
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3706

ग्रंथमाला

खंड एक
अंश पाच



REFBK-0024664

'विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्र' असं शीर्षक असलेल्या दुर्मिळ पुस्तकाचे मुखपृष्ठ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1985


3 NOV 1985

16 MAR 1986

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४


सं. वि. पुस्त.
संदर्भ जिवघ
३१०७
२२६६४
१६८८५





ग्रंथ मंडळ

खंड एक, अंश पाच



ग्रंथाली
अभिनव वाचक चळवळ

ग्रंथमाला : खंड एक, अंश पाच

प्रकाशक :
दिनकर गांगल, चिटणीस,
ग्रंथाली वाचक चळवळ
३४/९०२, नेहरूनगर
कुर्ला, मुंबई ४०००२४

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, टिळक रोड
पुणे ४११०३०

प्रसिद्धी : २० जून १९८५

© त्या त्या लेखकाचा

संपादक : दिनकर गांगल, वासंती मुझुमदार

संपादन सहाय्य : सतीश जकातदार

किंमत पंचवीस रुपये

राजीव साने / आमचे माहितीयुग / सकाळ / १
डॉ. राजीव जोशी / बुद्धिप्रामाण्यवादाची यथार्थता / आयुध / १४
माधव साठे / सामाजिक...ती विकृती; व्यक्तिगत...ती श्रद्धा / महाराष्ट्र टाइम्स / ३२
विनायक लिमये / इच्छामरणाचा हक्क हवाच ! / कोल्हापूर सकाळ / ३९
ना. नि. देशपांडे / दोन इक्षुमहर्षी / गोडवा / ४९
आशा मुंडले / भाषेतून दिसणारी स्त्री / साधना / ६३
रघुपती भट्ट / विष्णुशास्त्री चिपळूणकर / माणूस / ६८
मुकुंद निमखेडकर / पैठणी : सर्वाधिक किंमती वस्त्र / नागपूर पत्रिका / ८६
विजय सिन्हा / वास्तवात सुकलेला माणदेश / सकाळ / ८९
मनोहर कदम / शबय / स्त्री / ९४
जयंत गडकरी / शिवाजी : लोककल्याणकारी राजा / प्रकाशित पुस्तिका / १०७



आमचे माहितीयुग

राजीव साने

एक प्रचंड लाट येऊ घातली आहे. सुप्रसिद्ध उद्योगपती चंद्रकांत किर्लोस्कर यांनी आपला समाज आज 'तंत्रवैज्ञानिक युगाच्या उंबरठ्यावर' उभा असून हे नवयुग म्हणजे 'माहिती युग' असल्याचे चित्र रंगवले आहे, नव्या पंतप्रधानांनीदेखील आधुनिकीकरणाची घोषणा केली आहे. इतकेच नव्हे तर विज्ञान-तंत्रज्ञान खाते स्वतःकडे घेतले आहे. कॉंप्युटर या विषयावर जागोजागी परिसंवाद घडत आहेत. कंपन्या, बँका, आयुर्विमामंडळ व इतर संस्थांनी मोठ्या प्रमाणात यांत्रिक माहितीचा वापर सुरूही केला आहे. इंजिनिअरिंगचे विद्यार्थीच काय पण शाळेत 'मी कोण होणार' हा निबंध लिहिणारेही कॉंप्युटरची आवड असल्याचे सांगत आहेत. हार्ड-वेअर, विट वाईट, टर्मिनल हे शब्द सर्रास वापरले जात आहेत. एखादी विचारणा केली असता जिथे 'बघून सांगतो' असे उत्तर मिळायचे तिथे 'डेटा मागवलाय्' असे उत्तर मिळत आहे. पूर्वी हार्डवेअर म्हणजे खिळे, स्क्रू, रावळप्लग वगैरे अशी समजूत होती. आता त्या शब्दाला मोठा अर्थ आला आहे. (तो काय आहे ते ओघात येईलच.) या माहितीतंत्राची माहिती मात्र फारच कमी लोकांना जास्त आणि जास्त लोकांना कमी आहे. त्यामुळे स्वागत करणारे आणि धिक्कार करणारे असे तट पडले असले तरी दोन्ही प्रतिसाद हे काही धूसर प्रतिमांवर आधारलेले दिसतात. एक प्रतिमा कामधेनू-कल्पतरू छाप आहे, तर दुसरी राक्षस-सैतान छाप आहे. खरे काय

आहे ? या तंत्राचे समाजजीवनावर कोणकोणते परिणाम होतील ? याचा स्पष्ट उलगडा होण्यासाठी विविध क्षेत्रांत परस्परचर्चा होणे जरुरीचे आहे. प्रत्येक विषयातल्या तज्ज्ञांनी आपापल्या विषयापुरता विचार करून भागणार नाही. कारण माहितीतंत्र हा विषयच मुळात आंतरशाखीय (इंटरडिसिप्लिनरी) आहे आणि मुख्य म्हणजे हा विषय तज्ज्ञांच्या वर्तुळात बंदिस्त राहून अजिबात चालणार नाही. एकतर हा तांत्रिक बदल यापूर्वी आलेल्या बदलांपेक्षा प्रचंड झपाट्याने येतो आहे. त्याचे परिणाम जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होणार आहेत. कोणालाच त्याविषयी अंधारात राहून चालणार नाही. आणि या तंत्राशी तावडतोबीने संबंधात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना तर नाहीच नाही. भारतीय मजदूर संघाने एक मोठी स्वयंचलित यंत्रविरोधी परिषद नुकतीच संघटित केली होती. त्यावेळी दत्तोपंत ठेंगडी यांची ' प्रकट चिंतन ' नावाची पुस्तिका प्रसिद्ध झाली. त्यात माहितीतंत्राच्या विविध परिणामांवर मुद्दे उपस्थित केले आहेत. ए. आय. आय. इ. ए. या आयुर्विमा कर्मचाऱ्यांच्या संघटनेने देखील एक अभ्यास उपक्रम चालवला आहे. तरीही बहुतेक कामगार कार्यकर्त्यांत जी कॉंप्युटर-विरोधी भावना आहे, आणि ती अनेकदा बेकारी या एकाच मुद्द्यावर भर देणारी असते. कोणत्याही ऑटोमॅटिक मशिनरीमुळे आणि कॉंप्युटरमुळे बेकारी वाढतेच असे त्यांचे ठाम म्हणणे असते. खरे तर इतके साधे समीकरण मांडणे बरोबर नाही. बेकारी नेमकी कशामुळे वाढते आणि ती न वाढावी म्हणून कामगार संघटना काय करू शकतात याला कॉंप्युटर येऊ न देणे इतके सोपे उत्तर असू शकत नाही. या लेखात स्वयंचलितीकरण आणि बेकारी यांच्या संबंधांवर चर्चा करीत आहेच. दुसरे म्हणजे बेकारी हा मुद्दा पटकन् मनाची पकड घेणारा असल्याने माहितीतंत्राच्या इतर जबरदस्त भल्याबुऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष होते. कॉंप्युटरभोवती एक जादुई वलय असल्याने त्याविषयी स्पष्ट समज वाढणे आणखीनच अवघड होते. त्याकरिता हे जादुई वलय काढून टाकणे हे पहिले काम आहे. प्रथम बेकारीचा मुद्दा घेऊन नंतर कॉंप्युटर किंवा इतर तत्सम साधने काय असतात, कशी चालतात वगैरे जास्त तपशिलात मांडत आहे. पुढे इतर धोके व या तंत्राचा कसा उपयोग केला असता तो समाजहिताच्या आणि कामगारहिताच्या दृष्टीने योग्य ठरेल ते पाहू.

एखादे नवीन तंत्र आणल्यामुळे जर मुळात नोकरीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कमी करायचा प्रश्न आला तर कोणतीही कामगार संघटना अशा कामगार कपातीला निकराचा विरोध करील व तो केलाही पाहिजे. नवे उत्पादन सुरू करून किंवा वाढीव मागणी पुरवण्यासाठीच या वाढलेल्या उत्पादकतेचा उपयोग केला गेला पाहिजे. मुळात केलेली नेमणूक स्थिर मानूनच विस्ताराचे नियोजन केले पाहिजे. मात्र त्यासाठी कामांची पुनर्मांडणी आणि नवे प्रशिक्षण आवश्यक ठरेल. हे सर्व स्थित्यंतर घिसाड-घाईने किंवा मनमानीपणाने न करता कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन पद्धतशीरपणे

झाले पाहिजे. तसेच जर एखादे व्यवस्थापन औद्योगिक संबंधातले वर्चस्व टिकविण्यासाठी, कामगारांवर दडपण ठेवण्यासाठी, केवळ एक डावपेच म्हणून कामगारांना 'अनावश्यक' ठरवत असेल, असलेली उत्पादनक्षमता न वापरता लढ्यामध्ये बफर म्हणून पाडून ठेवत असेल तर अशा डावपेचांनाही आधुनिकीकरणाच्या बुरख्याआड लपू देता येणार नाही. तेव्हा मुळात असलेल्या कामगारांच्या कपातीला कामगार संघटना जो विरोध करतात, तो स्वाभाविक आणि स्वतःच्या प्रश्नातून उद्भवणारा असाच असतो. इथपर्यंत समाजातल्या एकूण बेकारीचा काहीही संबंध आलेला नसतो, पण जेव्हा कामगार-कपात होत नाही आणि तंत्राचे आधुनिकीकरण होते तेव्हाही उत्पादनाच्या विस्ताराच्या मानाने कामगार भरती वाढत नसते. अशा वेळी सामाजिक दृष्ट्या जागरूक असणाऱ्या कामगारांना प्रश्न पडतो की आपली नोकरी टिकत असली तरी समाजातल्या एकूण बेकारीत आपण भर तर टाकत नाही? आणि अशी आस्था असणे अत्यंत स्तुत्यच आहे. जेव्हा कामगार अशा प्रश्नात शिरतो, तेव्हा त्याला त्याची संस्था एकूण रोजगार निर्मितीमध्ये कोणकोणत्या बाजूने कसे व किती योगदान करते हे ठरविण्याची वेळ येते.

श्रमाची उत्पादकता प्रचंड वाढवून श्रमवंचत करणारी जी तंत्रे आहेत त्यांचे समर्थन करणारे लोक बेकारीच्या बाबतीत काही ठरावीक प्रतिपादन करीत असतात. अशा म्हणण्यांवर समर्पक उत्तर कामगार संघटनांजवळ नसते. एका प्रतिपादनाला इनपुट एंड आर्ग्युमेंट म्हणतात. म्हणजे असे की नव्या तंत्राला जे काही 'खाद्य' लागते ते पुरविण्यासाठी नवे जॉब तयार होत असतात. स्वयंचलित उपकरण चालवणारे, त्यांची निगा राखणारे काही कामगार प्रत्यक्ष कार्यस्थळी उरतातच, पण त्याबरोबर दूर कुठल्या तरी ऑफिसात बसून उपकरणात भरण्याची तथाकथित बुद्धी (?) कागदावर उतरवणारे कर्मचारीही आवश्यक होतात. म्हणजे उदाहरणार्थ, गजर लावून आपण झोपतो तेव्हा गजर वाजवणे हे आपणच करतो पण त्यावेळी मात्र 'उपस्थित' नसतो. गजर लावताना केलेले श्रमच तो वाजण्याचे वेळी फलद्रूप होत असतात.

त्याचप्रमाणे मशीन आपोआप चालताना जरी तिथे कोणी दिसत नसले तरी वेगळ्या वेळी व वेगळ्या ठिकाणी ते श्रम केलेले असतात. प्रोग्रॅमर किंवा तशा प्रकारचे नवीन कर्मचारी तयार होत असतात. पुन्हा ते मशीनही कोणी तरी बनवलेलेच असते. उदा. माहिती तंत्र व स्वयंचलित यंत्रे जशी आढळतात तसा इलेक्ट्रॉनिक उद्योग वाढत असतो. पण हे प्रतिपादन सहजपणे खोडून काढता येते. कारण असा अप्रत्यक्ष रोजगार व पुरवठ्याच्या उद्योगातला रोजगार हा मूळ संख्येपेक्षा साधारणतः कमी असतो. तशी प्रत्यक्ष पाहणीही उपलब्ध आहे आणि तर्काला हे पटेल की जर नव्या तंत्राला एकूण आतले व बाहेरचे धरून तितकेच कामगार लागत असते तर ते

व्यवस्थापनाला किफायतशीर पडलेच नसते. कारण अंतिम उत्पादनाच्या दर नगामागे होणारा श्रमखर्च कमी झालाच नसता. तेव्हां हे इनपुट एंड प्रतिपादन कच्चे आहे. मात्र दुसरे प्रतिपादन असे सरळ खोडून काढता येण्याजोगे नाही. ते आऊटपुटच्या बाजूने आहे. सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी ते अनेक व्याख्यानांतून केले आहे ते असे...जेव्हा पूल बांधला जातो तेव्हा नावाड्यांचा रोजगार जातो. पण दळणवळण वाढल्याने अनेक नवे धंदे सुरू होतात. त्याचे काय ? जेव्हा रेल्वे आली तेव्हा बैलगाडी व घोडागाडीचा रोजगार गेला पण एकूण रोजगार वाढला की नाही ? हा तर्क जवळजवळ सर्वच तंत्रवैज्ञानिक बदलांना लावता येतो. वाढीव उत्पादनाचा जेव्हा उपयोग केला जातो, तेव्हा नवीन श्रमाची मागणी तयार होत असते असे या प्रतिपादनाचे सूत्र आहे. विशेषतः भारतासारख्या देशात जिथे विकासाला भरपूर वाव आहे तिथे हे प्रतिपादन आणखीन् आकर्षक ठरते. कोणत्याही क्षेत्रातली वाढलेली उत्पादकता जर इतर क्षेत्रे विकसित करण्यासाठी वापरली गेली तर ती रोजगार निर्मितीला पूरक ठरू शकेल, पण खरी मेख या जर आणि तर मध्येच आहे. वाढीव उत्पादनाची जर उधळपट्टी झाली, अपव्यय झाला, चैनीच्या आणि दिखाऊगिरीच्या वस्तूमध्येच उपयोग झाला, शस्त्रांचे उत्पादन आणि समाज नियंत्रणाच्या व्यवस्थाच वाढत राहिल्या तर रोजगारनिर्मिती होणार नाही. तसेच उत्पादकतेच्या नादात भांडवलप्रधानता अफाट वाढत गेली तर एकूण उपयुक्त वस्तूपेक्षा साधनांचाच ढीग पडत जाणार नाही कशावरून ? तेव्हा हे आऊटपुट एंड प्रतिपादन सैद्धांतिक दृष्ट्या संभवनीय असले तरी त्याचा प्रत्यक्ष पडताळा कामगारांना समजेल अशा भाषेत कसा मिळणार ? उदाहरणार्थ, आयुर्विमा महामंडळातील कामगारांनी नेमकी कोणती मागणी करावी ? आयुर्विमा महामंडळाचे मुख्य प्रॉडक्ट वित्तभांडवल हेच आहे. (सुरक्षा हे साईडप्रॉडक्ट आहे !) जर तेवढेच कर्मचारी राहून अधिक वित्तभांडवल तयार होत असेल तर ते रोजगार निर्मितीसाठी सर्वांत उत्तम प्रकारे वापरले जात आहे की नाही हे तपासण्याचा आयुर्विमा कामगारांना अधिकार आहे का ? आणि तसा अधिकार मिळवला तरीही हे तपासण्याची पद्धस काय असेल ? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याखेरीज कामगारांचे समाधान होणार नाही. तेव्हा कॉंप्युटरमुळे बेकारी वाढते का ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे कॉंप्युटरमुळे उत्पादकता वाढते, पण वाढीव उत्पादनामुळे बेकारी वाढणार की कमी होणार हे मात्र राजकारणामुळे ठरते असे आहे. प्रत्येक आस्थापनेचा रोजगार क्षमता निर्देशांक काढणे, प्रत्येक गुंतवणुकीचा रोजगार निर्मिती निर्देशांक काढणे आणि त्यावरही वाटाघाटी करण्याचा हक्क कामगार संघटनांना मिळणे या राजकीय मागण्या केल्याखेरीज कामगार संघटनांना बेकारीवर परिणामकारकरीत्या काही करता येईल असे वाटत नाही. अर्थव्यवस्थेला नियंत्रित करणारी धोरणे ही वरून ठरत असतात. आणि त्यावर परिणाम

करण्याबाबत सामान्य माणूस हतप्रभ असतो. सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे. कॉंप्युटरच्या वापराबाबत साध्या 'बेकारी वाढेल' अशा चिंतेपेक्षा जास्त चिंताजनक बाब हीच आहे. सत्ता नावाच्या वस्तूचा एक महत्त्वाचा कच्चा माल 'माहिती' हा आहे. कॉंप्युटर्सच्या उपयोगातून सत्तेचे प्रॉडक्शन वाढण्याचा धोका हा सर्वांत मोठा आहे. तो कसा ते पहाण्यासाठी माहितीतंत्राच्या अंतरंगात शिरायचे आहे.

कॉंप्युटरला बुद्धी तर नसतेच आणि त्यात जादूही काही नसते. ते केवळ एक यंत्र आहे. पिठाच्या गिरणीत धान्याचे पीठ होते. तसेच कॉंप्युटरद्वारा माणूसच उपलब्ध माहितीचे उययुक्त माहितीत रूपांतर करीत असतो. आता प्रश्न असा पडतो की यंत्रात घालायला माहिती ही काय वस्तू आहे? प्रश्न खराच आहे. माहिती ही मुळातच जडवस्तूही नाही किंवा ऊर्जारूपही नाही. ती मुळात ज्ञानाच्या किंवा जाणिवेच्या स्वरूपाची असते. मग ती यंत्रात कशी घालतात? याचे उत्तर असे की यंत्रात घालण्यासाठी माहितीला मुळात वस्तुरूप यावे लागते. हे कसे घडते? एक नर्स पेशंटच्या नातेवाइकाला सांगत आहे 'पांढरी मोठी गोळी, तांबडी कॅप्सूल आणि पिवळी अर्धी गोळी सकाळी आणि दुपारी द्या; रात्री पिवळी संबंध आणि पांढरी छोटी द्या.' या प्रत्येक गोळीत काय रसायन आहे हे नर्सलाही माहिती नाही डॉक्टरला त्या रसायनाचे परिणाम माहिती आहेत. फॉरमॅकॉलॉजिस्टला ते कसे होतात यामागची प्रक्रिया माहिती आहे. डॉक्टरला पेशंटला झालेल्या रोगाची कारणे माहिती आहेत. नातेवाइकाला पांढरी केव्हा द्यायची, पिवळी केव्हा एवढेच माहिती आहे. पेशंटला देतील ती गोळी गटकन् गिळायची एवढेच माहिती आहे. प्रत्येक टप्प्यावर ज्ञानाचा एकेक तुकडा पडत आहे आणि तो तुकडा एकूण ज्ञानाच्या मानाने साधा सुटसुटीत होत आहे. एवढेच सध्या या उदाहरणावरून ध्यानात घेऊ या. दुसरे एक उदाहरण घ्या. एका स्वयंपाकघरात गृहिणीचा एकहाती कारभार आहे. तिथे तिला हे माहीत आहे की पूर्वाश्रमीच्या नेसकॅफेच्या डब्यात मिरे, लवंग, दालचिनी आहे. पूर्वाश्रमीच्या बोर्नव्हिटाच्या डब्यात रवा आहे. जऽऽरा जुनकट आणि ढिल्या झाकणाच्या स्टीलच्या डब्यात साखर आहे, इत्यादी. आता ती नोकरीला लागते आणि सकाळच्या स्वयंपाकाला बाई ठेवते. आता एका हाती कारभार होत नाही. बरेच गोंधळ होतात. शेवटी डब्यांची व्यक्तिमत्त्वे पुसली जाऊन त्यांवर रवा, चवळी, डाळीचे पीठ अशा चिठ्ठ्या लागतात. पाहा माहिती ही डोक्यातून बाहेर पडून वस्तूंना चिकटली! जर व्यक्तिनिरपेक्षपणे माहिती उपलब्ध व्हायची तर ती वस्तूवर चढवावीच लागते. एखादा कारखाना एकच शिफ्ट चालायचा तेव्हा लॉगबुक ठेवले जात नाही. दोन शिफ्ट सुरू झाल्या की नीट लिहावेच लागते. कारण दोन्ही शिफ्टचे सुपरवायजर जेव्हा एकत्र येतात तेव्हा एक हात धुऊन बस गाठण्याच्या गडबडीत असतो आणि दुसरा कॅंटिनपाशी रेंगाळत असतो. पहिल्या शिफ्टमध्ये काय 'पोझिशन' झाली आहे

हे त्याला कसे कळणार? एखाद्या जिन्याखालच्या लायब्ररीत, जिथे पाच दहाच मासिके (गेल्या महिन्यातली) मिळतात तिथे प्रश्नच नसतो पण काही लाख पुस्तके असलेल्या लायब्ररीत गेल्यास प्रत्येक पुस्तकाला दहा आकडी नंबर असतो. त्या नंबरावरून पुस्तकाचा पत्ता काढला (आणि पुस्तके जर नीट ठेवलेली असली) तर प्यूनलासुद्धा ते आणून देता येते. म्हणजेच कोणत्याही व्यवहारात श्रमविभागणी वाढली, आकारमान (स्केल) वाढले, आणि व्यक्तिनिरपेक्षपणे तो व्यवहार करायचा झाला की, ज्ञानाचे तुकडे होतात. ते स्वतंत्र होतात. त्यांना सांकेतिक लिपीत कुठल्या ना कुठल्या वस्तूवर खुणांच्या स्वरूपात उतरावे लागते. अशा ज्ञानालाच कॉम्प्युटरच्या संदर्भात 'माहिती' म्हणतात.

एखाद्या घरात पाटी असते श्री. अमुक तमुक आहेत/नाहीत. एका सरळपट्टीच्या सहाय्याने होत्याचे नव्हते करता येते. या सरळपट्टीला दोन अवस्था असू शकतात. आणि प्रत्येकीला आपण एकेक अर्थ चिकटवलेला असतो. पट्टीला हार्डवेअर (जडवस्तू), अवस्थेला सॉफ्टवेअर (व्यूह) आणि अर्थ चिकटविण्याला कोड असे म्हणता येते. आकडे फिरवून उघडता येणारे कुलूप आपण पाहिले आहे. या कुलुपातच अशी रचना असते की त्याची तीनही चाके एकमेकांशी ठराविक कोनांत आली की ते उघडेल. ती विशिष्ट अवस्था आकड्याने ओळखण्यासाठी सर्व कोनांना आकडे देऊन ठेवलेले असतात व कळीची संख्या मालकालाच माहीत असते. अशा किल्लीला सॉफ्टवेअर किल्ली असे म्हणता येईल. शाळेतल्या विज्ञान प्रदर्शनात न चुकता हजेरी लावणारे एक खेळणे म्हणजे ब्रेनो. जोड्या लावा टाइपाचा एखादा शब्दसमूह आतून वायरींनी जोडलेला असतो. राज्ये आणि राजधान्या असा खेळ असेल तर एक काडी महाराष्ट्रावर आणि दुसरी मुंबईवर ठेवली तरच दिवा लागतो. या ठिकाणी दोन माहितीकणांमधल्या अन्योन्यसंबंधाची वायर जोडलेली असणे अशा स्वरूपात प्रतिकृती तयार केलेली असते. एखाद्या प्रेस मशीनमध्ये कामगाराचा हात सापडू नये म्हणून एकाऐवजी दोन स्वीच ठेवलेले असतात. दोन्ही हात मशीनमधून बाहेर काढलेले असतानाच ते चालू होऊ शकते. कारण हे दोन स्वीच एकापुढे एक जोडलेले असतात. एक जरी ऑफ असला तरी मशीनला करंट मिळत नाही. या ठिकाणी मशीन सुरू होण्याची पूर्वअट या दोन स्वीचच्या रचनेमुळे वस्तुरूपात आली आहे. या ठिकाणी मशीनची हालचाल नियंत्रित केली आहे. पण अशाच स्वीचच्या रचना वापरून माहितीही काढता येते. उदा. एका फॅक्टरीत पगार हजाराच्यावर गेलेले ब्ल्यु कॉलर्ड कामगार किती असे काढायचे असले तर ब्रेनोसारखीच एक रचना करता येईल. प्रत्येक कामगारासाठी एक सर्किट–दोन स्वीच आणि दिवा असलेले. तीन माणसांनी हे काम करायचे आहे. एकाला फक्त ब्ल्यु कॉलर्ड कोण आणि व्हाईट कॉलर्ड कोण एवढेच माहीत आहे. एकाला फक्त पगार माहिती आहे.

तिसऱ्याला फक्त मोजता येते. पहिल्याने ब्ल्यु कॉलर्ड असेल त्याबाबत एक नंबरचा स्वीच दाबायचा. तिसऱ्याने किती दिवे लागले ते फक्त मोजायचे. आपोआप उत्तर तयार होईल. या उदाहरणात हे काम जास्तच कटकटीचे झाले आहे असे वाटेल. पण हे काल्पनिक उदाहरण आहे. यातला मुद्दा इतकाच की स्वीचेस्च्या रचनेत दोन पूर्वअटी एकाच वेळी पूर्ण होतात की नाही हा विचार प्रतिबिंबित करता येतो. व्होल्टेज वाढल्यावर आपोआप ऑफ होणारा स्वीचही तुम्ही पाहिला असेल. विजेच्या करंटनेच स्वीचही चालू बंद होऊ शकतो. त्या स्वीचने दुसरा स्वीच अशी मालिकाच जोडता येते. अशा एकमेकांमुळे चालूबंद होणाऱ्या स्वीचेस्ची विशिष्ट रचना हे कॉंप्युटरमधल्या 'तर्काचे' हार्डवेअर असते. स्वीचेस्च्या अवस्था तात्कालिक असतात. तसेच टिकाऊ स्वरूपाची जुळणीही करून ठेवता येते. ही जुळणी मुद्दाम कोणीतरी बदलेपर्यंत तशीच राहाते. कॅसेटवर गाणे आपण रेकॉर्ड करतो तेव्हा त्यातील टेपवर त्या गाण्याचा परिणाम उमटवून ठेवतो. अशाच प्रकारे कॉंप्युटरमध्येही टिकाऊ स्वरूपाच्या खुणा शिल्लक ठेवणारे जे घटक असतात. त्यांना मेमरी (स्मृती) म्हणतात. या सर्व तंत्रात माहिती ही सांकेतिक पद्धतीने वस्तुरूपात आणणे आणि माहितीवर करण्याच्या तार्किक प्रक्रियाही यंत्राच्या रचनेत प्रतिकृतीच्या रूपात आणणे ही पद्धत आहे.

"...मग कॉंप्युटर तुम्हाला सांगेल की काय करावे..." असे शब्दप्रयोग कॉंप्युटरविषयक साहित्यात वारंवार केले जातात. अशातून उगाचच कॉंप्युटरला माणसासारखे व्यक्तित्व चिकटवले जाते. पन्नास वर्षांपूर्वी रेडियो गात आहे असा शब्दप्रयोग सहजच होत असे. आता त्यातला मूर्खपणा सर्वांनाच माहित झाला आहे. कॉंप्युटर नवीन आहे आणि विशेष म्हणजे विचार करणे या खास माणसाच्या क्षमतेसारखी दिसणारी यंत्रणा त्यात आहे. त्या भोवती अधिकच गूढ निर्माण होत आहे. शिवाय निर्जीव वस्तूंवर 'आत्मा' लादण्याची सवयही तशी जुनीच आहे. वरुणाचा कोप झाला, धरतीमाता प्रसन्न झाली हे आजच्या भाषेत अलंकार म्हणून शिल्लक असले तरी एकेकाळी लोकांना खरोखरच तसे वाटायचे हे लक्षात घेण्यासारखे आहे. एका ग्रामोफोन कंपनीने पहिल्यावहिल्या ग्रामोफोनकडे टक लावून बघणारा एडिसनचा कुत्रा हे चिन्ह म्हणून घेतले आणि कंपनीचे नावही ठेवले 'हिज मास्टर्स व्हॉईस.' जेव्हा यंत्राकडून आदेश किंवा सूचना मिळायला लागतात तेव्हाही पक्के समजावे की हा त्याच्या मालकाचा आवाज आहे. आवाजाची ध्वनिमुद्रिका होणे हे आज आपल्याला अद्भूत वाटत नाही. पण बुद्धीचे यांत्रिकीकरण हा मात्र चमत्कार वाटतो. कारण यामागेही एक गैरसमज आहे. मानवी बुद्धीचे खऱ्या अर्थाने कधीच यांत्रिकीकरण होऊ शकत नाही. बुद्धीच्या एकाच अंगाचे, एकाच घटकाचे वैशिष्ट्य हे यंत्राने घालता येते. हा घटक कोणता हे नेमके ओळखण्यासाठीच कॉंप्युटरच्या

रचनेत शिरायचे आहे.

ध्वनिमुद्रिकेवर अनेक व्रणांचा एक चक्रव्यूह असतो. तो मूळ ध्वनीचा आलेख असतो. कार्डियोग्राममध्ये जसा वाद्याच्या ठोक्यांचा आलेख काढला जातो तसाच हा प्रकार आहे. रेकॉर्डवरचे खाचखळगे म्हणजे एकप्रकारचा शिलालेखच असतो. मात्र हा शिलालेख वाचता येत नाही. तो ध्वनीत उलटवता येतो. त्यावरून फिरणाऱ्या पिनला जी थर थर मिळते तिथेच आधी इलेक्ट्रिक करंटमध्ये आणि मागाहून ध्वनित रूपांतर घडत असते. या शिलालेखालाच रेकॉर्डची भाषा असे म्हणता येईल. या आधी आपण पाहिले की, स्वीचच्या ऑन आणि ऑफ अशा अवस्थांना हो आणि नाही असा अर्थ देता येतो. कॉंप्युटरमध्ये स्वतः चालू–बंद होत एकमेकांनाही चालू–बंद करणाऱ्या लाखो स्वीचेस्चा एक व्यूह असतो. या व्यूहाच्या निरनिराळ्या टोकांवर चालू-बंद-चालू-बंद अशा अवस्थांचा एक संच उपलब्ध होतो. त्यांना एक आणि शून्य असे संबोधले जाते. व्यूहाच्या एका टोकावर उदाहरणार्थ (०००० ।। ।।) असा संच दिला तर दुसऱ्या टोकावर उदाहरणार्थ (०।०।०।०।) असा संच मिळू शकतो. अशा संचांना एकेक शब्द, आकडा, चिन्ह मानून त्याप्रमाणे रचना करून ठेवली जाते. शून्य-एक च्या भाषेला 'मशीन लँग्वेज' म्हणजे यंत्राची भाषा म्हणतात. आपली नेहमीची भाषा म्हणजे इंग्लिश, मराठी, किंवा चित्रे, आलेख वगैरे आणि ही यंत्राची भाषा या दोन्हीच्या मध्ये काही सांकेतिक भाषा असतात. त्यांनाच फोर्ट्रान, कोबोल, अलगॉल वगैरे नावे आहेत. कॉंप्युटर प्रोग्रॅमिंगच्या अभ्यासक्रममध्ये या भाषा शिकवतात. कॉंप्युटर उत्पादकानेच मूळ यंत्रातच भाषांतराची आणि सुयोग्य व्यूहरचना घडावी याची जी सोय करून ठेवलेली असते, त्याला सिस्टिम सॉफ्टवेअर म्हणतात.

विशिष्ट प्रश्न सोडविण्यासाठी यंत्र सुसज्ज करताना ज्या सूचना प्रोग्रॅमर देतो त्यांना प्रॉब्लेम सॉफ्टवेअर म्हणतात आणि त्या प्रश्नांची जी मुळात उपलब्ध झालेली माहिती पुरविली जाते तिला डेटा असे म्हणतात. उत्पादनाच्या यंत्रात जसे डिझाईन (मूळ रचना), सेटिंग (सुसज्जीकरण) आणि ऑपरेशन (कच्चा माल घालून मशीन चालवणे) हे टप्पे असतात तसेच हे टप्पे आहेत. यामध्ये यंत्र विचार करीत नसते. विचार हा सॉफ्टवेअर/हार्डवेअर डिझाईनर लोकांनी आधी करून ठेवलेला असतो. यंत्र फक्त त्यांनी जोडून ठेवलेल्या आकृतिबंधानुरूप निर्जीवपणे हालचाली करत असते. पूर्वी या हालचाली चाके, तरफा, खटके अशा जड वस्तूमध्ये घडवल्या जायच्या. नंतरच्या काळात विद्युत चुंबकीय स्वीचेसूनी त्यांची जागा घेतली. हल्ली सिलिकॉन या धातूमध्ये असलेला एक खास गुणधर्म वापरून या हालचाली घडत असतात. ह्या धातूत दुसऱ्या धातूची किंचित भेसळ केली असता हा धातू विद्युत्-प्रवाहाला खूप विरोध करणारा किंवा सहज वाहून नेणारा असे दोन गुणधर्म दाखवतो

आणि विशेष म्हणजे हे गुणधर्म बदलणे देखील विद्युत् प्रवाहाच्या परिणामाने घडू शकते. या धातूच्या लहानशा वडीवर (चिप) प्रचंड मोठे व गुंतागुंतीचे सर्किट फोटोग्रॉफिक पद्धतीने सूक्ष्म स्वरूपात उमटवता येते. एका वडीवर असा लहानसा कॉम्प्युटर उमटवला असता त्याला मायक्रोप्रोसेसर म्हणतात.

टाकीतून पाणी वाहून जाऊ नये म्हणून बॉलकॉक बसवलेला असतो. पाण्याची पातळी वाढण्यामुळेच हा चेंडू वर उचलला जाऊन नळ बंद होतो. याऐवजी तिथे एक माणूस बसवला आणि त्याला सांगितले पाणी भरलेले दिसताच नळ बंद कर, तरीही तेच काम होईल. पाणी वाया जाऊ नये ही इच्छा आणि त्यामागची भावना ही त्या माणसाची नसली तरीही तो केवळ आज्ञापालन म्हणून हे काम यांत्रिकपणे करू शकतो. त्याच्या कृतीमध्ये पाणी मूल्यवान आहे अशी मूल्यभावना नसूही शकते. त्याला आदेश देणाऱ्याने खरा विचार केलेला आहे. हा मात्र घालून दिलेल्या निकषानुसार फक्त वागतो आहे. आणि म्हणूनच त्याची जागा बॉलकॉक घेऊ शकतो. 'ब्रेड जळू नये म्हणून दोन मिनिटांत टोस्टर बंद व्हावा.' असा विचार आपण करतो. ऑटोमॅटिक टोस्टरला ब्रेड जळू नये अशी इच्छा किंवा भावना कधीच नसते. फक्त वरील विचारांचा कार्यवाहीवजा-भाग म्हणजे दोन मिनिटांत बंद होणे एवढाच गुण त्याच्यात घालता येतो. थोडक्यात विचारांमध्ये येणाऱ्या निरनिराळ्या निकषांचे यांत्रिकीकरण होऊ शकते. पण हे ठरविणारी मूल्ये ही मात्र अपरिहार्यपणे मनुष्याच्याच अंतर्यामी वसत असतात. कारण मूल्ये ही भावनांपासून बनलेली असतात. अनुभवणे, जाणवणे, त्यावर इच्छा निर्माण होणे, त्यासाठी कृती करणे हे माणसाचे वैशिष्ट्य कधीच यंत्रात जात नाही. पाणी वाहून जाऊ नये यासाठी आपण बॉलकॉक बसवतो, पण बॉलकॉक मात्र पाण्याची पातळी वाढल्यामुळे ऑपरेट होतो. या साठी आणि मुळे मध्ये खरा फरक सामावलेला आहे. यंत्राच्या हालचालींना कार्यकारणांची मालिका असते पण उद्दिष्ट, हेतू, प्रयोजन, इच्छा हे कधीच असू शकत नाही. मानवी विचारातही एक पैलू यांत्रिक असतो. कार्यवाहीवजा (Procedural) पैलूचे बाह्य रूप (form) याचीच प्रतिकृती यंत्रात उभारता येते. जे मुळात यांत्रिक आहे त्याचेच यांत्रिकीकरण होते.

कॉम्प्युटरच्या वापराला आजच्या युगात प्रचंड वाव तयार होण्यामागे बहुतेक श्रमप्रकारांना कार्यवाहीवजा, यांत्रिक स्वरूप मुळात आलेले असणे हे प्रमुख कारण आहे. प्रथम कॉम्प्युटरचा गणिती हत्यार म्हणून केला जाणारा उपयोग आणि प्रशासकीय, व्यवस्थापकीय उपयोग यांना स्पष्टपणे वेगळे काढले पाहिजे. खगोलशास्त्र अंतराळविज्ञान, अणुशास्त्र यांसारख्या कामांमधील गणितं ही इतकी अवघड व लांबलचक असतात की ती माणसाने करीत बसणे हे केव्हाही महागात पडेल. त्या ठिकाणी कॉम्प्युटर हा श्रमांना मदत करून अधिक परिणामकारक बनवणारे साधन

म्हणून येतो. आपला खरा विषय हा प्रशासकीय व व्यवस्थापकीय उपयोग हा आहे. कारण त्यात औद्योगिक समाजाच्या रचनेत परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य आहे. हा उपयोग कसा केला असता समाज जॉर्ज ऑरवेलच्या १९८४ कडे जाईल आणि कसा केला असता अधिक मानवीपणाकडे जाईल हा खरा प्रश्न आहे. प्रशासकीय, व्यवस्थापकीय माहितीचा जन्म श्रमविभागणीतून होत असतो. श्रमविभागणी जितकी जास्त तितकी हाताळावी लागणारी माहिती जास्त असते. सामाजिक पातळीवर एकेका उद्योगाचे केंद्रीकरण होऊन एक कारची श्रमविभागणी होत असते, एकेका कारखान्यात किंवा संस्थेत निरनिराळी कार्ये वेगळी निघत असतात. कारखाना जेवढा मोठा तितकी डिपार्टमेंट जास्त ! प्रत्येक कार्यातही अनेक श्रमप्रकार आणि त्या श्रमप्रकारात एकेका टप्प्यावर करण्याची कार्ये वेगवेगळ्या माणसांकडे असतात. यात श्रमविभागणी अधिकार श्रेणीची उतरंड मिसळलेली असते. एका टोकाला पूर्णपणे सांगितलेले काम करणारे तर दुसऱ्या टोकाला संस्थेचा समग्र विचार करून धोरणात्मक निर्णय घेणारे लोक असतात. या असंख्य कामांचे सुसूत्रीकरण करून ती एकमेकांस पूरक कशी ठरतील हा व्यवस्थापनाचा सर्वांत मोठा प्रश्न असतो. उत्पादनातील सर्व घटकांची मोजदाद करणारी माहिती या प्रत्येक कार्यस्थळातून लोंढ्यासारखी बाहेर पडत असते. या सर्व रचनेमुळे वस्तूवर प्रक्रिया करणाऱ्या प्रत्यक्ष श्रमिकांच्या मानाने माहितीवर प्रक्रिया करणाऱ्या अप्रत्यक्ष श्रमिकाची संख्या जास्त वाढत आलेली आहे. या विविध स्थानांवर काम करणारा माणूस हा संघटनेच्या व्याख्यांवरहुकूम कळसूत्री बाहुलीप्रमाणे चालत राहील हे अशक्यच आहे. त्याचे मूड, हितसंबंध, गट-उपगट, आवडी-निवडी जीवनमूल्ये, मते, आकांक्षा या सर्व गोष्टीसहच तो संघटनेत उतरत असतो. यातूनच वरिष्ठ व्यवस्थापकांना हवी ती महिती हव्या त्या स्वरूपात जशीच्या तशी आणि वेगाने पोहोचणे भयंकर अवघड झालेले असते. म्हणून वरिष्ठ व्यवस्थापक हे कॉम्प्युटरच्या झटकन् प्रेमात पडतात.

एका मोठ्या क्षमतेच्या कॉम्प्युटरची अनेक तोंडे (टर्मिनल) प्रत्येक खात्यात बसवणे आणि प्रत्येक ठिकाणी घडणाऱ्या व्यवहाराची नोंद त्या त्या तोंडावर करणे ही डेटा बेस पद्धत म्हणून ओळखली जाते. एखादा माल स्टोअरमधून काढला गेला की तो प्रॉडक्शनमध्ये मोजला जाणे, स्टोअरमधून वजा होणे, अकाऊंटवर तितकी रक्कम खर्ची पडणे, परचेसकडे तितकी मागणी नोंदवली जाणे इतकेच काय पण जर कार्यक्षमता निगडित वेतन पद्धती असेल तर स्टोअरकीपरच्या नावे तेवढे पुण्य जमा होणे यासकट सर्व गोष्टी एकाचवेळी घडू शकतात. एखादी ऑर्डर कॅन्सल झाली की कामाचे वेळापत्रक कसे बदलेल याचे तावडतोब गणित होऊन त्या त्या खात्याला बदललेले वेळापत्रक पाठवणे शक्य होते. जितका वरचा अधिकारी तितका त्याला तपशिलात कमी रस असतो. त्याच्याकरिता माहितीचा गोषवारा काढून हवा असतो.

विशिष्ट निर्णयाला उपयुक्त ठरेल एवढीच माहिती वेगळी काढून हवी असते, माहितीच्या एकूण साठ्याकडे हव्या त्या अंगाने बघण्याची सोय यात होत असते.

अनेक कॉंप्युटर एकमेकांना जोडले जाणे हा यापुढचा टप्पा आहे. दूरसंदेश वहनाची माध्यमे देखील तितकीच प्रगत होत असल्याने ते हळूहळू शक्य होत आहे. हेड ऑफिसमध्ये बसून कंपनीच्या सर्व शाखांवर नजर टाकणे शक्य होत आहे. इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहार आणि सॉफ्टवेअर चलन म्हणजे रक्कम कॉंप्युटरद्वारा पाठवणे हे शक्य होत आहे.

माहिती तंत्राचे काही दुष्परिणाम हे स्थित्यंतराच्या काळातील गोंधळ अशा स्वरूपाचे असतात. जाहिरातबाजीला भुलून, घिसाडघाईने यंत्रे विकत घेणे, लोकांना योग्य प्रशिक्षण न दिल्याने संघटनेच्या गरजा कॉंप्युटरवाल्यांना व त्यांच्या अडचणी इतरांना न समजणे. दिखाऊगिरीसाठी कॉंप्युटरचा प्रिंटर म्हणून उपयोग करणे. कॉंप्युटरच्या 'प्रवृत्ती'ला जुळणारी माहिती त्या तऱ्हेनेच काटेकोरपणे नोंदण्याची सवय नसणे (डेटा डिसिप्लिन) या सर्वांतून कॉंप्युटरचा वापर केवळ नफ्याचा विचार केला तरीही तोट्यातच आढळतो आहे. यामुळे मक्तेदारी कंपन्यांकडे पांढरा हत्ती म्हणूनच बघितले जात आहे. परंतु स्थित्यंतराच्या काळातील घोळ हेच मुख्य प्रश्न म्हणून पाहिले तर खऱ्या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होईल.

कॉंप्युटरमुळे माहिती उपलब्ध होण्याचा वेग जास्त वाढतो. सध्याच्या समाजरचनेत माहितीचा प्रवाह हा खालून वर आणि आदेशाचा प्रवाह हा वरून खाली असा वहात असतो. बहुसंख्य लोक निर्णय-प्रक्रियेतून वगळले जात असतात. जर याच रचनेला पूरक असा कॉंप्युटरचा उपयोग झाला तर ही तफावत अधिकच वाढत जाणार आहे. अनेक लोकांची जीवने काही मोजक्या लोकांच्या हातात असणे हे नको ते परिवर्तन घडण्याचा धोका आहे. विशेषतः सांकेतिक भाषा वाढत गेल्याने बरेचसे ज्ञान हे कॉमनसेन्सच्या कक्षेबाहेर जात रहाणार आहे. त्यामुळे बऱ्याच लोकांना आपले मत व्यक्त करणे सोडाच पण बनवण्याचीही संधी मिळणार नाही. अंमलदारशाही (ब्युरॉक्रसी) आणि विशेषज्ञशाही (टेन्क्रोक्रसी) वाढत जाईल. विनिमयामध्ये जसे पैसा या माध्यमामुळे विनिमय करणाऱ्यांचा चेहराच हरवला जातो तसेच या माहितीतंत्राच्या माध्यमामध्ये श्रमाचाही चेहरा हरवण्याची मोठी शक्यता आहे. तसेच प्रत्येक श्रम हे निर्जीव माहितीतून एकमेकांशी जोडले जातानाच श्रमिक एकमेकांपासून तुटले जाण्याची व एकाकीपणे आपापले योगदान करणारे भाग बनण्याची प्रक्रिया घडू शकेल. एक सॉफ्टवेअर डिझाईनर सांगतो. "मी रूबिक्स फिरवल्यासारखे अर्थहीन खुणांशी खेळत आहे, असे वाटते. कोडी सोडवल्याने बुद्धिचातुर्याची हौस भागून जी धुंदी येते तशा धुंदीपायी मी प्रचंड काम करत राहतो. पण मला हेही माहीत नाही की माझी फंक्शन्स क्षेपणास्त्रांसाठी आहेत, औषधोप-

चारांसाठी आहेत की व्हिडिओ गेम पार्लरमध्ये तशाच एका खेळात वापरली जाणार आहेत." माहितीयुगातल्या माहितीचे 'माहिती' पण हे ती कशाची आहे हे कोणालाच माहिती नसण्यात असणार आहे काय? या युगाचा दुसरा धोका म्हणजे व्यावसायिकतावाद (प्रोफेशनॅलिझम). यात व्यवसायाने घालून दिलेली उद्दिष्टे ही आंधळेपणाने योग्य मानून माणूस त्या चौकटीपुरताच विचार करीत राहतो. साध्य-विवेक आणि मूल्यविवेक यांची फारकत होत जाते. 'कर्मचारी' असताना 'नागरिक' नसणे हे अधिकच वाढते. निरनिराळ्या व्यवहारांचे गुणात्मक मूल्यमापन करण्या-ऐवजी संख्यात्मक विक्रम मोडत जाणे हे वेड तयार होते. जे आकड्यात मोजता येते ते सत्य आणि बाकी सर्व भावडेपणा अशी धारणा बनत जाते. लोकातील सर्जन-शीलतेचा, तर्कात न बसणाऱ्या शहाण्या प्रतिभेचा उपयोग होणे थांबू शकते.

अर्थात माहितीतंत्रामुळे फक्त दुष्परिणामच होतील असे म्हणता येणार नाही. त्याने संदेशवहनाची आणि माहितीची छाननी करण्याची क्षमता वाढवली आहे. उपयोग काय दिशेने केला जातो यावर सर्व अवलंबून आहे. स्ट्रॅफोर्डबीअर या तज्ज्ञाने चिलीमध्ये द आयेंदे सरकारने केलेल्या एका अभिनव प्रयोगावर अहवाल दिला आहे. उद्योगांच्या व्यवस्थापनात व आर्थिक धोरणात लोकांचा सहभाग वाढतो असा दृष्टिकोन या सरकारचा होता. या प्रयोगात कॉंप्युटर टर्मिनल्समधून लोकांना माहिती उपलब्ध व्हावी अशी उलट सोय केली होती. यामुळे एखाद्या कारखान्यातील सामान्य कामगारालादेखील चिलीत इतरत्र काय घडते आहे हे कळावे असा प्रयत्न होता. कॉंप्युटरला रिपोर्ट देताना त्यावर मतही देण्याची सोय करण्याचा प्रयत्न होता. नेहमी कोणत्याही एका घटकाबद्दल "काय आहे" एवढेच कळवले जाते. वरील प्रयोगात वस्तुस्थिती, शक्यता आणि आकांक्षा अशा तीन तऱ्हांनी माहिती मागवली होती. गेल्या आठवड्यात आमच्या कारखान्यात झालेले अपघात, भांडणे, खोळंबा, तुटवडा, मोबदला, सोयी, उत्पादन, मागणी या सर्वच बाबतींत जागोजागी घड्याळे बसवली होती. त्यावर अर्ध्या भागावर दुःखी बाजू आणि अर्ध्या भागावर सुखी बाजू असे लिहिले होते. गटागटाने एकमतावर येऊन काटा फिरवून ठेवायचा अशी योजना होती. यामुळे प्रत्यक्ष कार्यस्थळावर जिवंत सहवास आणि अभिरुचीपूर्ण श्रम होऊ शकत होतेच. पण त्याचबरोबर घोरणांमध्ये लोकमत व्यक्त होणे हे थेटपणे शक्य होत होते. ही पद्धत रुळेपर्यंतच दुर्दैवाने आयेंदेची हत्या होऊन हे सरकार उडवले गेले. नाहीतर लोकशाही उत्पादन पद्धतीचे एक उत्तम उदाहरण जगाला मिळाले असते. आजची लोकशाही ही प्रातिनिधिक आहे. प्रत्यक्ष ठरावांवर संबंधिताचे मत घेणे हे इतके दिवस तांत्रिकदृष्ट्या अशक्य होते. कॉंप्युटरमुळे ते शक्य झाले आहे. त्यामुळे प्रतिनिधीकडे व नेतृत्वाकडे सत्ता एकवटण्याला पायबंद घालणे व प्रत्यक्ष निर्णयात लोकांचा सहभाग वाढवणे हे तांत्रिकदृष्ट्या शक्य झाले आहे.

याबरोबर इतर अनेक नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. आतापर्यंत सर्व जमाखर्च हे फक्त पैसा या एकाच परिमाणात होत होते. कारण नफ्याची प्रेरणा ही एकच प्रेरणा प्रभुत्वस्थानी होती. माहितीतंत्राच्या प्रगतीबरोबर इतर परिमाणेही जमाखर्चात आणणे शक्य होईल. उदाहरणार्थ परिसराचे रक्षण व ऊर्जासंपत्तीचा उचित वापर या गोष्टींचीही मोजदाद घेता येईल. रोजगारक्षमता कुठे व कशी निर्माण होईल व त्यासाठी प्रशिक्षणाच्या योजना कशा आखता येतील याबरही नेमके नियोजन शक्य होईल. एखाद्या प्रकल्पाचे मूल्यमापन करताना त्याच्या सामाजिक फायद्यातोट्यांचा जो ताळेबंद मांडावा लागतो (सोशल कॉस्ट अँड बेनिफिट अॅनॅलिसिस) त्यात सर्व गोष्टी पैशात रूपांतरित करून घेणे अशक्यच असते. म्हणूनच बहुपरिमाण जमाखर्चांची गरज जाणवू लागली आहे.

नियोजनासाठी केंद्रीकरण अपरिहार्य होते पण नव्या संदेशवहनामुळे विकेंद्रीकणरही शक्य आहे. उदा. शेतकऱ्यात एखादे पीक लावण्याची लाट आली की ते एकाच पिकाच्या मागे लागतात. आणि त्या पिकाचे भाव इतके पडतात की ते फेकून द्यावे लागते. जर प्रत्यक्ष ग्रामपंचायतीत माहिती उपलब्ध झाली तर मी टोमॅटो लावावा काय असा प्रश्न घेऊन शेतकरी तिथे जाऊ शकतो आणि आधीच बऱ्याच जणांनी लावला आहे अशी माहिती मिळाल्यास तो निर्णय बदलू शकतो. त्याचबरोबर त्याने बटाटा लावल्याचा निर्णयही इतरांसाठी फीड करून परत जाऊ शकतो. ऑन लाईन म्हणजे ताजी माहिती परस्परांना देण्याने कोणीतरी 'वरून' नियंत्रण करण्याची गरज कमी होत असते.

माहितीतंत्राला समाजभिमुख वळण देण्याची व श्रमजीवनाचे दरिद्रीकरण रोखण्याची दिशा घेणे गरजेचे आहे. माहितीतंत्र सरसहा फेटाळून लावणे अवघड आहे. माहिती उपलब्ध होण्याची अनेकांना संधी मिळणे, ज्ञानाची कॉमनसेन्सपासून कमी फारकत होऊ देणे, माहितीचा प्रवाह हा सत्ताकेंद्राकडेच न वहाता परस्परांकडे वहाणे (Horizontal communication), निर्णयप्रक्रियेत थेट सहभागाचे मार्ग विकसित करणे, उद्योगाची उद्दिष्टे विस्तारण्यासाठी त्यांचे मूल्यमापन बहुपरिणाम पद्धतीने करणे, विकेंद्रीकरणासाठी त्याचा उपयोग करणे या दिशांनी प्रयत्न व्हावेत. यासाठी माहितीतंत्रातील गुप्तता नष्ट करून ते सर्वांपर्यंत पोहोचवणारे शिक्षण व जागृती ही पहिली पायरी आहे. आणि उच्चतर उद्दिष्टांबरोबरच रोजगार निर्मितीची शाश्वती मिळवणे हे तर प्रथम आवश्यक ठरेल.

(रविवार सकाळ, पुणे १३, २० जानेवारी १९८५)

बुद्धिप्रामाण्यवादाची सर्वकालीन यथार्थता

डॉ. राजीव जोशी

बुद्धिप्रामाण्यवाद हा विषय अध्यात्माइतकाच अवघड व गहन आहे. त्यातून अध्यात्मात भावनेला आवाहन असते. गुरुने अनुभूती झाली म्हटली की मामला खतम. बुद्धिवादात शंका–उपशंकांना पूर्ण वाव द्यावयाचा असतो. आणि त्या वादाची सर्वकाल असणारी यथार्थता पटवून द्यायचे अवघड काम मला करावयाचे आहे

गेल्या शतकातील समाजसुधारक असे मानीत असत की, शिक्षणाचा जसजसा प्रचार होईल, तसतसा धर्मभोळेपणा नाहीसा होईल; अंधश्रद्धा, जुन्या टाकावू रूढी नष्ट होतील. समाजाच्या प्रगतीच्या आड येणाऱ्या चालीरीती सोडून दिल्या जातील. परंतु आपल्या देशातील एकंदर परिस्थिती पाहिली तर ही आशा फोल ठरल्याचे दिसते.

शिक्षणाचा प्रसार वाढला, उच्च शिक्षणाची व्याप्ती वाढली तरी अंधश्रद्धा कमी झालेल्या दिसत नाहीत. याचे एक कारण असे आहे की, सर्वजण आपली लोकप्रियता कमी होऊ नये म्हणून लोकांना प्रिय तेच बोलतात, त्यांच्या भावनांना जराही धक्का लागू नये म्हणून काळजी घेतात आणि त्यांच्या अंधश्रद्धांवर हल्ला करण्याचे टाळतात व या कृतीच्या समर्थनार्थ लोकमान्य टिळकांचा दाखला देतात.

त्यावेळी लोकमान्य टिळकांनी सुधारणांना पाठिंबा दिला नाही व लोकानुनय केला. कारण त्यांच्या डोळ्यापुढे राजकीय स्वातंत्र्याचे ध्येय होते आणि ह्या स्वातंत्र्य-

लढ्यासाठी सैनिक जमवावयाचे होते. आज आपल्यापुढे लोकजागृती, लोकशिक्षण आणि सर्वांगीण उन्नती हे ध्येय असावयास हवे. म्हणून आज आपण लोकमान्य टिळकांच्या मार्गाने जाऊ शकत नाही. सर्व ज्ञान लोकांपुढे परखडपणे ठेवण्याची गरज आहे.

आपल्यापुढील असणाऱ्या प्रश्नांची सर्वांना जाणीव आहेच. त्यांची व्याप्ती काय, स्वरूप काय, त्यामागे काय कारणे आहेत, आणि समस्यांची उकल करण्यासाठी आपल्याला काय करता येईल हे पाहण्यापूर्वी 'बुद्धिप्रामाण्यवाद' म्हणजे काय ते पाहू.

इतर प्राण्यांच्या तुलनेने, मनुष्याच्या जीवनात वेगळेपणा दिसून येतो. सभोवतालच्या परिस्थितीला संपूर्णपणे शरण न जाता, निसर्गाचे रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न मनुष्याने केला. या ज्ञान–साधनेमुळेच मनुष्य इतकी प्रगती करू शकला. ज्ञानसाधना म्हणजे, मानवी अनुभवातील त्या सर्व गोष्टींचे स्वरूप व रहस्य जाणून घेण्याचा चालविलेला प्रयत्न होय. मानवास असलेली विचार करण्याची सवय ह्या सर्व प्रयत्नांना ठरलेले प्रभावी साधन होय.

सर्वसामान्य माणसाची, जगाकडे पाहण्याची दृष्टी, श्रद्धेवर किंवा विश्वासावर आधारलेली असते. परंतु केवळ विश्वासाच्या आधारावर मनुष्याची ज्ञानलालसा तृप्त होत नाही. उदाहरणार्थ, आईवडील जे सांगतात त्यावर, लहान मूल चटकन् विश्वास ठेवते. परंतु मोठे झाल्यावर वडिलधाऱ्यावर चटकन् विश्वास बसतोच असे नाही. विश्वासाची जागा शंकेने घेतली म्हणजे माणसाची दृष्टी, प्रचलित व्यवहारज्ञानाकडे किंवा सामान्यज्ञानाकडे (Common sense knowledge) वळते. हे सामान्यज्ञान म्हणजे, समाजात रूढ असलेल्या, कमीअधिक प्रमाणात खऱ्याखोट्या असलेल्या समजुतींचे भांडार होय. परंतु अशा ढोबळ, संदिग्ध व कमी विश्वसनीय व्यवहारज्ञानाची, प्रगतीला मदत होत नाही. सूक्ष्म, निश्चित आणि अधिक विश्वसनीय ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात आणि ज्ञानाची पातळी उंचावल्यामुळे मानवाची सर्वांगीण प्रगती होते.

ज्ञान मिळविण्याची साधने चार आहेत.

१. इंद्रियज्ञान किंवा प्रत्यक्ष निरीक्षण आणि २. अतींद्रिय अनुभूती किंवा साक्षात प्रचीती (Inrtution) हे प्रत्यक्ष (Direct) साधनांचे प्रकार आहेत. त्याचप्रमाणे ३. अधिकारवाणी किंवा साक्ष (Authoritative opinion, Testimony) आणि ४. तर्क, अनुमान (Inference, Reasoning) हे अप्रत्यक्ष (Indirect Mediate) साधनांचे प्रकार होत.

१. इंद्रियज्ञान हे विविध इंद्रियांनी संवेदनांमधून मिळविलेले निरीक्षण होय.

२. अतींद्रिय अनुभूती हे ज्ञान इंद्रिय संवेदनाशिवाय होते. प्रतिमा किंवा प्रज्ञा यांच्या सहाय्याने हे ज्ञान होते असे समजले जाते.

३. अधिकारवाणीमुळे गतकाळातील घटनांचे ज्ञान किंवा आपल्या अनुभवात न आलेल्या गोष्टींचे ज्ञान होऊ शकते.

अनेक गोष्टी किंवा क्रिया अशा असतात की, ज्यांचे आकलन होण्यास मानवाच्या इंद्रियांची शक्ती व झेप अपुरी पडते. निरीक्षणावर आधारलेल्या ज्ञानावर मर्यादा पडतात. घणघण असा आवाज दुरून येतयेत जवळून वेगाने निघून गेला तर प्रत्यक्ष ज्ञानाच्या ह्या माहितीवरून तर्काच्या सहाय्याने तो आग विझविण्याचा बंब होता असा आपण निष्कर्ष काढतो. असे दोनचार वेळा घडले की जवळच मोठी आग लागली असणार असे प्रत्यक्ष ज्ञानापलीकडले ज्ञान आपल्याला उपलब्ध होते. शेतात उभी असणारी व हालचाल न करणारी मनुष्याकृती पाहून आपण निष्कर्ष काढतो की ते बुजगावणे आहे.

अतींद्रिय अनुभूतीमुळे एखादे गृहीत तत्त्व (Hypothesis), एखादा सौंदर्याचा साक्षात्कार, कलाकृतीचा आविष्कार, समोरील व्यक्तीच्या स्वभावाची संवेदना होऊ शकते. परंतु या अतींद्रिय अनुभूतीमधील विविधता, आत्मनिष्ठा आणि काही वेळेस दिसणारा विसंवाद ह्यामुळे या ज्ञानाबद्दल संपूर्ण अविश्वास नसला तरी साशंकता बाळगली जाते. हे ज्ञान पारखून घेण्यासाठी–समीक्षण आणि समर्थन करण्यासाठी बौद्धिक ज्ञानाची–तर्काची मदत घ्यावीच लागते.

एखाद्या अधिकारी व्यक्तीने, तज्ज्ञाने दिलेले ज्ञान किंवा दुसऱ्याने मिळविलेले ज्ञान आपण स्वीकारतो आणि आपले ज्ञानभांडार समृद्ध करतो. अर्थात ज्या व्यक्तीकडून आपण ज्ञान मिळवितो, ती व्यक्ति विश्वसनीय आहे किंवा नाही आणि ते ज्ञान तर्क-सुसंगत आहे किंवा नाही ह्याचा विचार करूनच असे ज्ञान आपण स्वीकारतो. तसेच आतापावेतो मिळविलेले ज्ञान तर्कास धरून आहे किंवा नाही हे आपण पुन्हापुन्हा तपासून बघत असतो. तर्काच्या सहाय्याने केलेली ही तपासणी वरील तीनही प्रकारच्या ज्ञान साधनेस लागू आहे.

अशा प्रकारे आपल्या लक्षात येईल की वरील तीनही प्रकारची साधने जमेस धरूनही ज्ञानाचा बराच मोठा प्रांत शिल्लक राहतो आणि याचे ज्ञान करून घेण्याचे तर्क किंवा अनुमान हे एकमेव साधन आहे. तर्काच्या सहाय्याने हे ज्ञान मिळवीत राहिल्याशिवाय मानवाची प्रगती होणे शक्य नाही हे उघड आहे.

परखड तर्कपद्धतीची दोन अंगे म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक विचार पद्धती होय. खरं तर, ही दोन्ही अंगे जरी एकच (Synouymous) मानली नाहीत तरी ती दोन्ही अंगे परस्परावलंबी पूरक अपृथकपणे मिसळलेली आहेत.

लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, " बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे तपासलेल्या जाणिवेवर विश्वास होय. जाणीव ही सत्य व भास ह्या दोन प्रकारची असते. प्रत्यक्ष चंद्र हा तळहाताएवढा भासला तरी शास्त्रीय अनुमानाने तो फार प्रचंड आणि दूर आहे हे

सिद्ध होते. असा सिद्ध शब्द प्रमाण मानावा. कोणाची बुद्धि प्रमाण मानावी याचेही शास्त्रीय निकष ठरलेले आहेत. एपिस्टेमिऑलॉजी असे ते शास्त्र आहे. माणूस बुद्धि-प्रामाण्यवादाच्या जोरावर प्रगत झाला व होत आहे. बुद्धिप्रामाण्यवाद नम्र आहे. प्रत्येक सिद्धांत चूक ठरण्याची शक्यता मान्य केली आहे. यापुढे अमुक एक शास्त्राची प्रगती नाही असे वैज्ञानिक म्हणत नाही. कोणताही सिद्धान्त पूर्णत्वाला पोहोचल्याचा दावा निसर्गनियमाप्रमाणे चूक आहे."

कोणताही सिद्धान्त किंवा आतापर्यंत आपल्याला मिळालेले कोणतेही ज्ञान चूक किंवा खोटे असण्याची शक्यता डोळ्यांपुढे ठेवून ज्ञानिक विचारपद्धतीमध्ये पुढील अष्टांगांचा विचार करावाच लागतो. बुद्धिप्रामाण्यवादी विचारमंथनाच्या प्रक्रियेबद्दल मुंबईच्या मराठी विज्ञान परिषदेचे एक पदाधिकारी डॉ. पंडित म्हणतात–

" Observe – arrange–Question – Synthesise – Generalise–Make hypothesis–Varify these with the help of experiments which can be conducted again and again by any place or at any time subject to assumptions made earlier. " या दिशेने प्रक्रिया होते.

आजपर्यंत झालेली प्रगती टप्प्याटप्प्याने झाली. हे ज्ञान मिळविताना आणि प्रगती होताना वेगवेगळ्या संस्कृतींचा उदय झाला, विविध छटांचे विचार आणि अनेक प्रकारची तत्वज्ञाने मांडली गेली. कॉ. नारायण देसाई यांनी त्यांच्या 'शास्त्रीय तत्वज्ञान' या पुस्तकामध्ये या विचारांचा अतिशय चांगला उहापोह केला आहे.

सृष्टीतील, समाजातील, प्रपंचातील घटनांचे कार्यकारणभाव नेहमीच आपल्याला स्पष्ट होतात असे नव्हे. त्यामुळे त्या बाबतीतल्या अज्ञानावर रहस्याची, कल्पिताची, प्रस्थापना करणारे आणि तशा रहस्याविषयी संशय घेऊन योग्य तो तपास करून पुढे जाणारे असे दोन प्रकारचे लोक जगात आणि भारतात प्रथमपासूनच होते आणि आताही आहेत. भाबडेपणाविरुद्ध संशय आणि तर्क तसेच अंधश्रद्धाळूपणा-विरुद्ध बुद्धिप्रामाण्य हा संघर्ष जितका जुना तितकाच तो आजही जिवंत असा संघर्ष आहे.

भारतीय तत्वज्ञानाला जगाने भव्योदात्त म्हटले आहे. सिकंदराच्या वेळेपासून भारत केवळ दौलतीसाठीच नव्हे तर तत्वज्ञानासाठीही प्रसिद्ध होता. युनानी किंवा ग्रीक तत्वज्ञानाचे प्लेटोच्या नवीन तत्वज्ञानात रूपांतर करण्याचे बरेचसे श्रेय भारतीय तत्वज्ञानाला आहे.

परंतु असे असले तरी, 'आमचे तत्वज्ञान सर्व ठीक आहे व त्याकडे टीकेच्या दृष्टीने पाहता येऊ नये' असे मात्र नव्हे. उलट सतत टीकात्मक दृष्टीने न पाहिल्या-मुळे आपल्या तत्वज्ञानातील दोष दूर न होता वाढत गेले. समाजाला निकोप आणि समृद्ध बनविण्याचे जे तत्वज्ञानाचे कार्य ते ह्या तत्वज्ञानाकडून घडले नाही. अर्थात

केवळ तत्वज्ञानाने समाज सुधारत नसतो, किंवा समाजक्रांती होत नसते हे जरी खरे असले तरी अचूक तत्वज्ञानाचे महत्व त्यामुळे कमी होत नाही. निसर्गाची शास्त्रे जाणणारे, समाजविकासाच्या नियमाचे ज्ञान झालेले व मनाच्या शक्तीचे योग्य आकलन करणारे तत्वज्ञान, जनमनाचा ताबा घेऊन, समाजाला व मानवाला बदलू शकते.

भारतीय तत्वज्ञानाचा पाया भक्कम असूनही ते बहुतांशी कालग्रस्त व गतिहीन राहिले. आपल्या तत्वज्ञानातील मायावाद, दैववाद, निराशावाद, रहस्यवाद, लोकोत्तरवाद वगैरे मिथ्यावादांनी जनतेच्या स्वोद्धाराच्या मार्गात जबर अडथळे निर्माण केले. विशिष्ट आर्थिक सामाजिक परिस्थितीने हे वाद किंवा ह्या प्रवृत्ती निर्माण झाल्या होत्या.

जुलूम, विषमता, अन्याय, रोग, अपमृत्यू, सामाजिक अशाश्वती, यामुळे जीवन कडू बनते; सुखवस्तू वर्गाच्या समृद्धिभोगाला 'चंचल लक्ष्मी'चे तडाखे बसले की दुःखवादी तत्वज्ञाने जन्म घेतात. आणि एकदा का असले तत्वज्ञान निर्माण झाले की, मग परिस्थिती बदलली तरी, त्यातल्या सदोष प्रवृत्ती, भूतकाळाचे भाररूपी दगड बनून, प्रगतीचा मार्ग रोखू शकतात. म्हणूनच प्रत्येक तत्वप्रणालीचे सतत समालोचन होणे जरुरीचे आहे. ज्या तत्वज्ञानाचा पाया व्यवहार असतो, त्या तत्वज्ञानाचे, आपोआपच समालोचन चालू राहते.

कित्येक संतांनी व्यावहारिक व लोकाभिमुख असा एक मार्ग रूढ केला खरा, परंतु त्याचे अधिष्ठान अध्यात्मवादी असल्याने जीवनाची नग्न भेसूर वास्तवता एकीकडे आणि हे साधुसंत व भोळीभाबडी जनता एकीकडे अशी फारकत झाली. मानवाला उच्च संस्कृतीचा लाभ करून देण्यासाठी वास्तव आणि विविध शास्त्रांमधील नियमांचे ज्ञान याची योग्य जाणीव हवी होती. ती ह्या साधुसंतांच्या खटाटोपात मुळीच आढळत नाही.

अशा ह्या संत वाङ्मयाचा आढावा घेतला, तर असे दिसून येईल की, महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, रामदास व तुकाराम असे प्रसिद्ध संत झाले. ह्यांपैकी ज्ञानेश्वरांनी प्रस्थापित वर्गाला विरोध केल्यावर सुरुवातीला त्यांना त्रास झाला. तरीही भगवत्गीतेचे निरूपण करणारा ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिल्यानंतर समाजाने त्यांना त्रास दिला नाही. ज्ञानेश्वरी जाळली किंवा बुडविली नाही. ज्ञानेश्वरीमध्ये समाजव्यवस्थेवर हल्ला नव्हता किंवा जीवनातील अडचणीमागील वास्तवाची जाणीव नव्हती.

रामदासांनी केलेले बरेचसे लिखाण राजकीय हेतूप्रित्यर्थ आहे. प्रचलित समाजव्यवस्थेवर त्यांनी टीका केली नाही; किंवा जगात असलेल्या दुःखामागील कारणे शोधण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला नाही. त्यांना समाजाने त्रास दिला नाही.

ह्या दोघांपेक्षा तुकाराम थोडासा वेगळा आहे. तुकारामाला जन्मभर त्रास झाला.

इतकेच काय पण त्याचे वाङ्मय–गाथा–इंद्रायणीत बुडविली. असा त्रास देण्यासारखे त्याच्या वाङ्मयात काय होते? संत तुकाराम ब्राह्मण नव्हता. आणि त्यांनी शेवटी-शेवटी जे अभंग लिहिले त्यामुळे प्रचलित समाजव्यवस्थेला धक्का बसत होता. तुम्ही जे अभंग रेडिओवरून सकाळ-संध्याकाळी ऐकता, त्यात प्रस्थापित वर्गाला राग येण्यासारखे काहीच नाही. म्हणूनच आजचा शासनकर्ता वर्गसुद्धा ते भक्तिमार्गी निवृत्तीपर अभंग तुम्हाला आजसुद्धा ऐकवितो.

परंतु 'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळचे काठी हाणू माथा ॥' 'दया तिचे नाव । भूतांचे पालन । आणिक निर्दालन कंटकाचे ॥' 'अंगी दैवत संचरे मग तेथे काय उरे ॥' 'रंडीचंडी शक्ति मद्य-मासे भक्षिती', 'नवसे कन्यापुत्र होंती तरी का करणे लागे पति ॥' 'ऐशा नरा मोजूनी माराव्या पैजरा ॥' हे अभंग तुम्ही कधी तरी रेडीओवरून किंवा संतवाणीमध्ये ऐकले आहेत का? एकदाही नाही.

ह्या अभंगातून तुकारामाने सांगितले की शेंदूर माखल्या धोंड्यांना नवस काय करितां? ज्यावर कुत्रे धार धरीते तो कसला देव? ऐसे कैसे झाले भोंदू, त्यांना जोड्याने मारा. नवसाने मुले झाली तर नवरा कशाला हवा? आणि हे अभंग प्रचलित समाजव्ययस्थेस हादरे बसवू लागले. पुरोहित वर्गाच्या प्रातीवर गदा येत होती म्हणून तुकारामाचे वाङ्मय इंद्रायणीत बुडविले व त्याचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाला.

धर्मकारण संपूर्णपणे व्यक्तिनिष्ठ, लहरी अशा अनुभूतीवर आधारलेले असते. चर्चा, वाद, सुधारणा इत्यादींना त्यात वाव नसतो. एकदा झालेले ज्ञान हे 'संपूर्ण अंतिम आणि सर्वकालीन चिरंतन असल्यामुळे' नम्रभाव, टीका सहन करणे असे प्रश्न उद्भवतच नाहीत. दुसऱ्याच्या मताची गळचेपी करणे ह्याशिवाय दुसरा मार्गच त्यांच्यापुढे उरत नाही.

आजचे शासनकर्तेसुद्धा तुकोबांचे हे अभंग लोकांच्या कानी न पडू देण्याची काळजी घेतात व प्रजेला भक्तिमार्गावर ठेवू बघतात. घटनेमध्ये शास्त्रीय विचार-सरणी (Scientific Temper) चा प्रसार हे मूलभूत कर्तव्य मानले गेले आहे पण राज्यकर्तावर्ग ती विचारसरणी वाढू न देण्याच्या प्रयत्नात असतो.

गजानन महाराजांच्या पुण्यतिथीची आवर्जून आठवण करून देणारा रेडिओ, चिमूरच्या बलिदानाबाबत उदास राहतो. कारण लोकांच्या मनात बंडाच्या कथा जागत्या ठेवणे राज्यकर्त्या वर्गाला धोक्याचे वाटते. लोकांनी भक्तिमार्ग आळवीत राहणे, प्रस्थापितांना अधिक सोयीचे वाटते.

सृष्टिशास्त्रानुसार, ह्या भूतलावर असा एक काळ निश्चितच होता की जेव्हा मनुष्यसृष्टीच अस्तित्वात नव्हती आणि त्याच्याही आधी असाही काळ होता की जेव्हा जीवसृष्टीसुद्धा अस्तित्वात नव्हती. तेव्हा धर्म, ईश्वरकल्पना वगैरे मानवी संस्कृतीबरोबरच उदयास येऊन वाढले असले पाहिजेत हे उघड आहे. मनुष्यमात्राचा

उदय झाला, त्यावेळी माणूस हा इतर प्राण्यापेक्षा वेगळा असल्याने, सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव त्यास होत होती; परंतु घडामोडीमागील कार्यकारणभावाचे आकलन होत नव्हते.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे या संदर्भात म्हणतात, "मनुष्यमात्राच्या दीर्घकालीन इतिहासावरून असे दिसते की, ईश्वर–आत्मा-परमात्मा–भुतेखेते यक्ष–दानव-आसुर इत्यादी शबल कल्पना स्वयंभू नसून, मनुष्याने त्या भ्रांत अनुमानाने बनविल्या आहेत."

अर्थात उपनिषद्‌कालाच्या शेवटी शेवटी, ईश्वरप्रार्थना, पूजा, अध्यात्म, यांचे स्तोम वाढलेले दिसते. प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ प्रा. शर्मा यांच्या मते, "हत्यारांचा व अवजारांचा अधिक उपयोग होऊ लागल्यावर, जमीनदारी वाढली; गुलाम बाळगता येऊ लागले. जमीनदारांना, राजांना, सार्वभौमत्व प्राप्त झाले. कुळे त्यांच्याकडे संरक्षण मागू लागली. आणि याच संकल्पनेतून, आपली काळजी वाहणारा आपल्याला संरक्षण देणारा असा ईश्वर, त्याची प्रार्थना केल्यास तो प्रसन्न होतो, ही कल्पना दृढ झाली. तरीही त्या कल्पना भ्रामक होत्या. निसर्ग, समाज, संस्कृती, यामधील वास्तवाची किंवा प्रश्नांची योग्य जाणीव नव्हती. त्यामुळे दुःखी जनतेचे समाधान होणे शक्यच नव्हते. वेदांच्या शब्दांनी ज्ञान संपले, वेदवाक्य हे अंतिम प्रमाण असे प्रतिपादणारे वेदांत तत्वज्ञानही, ह्या प्रश्नांची समाधानकारक व जीवनोपयोगी उत्तरे देऊ शकलेले नाही."

त्यामुळे ज्या ज्या वेळी परिस्थिती बिकट झाली, जीवन अधिकाधिक असह्य झाले तेव्हा बहुजनसमाज नव्या धर्माला घेऊन पुढे आला. प्रत्येक नवा धर्म ही बहुजनसमाजाची बंडखोरीच होय. त्याचबरोबर दुःखामध्ये बुडालेली जनता, नेहमी तारक, योगी, संतमंहतांच्या शोधात असते व त्यांच्या मदतीने दुःखामधून बाहेर पडण्याचा झटपट मार्ग शोधताना ते मृगजळात फसतात.

सर्व दृष्टींनी अडचणीत आलेली जनता, सर्वांना समान मानणारा ईश्वर स्वर्गात आहे, त्याचे राज्य पृथ्वीवर येणार, तो अवतार घेणार अशा आशेवरच दिवस कंठीत असते व अशा आशा दाखविणारे बंड नव्या धर्माच्या स्वरूपात खरे होत असते. निदान ईश्वराच्या दरबारी सगळे एक आहेत, तेव्हा या पृथ्वीतलावरसुद्धा तुम्ही आम्ही सगळे समान आहोत यावर भर देणारा नवा धर्म सुरुवातीला शास्त्यावर्गाला डोईजड होत असे. शास्त्यवर्गाला बंदे–पंडित–पुरोहित नेहमी या नव्या धर्मावर तुटून पडत आणि जेव्हा नवा धर्म प्रभावी होत असे, तेव्हा त्या धर्मातील बंडखोर विचार वगळून, शास्तावर्ग तो धर्म स्वतःच स्वीकारून जनतेच्या पचनी पाडीत असे.

हे तर, देवधर्म मानणाऱ्या आणि धर्मकांडामध्ये वरवरच्या आणि बहुतांशी फसव्या असणाऱ्या सुधारणा करू बघणाऱ्यांविषयी झाले. जे लोक पूर्वीपासून भौतिक तत्त्वाला

'जडवादी' ह्या निंदाव्यंजक नावाने संबोधित आले. बुद्धिवादी तत्त्वज्ञानाच्या महान पुरस्कर्त्यास 'चार्वाक—म्हणजे चावण्यात-खाण्यात वस्ताद' अशी शिवी दिली. पंडित सांकृत्यायन म्हणतात, "चार्वाक हे नाव व्यक्तिचे नसून पुनर्जन्म, दैववाद इत्यादी न मानणाऱ्या सर्व लोकांना शिवी आहे."

शास्त्रीय दृष्टिकोनाचे प्रथम बीज भारतात चार्वाकाने पेरले. त्या विचारवंतास सुखवादी ठरविण्यात आले. त्याची माहितीसुद्धा फारशी आज उपलब्ध नाही.

पौर्वात्यांनी अशीच दशा ग्रीक तत्वज्ञानी एपीकुरस ह्याची केली. एपीकुरस म्हणजे 'भोगवादी' होय. ह्याचीसुद्धा फारशी माहिती मिळत नाही.

एकूण सर्व जगात बुद्धिप्रामाण्यवादी किंवा निरीश्वरवाद्यास छळ करून ठार मारले. त्यांचे विचार किंवा नावनिशाणीसुद्धा उपलब्ध होऊ नये अशी व्यवस्था केली. हे सर्व बंडखोर ईश्वर व शोषण ह्या दोन गोष्टींविरुद्ध विचार व्यक्त करीत होते. ही त्यांची बंडखोरी प्रस्थापितांना सहन झाली नाही.

माणसाची जीवनविषयक आस्था, माणसाने भौतिक सुखासाठी केलेली रास्त धडपड ह्या खोट्या, मायावादी व वाईट गोष्टी आहेत असा प्रस्थापितांनी कायम प्रचार केला. न्याय्य समाजरचना निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न अशा निराशावादी तत्त्वज्ञानाच्या वापर करून, हाणून पाडण्यात आले. आजही मनुष्याच्या ज्ञानाच्या गतिशीलतेचा, सापेक्षतेचा किंवा अपूर्णत्वाचा खोटा बाऊ करून मायावादी, शून्यवादी, अज्ञेयवादी, निराशावादी तत्त्वांचा पाठपुरावा केला जातो.

प्रत्येक वेळी नवी आशा प्रज्वलित करणारा नवा धर्म उदयास आला खरा. परंतु निसर्गशास्त्रे आणि समाजशास्त्रे ही विकास पावलेली नसल्या कारणाने, अपुऱ्या माहिती मुळे, सर्व समाजापुढील सर्व प्रश्नांचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टिकोनातून होऊ शकले नाही. त्यामुळे नवे धर्म मृगजळाप्रमाणे फसवेच राहिले व सर्व समाजाला सुखसमृद्धी देऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रस्थापितांविरुद्ध झालेली बंडे तात्कालिकच राहिली.

भारतीय संस्कृतीच्या घडणीत आर्य विचारपरंपरेबरोबरच, अनार्य, हूण, शक, कुशान विचारांची सुद्धा सरमिसळ झालेली आहे. तसेच सेमेटिक व बाबालोनियन संस्कृतीचा पण परिणाम झालेला आहे. सेमेटिक विचारपरंपरेचा ज्यू, ख्रिस्ती व इस्लाम धर्मांवर जास्त परिणाम आहे. सेमेटिक विचारसरणी, निसर्गाच्या भयाणतेनेच वाढली. वारंवार होणारे जलप्रलय, जीवन कोळपून टाकणारी अरेबिअन वाळवंटे इत्यादी निसर्गाच्या आपत्तींना सेमेटिक जनतेला तोंड द्यावे लागले. त्यामुळे त्यांचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोन दुःखवादी, ईश्वरावलंबी किंवा परलोकवादी झाला आहे.

अर्थात ईश्वराची कोणतीही कल्पना मांडली तरी बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनातून मांडलेले प्रश्न अनुत्तरीतच राहतात. विषमता व निर्घृणता ज्या जगात आहे त्या जगाचा कर्ता व भर्ता सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान, दयाघन प्रभू असणे शक्य नाही. ईश्वराला

विषमता व निर्घृणता दिसत नसेल तर तो सर्वसाक्षी नाही व ती वैगुण्ये तो नाहीशी करू इच्छीत नसेल तर तो दयाघन नाही. पूर्वजन्मातील वाईट कर्मामुळे हे फळ मिळते म्हटले तर; आधीच्या जन्मात वाईट कर्म करण्याची बुद्धीच ईश्वराने माणसाला का द्यावी ? त्यातूनही बुद्धी ही कर्मानुसार ठरते, असे म्हटले तर, प्रथम जन्मात वाईट कर्म करण्याची बुद्धी प्राणिमात्राच्या मनाच्या स्वच्छ पाटीवर आली तरी कोठून ? हा प्रश्न उभा राहतो; आणि मनुष्य मात्र हा मूळ प्रवृत्तीनेच पापी आहे असे म्हणावे तर, असला मूळ प्रवृत्तीनेच पापी माणूस, दयाघन ईश्वराने जन्माला तरी कशासाठी घातला ?— हा प्रश्न निरुत्तर करतो.

दुःख तर संपत नाही आणि वाहेर पडण्याची वाटही सापडत नाही अशी वैफल्याची परिस्थिती पळपुट्या तत्त्वज्ञानाला व अगतिकतेला जन्म देते. महाभारतातील घटना डोळ्यांपुढे आणा. कृष्णाने अर्जुनाला गीता कधी सांगितली ?— युद्ध उभे ठाकले होते, कुरुवंशाचा नाश पुढे स्वच्छ दिसत होता आणि त्यातून सुटकाही नव्हती. दुःखवादी विचारधारेच्या पार्श्वभूमीवर आणि निराशाजनक वातावरणातून गीतेचा उगम झाला. 'कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ॥' ही विचारसरणी अशास्त्रीय आणि साफ चुकीची आहे. ह्या वचनामध्ये एकाच प्रकारची वैयक्तिक कर्मे अंतर्भूत आहेत. लढाईसारखी व राज्यकारभाराची कर्मे करणाऱ्यांची, त्या कर्माकडे पाहाण्याची दृष्टी, स्वमोक्षार्थ असल्यामुळे, ती कर्मेही वैयक्तिक ठरतात. बहुजनांकडून कार्यभाग उरकून घेऊनसुद्धा, त्यांना फलाचा लाभ मिळू द्यायचा नाही, असल्या जुलमी समाजव्यवस्थेला आधार देण्यासाठी, अशा प्रकारच्या तत्त्वज्ञानाची मदत आवश्यकच होती. ही सत्य परिस्थिती, गीतेचा उदो उदो करणारे लोक जाणून घेत नाहीत. सामान्य जनांना ही परिस्थिती समजावून घेण्याचे काम बुद्धिवाद्यांना करावयाचे आहे.

भारतीय तत्वज्ञानाची अध्यात्मपरता बुद्धिविकासाच्या आड येत राहिली. ह्या तत्वज्ञानात काही अंशी भौतिकवादी दृष्टिकोनही होता. परंतु त्यावेळच्या समाजव्यवस्थेमुळे, प्रस्थापितांना ऐतखाऊ राहणे जमले. श्रम व बुद्धी यांची पूर्णपणे फारकत झाली. बुद्धी ही पूर्णपणे (Abstract) अमूर्त विचारांच्या व कलांच्या वाढीसाठी वापरली जाऊ लागली. बुद्धीचा वापर जीवनविषयक प्रश्नांसाठी न झाल्याने, भौतिकवादी दृष्टिकोनाचा विकास जवळ जवळ थांबला. जीवन चाकोरीबद्ध, जखडबंद आणि अधिकाधिक खडतर झाले. भारतामध्ये विज्ञानाचा विकास थंडावला.

युरोपमध्ये मात्र गॅलिलिओ, रॉजर बेकन, विल्यम ऑफ ओकाम, केप्ल, फ्रान्सिस, बेकन, कोपर्निकस, ब्रुनो, डार्विन वगैरे निःस्पृह विचारवंतांनी आणि शास्त्रज्ञांनी, विज्ञानाला, ईश्वर-वायबल-पोप वगैरेंच्या कचाट्यातून मुक्त केले व विज्ञानाच्या विकासाचा मार्ग खुला केला.

शास्त्रज्ञांनी घेतलेली भूमिका केवळ एका उदाहरणावरून सुद्धा स्पष्ट होईल. लाप्लास ह्या फ्रेंच ज्योतिषी-गणिततज्ज्ञाने, त्यावेळी ज्ञान असलेल्या सर्व आकाशाचा, ग्रह-तारे दाखविणारा एक नकाशा तयार केला. पण या नकाशात ईश्वर आणि त्याचे स्थान याचा कुठेच उल्लेख नव्हता. ते पाहून, नेपोलिअनने त्याला विचारले, "या नकाशात ईश्वर कसा कोठेच दिसत नाही?" त्यावर लाप्लास उत्तरला, "या सर्व भौतिक बाबी आहेत. ईश्वर या गृहीताची (hypothesis) मला मुळीच गरज वाटत नाही."

राजा रामण्णा म्हणतात, "ज्या ज्या वेळी मी परदेशी जातो तेव्हा मला एक प्रश्न नेहमी विचारण्यात येतो की, 'साऱ्या जगातील शास्त्रज्ञ मंडळींपैकी नेमके भारतीय शास्त्रज्ञच जादूटोणा वा चमत्कारावर विश्वास का ठेवतात?' पाश्चिमात्य ज्ञानसाधनेत शंकेला अग्रस्थान दिलेले आढळते. तेथे ज्ञानाची उत्पत्तीच शंकेपासून होते. नैसर्गिक अथवा मानवनिर्मित तत्वांची वस्तुनिष्ठ भूमिकेतून चिकित्सा होऊ शकते. भावनेच्या आहारी न जाता, सत्याचा शोध घेणे हे एकच ध्येय त्यांच्यापुढे असते. युरोपखंडातील रेनीसान्स (प्रबोधन) चळवळीच्या प्रवक्त्यांनी केलेल्या विचारमंथनातून, पाश्चात्त्यांत आधुनिकतेचा जन्म झाला; हजारो वर्षांचे प्रस्थापित विचार धुळीला मिळाले व आधुनिक विज्ञान जन्मले."

युरोपमध्ये असे विचारमंथन आजही होते. याविषयी जयंत नारळीकर म्हणतात, "वैज्ञानिक मुळात वस्तुनिष्ठ असतो, पण पुढे सिद्धान्ताशी जवळीक उत्पन्न झाली की, वस्तुनिष्ठता मागे पडते. अलीकडे अशा मोहाला बळी पडण्याची शक्यता जास्त आहे. कारण संशोधनाला मोठमोठी बक्षिसे असतात, तसेच शास्त्रज्ञ सबंग लोकप्रियतेला बळी पडण्याची शक्यता असते." तरीसुद्धा या शास्त्रज्ञांच्या संशोधनाबद्दल युरोपमध्ये विचारमंथन होते. अशा प्रकारे छाननी करून पुन्हापुन्हा तपासण्यात आलेल्या संशोधनापैकी काही उदाहरणे आहेत.

ग्रीक खगोलशास्त्रज्ञ क्लाडियस टॉलेमीने 'पृथ्वी ग्रहमालेच्या केंद्रस्थानी आहे' असे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले होते. त्यावेळच्या प्रस्थापित वर्गाचा ह्या सिद्धान्तामुळे फायदाच होता. त्यामुळे टॉलेमीच्या सिद्धान्तास धार्मिक प्रतिष्ठा मिळाली.

ह्या सिद्धान्ताची पुन्हापुन्हा तपासणी करून ब्रूनो, गॅलिलिओ, निकोलस, कोपर्निकस ह्यांनी टॉलेमीच्या सिद्धान्ताला विरोध केला. ह्या त्यांच्या गुन्ह्यांबद्दल त्यांचा अनेक प्रकारांनी छळ करण्यात आला. टॉलेमीचा सिद्धान्त चूक असल्याचे रॉबर्ट न्यूटन ह्याने सिद्ध केले.

फ्रेंच शास्त्रज्ञ ब्लाण्डलो ह्याने एन् (N) किरणाबाबत केलेले संशोधन एक वर्षातच खोटे असल्याचे सिद्ध झाले.

अमेरिकन शास्त्रज्ञ स्पेक्टर ह्यांचे कर्करोगासंबंधीचे संशोधन बनावट असल्याचे

काही महिन्यांतच सिद्ध झाले.

ही सर्व पाश्चिमात्य शास्त्रज्ञांची उदाहरणे होत. त्यांच्या चुका उशिरा का होईना उघडकीस आल्या. भारतातील परिस्थिती आणखीनच कठीण आहे. उच्चपदस्थांच्या चुका काढून त्या सिद्ध करण्याचे धैर्य कोणापाशी आहे?

उलटपक्षी योग्य ज्ञान असूनही आर्यभट्ट, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त इत्यादींनी लोकाराधनाच्या वृत्तीला बळी पडून वेद-पुराणातील भाष्येच खरी आहेत असे सांगितले. आपल्याकडील विद्वानांची मनोवृत्ती आजही अशीच आहे. बुद्धिप्रामाण्यवाद्यांवर, म्हणून फार मोठी जबाबदारी आहे.

आपल्याकडे सर्व क्षेत्रांत वैचारिक गोंधळ दिसतो. भारतात संशोधन फारशी चिकित्सा न होता स्वीकारले जाते. चुकीचे निष्कर्ष विद्यापीठातूनसुद्धा फारशी चिकित्सा न होता मान्यता प्राप्त होतात. विज्ञान प्रसारास वाहून घेतलेल्या संस्थादेखील ह्या बाबतीत उदासीन आहेत. काही निष्कर्षांच्या आणि सिद्धान्तांच्या बाबतीत पत्राद्वारे, लेखाद्वारे चर्चा करून शंका उपस्थित करून सत्य जाणून घेण्याचा मी स्वतः अनेकदा प्रयत्न केला तरीही मला फारसे यश मिळाले नाही.

काही बोलकी उदाहरणे येथे पुढे मुद्दाम देत आहे. कारण ह्याबाबत मला जास्तीत जास्त चर्चा व्हावयास हवी आहे. त्यातूनच बुद्धिप्रामाण्यवादाची सर्वकाल यथार्थता का व कशी आहे हे तुम्हास समजेल.

त्या त्या शाखेमधील संशोधनासाठी दिली जाणारी डॉक्टरेट (पीएच. डी.) ही उच्चतम पदवी आहे. कोणत्याही शाखेमध्ये ही पदवी प्रदान करताना त्या त्या अभ्यासकाची संशोधक वृत्ती, निष्कर्ष काढण्यामागे असलेली वैज्ञानिक मनोवृत्ती, तसेच आपले निष्कर्ष पुन्हापुन्हा तपासून बघण्याची तयारी, त्यासाठी लागणारी पूर्वग्रहविरहित विचार करण्याची क्षमता इत्यादी बाबींची चिकित्सा होणे आवश्यक आहे. परंतु विज्ञान शाखेतील अभ्यासकास डॉक्टरेट ही पदवी देतानासुद्धा अशी चिकित्सा होत नाही असे आढळून येते.

पुणे विद्यापीठाने जीवरसायनशास्त्रामध्ये एका प्रबंधास मान्यता दिली. त्यातील निष्कर्ष असा आहे — "मराठे आणि आदिवासी यांच्या संक्रमातून महार जमातीची उत्पत्ती झाली असावी इ." — वास्तविक हजारो वर्षांच्या कालावधीनंतर आजच्या पिढीच्या रक्ताची अशा प्रकारे तपासणी करून असा निष्कर्ष काढणे सकृत्दर्शनीच संशयास्पद आहे. तसेच सदरहू निष्कर्षाने समाजशास्त्र, इतिहास, राजकारण, जातिव्यवस्था इ. समाजाच्या सर्व बाबतीत विचारांना हादरा दिला जातो हे लक्षात घेऊन पुणे विद्यापीठाने जास्त काळजी घ्यावयास हवी होती.

मीदेखील जीवशास्त्राचाच अभ्यास केलेला आहे. साहजिकच माझ्या वाचनात जेव्हा वरील संशोधन आले तेव्हा मी त्या संशोधकास, त्याच्या कलकत्त्यातील परीक्ष-

कास, पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूस व राज्यपालांस माझ्या, वैज्ञानिक दृष्टिकोनातून घेतलेल्या शंका व्यक्त केल्या. (माझे विचार समाज प्रबोधन पत्रिका एप्रिल ८१ व किर्लोस्कर, जून ८२ च्या अंकात छापून आले आहेत.) काही फुटकळ उत्तरे ह्या उच्चपदस्थांकडून मला आली, परंतु वरील संशोधन चूक की बरोबर हे अजून अनिर्णितच आहे.

अशा प्रकारे प्रसिद्ध पावलेल्या व छापून आलेल्या माहितीवर अंधश्रद्धा ठेवण्याची सामान्य लोकांचीच फक्त नव्हे तर तज्ज्ञ मंडळीची पण मनोवृत्ती असते. बंगलोरच्या डॉ. पसरीचा ह्यांनी काही एक उदाहरणावरून 'पुनर्जन्म' असावा असे संशोधन केले. ह्या गोष्टी मानसिक चिकित्सेच्या असल्यामुळे मला मानसोपचार तज्ज्ञाची मदत हवी होती. परंतु पसरीचा ह्यांचे संशोधन ज्याअर्थी प्रसिद्ध झाले आहे त्याअर्थी ते खरे असावे असे मानून ह्याबाबत चिकित्सा करण्यास पुण्याच्या मानसोपसार तज्ज्ञाने नकार दिला.

हे तज्ज्ञ देव न मानणाऱ्यापैकी आहेत. तरी पण प्रसिद्ध होणाऱ्या संशोधनाचा पगडा त्यांच्यावर इतका घट्ट आहे की प्रसिद्ध पावलेले संशोधन ते पुन्हापुन्हा तपासण्यास तयार नाहीत. हीसुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धा आहे. पुन्हापुन्हा तपासणी करणे हा विज्ञानाचा मूलभूत पाया आहे.

एखाद्या जोडप्यास फक्त मुलीच झाल्या तर त्याचा दोष स्त्रीकडे देण्याची आपल्याकडे प्रथा आहे. स्त्री मुक्ती चळवळ सुरू झाल्यावर ह्या विचारांचा तराजू विरुद्ध बाजूस झुकू लागला. मुंबईच्या प्रसिद्ध डॉ. गीता पंड्या ह्यांनी ह्या विचारास शास्त्रीय मान्यता दिली. डॉ. दस्तूर ह्यांनी टाईम्समध्ये लेख लिहिला की मुलीच झाल्या तर तो दोष स्त्रीचा नाही तर त्याला पुरुष जबाबदार आहे.

वास्तविक एम्. बी. बी. एस्. झालेल्या कोणत्याही डॉक्टरला हे माहीत असते की 'पित्याकडून दोन प्रकारची क्ष व य अशी गुणसूत्रे दिली जात असली तरी कोणत्या प्रकारच्या गुणसूत्राचा संयोग होईल ह्यावर कोणाचेच नियंत्रण नसते.' तेव्हा स्त्री किंवा पुरुष ह्यांपैकी कोणाकडेही हा दोष लावणे अशास्त्रीय आहे.

मी ह्याबाबत डॉ. पंड्या, डॉ. दस्तूर व टाइम्स तिघांशीही पत्रव्यवहार केला. डॉ. दस्तूर ह्यांनी चूक मान्य केली; परंतु माझे शास्त्रीय विचार टाइम्समध्ये छापून न आल्याकारणाने सामान्यजनांना शास्त्रीय सत्य समजलेच नाही. टाइम्सकारांना शास्त्रीय सत्य समाजापुढे आणण्याची निकड पटली नाही.

मुंबईला मराठी विज्ञान परिषद ही एक मोठी संस्था आहे. नामवंत स्थापत्यविशारद भौतिक शास्त्राचे प्रोफेसर्स व इतर विषयांचे तज्ज्ञ ह्या संस्थेत आहेत. विज्ञान प्रसाराचे कार्य करण्यासाठी त्यांना सरकारी अनुदाने मिळतात.

म. वि. प. च्या मासिकातून "विज्ञान व अध्यात्म यांच्यात समन्वय आहे"—

इत्यादी अशास्त्रीय विधाने करणारे लेख प्रसिद्ध केले. तसेच, कोण्या एका श्री. जगन्नाथ टिळकांचा 'गणिताद्वारे पुनर्जन्म सिद्ध' (?) करणारा व शंकराचार्यांच्या मायावादास शास्त्रीय (?) ठरविणारा लेख प्रसिद्ध केला. या लेखातील अशास्त्रीय विधाने आणि त्यांच्या गणितामधील चुका मी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर सुद्धा माझ्या लेखांना आणि विचारांना योग्य प्रसिद्धी देण्यात आली नाही.

अशा प्रकारे वर्ष्याच वेळा, उच्चपदस्थ, नाना संस्थांचे मान्यवर पदाधिकारी, प्रतिष्ठित नियतकालिकांचे संपादक, प्रसिद्ध शास्त्रज्ञ-विचारवंत विरोधी मतांना प्रसिद्धी देत नाहीत. विरोधी असलेल्या शास्त्रीय सत्याची दखल घेत नाहीत, चर्चा टाळतात आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून घेतलेल्या शंकांना उत्तरेही देत नाहीत. ह्या वृत्तीमुळे, शास्त्रीय संशोधन कसाला लागत नाही; विज्ञानाची प्रगती खुंटते आणि वैज्ञानिक विचारसरणीची वाढ होत नाही. विशेष म्हणजे, हे सर्वजण वैज्ञानिक प्रसार करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुकारा करतात.

खरे म्हणजे, ह्या संस्थांची, वृत्तपत्रांची किंवा विद्यापीठांची अशी ही भूमिका प्रेस कौन्सील ॲक्ट, चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्ट, शासनाचे विविध कायदेकानू, घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे, यांच्याविरुद्ध आहे व नैतिक मूल्याची उपेक्षा करणारीही आहे. त्याशिवाय, ज्या समाजसुधारणेचे ध्येय हे सर्वजण डोळ्यांपुढे ठेवतात, त्या त्यांच्या मूळ हेतूंना बगलच देणारी आहे. प्रत्येक बुद्धिप्रामाण्यवाद्याला, समोर येणारा प्रत्येक प्रश्न व्यक्तिशः धसास लावणे, योग्य त्या पाठबळाअभावी शक्य होत नाही. त्यासाठी बुद्धिवादी व्यक्तीने, आपल्याला योग्य वाटणारी भूमिका प्रत्येक व्यासपीठावरून आग्रहाने मांडली पाहिजे. तसेच विविध संघटनांमधूनसुद्धा हे प्रश्न पुनःपुन्हा उपस्थित केले पाहिजेत.

विरोधी मनांची गळचेपी करण्याचा उच्चपदस्थाचा हा स्थायीभाव लक्षात न घेता, विचारस्वातंत्र्याच्या गळचेपीचा दोष कोणी विचारवंत उच्चपदस्थाच्या जाति-धर्माला चिकटवितो, तर काही विद्वान राजकीय प्रणालीचा हा दोष आहे असे समजतात. तसेच काही विद्वान, विरोधी मांडण्यास संपूर्णपणे मुभा असलेल्या आदर्श समाजव्यवस्थेच्या कल्पनासाम्राज्यात मश्गुल होतात.

ज्या भारतात अजूनही पाण्याला जात आहे, जानव्याच्या दोरांची संख्या कमी-अधिक आहे, किंवा शहाण्णव नि ब्याण्णव कुळींत उच्चनीचता ठरते, त्या भारताने जगाला अध्यात्म शिकविले, अशा वढाया मारू नयेत. महाभारतकाली सोन्याचा धूर निघत होता असे विधान करून भूतकाळात रममाण होताना अश्वत्थाम्याला पिण्यास दूध नव्हते, सुदामा अठराविश्वे दारिद्रातच वाढला, तपश्चर्या करणाऱ्या शंबूकाचा रामाकडून वध झाला, एकलव्याला अंगठा गमवावा लागला, 'तुझे मस्तक तुटून पडेल' अशी धमकी देऊन स्वपत्नी गार्गीची चौकसबुद्धी दडपावी लागली वगैरे सत्य

विसरता कामा नये.

केवळ देव आणि धर्म न मानणे म्हणजेच बुद्धिप्रामाण्यवाद असे नव्हे तर, जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारे कोणतेही संशोधन किंवा सिद्धान्त परखडपणे पुन्हापुन्हा तपासून घेण्याची मनोवृत्ती म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद होय.

पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटचे प्रा. सतीश बहादूर यांच्या मते, प्रचलित सिनेमाची सुरुवात खऱ्या (वास्तव) प्रश्नांनी केली जाते तर शेवट खोट्या उत्तरांनी केला जातो. असे सिनेमा पाहून समस्या समजण्याची क्षमताच नाहीशी होते. खरे म्हणजे कलेच्या माध्यमाद्वारे माणसाला स्वतःच्या मर्यादा व सामर्थ्य ओळखण्यास शिकविले पाहिजे. हे सिनेमे माणसाच्या चौकसपणाला खीळ घालून, फसवे समाधान निर्माण करतात. त्या समाजाला दिलेल्या झोपेच्या गोळ्या होत.

क्रिकेटवर लाखो रुपये खर्च करणारे, इतर खेळांना प्रोत्साहन देत नाहीत किंवा दूरदर्शन वर त्यांचे प्रक्षेपण करून त्याची गोडी जनमानसात निर्माण करीत नाहीत. क्रिकेट हा खेळ खर्चाचा व दिखाऊ आहे. तसेच त्या खेळातून प्रयत्नाची महती लोकांच्या मनावर न बिंबविता खेळाडूंची वैयक्तिक व झगमगती प्रतिमा उभी केली जाते; आणि लोकांना पाच-पाच दिवस गुंगवून ठेवता येते. न्यायमूर्तींसुद्धा केस चालविताना स्कोअर ऐकताना दिसतात. खेळाचे वेध महिनेनमहिने आधीपासून लागतात. लोकांना विचार करण्यापासून दूर ठेवता येते. आर्य चाणक्याच्या नीतिशास्त्रानुसार प्रजेला अंधश्रद्ध ठेवणे राज्यकर्त्यांना आवश्यकच आहे.

भारतात शंभर वर्षांपूर्वी विज्ञानाची वाढ झालेली नव्हती. त्यामुळे सनातनी व बुद्धिप्रामाण्यवादी ह्यांच्यातील वाद प्रामुख्याने तात्त्विक होत असत. सामान्य जनतेला कोणते विचार चूक किंवा बरोबर हे सहजासहजी टरवणे सोपे असे.

परंतु आज भारतात विज्ञानाची प्रचंड वाढ झाली आहे. न्यूट्रॉन, प्रोटॉन, एनर्जी, मॅटर, सापेक्षतावाद इत्यादी शास्त्रीय परिभाषेतील शब्दांची गल्लत करून सामान्य लोकांचा बुद्धिभेद करणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे बुद्धिप्रामाण्यवादाची आज अत्यंत जरुरी आहे.

कित्येकदा तर अशी शास्त्रीय तत्वांची केलेली गल्लत शास्त्रज्ञांच्यासुद्धा चटकन ध्यानात येत नाही. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात. "मी जे लिहितो ते भौतिकशास्त्र (physics) शिकलेल्यापैकी एखाद्यासच पटेल." शास्त्रीय तत्वांची गल्लत कशी होते त्याची काही उदाहरणे मी सांगतो.

अणूची इलेक्ट्रॉन, प्रोटॉन वगैरे रचना असते; त्यामुळे एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूत रूपांतर करता येते. ह्या विश्वातील प्रत्येक पदार्थ छिद्रमय आहे. योगी स्वतःच्या अतींद्रिय सामर्थ्याने वस्तूचे विघटन करून या छिद्रमय विश्वातून स्वतःकडे आणतो आणि पुन्हा त्याचे संयोजन करून नवी वस्तू तयार करतो असे सांगितले जाते.

परंतु ह्या बाबतीत आपण लक्षात ठेवले पाहिजे की अणूचे विघटन होताना प्रचंड उष्णता शोषिली जाते किंवा बाहेर टाकली जाते. तसेच न्यूट्रॉन व किरणोत्सर्गाचा खूप त्रास होतो. शिवाय असे अणूचे विघटन करण्यासाठी प्रचंड साधनसामग्री लागते.

निसर्गनिर्मित वस्तूमध्येसुद्धा काही वेळा काही वैगुण्ये असल्याचे दिसते; परंतु योग्यांनी केलेली प्रत्येक वस्तू नेहमीच वैगुण्यरहित आढळते. त्याचप्रमाणे बाजारात उपलब्ध असणाऱ्याच वस्तू हे योगी तयार करतात. ह्या जगात न मिळणारी एखादी चमत्कारिक वस्तू योग्यांना तयार करता येत नाही.

सृष्टीचे ज्ञानेंद्रियांना होणारे ज्ञान सत्य नाही, ते सापेक्ष आहे. अंतिम सत्य काय आहे ? या प्रश्नांची उकल बाह्य अनुभवावरून व वैज्ञानिक साधनांनी होणार नाही. त्यासाठी ध्यानधारणा, अनासक्ती, भक्ती, इ. मार्गाने आंतरिक शक्ती जागृत केली पाहिजे इत्यादी गोष्टी अंधश्रद्धाळू लोकांकडून सांगितल्या जातात.

वैज्ञानिकांना होणारे ज्ञान असत्य आहे असे हे सत्पुरुष कशाच्या आधारे म्हणतात ते समजत नाही. सत्य नेहमीच सापेक्ष असते. कोणतीही गोष्ट अंतिम समजणेच चूक आहे. 'अंतिम सत्य' ही विचारसरणीच अशास्त्रीय आहे. उपलब्ध ज्ञानाच्या मदतीने अस्तित्वात असलेल्या परिस्थितीतील सापेक्ष ज्ञानच आपणास माहीत होऊ शकते. आणि असा बदल खुल्या मनाने स्वीकारणे म्हणजेच बुद्धिप्रामाण्यवाद होय. तीच शास्त्राच्या प्रगतीची निकडीची गरज आहे.

विविध गूढ गोष्टी विज्ञानाच्या सहाय्याने समजावून घेण्याचे कार्य हजारो वर्षे चालूच आहे. परंतु गेल्या हजारो वर्षांत, एकही सत्पुरुषाने निसर्गातील कोणतेही गूढ उलगडलेले नाही. उलट वैचारिक गोंधळ माजविला. 'आंतरिक शक्ती' आणि 'एनर्जी' यांची गल्लत करून फक्त शब्दावडंबर माजविले व लोकांची दिशाभूल केली.

"जीवनात काहीही उद्देश बाळगू नका, आहे त्यात समाधान माना, विचार करू नका, सत्यशोधन करू नका, समाधीकडे जा, मुक्त व्हा !" अशा प्रकारे मन मुक्त व बेहोष करणे, हे एल्. एस. डी. पेक्षाही घातक आहे. त्यांना सत्यशोधन नको आहे. कारण, त्यामुळे — प्रस्थापितांची शांती धोक्यात येईल. बरेचदा बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञान, शरीराचे कार्य, मन वगैरे बाबतीत बरेच अज्ञान असते. त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज पसरवून अशास्त्रीय विचारांना मान्यता मिळवून देणे प्रस्थापितांना फारच सोपे जाते. एक दोनच उदाहरणांवरून माझा मुद्दा स्पष्ट करतो.

असे म्हटले जाते की, आज जगात एवढी दुःखे आहेत, विविध मानवी समस्या भेडसावत आहेत, विज्ञान प्रसारित होत असता या समस्याही वाढत आहेत. विज्ञानाने प्रश्न सुटू शकणार नाहीत–वगैरे.

एखाद्या विषयाचे सुव्यवस्थित, निश्चित, व यथार्थ ज्ञान—म्हणजे विज्ञान होय. विज्ञानाचे वस्तुनिष्ठ व मूल्यवादी असे दोन प्रकार पडतात. वस्तुनिष्ठ शास्त्रे ही आपापल्या विषयांचा अभ्यास करताना वास्तविक सत्य (Facts) शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. त्याचा उद्देश, जे आहे त्याचे यथार्थ वर्णन करण्याचाच असतो. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी शास्त्रांचा अंतर्भाव वस्तुनिष्ठ शास्त्रांच्या वर्गात केला जातो.

यावरून आपल्याला स्पष्ट होईल की मानवी समस्या सोडविण्यासाठी, समाजशास्त्राची अत्यंत गरज आहे. वस्तुनिष्ठ शास्त्रामध्ये केवळ रसायन व पदार्थविज्ञानच नाही तर त्यामध्ये समाजशास्त्राचा पण समावेश आहे, हे लक्षातच घेतले जात नाही. व समाजशास्त्रे वगळून समाजाच्या समस्या सोडविण्याचा उपद्व्याप केला जातो; आणि त्यामुळे अटळ असणाऱ्या अपयशाचे खापर विज्ञानवाढीवरच फोडले जाते.

दुसरा एक मुद्दा असा मांडला जातो की, भौतिकतेच्या पलीकडे काहीतरी अशी शक्ती आहे की जी अध्यात्माने प्राप्त होऊ शकते. तसेच, मनुष्याचे आचरण चांगले राहावे यासाठी अध्यात्माची गरज आहे.

येथे अध्यात्म (Spirituality), नैतिकता (Ethical and moral Values) आणि भौतिक वास्तू (Physical entities) म्हणजे काय हे पहावयास हवे.

मानवी संवेदनाला आणि विचारशक्तीला समजू शकणारे, निसर्गविज्ञानाच्या मर्यादेत असणारे ते भौतिक असे म्हणावयास हवे. या पलीकडे काही गोष्टी आहेत असा एक समज असतो. तो अध्यात्माचा प्रांत आहे असे समजले जाते. या कल्पनांचा उदय कसा झाला ते पाहू.

पूर्वी मेंदूच्या कार्याविषयी फारशी माहिती तव्हती. त्यामुळे पंचेंद्रियांना संवेदना देणारे ते भौतिक अशी ढोबळ व्याख्या करण्यात आली. मज्जाशास्त्रामध्ये (Neurology) आता खूप माहिती मिळत आहे. विशेषतः जीवरसायनशास्त्र (Biochemistry), अणुजीवशास्त्र (Molecular biology), भौतिकशास्त्र (Physics), यामधील विविध प्रगतीच्या सहाय्याने, मज्जासंस्थेची अधिकाधिक सूक्ष्म माहिती होत आहे. विकारभावना या रासायनिक प्रक्रियांनी होतात व मेंदूचे हे कार्य म्हणजे विविध रासायनिक, भौतिक क्रिया आहेत असे आज स्पष्ट झाले आहे. विविध रसायने पृथक करून, विशिष्ट भावना, विचार वगैरे निर्माण करता येतात.

आज आपल्याला असे म्हणता येते की, विचार, भावना, स्मरणशक्ती, बुद्धी इत्यादी मेंदूची सर्व कार्ये या भौतिक (Material) क्रिया आहेत. यामध्ये आध्यात्मिक (Spiritual) घडामोडींना जराही वाव नाही.

त्यामुळे तुमच्या हे लक्षात येईल की, मानवीमूल्ये, नैतिकता, वगैरे पूर्णपणे भौतिक आहेत. त्यांच्याशी, धर्माचा किंवा अध्यात्माचा काडीमात्र संबंध नाही.

इतिहासाकडे वळून पाहिले तरी दिसते की, धर्म–अध्यात्म हे नैतिक होतेच असे नव्हे. धर्माने अनेक अनैतिक कृत्यांची पाठराखण केली. ब्रूनो, गॅलिलिओ, कोपर्निकस, ल्यूथर तसेच ज्ञानेश्वर–तुकाराम यांना धर्मपीठांनी त्रास दिला, सुधारणावाद्यांना चिरडले; अंधश्रद्धांना खतपाणी घातले. अस्पृश्यांना व स्त्रियांना ज्ञानापासून वंचित केले. सती, देवदासीसारख्या प्रथा पाडल्या; सेवेसाठी शूद्र निर्माण केले.

'कोणत्याही भावना मेंदूत तयार होतातच कशा ?'—हे पाहणे अतिशय मनोरंजक, मनोवेधक आहे.

गर्भाची वाढ होत असता, मात्यापित्याकडून मिळालेल्या गुणसूत्रामुळे त्या जीवाच्या व्यक्तिमत्वाची रूपरेषा तयार होऊ लागते. गर्भसंभवापासून त्या जीवाच्या मृत्यूपर्यंत, जीवाला सतत संवेदना मिळत असतात, त्यामुळे जीवाच्या मेंदूत सतत भौतिक बदल होत असतात. त्या संवेदनांना दिलेली प्रतिक्रिया (response) हे व्यक्तिमत्वाचे प्रकटन होय. थोडक्यात, गुणसूत्रांनी घातलेला पाया आणि नवनवीन संवेदनामधून मिळालेली भौतिक माहिती, यातून त्याचे व्यक्तिमत्व बनत असते. त्यामध्ये कोणताही आधिभौतिक (spiritual किंवा Supra Physico) भाग नाही.

व्यक्तीबाबत घडलेल्या भौतिक प्रक्रियामधून व्यक्तिमत्व घडते. सर्व व्यक्तीच्या सामाजिक संबंधातून (Interactions) समाजाचे नियम तयार होतात. आणि या सर्व क्रियाप्रतिक्रिया पूर्णपणे भौतिक असतात.

समाजधारणेचा तत्कालीन विचार म्हणजे धर्म कसा निर्माण होतो, एखादे तत्वज्ञान मान्यताप्राप्त कसे होते, त्यामागील ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक कारणे काय असतात हे आपण पाहिलेच आहे. समाजात असणारे विविध विचार, तत्वज्ञाने व घडामोडी यांची परखड तपासणी करून, त्यामागे असणाऱ्या शास्त्रीय कारणांचा ऊहापोह करून, आपल्यापुढे असणाऱ्या प्रश्नांची, निसर्ग, विज्ञान व समाजशास्त्र यांच्या सहाय्याने नीट मांडणी करूनच, ते प्रश्न सोडविण्याचे शास्त्रशुद्ध प्रयत्न करणे हे बुद्धिप्रामाण्यवाद्यांसमोरील मुख्य काम आहे.

शिक्षणाने तर्कशुद्ध विचारसरणीची सवय लागली पाहिजे. तसेच प्रत्येक विचार तपासून त्याचा स्वीकार केला पाहिजे. परंतु आजच्या शिक्षणाने हे कार्य होत नाही. समाजात तर्कशुद्ध विचारसरणीची वाढ होणे, शास्त्याबर्गाला नको असते. समाज भक्तिमार्गी कसा राहील, खोट्या भ्रामक कल्पनांत मश्गुल कसा राहील हेच ते पाहतात.

देहधारणा नीट चालल्याशिवाय माणूस, 'माणूस' बनत नाही. खऱ्या अर्थाने मानवता प्राप्त झाल्याखेरीज त्याची विवेकशक्ती नीट काम करणार नाही. अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-स्थैर्य या गोष्टी संपूर्ण समाजाला उपलब्ध झाल्याबाचून बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरेसा प्रसार होणार नाही हे सतत ध्यानात धरले पाहिजे. असो.

यावाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मी येथे उपस्थित करू इच्छितो. कोणत्याही प्रश्नाला एखादे अंतिम उत्तर असते असे बुद्धिप्रामाण्यवाद मानीत नाही. सर्व प्रश्नांची तात्पुरती का होईना, उत्तरे माझ्या पाशी आहेत असाही माझा दावा नाही. ज्ञानसाधनेचे प्रयत्न सतत चालूच राहतील. त्यासाठी चर्चा मात्र चालूच राहावयास हवी. त्यानेच बुद्धिवाद वाढीस लागेल.

('आयुध' जानेवारी ८४)

[मानवीय नास्तिक मंच, नागपूर यांनी आयोजित केलेल्या व्याख्यानमालेत ६ डिसेंबर १९८३ रोजी झालेल्या भाषणाचा गोषवारा]

सामाजिक....तीं विकृती
व्यक्तिगत....तीं श्रद्धा

माधव साठे

मागासलेल्या जिल्ह्यात कारखाना निघो, न निघो, तालुक्यात इस्पितळ निघो, न निघो, साखरी गावात बिअर बार, व्हिडिओ केन्द्र आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघतातच निघतात. तशीच मुंबईत अलीकडे देवळं निघतात. दादर मध्यरेल्वे स्थानकासमोर होत असलेल्या श्रीमंत, भपकेबाज, पंचतारांकित स्वामी नारायण मंदिरापासून ते गल्लीबोळातल्या वडापावाच्या गाडीप्रमाणे फूटपाथवरील साईबाबा मंदिरांपर्यंत तऱ्हतऱ्हेची देवळं मुंबईत निघत असतात.

महालक्ष्मी, मुम्बादेवी, बाबुलनाथ, भुलेश्वरचं राधाकृष्ण मंदिर, माहीमचं सितला-देवी मंदिर, उपनगरातील पार्लेश्वर किंवा गोरेगावची अंबाबाई ही जुनी देवळं आपल्या परिचयाची आहेत. पूर्वीपासून भाविक मंडळी या देवळांत जात असत. नवरात्रात आजही महालक्ष्मीची जत्रा भरते, गिरगावकर आजही श्रावणी सोमवारी बाबुलनाथला जातात. काही झालं तरी या क्षेत्रातली मुंबईतली ही बुजुर्ग मंडळी. पण आज इतर क्षेत्रांत बुजुर्गांना बाजूला सारून नवी, भुरटी युवक मंडळी चमकू लागली आहेत. तसंच देवाधर्माच्या क्षेत्रातही टिटवाळा, सिद्धिविनायक, उद्यान गणेशापासून संतोषीमाता, साईबाबासारखी ज्यूनिअर मंडळी चमकू लागली आहेत.

गणपतीची देवळं मुंबईत पूर्वीही होती. गणेशभक्ती ही काही नवी गोष्ट नव्हे. चतुर्थीला गणेशभक्त उपवास करत, उपासना करत. गणेश-उपासकांच्या भक्तीबद्दल मला सध्या आक्षेप घ्यायचा नाही. देव-धर्म यावरील विश्वास हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत प्रश्न आहे. घटनेने ते स्वातंत्र्य दिलेले आहे. मात्र धर्माला, धार्मिक श्रद्धेला अंधश्रद्धेचे त्याहूनही वाईट म्हणजे व्यापारी आणि त्याहूनही वाईट असं तद्दन फिल्मी स्वरूप येत आहे, त्याचा विचार करायला हवा. ज्याला गणपतीची उपासना करायची त्याला ती घरी बसूनही करता येईल किंवा कोणत्याही गणपतीच्या देवळात जाऊन करता येईल. त्याच्या दृष्टीनं सर्वच गणपती-मंदिरांचं स्थान आणि महत्त्व सारखंच असलं पाहिजे. फिल्मी जगातल्या ताऱ्यांच्या उदयास्तांप्रमाणे गणपती आणि गणपतीच्या देवळांचे उदयास्त असता कामा नयेत.

पण मुंबईत नेमकं तेच होतं आहे, कुलकर्ण्यांच्या बटाट्याच्या भाजीची जागा वडा-पावानं घ्यावी आणि वडा-पावाच्या गाड्यांपैकीही हुतात्मा चौकातल्या तार ऑफिसजवळच्या गाडीपुढं रांगा लागाव्या; तसंच देव आणि देवस्थानांचं होत आहे. एकेकाळी पिकेट रोडच्या मारुतीचं माहात्म्य होतं; आज ते तितकंसं राहिलेलं नाही. सिद्धिविनायकाचं देऊळ पूर्वीही होतं, पण त्याला आजचा भाव नव्हता. शनिवारच्या पिकेट रोड मारुतीच्या रांगा रोडावू लागल्या आणि मंगळवारच्या सिद्धिविनायकापुढल्या रांगा लांबू लागल्या. सिद्धिविनायकाचं महत्त्व वाढू लागताच क्रॉस मैदानात रातोरात हातमागाचं प्रदर्शन किंवा सर्कस उभी रहावी तसा शिवाजी पार्कात उद्यान गणेश निघाला. बाबूभाई जगजीवनदाससमोर बाबूभाई भवानजी निघावा (किंवा बा. भ. समोर बा. ज.) किंवा कॅन्सर रोग्यावरचा 'आनंद' सिनेमा चालल्यावर तसलेच इतर सिनेमे-नाटके निघावी तसाच हा प्रकार. एखाद्या मोठ्या नटानं आपल्या मुलाला पुढे आणावा पण तो फारसा चमकू नये तसंच काहीसं या उद्यान गणेशाचं झालं. सिद्धिविनायकाशी उद्यान गणेश स्पर्धा करू शकला नाही, पण ते देऊळ आजही शिवाजी पार्कच्या मैदानात खडं आहे.

अष्टविनायकांची यात्रा लोक पूर्वीही करत असत. पण अलिकडे त्यात बरीच वाढ झाली आहे. सिनेमामुळे एखाद्या दैवताचं महत्त्व वाढतं तसंच एखाद्या दैवताचं महत्त्व समाजात वाढलेलं दिसलं की हुशार सिनेमावाला त्या दैवतावर सिनेमा काढून खिसे भरतो. हा व्यवहार दुमार्गी आहे. अष्टविनायकांवरून सिनेमा, पुन्हा अष्टविनायकाच्या यात्रांना गर्दी असं चक्र एकीकडे तर दुसरीकडे आधी संतोषीमाता सिनेमा आणि त्यापाठोपाठ संतोषीमातेची वाढती लोकप्रियता. टिटवाळ्याचा गणपती हेही एक लोकप्रिय दैवत, पण त्याच्या लोकप्रियतेत सिद्धिविनायकासारखं सातत्य नाही. एक निरीक्षण असं आहे की टिटवाळ्याच्या गणपतीची लोकप्रियता सरळ मुंबईतल्या तांदूळ पुरवठ्याशी निगडीत आहे! मुंबईत तांदळाचा पुरवठा होत

असतो तेव्हा ठराबीक किंवा पारंपरिक भक्तच टिटवाळ्याच्या गणपतीला जात असतात. मुंबईत तांदळाचा तुटवडा भासू लागला की टिटवाळ्याला भाविकांच्या रांगा लागतात !

संतोषीमाता हे दैवत गुजरातचं. अंबाबाई, तुळजाभवानी ही दैवतं महाराष्ट्राची. मुंबईतला गुजराती समाज संतोषीमातेची उपासना, व्रतं वगैरे करत असे. साहजिकच मुंबईत संतोषीमातेचं माहितीतलं असं एकच देऊळ होतं ते गुजराती वस्तीत गोल देवळाजवळ लादी बाजारात. तेथेही प्रामुख्यानं गुजराती भगिनीच जात असत. गिरगावकर मराठी महिला तिकडे फिरकत नसत. त्या जायच्या महालक्ष्मीला. पण संतोषीमाता सिनेमा तुफान चालला आणि मुंबईत संतोषीमातेची लोकप्रियता एकदम वाढली; जंजीरनंतर अमिताभ बच्चनची वाढली तशी. लादी बाजारातल्या या देवळापुढे रांगा लागू लागल्या. मला वाटतं, संतोषीमातेवर एक मराठी नाटकही येऊन गेलं. आकाशवाणीच्या सकाळच्या भक्तिगीतात संतोषीमातेची आरती ऐकू येऊ लागली. काही ठिकाणी संतोषीमातेची फूटपाथी देवळंही निघाली. सिनेमाचा भर ओसरल्यावर हळूहळू संतोषीमातेच्या देवळापुढील रांगाही रोडावू लागल्या आणि आकाशवाणीवरील संतोषीमातेची आरती व गाणीही विरून गेली. यात खरोखरच धार्मिक श्रद्धा असेल तर बॉबी सिनेमानंतर डिम्पल कापडिया स्मृतीआड व्हावी त्या सहजतेनं संतोषीमाता भक्तीआड होती ना ! दादर (मध्य रेल्वे) स्टेशनवरील पायपुलाकडून बंबखाना किंवा ग्रंथसंग्रहालयाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर मात्र संतोषीमातेचं फूटपाथ-देऊळ आजही उभे आहे.

संतोषीमातेनंतर, अमर-अकबर-ॲंथनी सिनेमा गाजला. या सिनेमात साईबाबांच्या कृपेने नायकाच्या आईला दृष्टीलाभ होतो. झालं, साईभक्तीची लाट आली. जनता लाटेत राष्ट्रपतीपदावर आरूढ झालेले राष्ट्रपतीही आपल्या लवाजम्यासह शिर्डीला जाऊन साईबाबांची पूजा करून आले. लाट लाटेला मिळाली ! साईभक्ती तशी काही नवी नाही, पण या सिनेमानंतर तिला उधाण आलं, फूटपाथवर साईमंदिरं निघू लागली. कापडाचं नवं दुकान निघावं, तशी किंवा अलीकडे फोर्टमध्ये एकदम बारा रुपयेवाले बुशकोट विकणाऱ्या फेरीवाल्यांची लाट आली तशी सुरुवातीला फूटपाथवरील एखाद्या झाडाला तसबीर किंवा फोटो टांगावा, त्याला हार-फुलं वहावी, मग एखाद्या फांदीला घंटा लटकू लागावी आणि एखाद्या शनिवार-रविवारी रातोरात चकचकीत लाद्यांचा चौथरा व वर देव्हारावजा मंदिर. (सारी विनापरवाना बांधकामं शनिवारी-रविवारी होतात, त्यामुळे साईबाबांचा वार गुरूवार असला तरी देऊळ शनिवार-रविवारी उभं रहातं !) मुंबई विद्यापीठाजवळ सेशन कोर्टाच्या भिंतीपाशी बोरीबंदरला एम्पायर-स्टर्लिंग सिनेमाच्या दरम्यान, साने गुरुजी मार्गावर गुलाबराव गणाचार्य चौकाजवळ, माहीमला सिटीलाईट सिनेमासमोर अशी

ठिकठिकाणी फूटपाथवर साईबाबांची मंदिरं दिसू लागली, रांगा लागू लागल्या. सायंकाळी–विशेषतः गुरुवारी ध्वनिवर्धक लावून आरत्या होऊ लागल्या. रोषणाई होऊ लागली आणि अर्थातच आजूबाजूच्या रहिवाशांकडून, दुकानदारांकडून, वर्गणी जमा केली जाऊ लागली.

या साऱ्या देवळामागे कोण मंडळी आहेत? देवळात जमणाऱ्या पैशांचे नेमके काय होते? जमवलेल्या वर्गणीचं काय होतं? वगैरे अनेक प्रश्न उभे रहातात. पण त्यांची उत्तरे तशी सरळ आहेत. यांपैकी बहुतेक देवळांमागे स्थानिक बेरोजगार, आवारा मुले, सिनेमाच्या तिकिटांचा काळा बाजार करणारे, दारू-मटका-अड्डेवाले, स्थानिक दादा हीच मंडळी असतात. काही ठिकाणी त्यांना एखाद्या स्थानिक सेनापतींचा उघड वा छुपा पाठिंबा असतो. विनापरवाना झोपड्या, फेरीवाले हटवले पाहिजेत तर ही देवळंही हटवली पाहिजेत. काही देवळं नगरपालिकेनं हटवली तरी पुन्हा येतच असतात (तशी ही देवळं स्वयंभूच!) काही ठिकाणी साईबाबाऐवजी गणपती, मारुती, तर भायखळ्याच्या वाकड्या पुलापाशी (एस ब्रिज) चक्क शनी महाराज आहेत.

स्वामी नारायण हा गुजराती वैष्णव संप्रदायापैकी एक पंथ. या पंथावर बरेच लिहिण्यासारखं आहे. पण सध्या तो विषय नाही. काही वर्षांपूर्वी स्वामी नारायण द्विशताब्दी (नेमकी कितवी शताब्दी याबद्दल चूकभूल द्यावी घ्यावी!) झाली आणि स्वामी नारायण भिंतीभिंतीवर दिसू लागले. साधारण 'जय गुरुदेव' दिसू लागले त्याच सुमारास दादर मध्य रेल्वे स्टेशनसमोर नवं दिमाखदार देऊळ उभं रहात आहे. काही कोरीव कामही होतं आहे. देवळांपैकी हे पंचतारांकित देऊळ. देवळं आणि देव यांतही एकप्रकारची वर्ण-वर्ग व्यवस्था आहे. टिटवाळा, सिद्धीविनायक, स्वामी नारायण ही मध्यम वर्गापासून वरच्या मंडळींसाठी. साईबाबांच्या भक्तांत श्रीमंत मंडळी विशेषतः सिनेमावाले यांचा भरणा असला तरी त्यांना सिद्धीविनायकाचं स्थान नाही. लायन, रोटरी वगैरे क्लब जसं व्यापारी, उद्योगपती, बडे अधिकारी यांना एकत्र येण्याचं, ओळखी वाढवण्याचं ठिकाण; तसंच काहीसं स्वामी नारायणाचं.

देवळांवर भागत नाही की काय म्हणून आता रस्त्यांची, चौकांची नावं याकडे या मंडळीचा मोहरा वळू लागला आहे. मुळातच आपल्याकडे रस्त्यांची नावं बदलण्याबद्दल काहीही नियम, संकेत नाहीत, कसलाच धरबंध नाही. दादर (मध्य रेल्वे) स्टेशनसमोरील तिठ्याला स्वामी नारायण चौक नाव दिलं आहे. (तिठ्याला चौक म्हणणं सध्या बाजूला ठेवू!) तोच प्रकार मालाडच्या राणी सती मार्गाचा. ही नावं केव्हा, कोणी व कशासाठी दिली? बाबुलनाथ, महालक्ष्मी या देवस्थानांवरून इतिहासाच्या ओघात आजूबाजूच्या परिसराला तीच नावं पडली. ती आज बदलण्याचा

आग्रह असण्याचं कारण नाही. पण दादरच्या कपाळी स्वामी नारायणाची पाटी कशासाठी ? सतीची चाल ही एक दुष्ट रूढी होती. कायद्यानं ती बंद करावी लागली. मध्यंतरी राजस्थानात पुन्हा सतीच्या घटना ऐकू येऊ लागल्या. लोक जागृतीनं आपण ही प्रथा बंद करणार, विधवा स्त्रीला विधवेच्या जिण्याऐवजी सती जावं असं वाटण्याऐवजी समाजजीवनात ती सामावली जाईल अशी समाजस्थिती निर्माण करून तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जोपासायला मदत करणार की सती प्रथेला पुन्हा प्रतिष्ठा मिळवून देणार ?

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे देव-धर्म हा प्रत्येकाचा व्यक्तिगत प्रश्न आहे. सार्वजनिक जीवनात देवा-धर्माचं स्थान काय असावं किंवहुना काही स्थान असावंच का हा प्रश्न आहे. त्याप्रमाणे श्रद्धेला अंधश्रद्धेचं किंवा विकृत बाजारी स्वरूप ही एकंदर समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. श्रद्धा सर्वच समाजात पूर्वीपासून आहे. श्रद्धेतून विनम्रता, चारित्र्य, नीतीची चाड या गोष्टी आल्या पाहिजेत. जीवनातील असुरक्षिततेच्या भावनेला श्रद्धेची आधाराची काठी म्हणून किंवा कुबडी

भेसळयुक्त अभिषेक

पाण्यात भेसळ हा गुन्हा ठरवणारा कायदा करावा अशी मागणी सर्व राज्यांच्या मंत्र्यांच्या परिषदेने केली होती. त्यावरून आपल्या देशातले भेसळविषयक कायदे किती भोंगळ आहेत हे स्पष्ट झाले होते.

मद्रास उच्च न्यायालयाने भेसळीच्या संदर्भात अलीकडे एका अपील सुनावणीत दिलेला निर्णयही अतिशय महत्त्वपूर्ण आणि काहीसा हसायला लावणारा आहे. व्यापारी लोकांची धंदेवाईक वृत्ती कोणत्या थराला जाऊ शकते, याचेही दर्शन या प्रकरणातून घडते. एका व्यापाऱ्याने भेसळ असलेला मध आपल्या दुकानात विक्रीस ठेवला. या मधात भेसळ होती हे खरे, पण त्याने अतिशय शहाजोगपणे या मधाच्या बाटल्यांवर 'फक्त अभिषेकासाठी' असे लेबल लावले होते. कारण अभिषेकासाठी वापरावयाचा मध काही खाद्यपदार्थ ठरू शकत नाही अशी त्याची अटकळ असावी. भेसळीच्या आरोपाखाली त्याच्यावर खटला भरून त्याला सालेमच्या मॅजिस्ट्रेटपुढे उभे केले असता अभिषेकाच्या मधात भेसळ ही अन्नात भेसळ नव्हे म्हणून त्याची अपेक्षेप्रमाणे सुटका झाली. आपली पाताळयंत्री व्यापारी 'ट्रिक' फळाला आली म्हणून त्याने देवाला (भेसळयुक्त) मधाचा अभिषेक केला काय हे कळायला मार्ग नाही,

म्हणून वापर होतो. पण ज्यांना ती न घेता ताठ उभे रहाता येते, प्रश्नांना सामोरे जाता येते ते निश्चितच वरच्या पायरीवर असतात. विज्ञाननिष्ठा आणि प्रश्नांची नेमकी समज यांतून प्रश्न सोडवता येतात. खरं तर त्यासाठी देवाधर्माच्या कुबड्या वापरण्याचं समाज जितक्या लवकर सोडून देईल तितकं चांगलंच. सध्या श्रद्धा मान्य करून तिचं स्वरूप तपासलं पाहिजे.

सध्याच्या समाजव्यवस्थेत प्रत्येकाला असुरक्षिततेची भावना आहे. संधी उपलब्ध नाही; प्रामाणिक श्रम करून गरजा पूर्ण होतील ही शाश्वती नाही. या सर्वांपायी लोक देवाधर्माचा आधार घेतात. विविध देव आणि देवळं यांचं प्रस्थ त्यामुळे वाढतं. पण खऱ्या अर्थानं समाज सश्रद्ध होतो आहे का? श्रद्धा वाढली, तर त्याबरोबर विनय, विनम्रता, चारित्र्य अंगी बाणतंय का? तसं दिसत नाही. देवळासमोरील रांगा वाढतायेत आणि चारित्र्याची पातळी उतरतेय, कोणत्याही मार्गानं पैसा मिळवावा, पैशाचं हिडीस प्रदर्शन करावं, साऱ्याचं मोजमाप रुपये-आणे-पैच्या भाषेत करावं आणि मंगळवारी सिद्धिविनायकाच्या किंवा गुरुवारी साईबाबाच्या रांगेत उभं रहावं

पण अन्न व नागरी पुरवठा खात्याचे अधिकारी काही गप्प बसले नाहीत. त्यांनी या प्रकरणी हायकोर्टात धाव घेतली आणि मधात उघडउघड भेसळ करून साळसूदपणे वावरणारा व्यापारी मोकळा कसा राहू शकतो हा प्रश्न विचारला. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती टी. एन. सिंगारवेल यांनी 'फक्त अभिषेकासाठी' हे लेबल म्हणजे नीतिमत्तेची अजिबात चाड नसलेल्या व्यापाऱ्याचा डोकेबाजपणा आहे, असा शेरा मारला.

या अभिषेकाच्या मधाचा वापर फक्त देवाच्या मूर्तीवर टाकण्यासाठी होत नाही तर देवभक्त लोक अभिषेकानंतर प्रसाद म्हणून मोठ्या भक्तिभावाने त्याचे 'ग्रहण' करतात आणि परिणामी तो त्यांच्या पोटात जातोच. म्हणजे भेसळीचा मध माणसे खातात किंवा पितात. देवाच्या नावाने धंदा तर करायचा आणि वर कायद्याला हुलकावणी देऊन गुन्हा करून नामानिराळे रहायचे असे करणाऱ्या या व्यापाऱ्याला भेसळीबद्दल दोषी ठरवून न्यायमूर्ती सिंगार वेल यांनी योग्य ती शिक्षा दिली. कायद्याच्या तर्कट अर्थावर बोट ठेवून समाजाची फसवणूक करणारे अनेक जण आहेत. त्यांना पकडून न्यायासनासमोर खेचायला हरकत नाही. नव्हे असे 'भेसळयुक्त अभिषेक' करायला लावणाऱ्या व्यापाऱ्यांना भाविकांनी आधी खेटराचा प्रसाद दिला पाहिजे.

(सोमनाथ पाटील, शब्दमेळ, मुंबई सकाळ, १५ डिसेंबर ८४)

असा सोपा हिशेब मांडला जातोय. फूटपाथ-देवळं म्हणजे जणू निरुद्योगी माणसांची रोजगार हमी योजनाच! माटुंग्याच्या गणेशोत्सवाच्या झगमगाटामागे मुंबईतल्या एका मोठ्या समाजकंटकाच्या काळ्या पैशाच्या थैल्यांचे पाठबळ आहे.

साईबाबा हे खरं तर हिंदू-मुस्लिम सामंजस्याचं प्रतीक, पण साईबाबांची देवळं वाढली. रांगा वाढल्या, म्हणून हिंदु-मुस्लिम सामंजस्य वाढलं असं होत नाही. देवाला आपण हप्ता घेऊन काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याच्या पातळीवर आणून बसवतोय; एकानं काम केलं नाही तर दुसऱ्याला गाठावं तसं पिकेट रोडहून प्रभादेवीला जातोय हे कोणाच्याच लक्षात येत नाही का? मशिदीवरच्या ध्वनिवर्धक कर्ण्याचा त्रास होतो तसा नाक्यावरच्या देवळांतून किंचाळणाऱ्या भजनापासून फिल्मी भक्तिगीतांपर्यंतच्या गाण्यांच्या तबकड्यांचा नाही का होत? आगगाडीत तारस्वरात भजनही म्हणणारी मंडळी डब्यातल्या सहप्रवाशांचा विचार करत नाहीत. मग प्रामुख्यानं व्यापारी मंडळी असलेल्या या टाळकऱ्यांनी ग्राहकांचा विचार तरी कसा करावा? गंमत अशी की आणीबाणीत ही भजनं एकदम बंद झाली होती. सारीच आळीमिळी होती ना! पण दुसरं स्वातंत्र्य येताच पुन्हा यांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्यही परत आलं. या साऱ्यांत श्रद्धा कोठे बसते? देवावर भरवसा ठेवून त्याला लाच देण्याचा प्रयत्न करायचा की प्रामाणिक श्रम, श्रमाची प्रतिष्ठा आणि आजच्या प्रश्नाबद्दल विवेकानं विचार करून आजच्या व्यवस्थेत या प्रश्नांची रुजलेली मुळं खणून काढण्याचा प्रयत्न करण्यासाठी मनगट आणि मेंदू यांच्यावर भरवसा ठेवायचा हे ठरवण्याची वेळ आली आहे.

(महाराष्ट्र टाईम्स, रविवार, मुंबई. ३० डिसेंबर १९८४)

इच्छामरणाचा हक्क हवाच !

विनायक रा. लिमये

आज आपल्या देशात लोकसंख्या व वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या याचा स्फोट झाला आहे आणि या परिस्थितीत नजीकच्या भविष्यकाळात फरक पडेल अशी चिन्हे निदान आज तरी दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. त्यामुळे देशाच्या साधनसंपत्तीवर असह्य ताण पडत आहे आणि सरकारच्या कार्यक्षमतेतही खूपच कपात झाली आहे. अर्थात सरकारची कार्यक्षमता कमी होण्याला हे एकमात्र कारण नाही.

अशा परिस्थितीत मरणाच्या हक्काची एक नवीन मागणी पुढे करून सध्याच्या गोंधळाच्या परिस्थितीत भर घालणे कितपत योग्य आहे, असे काही लोकांना वाटण्याचा संभव आहे; पण या मागणीचे स्वरूप हे इतर मागण्यांसारखे नाही. कोणतीही मागणी मान्य करण्याने देशाच्या आधीच तोकड्या असलेल्या साधनसामग्रीवर आणखी ताण पडतो, पण माणसाला मरणाचा हक्क बहाल करण्याने तसे काही होणार नाही. उलट त्यामुळे वाचलेली साधनसंपत्ती दुसऱ्या लायक लोकांच्या उपयोगासाठी उपलब्ध होईल. ही मागणी मान्य करण्यासाठी सरकारला फारसे काही करावे लागणार नाही, करावा लागेल फक्त सध्याच्या आत्महत्येसंबंधीच्या कायद्यात बदल.

सध्याच्या कायद्याने, १. आत्महत्येचा प्रयत्न, २. एखाद्याला यासाठी मदत करणे आणि ३. एखाद्याला आत्महत्येला प्रवृत्त करणे हे सर्व गुन्हे ठरविले आहेत.

आता यात बदल व्हावयास हवा तो असा : १. हे रद्द करणे, २. यातून निदान डॉक्टर आणि शल्यविशारद यांना वगळणे, ३. ही व्यवस्था तूर्त ठेवायला हरकत नाही.

कायद्यात या प्रकारचा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यासाठी आपल्या देशात मे १९८१ मध्ये 'द सोसायटी फॉर द राईट टू डाय वुईथ डिग्निटी' या संस्थेची स्थापना मुंबई येथे एम. आर. मसानी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली आहे.

आपल्या देशातील अशा प्रकारची ही एकमेव संस्था आहे. या प्रश्नासंबंधी लोकमत जागृत करणे आणि कायद्यात थोडासा बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे एवढेच माफक ध्येय तिने ठेवले आहे. प्रचलित कायद्याचा भंग करण्याचा संस्थेचा सध्या तरी विचार नाही.

सर्व जगात या प्रकारचा प्रयत्न करणाऱ्या एकूण अठ्ठावीस संस्था आहेत. त्या सर्वांची मिळून जी एक संस्था आहे तिचे 'द वर्ल्ड कॉन्फरन्स ऑफ राईट टू डाय सोसायटीज' असे नाव आहे. दर दोन वर्षांनी तिचे अधिवेशन भरत असते.

दीर्घायुष्य हा अनेकांना शाप ठरतो. जोपर्यंत जगण्यात मौज आहे तोपर्यंतच मरण आलेले चांगले, ही गोष्ट उघड आहे आणि जर ते नैसर्गिकरीतीने येत नसेल

इच्छामरण—विचारमंथन व प्रचाराची गरज

'इच्छामरणाचा हक्क' या विषयासंबंधी काही मुद्यांचे तळमळीने मार्मिक विवेचन करून श्री. विनायक लिमये यांनी एकप्रकारे सामाजिक कर्तव्य पार पाडले आहे.

आत्महत्या हा असा एकच गुन्हा आहे, की तो करण्याचा प्रयत्न करणाऱ्यास वा त्याला प्रवृत्त करणाऱ्यास शिक्षा होते. पण प्रत्यक्ष गुन्हा घडल्यावर तो गुन्हेगार मात्र शिक्षेमधून निसटतो ! कारण आत्महत्या करून गुन्हेगाराला शोधून कोर्टापुढे खेचणे, शिक्षा ठोठावणे शक्यच नसते. त्यामुळे कोणी परवानगी देवो, न देवो, आजही शेकडो, हजारो लोक प्रत्यही आत्महत्या करून 'इच्छामरणाचा हक्क' उपभोगीत असतातच. फक्त त्यांच्या त्या कृत्याला नैतिक पाठिंबा देणाऱ्यांच्या नावाने तथाकथित समाज–हितचिंतक आकांडतांडव करतील, एवढेच ? पण त्याची पर्वा करण्याचे कारण नाही !

कोणतीही नवीन गोष्ट सांगणाऱ्याने स्वतः करून दाखवावी, आचरणात आणावी, मग इतर लोक त्याचे अनुकरण करतील, हे तत्त्व इतर बाबतीत

तर मुद्दाम घडवून आणले पाहिजे. पण आज जो कायदा आहे त्यामुळे हे शक्य होत नाही. म्हणून प्रचलित कायद्यात इष्ट तो बदल घडवून आणला पाहिजे.

या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. नैसर्गिकरीत्या मरण येण्यापूर्वी ज्यांना आपले जीवन संपविण्याची इच्छा असेल त्यांच्या मार्गातील आजच्या कायद्याची अडचण दूर करणे हा इच्छामरणाच्या चळवळीचा उद्देश आहे. येथे कोणावरही सक्ती करण्याचा उद्देश नाही. नैसर्गिक मृत्यूच्या माध्यमातूनच आपले जीवन संपावे अशी ज्यांची इच्छा असेल त्यांना त्यांच्या मार्गाने जाण्याचे जे स्वातंत्र्य आज आहे ते केव्हाही अबाधितच राहणार आहे.

इच्छामरण ही कल्पना पुष्कळांना चमत्कारिक वाटेल आणि ते तिला विरोधही करतील. कोणत्याही नवीन कल्पनेचा सुरुवातीला विरोध होत असतो. कृत्रिक साधनांनी संततिनियमन, गर्भपात यांनाही विरोध करणाऱ्यांची संख्या एकेकाळी फार प्रचंड होती, पण ती स्थिती आज राहिलेली नाही. संततिनियमनाची कृत्रिम साधने, गर्भपाताला कायद्याने मान्यता इत्यादीमुळे नवीन जीव जन्मास घालण्याचे अगर न घालण्याचे आणि जीव निर्माण करण्याची वेळ ठरविण्याचे स्वातंत्र्य माणसाला मिळाले आहे. इच्छामरणाला परवानगी देण्याने माणसाला आपल्या मरणाची वेळ

ठीक आहे. पण इच्छामरणाच्या हक्काचे समर्थन आणि प्रचार–प्रसार करू पाहणाऱ्याने अगोदर इच्छामरण स्वीकारावे, हे कसे शक्य आहे ? 'आधी केले मग सांगितले' हे एवढ्या बाबतीत केवळ अशक्य आहे. पुणे येथील सेवानिवृत्त इंजिनिअर मंडलिक यांनी या विषयावर चार–पाच वर्षांत खूप लेख लिहून प्रचार केला व त्यात '१९८३ साल पाहण्यास मी जिवंत असणार नाही,' अशी गंभीरपणे प्रतिज्ञा करून १९८२ च्या डिसेंबर अखेरीस विषारी द्रव्य सेवन करून आपल्या जीवनाचा अंत करून घेतला. गेले बिचारे ! कोणी 'तत्वनिष्ठ' तर कोणी 'मूर्ख', 'माथेफिरू' म्हणून त्यांची संभावना केली असणार ! चार-दोन वृत्तपत्रांत दहा-पाच ओळी बातमी आली आणि पाण्यात खडा पडल्यावर चार तरंग उठल्यावर जलाशय शांत राहावा त्याप्रमाणे सारे शांत झाले !

वयाची बासष्ट वर्षे उलटलेल्या श्री. लिमयांनी अगर सदुसष्ट वर्षे उलटलेल्या (पण जिवंत राहून साहित्यनिर्मिती करण्याची जिद्द असलेल्या, स्वातंत्र्य-सैनिक वगैरे तीन प्रकारच्या पेन्शन घेणाऱ्या) माझ्यासारख्या काही चारदोन व्यक्तींनी इच्छामरणाचा हक्क बजावून (आजच्या कायद्याच्या भाषेत बोलायचे

निश्चित करण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे.

इच्छामरणाची मागणी ही विकृत मनोवृत्तीच्या लोकांच्या डोक्यातून निघालेली एक कल्पना आहे, असेही म्हणता येणार नाही. पुण्याचे रहिवासी व पश्चिम रेल्वेतील सेवानिवृत्त अभियंता गोपाळ मंडलिक यांच्या स्वेच्छामरणाच्या कल्पनेला न्यायमूर्ती छगला यांनी पाठिंबा दिला होता. विख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. मोदी यांनी श्री. मंडलिक यांनी 'जीवन मुक्ती' संस्था काढावी आणि त्या संस्थेसाठी प्रचार करावा असा सल्ला त्यांना दिला होता. प्रख्यात लेखक आर्थर कोस्लर यांनी आत्महत्येच्या मार्गाने आपले जीवन संपविले. आपल्याला हाडाचा कर्करोग झाला असून त्यावर कोणताही उपाय नाही, आपल्याला असह्य वेदना होत आहेत आणि यापुढील आपले जे काही आयुष्य उरले असेल ते परावलंबी होणार म्हणून विन्स्टन चर्चिल यांचा मुलगा रॅंडाल्फ चर्चिल यांची पत्नी श्रीमती जून स्पेन्सर चर्चिल हिने आत्महत्येचा मार्ग पत्करला. कृत्रिम हृदयरोपणाची प्रथम शस्त्रक्रिया करणारे विख्यात शल्यविशारद डॉ. खिश्चन बर्नॉर्ड यांनी दयाळू मृत्यू (Mercy Killing) हा कायदेशीर बनवावा, असे मत दिले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी इच्छा-मरणाची जरुरी असल्याचे मत मांडले होते आणि त्यांनी आपल्या शेवटच्या

तर आत्महत्या करून) हा प्रश्न धसाला लागणार नाही. त्यासाठी समाजातील जाणत्या, प्रामाणिक, पुरोगामी वृत्तीच्या विचारवंतांनी विचारमंथन करून हा प्रश्न धसाला लावायला हवा. १. 'सकाळ'सारख्या वजनदार पुरोगामी वृत्त-पत्रांनी तो वाचकांच्यासमोर चर्चेसाठी ठेवायला हवा. २. 'जीवनमुक्ती मंडळ' किंवा अशाच नावाची किमान महाराष्ट्रीय स्तरावरील लहानशी संस्था, परिषद स्थापन करून तिच्याद्वारे वरचेवर जिल्ह्या-जिल्ह्यांतून चर्चासत्र घडवून आणायला हवीत. ३. कोणातरी आमदाराने विधानसभेत व खासदाराने लोक-सभेत इच्छामरणाचा हक्क कायदेशीर करण्यासंबंधीचे खासगी विधेयक आणा यला हवे. मग ओघानेच लोकमत अजमावण्यासाठी ते चर्चेला समाजापुढे, देशापुढे येईल. विचारमंथन होईल व कुटुंबनियोजन, कायदेशीर गर्भपात वगैरेसारख्या आपल्या पुरोगामी योजनांप्रमाणेच तेही एक दिवस विधिसंमत होऊन जाईल. अनेक अनामिक लोकांचे आत्मसमर्पण सार्थकी लागेल.

इच्छामरणाच्या हक्काला कायदेशीर मान्यता देण्यासाठी विधेयक पुढे येईल, तेव्हा सांगोपांग चर्चा होऊन, हा हक्क देण्यास पात्र अशा प्रकारची यादी निश्चित केली जाईलच. श्री. लिमये यांनी आपल्या लेखात (कदाचित

आजारात औषधी उपाययोजनेचा त्याग केला होता. आचार्य विनोबा भावे यांनीही हाच मार्ग स्वीकारला. जैन आचार्य सल्लेखना मरणाच्या मार्गाने मृत्यूला सामोरे जातात. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ आणि लेखिका डॉ. इरावती कर्वे यांनी तर माणसाला पन्नास वर्षे पूर्ण झाली, की त्याला कोणत्या ना कोणत्या उपायाने मारून टाकावे असे सुचविले आहे (गंगाजल : जुन्याच समस्या, नवे उपाय). स्वतंत्र प्रज्ञावृत्तीच्या विचारवंत श्रीमती शकुंतला परांजपे या इच्छामरणाच्या कल्पनेच्या जोरदार पुरस्कर्त्या आहेत. पोपनीसुद्धा मर्यादित इच्छामरणाच्या कल्पनेचा पाठपुरावा केला आहे. ही यादी आणखी किती तरी वाढविता येईल. यांतील एकही व्यक्ती विकृत विचारसरणीची आहे, असे कुणालाही म्हणता येणार नाही.

आधुनिक वैद्यकशास्त्राच्या प्रगतीमुळे माणसाचा मृत्यू टळला नाही (आणि भौतिकशास्त्रांची कितीही प्रगती झाली तरी तो टळणार पण नाही.)पण तो बराच पुढे गेल्यामुळे (कारण माणसाची सरासरी आयुर्मर्यादा वाढली आणि ती अजूनही वाढतच आहे.) म्हाताऱ्या माणसांची संख्या वाढली. आज आपल्या देशात साठापेक्षा जास्त वय असणाऱ्यांची संख्या सुमारे सहा कोटी आहे आणि इ. स. २००० मध्ये ती पंधरा कोटींच्या आसपास असेल.

स्थळाभावी) ती दिली नसली तरी ती तुम्हा-आम्हाला सहज समजण्यासारखी आहे. उदा. महारोग, कर्करोग, अर्धांगवात, मर्यादा ओलांडलेला क्षयरोग, यातना देणारा पराकोटीला पोचलेला मधुमेह वगैरे. आज ना उद्या मरणारच, पण निष्कारण कुटुंबियांना खर्च, खस्ता आणि पर्यायाने जनतेच्या पैशातून चाललेले दवाखाने यांच्यावर भारभूत झालेले, अनेक रोगांनी त्रस्त आणि जगणे असह्य झालेले रोगी, वृद्धापकाळी दीर्घकाळ मृत्युशय्येवर पडून कुटुंबियांच्या सहनशीलतेचा, माणुसकीचा अंत पाहणारे अभागी वृद्ध अगर अपंग अवस्थेमुळे अन्नान्नदशा झालेले, केवळ समाजाच्या भूतदयेवर जगणारे लाचार, दुबळे, वृद्ध, निराधार स्त्री–पुरुष अशा प्रकारच्या लोकांना जीवनाचा अंत करून घेण्यास कायदा आड येऊ नये.

गंमत अशी, की ज्यांचा आज जगाला तिळमात्र उपयोग नाही, ज्यांना जगणे असह्य झाले आहे. १. मरण येत नाही म्हणूनच जगणे. २. जगण्यासाठी मिळेल ते तुटपुंजे कदान्न घशाबाटे पोटात ढकलणे आणि ३. ते अन्न मिळविण्यासाठी धडपडणे, लोकांचे पुढे हात पसरणे ही 'जीवनाची त्रिसूत्री' झालेले लोक, आंधळेपांगळे, अपंग; रस्त्यात, देवाच्या दारात भीक मागून

जगायचे कसे ही चिंता असणारे जसे कोट्यवधी लोक जगात आहेत, तसे आपण या जगातून, जाताना आपल्याला किती हाल, यातना यांना तोंड द्यावे लागेल याची चिंता करत असणारेही कोटींनी मोजता येतील एवढे लोक आहेत. पहिल्या प्रकारच्या लोकांची समस्या सोडविणे खूप अवघड आहे, पण दुसऱ्या प्रकारच्या माणसांचा प्रश्न इच्छामरणाने सोडविता येईल, नव्हे त्यांचा प्रश्न सोडविण्याचा तो जवळजवळ एकमात्र मार्ग आहे. पाहिजे तेव्हा मरणाचा हक्क मिळण्याने अशा माणसांना एक प्रकारची मानसिक निश्चितता लाभेल आणि आपल्या आयुष्याचा राहिलेला काळ काहीशा स्वस्थतेने ते जगू शकतील. त्यांच्याबाबतीत इच्छामरण हे धोक्याच्यावेळी बाहेर जाण्याच्या मार्गाची जागा घेऊ शकेल.

जीवन हे शेवटी आहे तरी कुणाचे ? ते संपविणे अगर चालू ठेवणे हा अधिकार कुणाचा आहे आणि खरोखर कुणाचा असला पाहिजे ? हा अधिकार सरकारला का आणि कशासाठी ? मग माणसाला सुखी होण्यास मदत करणे, माणूस सुखी होईल, (दुःखापासून मुक्तता हेही सुखच आहे.) अशी परिस्थिती निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट असले पाहिजे. एखाद्याचे जीवन जगण्याच्या लायकीचे आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार कुणाचा ? त्या माणसाचा अथवा सरकारचा ? माणूस

मिळालेल्या चार पैशांवर पोटाची खळगी भरण्यात पुरुषार्थ मानणारेच या जगात आणखी चार दिवस राहण्यासाठी धडपडतात. आणि ऐन उमेदीतील तरुण आणि तरुणी परीक्षेत नापास झाल्यामुळे, बेकारीला कंटाळून, प्रेमभंग झाल्यामुळे, नवऱ्याचा, सासरच्या लोकांचा जाच असह्य झाल्यामुळे, धंद्यात नुकसानी आल्यामुळे कोणी विनयभंग झाल्यामुळे, अपेक्षेप्रमाणे गोष्टी न घडल्यामुळे अशा अनेक प्रकारच्या कारणांमुळे क्षणिक वैफल्याच्या मनःक्षोभाच्या अवस्थेत मृत्यूला कवटाळीत असतात. या प्रकारच्या आत्महत्यांचेच प्रमाण शेकडा नव्वदपर्यंत भरेल. अशा आत्महत्यांना कायद्याचे संरक्षण तर मिळू नयेच, पण त्या घडू नयेत अशी परिस्थिती निर्माण करणे हे समाजाचे, कल्याणकारी सरकारचे आद्य कर्तव्य आहे. इच्छामरणाच्या हक्काचा प्रचार करणाऱ्या संस्थेनेही अशा क्षणिक भावनेतील घडणाऱ्या आत्महत्येची पाळी येऊ नये, यासाठी प्रचार करायला हवा.

श्री. लिमये लिहितात त्याप्रमाणे प्रख्यात समाज व मानववंश शास्त्रज्ञ डॉ. इरावतीबाई कर्वे यांच्या पन्नाशी ओलांडलेल्यांना येनकेन प्रकारे निरोप द्यावा, या म्हणण्यातील अतिशयोक्तीचा भाग वगळून, त्यातील भावार्थ

जन्माला येताना स्वतःच्या इच्छेने आपणहून येत नाही, मग त्याने त्याला नैसर्गिक-रीत्या मरण येईपर्यंत जगलेच पाहिजे ही सक्ती का म्हणून ? माणूस जन्माला येताना एकटाच येतो आणि जातानाही तो एकटाच जातो, त्याला होणाऱ्या वेदना त्याला एकट्याला सहन कराव्या लागतात, त्याचे अगदी जवळचे आणि प्रेमाचे माणूससुद्धा त्याला या बाबतीत मदत करण्यास सर्वथा असमर्थ असते. मग त्याला या परिस्थिती-तून सुटका करून घ्यावयाची असल्यास त्याच्या मार्गात कायद्याची धोंड उभी करणे हा शुद्ध अघोरीपणा आहे. सरकार आणि त्याचे कायदे हे माणसाचे प्रश्न सोडविण्या-साठी असले पाहिजेत, ते कुजत आणि कुचंबत ठेवण्यासाठी असता कामा नयेत. कायदा माणसासाठी असला पाहिजे, माणूस कायद्यासाठी असता कामा नये.

या लेखात वर एके ठिकाणी आर्थर कोस्लर यांच्या आत्महत्येचा उल्लेख केलेला आहे. या संदर्भात खास सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी सिंथिया हिनेही आत्महत्या केली. तिची प्रकृती चांगली होती आणि वयही छप्पन्न होते. कोस्लर यांच्या पश्चात आपले जगणे निरर्थक होईल, असे तिला वाटल्यामुळेच तिने आत्महत्येचा मार्ग पत्करला असणार, हे उघड आहे.

माणसाला इच्छामरणाचा हक्क बहाल केला, तर या सबलतीचा काही लोक

लक्षात घ्यायला हवा. वस्तुस्थिती अशी आहे की पन्नाशी नव्हे, साठी व सत्तरी ओलांडलेल्या व्यक्तींनीही सरसकट मरावे असे म्हणणे आमघातकीपणाचे होईल. कारण अनेक राजकारणी मुत्सद्दी, तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ, साहित्यिक, थोर कलाकार, समाजातील थोर विचारवंत यांच्या कर्तबगारीला आणि प्रतिभेला साठी ओलांडल्यावरही बहर येतो. वयाच्या व शक्तीच्या मानाने त्यांचा आहार कमी झालेला असतो. पण ते समाजासाठी, भावी पिढीसाठी बहुमोल कार्य करीत असतात. त्यांनी जीवनाचा (असह्य झाल्यावर) अंत कधी करून घ्यायचा ते त्यांच्यावरच सोपवावे. कारण कोणी न सांगताच एक दिवस हा निर्णय घेण्याएवढे ते विचारी असतात.

कोणतीही नवीन कल्पना पुढे आली, ती समाजाच्या, देशाच्या कितीही हिताची जिव्हाळ्याची असली तरी नाके मुरडणारे, हेत्वारोप करणारे, नाही नाही त्या शंका निर्माण करणारे, स्वतःच्या विद्वत्तेची घमेंड मिरवणारे, 'शंकासूर' असतातच ! असे लोक सततच नव्या कल्पनांना कोलदांडा घालण्याचा प्रयत्न करीत असतात. इच्छामरणाला सरसकट मुक्तपणे मुभा देण्यात येईल, नातेवाईकांचे डबोले व वारसा मिळविण्यासाठी, आपल्या

दुरुपयोग करतील, गैरफायदा घेतील अशी शंका काही जण प्रकट करतात. यावर आचार्य काका कालेलकर यांचे असे म्हणणे आहे की, मला तुम्ही एकतरी असा कायदा दाखवा की ज्याचा दुरुपयोग केला जात नाही. काही लोक दुरुपयोग करतील या आशंकेने योग्य तो कायदाच न करणे हा शुद्ध वेडेपणा आहे. शिवाय इच्छा मरणाच्या सबलतीचा दुरुपयोग होण्याची, कुणाकडून तरी गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता एका नैसर्गिक कारणाने अत्यल्प आहे. ते कारण असे, की माणसाच्या ज्या मूलभूत भावना आहेत त्यांपैकी सर्वांत प्रबळ भावना म्हणजे स्वतःचे अस्तित्व टिकविणे.

वार्धक्यावस्थेत शेवटी शेवटी माणूस आजारी नसला तरीसुद्धा इतका दुबळा होतो, की शरीराची मामुली हालचाल करण्यासाठीसुद्धा त्याला कुणीतरी मदत करावी लागते. अर्धांगवायूचा जोरदार झटका आलेला माणूस तर सर्वस्वी परावलंबी असतो. याचाच अर्थ असा, की इच्छामरणाला असलेली आजची कायदेशीर अडचण नाहीशी झाली तरीही त्याला ती कृती करण्यासाठी दुसऱ्या कुणाच्या तरी मदतीची गरज लागेल. तसेच आजच्या कायद्यातील आत्महत्येच्या प्रयत्नासंबंधीचा भागच तेवढा रद्द केला आणि एखाद्याला आत्महत्येच्या काळात मदत करण्या-

---

मार्गातील काटा दूर करण्यासाठी कायद्याचा दुरुपयोग केला जाईल, ही शंकाच घेणे मूर्खपणाचे आहे. बिजार शिवणारा आकस्मिक अडचणीसाठी तरतूद करून ठेवतोच, अशी म्हण आहे. कायदेतज्ज्ञांना हे ज्ञान असतेच. थोडे स्पष्टीकरणच करायचे म्हणजे मरायला तयार होणाऱ्याला लगेच परवानगी मिळणार नाही. चार पंचांच्या साक्षीने दंडाधिकाऱ्याच्या दर्जाचा माणूस त्याचा अर्ज घेईल, कारणांची छाननी करेल, खोल चौकशी होईल, चार-सहा महिन्यांची मुदत देण्यात येईल. मत परिवर्तन झाल्यास अर्ज रद्द होईल व शेवटी सरकारी गॅझेटेड डॉक्टरांच्याच हातून, संबंधित मंडळींच्या नातेवाईकांच्या समक्ष, त्या इच्छुकाला एक गोळी दिली जाईल व हसतखेळत गप्पा मारीत इतरांचा शेवटचा निरोप घेतच तो बिचारा जिवंतपणीच्या मरणयातनांतून मुक्त होण्यासाठी या जगाचा निरोप घेईल.

इच्छामरणाला परवानगी देण्याच्या कायद्याचा फायदा घेण्यासाठी फार थोडे लोक पुढे येतील. कुटुंब नियोजनाप्रमाणे याचा खूप प्रचार व्हायला पाहिजे. ठायी ठायी दिसणाऱ्या भिकाऱ्यांच्या झुंडीच्या पुढे, दवाखान्यातील असाध्य रोग विभागातील रुग्णांच्या पुढे, प्रचारकांनी जीव तोडून प्रचार

संबंधीचा भाग तसाच कायम ठेवला तर एका विशिष्ट उदाहरणात काय चमत्कारिक स्थिती निर्माण होईल ते पाहा. अ आणि ब एकमेकाला उत्तेजन देऊन संगनमताने एकत्र आत्महत्या करण्याचा निर्णय घेतात आणि या निर्णयाला अनुरूप अशी कृती करतात. यामध्ये अ मरण पावतो आणि ब मात्र प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे जिवंत राहतो. या परिस्थितीत ब वर अ चा खून करण्याच्या आरोपावरून खटला होऊ शकतो. आपल्या देशातील कायद्याने आत्महत्या हा गुन्हा मानलेला नाही तर आत्महत्येचा प्रयत्न हा गुन्हा ठरविलेला आहे. त्यामुळे या उदाहरणातील अ चा मृत्यू ब ने त्याचा केलेला खून ठरू शकतो. हा सर्व विचार करता आजच्या कायद्यातील एखाद्याला आत्महत्या करण्यासाठी मदत करणे हा गुन्हा आहे हा भागही रद्द करण्यात आला पाहिजे.

माझ्या वयाला बासष्ट वर्षे पूर्ण झाली असून मला आता त्रेसष्टावे वर्ष चालू आहे, पण वयाच्या तिसाव्या वर्षापासून माझे असे मत आहे, की माणसाला इतर काही हक्कांबरोबरच मरणाचाही हक्क असण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे आतापर्यंत नाही म्हटले तरी काही हजार लोकांबरोबर मी या विषयावर बोललो आहे. या बोलण्याच्या अनुभवावरून मला असे आढळून आले आहे की, साधारणतः

करायला हवा. धडधाकट भिकारी कदाचित काम करायला तयार होतील. अनेक अपंग भिकाऱ्यांना सोपे उद्योग द्यावे लागतील. कालांतराने या प्रचाराचा परिणाम निश्चित होईल. समाजसेवी संस्था, शासन संस्था, यांनी सहकार्याने या योजनेला समाविष्ट होण्यास पात्र अशा लोकांना एक पैसाही खर्च करावा न लागता सर्व सव्यापसव्य करण्याची जबाबदारी स्वीकारावी. या गोष्टीचा निश्चित फायदा होईल. राष्ट्राची साधनसामग्री फारशी वाचली नाही, तरी दरवर्षी हजारो व्याधिग्रस्त स्वतः मरणयातनांतून मुक्त होऊन आपला कुटुंबियांवरील, समाजावरील, देशावरील अकारण पडणारा बोजा कमी करतील. मात्र चिकाटीचे प्रयत्न करायला हवेत.

(' माझ्या मते, ' कोल्हापूर सकाळ, २२ जुलै १९८४)

पंचेचाळीस–पन्नासपेक्षा ज्यांचे वय जास्त आहे अशा व्यक्तींना ही कल्पना मान्य होते. अगर त्यांना ती पटवून द्यावयास फार प्रयास पडत नाहीत. मात्र त्यापेक्षा कमी वयाच्या आणि विशेषतः तरुण लोकांना ही कल्पना पटवून देणे हे खूपच जड जाते आणि एका दृष्टीने हे नैसर्गिकपण आहे. वृद्ध आणि तरुण माणूस हे जीवनाच्या ज्या पातळीवरचे जीवन जगत असतात त्या पातळ्या एकमेकांपासून सर्वस्वी वेगळ्या असतात. वृद्धांच्यापाशी भूतकाळ मोठा आणि भविष्यकाळ लहान असतो, तर तरुणांच्या बाबतीत सर्वस्वी याच्या उलट स्थिती असते. इच्छामरणाच्या हक्काचे महत्त्व आज तरी त्यांना वाटणार नाही, पण आज तरुण असलेल्यास जर अकाली मरण आले नाही तर तोही भविष्यकाळात यथावकाश म्हातारा होणारच आहे. शिवाय असाध्य रोग आणि जीवन लुळेपांगळे करणारे घात–अपघात तर कुणालाही आणि केव्हाही होऊ शकतात. तेव्हा तरुण माणसालाही मरणाच्या हक्काची गरज केव्हाही जाणवण्याची शक्यता आहे. पण त्यासाठी जर आतापासूनच प्रयत्न केले नाहीत तर त्या वेळेपर्यंतसुद्धा माणसाला मरणाचा हक्क मिळालेला असणार नाही, तेव्हा माझी तरुण वर्गाला ही विनंती आहे की, त्यांनी हा प्रश्न आपलाच समजावा आणि या चळवळीचे आज प्रायः वृद्धांच्या हाती असलेले नेतृत्व आपल्या हाती घ्यावे.

(कोल्हापूर सकाळ, १० जून १९८४)



दोन इक्षुमहर्षी

ना. नि. देशपांडे

भारतातील साखर उद्योग आता इतका भरभराटीला आला आहे की, स्वतःच्या गरजेइतका साखर पुरवठा करूनही मोठ्या प्रमाणात साखरेची निर्यात करून विदेशी चलन संपादन करण्याइतकी आता प्रगती झाली आहे, एवढेच नव्हे तर जगातील प्रमुख ऊस लागवड करणाऱ्या देशांत भारताचा बराच वरचा क्रमांक लागतो. ही प्रगती हेक्टरी उत्पादनाच्या दृष्टीने कदाचित् फारशी उच्च नसेल (अर्थात् त्यालाही काही कारणे आहेत) परंतु तंत्रज्ञान व शर्करांप्रमाण यादृष्टीने बरीच प्रगती गाठली गेली आहे. निदान दक्षिण भारतातील राज्यांची तरी हेक्टरी उत्पादनाच्या बाबतीतही ही पातळी खाली असण्याचे कारण म्हणजे उत्तरेकडील राज्यांची हवामानविषयक परिस्थिती ही तुलनात्मकदृष्ट्या दक्षिणेकडील राज्यांच्या मानाने ऊसाचे हेक्टरी उत्पादन व शर्करांप्रमाण या बाबींबाबत तितकीशी अनुकूल नाही (जमिनी जरी जास्त कसदार असल्या तरी); शिवाय ऊसाच्या वाढीचा हंगाम हा बराचसा लहान असतो. परिणामी अल्प हंगामी जाती व परिणामी कमी उत्पादन व कमी उतारा मिळतो. ही झाली सध्याची परिस्थिती.

सुमारे अर्ध शतकापूर्वीची परिस्थिती म्हणजे इ. स. १९३० सालापर्यंत साखर उद्योग धंद्याला संरक्षण मिळाले नव्हते. त्यामुळे भारतात फारच थोडे साखर कारखाने होते व जे होते ते कसेतरी जीव धरून होते व काहींनी आपले कारखाने परवडत

नाहीत म्हणून बंदही केले होते. त्यांपैकी महाराष्ट्रातील एक ठळक उदाहरण म्हणजे बारामती येथील साखर कारखाना. बेलापूर कंपनीचा (श्रीरामपूर) साखर कारखाना कसातरी जीव धरून चालला होता. याचे मुख्य कारण विदेशी साखरेची आयात फार मोठ्या प्रमाणात होत असे व ती बरीचशी स्वस्तही असे. तेव्हा त्या साखरेशी टक्कर देण्याची कुवत आपल्याकडील साखर कारखान्यांत नव्हती, शिवाय ऊस लागवडीचे तंत्र व कारखान्यातील तंत्रज्ञान हे पण विकसित झाले नव्हते. बहुतांशी साखर जावा, मॉरिशस व सईवियाना (उत्तर अमेरिका) या देशातून येत होती व ती अनुक्रमे 'जॉन्सन,' 'मोरस' व 'लिसा' या अपभ्रंशित नावांनी ओळखली जात होती. भारतातील काही थोडे कारखाने पिठीसाखर किंवा खांडसारी साखरेची निर्मिती करीत असत. बहुतांशी ऊस हा गुऱ्हाळात गुळाच्या निर्मितीसाठी वापरला जात असे. ऊसाच्या जाती पण स्थानिक पुरातन काळापासून चालत आलेल्या असत; त्याही प्रदेशानुसार भिन्न असत. त्याही काळात काही जाती इतर देशातून आणवून थोड्याफार प्रमाणात लागवडीचे प्रयत्न झाले. परंतु या जाती हेक्टरी उत्पादन, शर्कराप्रमाण व वाढीचा हंगाम यादृष्टीने जरी सरस असल्या तरी भारतीय परिस्थितीत त्या फारशा समरस होऊ शकल्या नाहीत. त्यापैकी बेलापूर कंपनीने लागवडीत आणलेल्या ई.के.–२८ व पी.ओ.जे.–२८७८ या जातीने बरेच महत्त्वाचे स्थान पटकावले होते. तेव्हा भारतीय परिस्थितीशी जमवून घेणाऱ्या व उत्पादन व शर्कराप्रमाण चांगले देऊ शकणाऱ्या ऊसाच्या भिन्न भिन्न प्रादेशिक परिस्थितीसाठी वेगवेगळ्या जातींची आवश्यकता होतीच.

इ. स. १९३० साली भारतीय साखर उद्योगधंद्याला संरक्षण मिळून आयात होणाऱ्या साखरेवर जकात कर बसविला गेला. परिणामी भारतीय उत्पादित साखर ही त्या साखरेशी थोडीफार स्पर्धा करू शकत होती. याचा परिणाम म्हणून नवीन नवीन साखर कारखाने काढण्याकडे प्रवृत्ती होऊ लागली (सहकारी साखर कारखानदारीचा उदय तोपर्यंत झाला नव्हता), गुळाकडील कल आता साखरेकडे जाऊ लागला, कारण गुळाच्या भावातील चढउतार. बरेचसे उत्पादक घटक जरी आजच्या मानाने स्वस्त असले तरी गुऱ्हाळ घालणेचे सव्यापसव्य करणेपेक्षा साखर कारखान्याला तयार ऊस ठराविक भावात घालणे त्यांना सोयीचे वाटू लागले. परिणामी बरेचसे शेतकरी आता साखर कारखान्यासाठी ऊसाची लागवड करू लागले, अर्थात मधून मधून गुळाचे भाव चांगले दिसताच गुऱ्हाळे पण घातली जात (करार मोडूनही) तो भाग वेगळा. बऱ्याचशा (महाराष्ट्रात तरी) साखर कारखान्यांकडे स्वतःचे असे ऊसाचे क्षेत्र असे. तथापि बाहेरचा पण ऊस घेतला जात असे.

त्यावेळी ऊसाच्या योग्य जातीची समस्या होतीच. ही कशी दूर झाली हे निवेदन करण्यापूर्वी ऊसाच्या पिकाबाबत काही विशेष माहिती येथे देत आहे.

वनस्पतीशास्त्रदृष्ट्या ऊस हे पिक ग्रामीनेई (Gramineae) या गवती कुलातील आहे व याचे गोत्र सॅकरम (Saccharum) आहे. हे पीक प्रामुख्याने उष्ण देशीय प्रदेशातून फार मोठ्या प्रमाणात यशस्वीरीत्या तयार होते.

भारत, ब्राझील, क्यूबा, चीन, पाकिस्तान, अमेरिकेतील संयुक्त संस्थाने (सुईसियाना, फ्लोरिडा आणि हवाई) ऑस्ट्रेलिया, इन्डोनेशिया (त्याकाळी जावा, सुमात्रा व बोर्निओ ही बेटे), दक्षिण आफ्रिका आणि मॉरिशस व वेस्ट इन्डीज बेटे हे जगातील ऊस लागवडीचे प्रमुख देश होत.

भारतात ऊस हे एक महत्त्वाचे नगदी पीक असून एकूण सुमारे २६ लाख हेक्टर्स क्षेत्र व्यापले गेले आहे. त्यात सुमारे १५६ लाख टन ऊसाचे उत्पादन होते. (म्हणजे हेक्टरी सरासरी सुमारे ६० टन). भारताला जगातील साखर उत्पादनाच्या बाबतीत पहिला क्रमांक मिळतो, त्यानंतर ब्राझील व क्यूबाचा क्रमांक लागतो. भारतातही ऊसाच्या लागवडीचे दोन विभाग पडतात. १. उष्ण देशीय व २. मध्यम उष्ण देशीय. यापैकी क्र. एक मध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू यांचा अंतर्भाव होतो व क्र. दोन मध्ये उत्तर प्रदेश, बिहार, पंजाब, हरियाना आणि राजस्थान यांचा अंतर्भाव होतो. पहिल्या गटातील प्रदेशातील साखरेचे उत्पादन (व ऊसाचे पण) जास्त आहे व वाढीचा काल हा १ वर्ष किंवा त्याहीपेक्षा जास्त आहे. मात्र भारतातील ७० टक्के क्षेत्र हे क्र. दोनच्या गटातून आहे (उत्तर भारत).

भारत हे काथा अथवा वनस्पतिशास्त्रातील सॅकरम बार्बेरी (Sacchrum barberi) या वनी प्रकारातील ऊसाच्या जातीचे मूलस्थान आहे. भारतातील आणखी एका ऊसाच्या जातीचे नाव सॅकरम सिनेन्सीस (Saccharum Sinensis) असे आहे. याला 'चीनी ऊस' असेही नाव आहे. श्री. रॉक्सबर्ग या शास्त्रज्ञाचे मते या चीनी जातीच्या ऊसाची लागवड प्रथम इ. स. १७९६ साली कलकत्ता येथील वनस्पती उद्यानात केली गेली. या शास्त्रज्ञाने या जाती वेगळ्या असे मानून त्यांना वरीलप्रमाणे नाव दिले. श्री. बॅट या एका शास्त्रज्ञाने इ. स. १९०८ सालात असे निवेदन केले की—'जर चीनमधील मूळ वंश अद्यापि अस्तित्वात राहिला असेल तर या वनस्पती भारतातील मूळ स्थानिक जातीत एकजीव झाल्या आहेत. आणि त्यांचे मूळ हे विसरून गेले आहेत.'

आणखी एक वनी ऊस कंस (Kans) अथवा कांही (Sacchrum Sponteneoum) सॅकरम स्पॉटेनियम—जवळ जवळ एक उपद्रवी तण भारतभर पडीक जमिनीतून, नद्यांकाठी पसरले होते. या प्रकारातील आतील खोड फारच बारीक, फूट भरमसाट, जास्त तंतूमय भाग आणि अती कमी शर्कराप्रमाण असे. या जातीतील अनेक प्रकार हे अवर्षण परिस्थिती, रोग व थंडीचा कडाका यांना बऱ्याच प्रमाणात प्रतिकार करू शकतात. या जाती सॅकरम बार्बेरी प्रकारातील होत्या व त्या मुळात उत्तर भतातार

सॅकरम ऑफीसीनेरम (Sacchreem Officinerum) आणि सॅकरम स्पॉन्टेनीयम (Sacchrem Spontaneoum) प्रकारातून, नैसर्गिक संकरातून निर्माण झाल्या असा समज आहे. फेस ही जात ऊसाच्या जातीची पुढील पैदास करण्याच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरली.

सॅकरम ऑफीसीनेरम प्रकारातील जाती या जाड खोडाच्या होत्या, या प्रकारात मूळच्या न्यूगिनीमधील स्थानिक उष्णदेशीय जातींचा पण अंतर्भाव आहे. हे प्रकार जाड व मृदू खोडाचे असून त्यांची उत्पादनक्षमता व शर्कराप्रमाण हे उच्च आहे. इ. स. १८२७ सालात कॅप्टन स्लीमन या गृहस्थाने मॉरिशसमधील काही चांगल्या ऊसाच्या जाती भारतात आणल्या. या जाती जाड व मृदू खोडाच्या, बहुउत्पादक व जास्त शर्कराप्रमाण असलेल्या होत्या. या जातींची लागवड प्रथम कलकत्ता येथील वनस्पती उद्यानात केली गेली. या संबंधीची व इतर विदेशी जातींची तपशीलवार नोंद कृषिफलोद्यान संस्थेत केली आहे. या बहुमोल कामगिरीबद्दल कॅप्टन स्लीमन यांना या संस्थेतर्फे सुवर्णपदक देण्यात आले होते. बॅटने इ.स. १८९५ मध्ये मॉरिशस, ओटाहैत व बार्बोन ऊस या प्रकाराची नोंद केली होती.

या सर्व नवीन आणलेल्या जाती सॅकरम ऑफीसीनेरम प्रकारातील असून, भारताच्या काही प्रदेशातून अद्यापि लागवडीखाली आहेत. परंतु मर्यादित प्रमाणात व त्यांना आता स्थानिक नावे पण पडली आहेत. उदाहरणार्थ कोईमतूर जिल्ह्यातील 'वेल्लाई', बायक सीमेवरील प्रांतातील 'देशी' अथवा 'पेशावरी' व ब्रह्मदेशातील 'पिवळा टामू' या सर्व जाती एकच आहेत. म्हणजे ओटाहैत प्रकारातील. या प्रकारासहित आणखीही काही जाड खोडाच्या जाती 'पौंडा' नावाखाली असून त्यांचा वापर मुख्यतः खाण्यासाठी होतो. महाराष्ट्रातील पुंड्या उस हा याच प्रकारातील आहे. तसेच कोईमतूर जिल्ह्यातील 'पूवन', बेल्लारी भागातील 'होत्ताईं कल्फधू' व कर्नाटकातील 'पटापट्टी' या सर्व जाती पुंड्या प्रकारातीलच आहेत. यापैकी पटापट्टी हा प्रकार पूवन प्रकारातूनच निघालेला प्रकार आहे व कर्नाटकात येल्लोर भागातून आला असा समज आहे. यापैकी पुंड्या प्रकारातील ऊसाच्या जाती या भारतात यापूर्वीही होत्या म्हणतात. (ईबन-इ-बलुत या एका प्रवाशाने त्याच्या प्रवास दैनंदिनीत नोंद केल्यावरून).

(टीप :– यापैकी पटापट्टी हा प्रकार कोल्हापूर भागात पूर्वी केवीच्या नावाखाली होता. वास्तविक हा पुंड्यातील मूळ प्रकार असावा कारण पुंड्यातही कधीकधी एकाच बुचड्यात व कधी एकाच उसात अर्धा भागही काही पुंड्याचे व काही कवाच्याचे ऊस आढळून येत असत.)

ऊसाच्या पिकाची अभिवृद्धी ही साकीय पद्धतीने खोडाचे तुकडे ज्यावर दोन-तीन डोळे आहेत असे—करून केली जाते. उष्णदेशीय प्रदेशातून या ऊसाल

भरघोस फुलोरा येतो. परंतु मध्य उष्णदेशीय प्रदेशातून तो तुरळक प्रमाणात येतो. ऊसाच्या या फुलोऱ्याला तुरे असे नाव असून त्यात मुक्त शाखेच्या परिमंजिरी (Panicles) पुष्पहैव (Sessile) असतात. व जवळ जवळ १ लाखापर्यंत फुले असतात. ही फुले जोडीजोडीने कणाशकावर (Spinelet), एक वृत्तहीन (Sessile) आणि इतर सवृत्त (Pedicellate) असतात. ही सकाळी लौकर ५ ते ६ च्या दरम्यान उमलतात व एका तुऱ्याला फुलोरा पूर्णपणे उमलण्यास सुमारे १० ते १५ दिवस लागतात. फुलतोरणाही या तुऱ्याच्या अग्राकडून सुरू होऊन खाली खाली जाते, संकर हा बहुधा होतो. याच्या बीयांना रुल्फ (Rulf) अथवा फझ (Fuzz) म्हणतात व ती आकाराने अगदी लहान असून त्यांना रुपेरी केस असतात. यातील नियंत्रक घटक म्हणजे तपमान, आर्द्रता, पाऊसमान आणि अनुवंशिकता हे आहेत. त्याचप्रमाणे दिवसाचा प्रकाश कालावधी पण. उष्णदेशीय प्रदेशातून फुलोरा भरघोस धरत असल्याने ऊसाच्या जातीची पैदास कार्य हे मुख्यतः याच प्रदेशातून स्थिरावले आहे.

ऊसाच्या जातीचे वर्गीकरण करताना सय्यद महम्मद हादी यांचे ऊस व साखर निर्मितीसंबंधी कार्य लक्षात घ्यावे लागेल. सय्यद महम्मद हादी या गृहस्थाने साखर उद्योगासंबंधी उत्तर प्रदेशातून काही कार्य इ. स. १९०२ मध्ये हाती घेतले. त्यांनी प्रामुख्याने ऊसाच्या विविध जाती आणि पहिल्यांदाच ऊसाच्या भारतीय जातींचा पद्धतशीर वर्गीकरणाच्या दृष्टीने अभ्यास हाती घेतला. त्यांनी केलेले वर्णन हे तपशीलवार आहे, जरी ते पूर्णपणे वनस्पती शास्त्रावर आधारित नावे देऊन नसले तरी त्यांचे वर्गीकरण हे मुख्यतः बाह्य दर्शन (मुख्यतः रंग) आणि विविध जातींचे कृषिदृष्ट्या गुणधर्म यांवर आधारीत होते. त्यांनी एकूण सहा जातींचे वर्णन केले आहे. त्यापैकी पाचवी व सहावी अनुक्रमे गणा व पौंडा ऊस हे अनुक्रमे सॅकरम सिक्वेन्सीस व सॅकरम आफीसीनेरम प्रकारात मोडतात. पहिल्या चार जातींपैकी म्हणजे १. धाऊस, २. मवना, ३. फुस्वार व ४. चीनी प्रकार हे एस्. बार्बेरी गटात मोडतात. हादी साहेबांनी आयुष्यभर आपले लक्ष प्रामुख्याने साखर निर्मितीवर केंद्रित केले व अखेर अखेर जेव्हा ते भोपाळ संस्थानचे कृषी संचालक होते, तेव्हा भारतीय साखर उद्योग या विषयावर एक विस्तृत ग्रंथ प्रकाशित केला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात ऊसाच्या सुधारणा पद्धतीत एक प्रकारची क्रांती दिसून आली. श्री. सालेट पेडेल या गृहस्थाला इ. स. १८८८ सालात जावामध्ये फलनशील बियांचा शोध लागला आणि श्री. नॉबेल आणि श्री. हॅरीसन या गृहस्थांना इ. स. १८८९ मध्ये बार्बाडोसमध्ये स्वतंत्ररीत्या हाच शोध लागला. त्यानंतरच्या काळात या दोन्ही देशांनी आपल्या देशातील साखर उद्योग धंद्याला पुरवठा करण्याच्या व ऊसाची रोपे देण्याच्या दृष्टीने बरीच प्रगती केली.

या फलनशील बीयांच्या शोधानंतर भारताला पुढे आणखी ३१ वर्षे वाट पहावी लागली. (जावा व बार्बाडोसमध्ये याचा प्रत्यक्ष वापर होईपर्यंत) या मध्यंतरीच्या काळात जावा व वेस्ट इंडीज या देशांनी ऊस उत्पादनात बरीच प्रगती केली होती. तरीसुद्धा भारत देश हा कमी उत्पादक देशी मातीवर ज्यांची उत्पादन शक्ती हेक्टरी १४ टनांपेक्षा जास्त नव्हती अशांवर विसंबून होता.

यानंतर डॉ. चार्लस आल्फ्रेड बार्बर व सर टी. एस. वेंकटरामन् यांनी १९१२ साली कोईमतूर येथे ऊस पैदास केंद्र स्थापन करून नवी आघाडी निर्माण केली. भारतातील ऊस क्रांतीचे हे जनक असून ते भारतातील दोन इक्षु-महर्षी होत.

१. डॉ. चार्लस अल्फ्रेड बार्बर (जन्म १८६०, मृत्यु १९३२)

डॉ. बार्बर यांचा जन्म १० नोव्हेंबर १८६० मध्ये केनबर्ग दक्षिण आफ्रिका येथे झाला. त्यांचे वडील रेव्हरंड वुईल्यम बार्बर हे मिशनरी होते. चार्लस आल्फ्रेड बार्बर यांची आयुष्याची पहिली दहा वर्षे केपकॉलनीमध्ये गेली. इ.स. १८७१ मध्ये ते इंग्लंडमध्ये गेले व न्यू किंग्जवूड स्कूल बाथ येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. वयाच्या अठराव्या वर्षी ते मॅचेस्टर आणि लिव्हरपूल डिस्ट्रिक्ट बँकेत नोकरीस राहिले व तेथे त्यांनी पाच वर्षे नोकरी केली. याचवेळी त्यांनी दक्षिण आफ्रिकेत आपले निसर्गप्रेम जोपासले. नोकरीच्या या पाच वर्षात त्यांनी रसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र आणि भूगर्भशास्त्र यांचे अध्ययन केले व लंडन युनिव्हर्सिटीची पहिली बी. एससी. परीक्षा ते उत्तीर्ण झाले. इ. स. १८८३ मध्ये शास्त्राच्या अभ्यासक्रमाचा निर्णय घेऊन जर्मनी येथे प्रयाण केले. तेथे त्यांनी प्रथम हॅम्बुर्ग व नंतर बॉन युनिव्हर्सिटी येथे अध्ययन केले. तेथे त्यांच्यावर, स्ट्रेस वर्जर, स्किमिटज आणि स्किम्पर या वनस्पती शास्त्रज्ञांचा प्रभाव पडला आणि त्यांच्या प्रभावामुळे त्यांनी पुढे आपले लक्ष वनस्पती शास्त्राकडे वळविले. वयाच्या चोविसाव्या वर्षी इंग्लंडमध्ये परतल्यावर त्यांना क्राईस्ट कॉलेज (केंब्रिज) मध्ये प्रवेश मिळाला व या कॉलेजचे ते स्कॉलर झाले. येथे ते नॅचरल सायन्स ट्रायपासच्या दोन्ही भागांत प्रथम श्रेणीत ऑनर्समध्ये उत्तीर्ण झाले.

इ. स. १८९१ सालात ते वेस्ट इन्डीज द्वीपसमूहातील लीवर्ड द्वीपामध्ये सुपरिंटेंडेंट ऑफ ॲग्रीकल्चर या जागेवर रुजू होण्यासाठी गेले. तेथे त्यांनी ऊस या पिकाचा पहिला प्रत्यक्ष अनुभव संपादन केला. इ. स. १८९५ सालात साखर उद्योगातील मंदीमुळे त्यांची जागा कमी करण्यात आली आणि ते इंग्लंडला परतले. इ. स. १८९५ ते १८९८ या सालात त्यानी कूपर्सहिल येथील रॉयल इंजीनियरिंग कॉलेजमधील एका जागेवर काम केले. तसेच, पुढे त्यांनी प्रोफेसर एच. मार्शल वार्ड यांची जागा घेतली. इ. स. १८९८ सालात ते भारतात मद्रास येथे सरकारी वनस्पती शास्त्रज्ञ या नेमणुकीवर रुजू झाले. यानंतर पुढे भारतात त्यांनी आपले

सर्व लक्ष उष्णदेशीय कृषिशास्त्र या विषयावर केंद्रित केले.

भारतात ते आले त्याकाळात शास्त्रीय अधिकाऱ्याची भूमिका व प्रत्यक्ष कार्य काय याचीच बरोबर जाण झालेली नव्हती. भारतात श्री. क्यू या गृहस्थांच्या प्रभावाखाली सुदैवाने शास्त्रीय वनस्पतीशास्त्र या विषयात बऱ्याच जणांना ते पुढे आणू शकले आणि त्यांचे बहुतांशी यश–ज्यांची पूर्ण नोंद उष्णदेशीय अस्तित्पाती वनस्पती यासंबंधी आहे–यापूर्वी सिस्टिमॅटिक वनस्पतीशास्त्र व सर्वसाधारण शास्त्र या दोन्हीत बराच गोंधळ होता. त्यांच्या पहिल्या सूचना या मद्रास इलाख्याच्या वनस्पती संबंधी माहिती गोळा करण्यासंबंधीचा होत्या. आणि त्यासाठी त्यांना दक्षिण भारताच्या वनस्पतीशास्त्रीय सर्वेक्षणाचे संचालक म्हणून नेमण्यात आले. पुढे काही थोड्या काळातच त्यांच्या कामात पिकांच्या रोगांचा अभ्यास या विषयाचाही अंतर्भाव करण्यात आला. पहिल्या पाच वर्षात त्यांच्या कार्याची व्याप्ती हळूहळू व सातत्याने इकॉनॉमिक (व्यावहारिक), बॉटनी, मायक्रॉलॉजी, आळींची शास्त्रे आणि एन्टॉमोलॉजी (कीटक शास्त्र) यांच्याही अभ्यासापर्यंत वाढली.

इ. स. १९०८ सालात डॉ. बार्बर यांची नेमणूक कोईमतूर (तामिळनाडू) येथे नव्यानेच स्थापन झालेल्या कृषी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून झाली. आणि त्यांच्याकडे वनस्पतीशास्त्र या सर्व विभागाचे कार्य सुपूर्द करण्यात आले. त्यानंतर शासनाने ऊस या विषयाच्या अभ्यासासाठी एक स्वतंत्र खाते उघडण्याचे ठरविले आणि श्री. बार्बर यांची नेमणूक पहिले ऊस तंत्रज्ञ म्हणून करण्यात आली. त्या कार्यक्षेत्राच्या निमित्ताने त्यांनी कोईमतूर येथे एक ऊस संशोधन केंद्र उघडले.

इ. स. १९१२ हे साल जरी डॉ. बार्बर यांच्या ऊस या पिकासंबंधीच्या एकाग्र अभ्यासाच्या उदयाचे वर्ष मानले गेले असले तरी त्या विषयासंबंधी समस्येच्या त्यांच्या अगदी सुरुवातीच्या शोधाचे वर्ष मानता येणार नाही. या समस्यांची सुरुवात लीवर्ड द्वीप समूहात झाली होती पुढे सुरुवातीसच भारतातच त्याचे नूतनीकरण झाले–ज्या काळात मद्रास भागास 'ऊस रंगणे' या रोगांच्या प्रादुर्भावाने व प्रसाराने भयंकर थैमान मांडले होते. या विशिष्ट समस्येवर तोड म्हणून त्यांनी काही नवीन जाती हाती घेतल्या आणि त्यापैकीच काहींची रोग प्रतिबंधक जाती म्हणून निवड केली. याबाबतीत या वनस्पतीचा अगदी जवळून सूक्ष्म अभ्यास करण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी समालकोटा येथे काही जमीन घेतली आणि तेथे त्यांनी स्वतःच्या खास देखरेखीखाली या पिकाची लागवड केली.

इ. स. १९१२ सालापासून तो त्यांच्या नोकरीच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची सर्व शक्ती व उत्साह हा ऊस या पिकाच्या उत्पादनासंबंधी विविध बाबींवर केंद्रित झाला होता, त्यांना ज्या ज्या समस्या हाती घ्याव्या लागल्या त्या बऱ्याच अंशी अगदी विलक्षण होत्या. त्याकाळात ऊस लागवडीचे एकत्रित केंद्र हे उत्तर भारतात बिहार,

उत्तर प्रदेश आणि पंजाब या प्रदेशात होते आणि हा सर्व मध्यम उष्णदेशीय प्रदेश होता–जेथील हवामानाच्या उपस्थितित ऊसाच्या क्रियाशील वाढीचा काल हा फक्त चार महिन्यांचा होता. आणि जाड खोडाच्या ऊसाच्या जातींचा अर्थात त्यात अंतर्भाव केला गेला नाही. यावेळी जगात इतरत्र अनेक देशात ऊसाच्या खास रोपवटिकेचे तंत्र हे एक विशिष्ट कला किंवा तंत्र म्हणून कळसास पोहोचलेले नव्हते, परंतु भारतात मात्र ते अंमलात आणले जात नव्हते, त्यामुळे पुढील काळात हे तंत्र भारतातही कसे शक्य आहे यावर अवलंबिण्यात आले.

उत्तर भारतात सर्वसाधारणपणे लागवडीत असलेल्या ऊसाला क्वचितच तुरे येतात व ज्यांना ते येतात त्यांच्यात बी-धारणा होत नाही. या बी न धरणेच्या कारणाची मीमांसा अशी केली आहे की, परागकणांची अफलनशीलता अथवा परागकोश न झडता सुकून जाणे, हा एक हवामानाचा परिणाम असे दर्शविले गेले आहे. कारण परागकण दक्षिण भारतातून जेव्हा हे ऊस लावले गेले तेव्हा तर झाले होते, या कारणामुळेच संशोधन केंद्र हे या ऊसाच्या प्रदेशाबाहेर स्थापन करणे भाग पडले. परंतु एक अटळ परिणाम म्हणून आणखी एक गुंतागुंत निर्माण झाली, त्यात रोपांच्या प्राथमिक चांचण्या पुन्हा–अगदी वेगळ्या अशा परिस्थितीत चालू ठेवणे भाग पडले, वेगळ्या अशा की ज्या भागात अथवा प्रदेशात त्या ऊसाची व्यापारी धर्तीवर लागवड करावयाची त्याच्या बाहेर, अशी एक योजना–उत्तर भारतात स्थलांतर व चांचणी करणेसंबंधी आखणे भाग पडले. यामुळे त्या प्रांतात एक संशोधन केंद्र स्थापन करणे भाग पडले.

उत्तर भारतासाठी ज्या जाती तयार करावयाच्या त्यांच्या विशिष्ट गुणधर्मांची आवश्यकता म्हणजे काटकपणा, तशाच अडचणीच्या वातावरणातही उदाहरणार्थ हिवाळ्यात कडक थंडी व उन्हाळ्यात गरम कोरडी हवा ही होती. हे सर्व साध्य होण्यासाठी डॉ. बार्बर यांनी देशी बारीक खोडाच्या जाती व नवीन जाड खोडांच्या जाती याच्यात संकर करवून आटोक्यासंबंधी प्रयत्न हाती घेतले. या ठिकाणी अशी एक समस्या उद्‌भवली की या कामासाठी कोणत्या स्थानिक (देशी) बारीक खोडाच्या जाती निवडाव्या व कोणत्या योग्य होऊ शकतील, यातूनच ऊसाच्या लागवडीचा सघन अभ्यास हाती घेण्याची आवश्यकता निर्माण झाली. या शोधातील निष्कर्षांची त्यांनी नोंद ठेवली होती आणि अनेक बहुमोल निबंधलेखन त्यांनी केले आहे. (मेमरीज ऑफ दी डिपार्टमेंट ऑफ ॲग्रीकल्चर इन् इन्डिया)— भारतातील कृषी खात्यासंबंधी एक अवश्यमेव बाब म्हणजे त्यांची आपल्या कार्यातील एकाग्रता स्पष्ट उठून दिसून येते. या विस्तृत तपशीलवार नोंदीत त्यांचे प्रमुख यश दिसून येते–ज्यात इतर कोणीही गोंधळून गेले असते. असे एवढे असताही त्यांनी व्यावहारिक बाजूकडे मुळीच दुर्लक्ष केले नाही, को अथवा कोईमतूर प्रकारा-

तील जातींच्या ऊसाचे देश आणि ज्या विस्तृत प्रमाणात त्यांची लागवड होत आहे–त्यावरून याची प्रचिती येते.

भारतीय ऊसाचा तपशीलवार अभ्यास हा त्यांनी केलेल्या वर्गीकरणात समाविष्ट केलेला असून, शिवाय त्यांच्या दुहेरी मूळाबाबत स्वतःचे मतही प्रगट केले आहे. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की यावेळी ऊस या वनस्पतीची जटबल (Complex) गुणसूत्राची (Chromoconal) घटना याची पूर्वी कोणी दखल घेतली नव्हती आणि त्यांनी केवळ या वनस्पतीचे बाह्य शरीरविज्ञान विषयक बाह्य दर्शनच मार्गदर्शनासाठी घेतले होते. ज्या गुणसूत्रांचा शोध विशेषतः श्री. ब्रेमर यांनी केलेल्या––त्यात फारच अल्पफरक त्यांनी स्वतः काढलेल्या निष्कर्षात करावा लागला. यावरून त्यांच्या अचूक निर्णय क्षमतेची व आंतरदृष्टीची प्रचिती येते. तसेच ऊसाच्या मूळासंबंधीचे महत्त्व जे एरव्ही बरेच उपेक्षित होते–त्यासंबंधी त्यांनी स्वतः दिलेले महत्त्व याचा पण निर्देश येथे करणे अवश्य आहे. कारण आताच या ऊसाच्या मूळांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व येत आहे.

त्यांचा स्थानिक जातींचा अभ्यास विशेषतः पंजाबातील जातींशी संबंधित त्यात त्यांनी आपले विशेष लक्ष 'काहु' व 'काहता' या दोन जातींवर केंद्रित केले होते. यापैकी काहु जात ही थंडीच्या कडाक्याला फारच बळी पडत असे. आणि कधी कधी पुन्हा पुन्हा नव्यानेच लावावी लागत असे. तर काथा ही जात जास्त चिवट होती. काथा अगदी बारीक ऊस आणि कंस–जंगली ऊसाची जात (S. spontaneum) यामधील साद्दश्याकडे त्यांचे लक्ष वेधले आणि त्यानुसार पुढे त्यांनी आपल्या संकर कार्यात या जाड ऊसाच्या जातीशी–जो कोईमतूर भागातील परिस्थितीशी समरस झाला होता–त्याचा संकर घडवून आणला. सॅकरम ऑफीसीनेरम आणि सॅकरम स्पॉनेयिम यातील (gutea specifie) आंतर जातीच्या पैदास व विकासाचा पाया घातला गेला. सध्या जगातील सर्व संकरित ऊसाच्या लागवडीखालील जाती यांच्यात या सॅकरम ऑफीसीनेरमचे रक्त (मूलभूत गुण) आहे. सॅ. ऑ. या जाड ऊसाच्या जातीच्या प्रकारात जरी उच्च उत्पादनक्षमता संभाव्य असली तरी त्या जाती अनेक रोगांच्या प्रादुर्भावाला बळी पडतात त्याचप्रमाणे त्या उत्तर भारतातील प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत टिकून राहू शकत नाहीत. को २०५ (Co–२०५) हा मात्र मूलभूत संकरामुळे टिकून राहतो. इतर उल्लेखनीय जाती–ज्यांची पैदास बार्बर यांनी केलेल्या संकराद्वारे झाली आहे अशा म्हणजे–को २१०, को २१३ आणि को २१४ होत. बार्बर यांच्या कार्याचे मोल. हेच त्यांच्या पैदास कार्यातील कोईमतूर भागातील ऊसासंबंधीचे कार्य मूलभूत शास्त्रशुद्ध पायावर आधारित होते. त्याला आता आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली आहे.

२. सर टी. एस. वेंकटरामन (१९१९-१९४२)

मद्रास राज्यातील (आता तामिळनाडू) येथे जन्म. तिरुवादी सांबशिवा वेंकटरामन यांचे महाविद्यालयीन शिक्षण तिरुचिरापल्ली येथे पूर्ण झाले. मद्रास येथील प्रेसिडेन्सी कॉलेजमधून त्यांनी १९०५ साली बी. ए. ची पदवी संपादन केली (वनस्पती शास्त्रातील) व प्रेसिडेन्सीत प्रथम क्रमांक मिळविला. नंतर १९०७ मध्ये मद्रास कृषी खात्यातील डॉ. सी. ए. बार्बर यांचे सहाय्यक म्हणून ते रुजू झाले. डॉ. बार्बर हे त्यावेळी इकॉनॉमिक बॉटनीस्ट होते. १९१२ सालात भारत शासनाने कोईमतूर येथे इम्पीरियल केन ग्रीडींग स्टेशन (ऊस पैदास केंद्र) सुरू केले व डॉ. बार्बर हे त्याचे प्रमुख म्हणून नेमले गेले. वेंकटरामन यांची निवड त्यांचे दुय्यम सहकारी म्हणून करण्यात आली, डॉ. बार्बर यांच्या इ. स. १९१९ मध्ये सेवानिवृत्तीनंतर वेंकटरामन यांचीच त्या केंद्राचे प्रमुख म्हणून निवड झाली.

डॉ. बार्बर हे जरी सॅकरम स्पॉन्टेनियम या वनी जातीचा उपयोग पैदास आंतर जातीय संकरात ऊसाच्या पैदाशीसाठी वापरण्याबाबत जगातील पहिले पैदासक असले तरी वेंकटरामन् हे (inter gendrie Hybriditation) इंटरजेन्ड्रिक हैब्रडायझेशन (आंतर प्रजातीय संकर) पद्धत तीन संकरात म्हणजे ऊस-ज्वारी आणि ऊस-बांबू यातील संयोग घडवून आणण्यात जगातील पहिले पैदासक होत. हे संकर हळव्या व गरव्या जातीची गरज भागविण्याच्या उद्देशाने घडवून आणले होते, ज्यात ऊसाचे पीक लागवडीत लोळणार नाही, रोगास व किडीस प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीतही प्रतिकार करू शकेल असे. ऊस–ज्वारी हा संकर इ.स. १९३० साली पहिल्यांदा केला गेला आणि तेव्हापासूस आतापर्यंत तो यशस्वीरीत्या जावा (आताच्या इन्डोनेशियाचा एक भाग), हवाई आणि फ्लोरिडा या प्रदेशातून वरचेवर वापरला जात आहे. या संकरातून दोन हळवे प्रकार बाहेर पडले. त्यांनी तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि बिहार या प्रदेशात अत्युत्तम प्रगति दर्शविली.

(महाराष्ट्रातही अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर जवळ टिळकनगर येथील महाराष्ट्र शुगर मिल्स येथे व कोल्हापूर येथील कोल्हापूर शुगर मिल्सच्या शुगरकेन इस्टेटीवर या जातींची चाचणी घेतली होती (इ. स. १९३५ सालात). त्यापैकी कोल्हापूर येथील चांचणी प्रस्तुत लेखकाने स्वतःच्या उपविभागात घेतली होती. परंतु ज्या अपेक्षेने या जातींची लागवड महाराष्ट्रात चाचणीसाठीं घेतली गेली ती अपेक्षा या जाती पूर्ण करू शकल्या नाहीत. उदा. हळवा हंगाम–वर्षातून दोन पिके घेणे. इतर ठिकाणचा अनुभव माहीत नाही. हा माझा स्वतःचा अनुभव आहे.)

डॉ. वेंकटरामन् यांनी कोईमतूर येथे पैदाशीत केलेल्या ऊसाच्या सुधारित जातींनी भारतात आता सुमारे ७५ टक्के तरी क्षेत्र व्यापले आहे असा अंदाज आहे. (ऊसा-

खालील एकूण क्षेत्रापैकी) या जाती म्हणजे को २८१, को २९०, को २९९, को २१२, को ३१३, को ३३१, को ३५२, को ३५६, को ४१९ आणि को ४२१ यांपैकी काही जातींनी भारताबाहेरही प्रसिद्धी मिळविली. उदाहरणार्थ को २९० या जातीने हवाई बेटात 'ग्रॅन्ड प्राईज' मिळविले आणि हे बक्षीस आतापर्यंत कोठेही न निघाले इतके बेटाड होते. या बेटाडात (Stool) ३६० ऊस निघाले व ३० फूटपर्यंत उंची वाढली. ऊसाचे २ टन उत्पादन व साखरेचे ४०० पौंड (सुमारे २०० किलो) मिळाले. दक्षिण आफ्रिकेत को २८१, को २९० आणि को ३०१ या जातीचे ४० टक्के जादा उत्पन्न तेथील 'उबा' या स्थानिक जातीपेक्षा दिले. उबा ही जात आता द्रुतगतीने नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. तसेच या को जाती खाली ऊसाच्या एकूण क्षेत्रापैकी सुमारे ५६ टक्के क्षेत्र व्यापले आहे. एवढेच नव्हे तर भारत हा देश साखरेच्या विदेशातून आयातीबाबत जर या जातींनी साखर कारखान्यांना ऊसाचा वाढता पुरवठा केला नसता तर अवलंबित राहिला नसता आणि तेही स्पर्धात्मक दरात–हे सर्व या कोईमतुरी ऊसामुळे झाले. (वरील को जातीत आणखी काहींचा उल्लेख नाही त्या म्हणजे को २१० व को २१३. त्याही काही काळ होत्या.)

डॉ. वेंकटरामन् यांनी ऊसाच्या पैदाशीचे शास्त्र आणि या बाबतीत देणगी म्हणजे भारताचे स्थान साखरेची आयात करणाऱ्या देशातून निर्यात करण्याकडे स्थित्यंतर ज्यामुळे होऊ शकले ती होय. यामुळे भारताकडे सर्व जगाचे लक्ष वेधले गेले.

यापूर्वी भारतात जावा बेटातून जॉनसन (जावानीजचा अपभ्रंश), मॉरिशसमधून मोरस (मॉरिशसचा अपभ्रंश) व लीसा (लईसीयानाचा अपभ्रंश) या तीन विदेशी साखरेची आयात होत असे.

डॉ. वेंकटरामन् यांची इंटरनॅशनल सोसायटी ऑफ शुगरकेन टेक्नॉलॉजीस्टस (आंतरराष्ट्रीय ऊसतंत्र संस्था) हिचे व्हाईस चेअरमन (उपाध्यक्ष) आणि सेक्शनल प्रेसिडेन्ट म्हणून निवड झाली. त्यांनी जावा बेटातील इंटरनॅशनल शुगरकेन कन्व्हेन्शन (आंतरराष्ट्रीय ऊस परिषद) येथे आणि ब्रिस्बेन येथे पण अनुक्रमे १९२९ व १९३५ साली भारताचे प्रतिनिधित्व केले.

भारतातील त्यांच्या शास्त्रज्ञ सहकाऱ्यांनी त्यांना जानेवारी १९३७ मध्ये भरलेल्या इंडियन सायन्स काँग्रेसचे जनरल प्रेसिडेन्ट म्हणून निवडून सर्वोच्च दर्जाचा सन्मान बहाल केला, त्यांच्या सेवानिवृत्तिसमयी त्यांना भारत शासनातर्फे नाईट हा बहुमान बहाल केला.

या महान व्यक्तीची भेट घेण्याचा योग (सद्भाग्यच म्हणा) मला १९३५ च्या हिवाळ्यात आला. त्यावेळी मी कोल्हापूर येथील साखर कारखान्याच्या ऊस क्षेत्रविभागातील एक उपाधिकारी होतो (१९३३ ते १९४४), त्यावेळी मी व माझे काही सहकारी यांनी कोईमतूर ऊस संशोधन केंद्रास भेट दिली. त्यावेळी रावबहादूर

असलेले वेंकटरामन् यांनाही भेटलो. एक थोडीशी स्थूल, ठेंगणी, काळसर वर्णाची जाड चष्मा लावलेली व्यक्ती. बोलणे हळू आवाजात, सौम्य, शांत व गोड.

त्या काळी म्हणून को जातींचा उदय व प्रसार होण्याऱ्या स्थानिक देशी पुंड्या जातीला पर्यायी म्हणून आणखीही कांही विदेशी जातींची चाचणी चालू होती त्या म्हणजे– बी १५२८ (बार्बोडस) डी १०९ (डमरारा),. एच १०९ (हवाई) जावा बेटातील जे २१३ या बारीक खोडाच्या जातीचा प्रकार महाराष्ट्रात फार झाला होता परंतु पुढे काजी रोगामुळे फारच ग्रासल्यामुळे ही जात काढून टाकावी लागली.

श्रीरामपूर जवळ बेलापूर कंपनी हरिगाव (जि. अहमदनगर) या खासगी साखर कारखान्याने काही विदेशी जाती (बहुतेक जावामधून असाव्या) आणवून त्यांच्या लागवडीचा प्रसार केला होता व बऱ्याच वर्षापर्यंत त्या तेथे व इतर साखर कारखान्याच्या ऊस प्रदेशात व दख्खन कारखान्याच्या क्षेत्रातील ऊस बागायतदारांकडे पण होत्या. त्या म्हणजे ईके २८ व पीओजे २८७८ हया.

याच काळात डॉ. बदामी या वनस्पती शास्त्रज्ञाचे म्हैसूर संस्थानातील कार्य चालू होते. यांना पण भेटण्याचा व त्यांचे कार्य पहाण्याचा योग याच काळात मला आला. काही म्हैसुरी जाती एच. राम (हेल्लाळ म्हैसूर) पैदाशीत केल्या. त्यापैकी काही एच. एम. ८९ व एच एम ५४४ वगैरे. या भरघोस उंच वाढूनही न लोळणाऱ्या जाड खोडाच्या परंतु फूट कमी व खोडव्यास गैरसोयीच्या होत्या.

इम्पीरियल आता भारतीय कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च (भारतीय कृषी अनुसंधान सभा) यांनी एक शुगर कमिटी स्थापन केली. त्यांनी ऑक्टोबर १९२९ सालात अशी शिफारस केली की–भारतीय साखर उद्योग व्यवसायास संरक्षण मिळावे या उद्देशाने– एका टेरीफ बोर्डातर्फे चौकशी व्हावी, १९३० मध्ये हे टेरीफ बोर्ड स्थापन होऊन त्यांनी या व्यवसायाच्या सर्व बाजूंचा अभ्यास करून व १९२१ सालातएक अहवाल सादर केला व त्या अहवालात या व्यवसायाला पंधरा वर्षे संरक्षण मिळावे असे प्रतिपादन केले. टेरीफ बोर्डाचा हा निर्णय मान्य झाल्याने टेरीफ बोर्डाने असे निवेदन केले की, कोईमतूर येथील ऊस संशोधन केंद्राने प्रगतीचा बराच टप्पा गाठला असून को जातीच्या ऊसाच्या प्रसारामुळे उत्पादन ५९ टक्क्यांनी वाढले आहे आणि शिवाय भारतीय साखर उद्योग व्यवसायाच्या कार्यक्षमतेतही उल्लेखनीय प्रगती झाली आहे. आणि ही शुगर कमिटी १९२० सालात स्थापन झाल्याने १९२० सालात सादर केलेल्या अहवालापेक्षा भारत शासनाने टेरीफ बोर्डाचा अहवाल मान्य करून साखर उद्योग (संरक्षण) कायदा १९३२ हा संमत केला (विधिमंडळाने).

भारत शासनाच्या संरक्षक धोरणाचा प्रभाव हा तात्काळ दिसून आला. भारतीय

भांडवलदार— जे साखर उद्योग धंद्यात भांडवल गुंतविण्यात कचरत होते, त्यांनी तात्काळ साद दिली. संरक्षणपूर्वीच्या काळात भारतात अवघे ३२ साखर कारखाने होते (त्यांपैकी महाराष्ट्रात एक बेलापूर, हरिगाव हा होता व पुण्याजवळ फुरसुंगी येथे वर्तक साखर कारखाना. हा अगदी छोटा कारखाना) बारामती येथील साखर कारखाना त्यापूर्वीच बंद पडला होता. पुढील दोनच वर्षांत भारतातील साखर कारखान्यांची संख्या ११२ वर गेली. व १९४१ पर्यंत ही १५७ पर्यंत गेली.

१९३२ सालातच बेलापूर कंपनी व्यतिरिक्त, टिळकनगर येथील महाराष्ट्र शुगर मिल्स, कोल्हापूर शुगर मिल्स, अकलूज येथील सासवड माळी शुगर मिल्स, बेलवंडी येथील बेलवंडी शुगर वर्क्स— वालचंद शुगर इंडस्ट्रीज (जि. पुणे व सोलापूर), रावळगांव शुगर फार्म (मालेगाव, जि. नासिक), फलटण येथील फलटण शुगर वर्क्स, पुणतांबा येथील चांगदेव शुगर वर्क्स एवढे कारखाने १९३२ मध्ये निघाले. जगात कोठेही कारखान्याच्या वाढीत एव्हढ्या झपाट्याने प्रगती कधीच झाली नव्हती.

पुढील चार वर्षांत (१९३३-३७) भारतीय साखर कारखान्यातून निघालेली साखर ही संरक्षणपूर्व काळातील १ लाख टन आकड्यापासून ११ लाख टनापर्यंत गेली. वास्तविक त्यावर्षी (१९३६-३७) भारतातील साखरेचे उत्पादन (सर्व साखर निर्मिती पद्धतीचे) हे १,२५४,००० टन होते आणि हे अंदाजी बापरापेक्षा ५३,००० टन जास्त होते. भारतात आयात होणाऱ्या विदेशी साखरेत ही १९३२-३३ सालापासून घसरण सुरू झाली व पुढील काही वर्षांतच तिचे आकडे नगण्य राहिले. (त्याकाळातही विदेशी साखर ही भारतीय साखरेपेक्षा स्वस्त उपलब्ध होती. तसेच भारतीय साखरेवरील एक्साईज ड्यूटी (साठ रुपये टनास) ही त्यावेळी फारच कमी होती.)

इ. स. १९७०-७१ पर्यंत साखर कारखान्यांची संख्या ही २१६ पर्यंत गेली आणि साखर उत्पादन हे ११ लाख टनापासून ते ३० टनांपर्यंत गेले.

साखरेचे कारखान्यांचे वितरण खालीलप्रमाणे होते–

उ. प्रदेश ७१, बिहार २७, हरियाना ३, पंजाब ६, महाराष्ट्र २१, आंध्रप्रदेश १९, कर्नाटक ११, तामिळनाडू १५ व इतर २-३.

भारत शासनाच्या परवाना धोरणानुसार सहकारी साखर कारखाने पण काढण्यास परवानगी दिली होती. (विशेषतः दक्षिण भारतात) आणि १९७०-७१ सालापर्यंत ही संख्या ८१ पर्यंत गेली. (प्रवरानगर, लोणी ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर हा भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना होय. पद्मश्री श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांनी कै. धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रोत्साहनाने हा कारखाना स्थापन केला.)

सफेत साखरेचे उत्पादन फक्त हे एकूण वापरल्या जात असलेल्या ऊसाच्या मानाने २८ टक्के होते. आणि कमाल उत्पादन म्हणजे कमाल ऊस ९० टक्के होते.

याचा वापर गूळ व खांडसारी साखर निर्मितीसाठी केला जातो व बाकीचे १२ टक्के व बाकीच्यापैकी १२ टक्के ऊस हा बेण्यासाठी वापरला जात असे (त्यातच खाण्याचा ऊस व वाद ऊस यांचा अंतर्भाव आहे.) आता भारतीय साखर उद्योग हा जगातील दुसऱ्या श्रेणीचा आहे.

डॉ. बार्बर, डॉ. वेंकटरामन् आणि डॉ. दत्त (कोईमतूर येथील आणखी एक ऊस तज्ज्ञ) हे शास्त्रज्ञ आणि भारतीय साखर उद्योग धंद्याच्या विकासावर जो प्रभाव घडवून आणला त्यामुळे कृषी संशोधनाचीही एक फायद्याची बाब दिसून आली. येथे हे पण लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, संशोधनावर जेवढा अल्प खर्च होत आहे त्यामानाने आर्थिक लाभ प्रचंड आहे.

सध्या सहकारी साखर कारखानदारीचे पेवच फुटले आहे. परंतु ज्या पद्धतीने नवीन नवीन साखर कारखाने निघत आहेत ते पाहता कारखान्याची प्रत्यक्ष आवश्यकता, ऊसाचे क्षेत्र व पुढील संभाव्य वाढ व पुढे कारखाने यशस्वीरीत्या चालतील किंवा काय व त्यापैकी किती आजारी पडतील (सध्याच्या आजारी कारखान्यांच्या संख्येत भर टाकतील) या बाबींचा विचार न करता हे सर्व अनिर्बंध चालले आहे असेच खेदाने म्हणावे लागेल. व त्यासाठी कदाचित पुढेमागे एखादी स्वतंत्र कमिटी स्थापन करावी लागेल.

('गोडवा' आक्टोबर १९८४)

भाषेतून दिसणारी स्त्री

आशा मुंडले

आपण एकमेकांशी बोलतो. आपलं जीवन त्यावर अवलंबून असतं. कारण सगळे व्यावहारिक करारमदार तोंडी-लेखी असेच असतात. किंबहुना माणूस इतर सजीव सृष्टीहून वेगळा पडला, श्रेष्ठ ठरला तो या भाषा व्यवहारामुळेच. एका पिढीचे विचार ज्ञान, माहिती, अनुभव दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवता येतात. लेखनामुळे ते स्थलकाल-मर्यादांनाही ओलांडतात, म्हणूनच संस्कृतीचा जन्म झाला.

आपण लहानपणी कोणती भाषा बोलावी हे आपल्या हातात नसतं. पहिली भाषा भोवतालच्या समूहाची जी असेल तीच आपली होते. नकळत त्यात प्राबीण्य मिळतं. पुढे मग शाळेत किंवा इतरत्र औपचारिक रीतीने इतर भाषा शिकल्या जातात. प्रवासातून शिकता येतात वगैरे. म्हणजे सारखं वाटतं की भाषा हे साधन लोकांशी संपर्क ठेवण्याचं. पण कळत न कळत या साधनाने आपला ताबा घेतलेला असतो. ज्या त्या भाषिक समाजाची परंपरागत मूल्य व्यवस्था त्या त्या भाषेतून प्रतिबिंबीत होते. वापरता वापरता आपणही ती मूल्य कुठेतरी पत्करून बसतो.

भाषा आणि भावना यांचा गहरा संबंध आहे आणि त्यामुळे भाषेतून मुरलेलं मनातून नाकारायला फार प्रयत्न लागतात. भाषेला 'आई' म्हटलंय कवींनी, ते उगीच नाही. मराठी भाषा फुलांमध्ये मोगऱ्यासारखी रसपूर्ण–धुंद. तिच्यापुढे अमृतही तुच्छ. माझ्या मराठीवर माझं प्रेम आहे.

पण–आम्ही जेव्हा स्त्रियांबद्दल बोलतो तेव्हा ? इंग्लिशमध्ये प्रथम जेव्हा मी एका बाईचं वर्णन 'सेक्सी विच्' असं वाचलं तेव्हा मनावर जो ओरखडा उठला तो अजून तसाच आहे. मराठीत आपण रागाने विचारतो, "काय रे, तुला आईबहिणी आहेत की नाही ?" म्हणजे आई-बहिणींना सन्मान, परंतु त्यातला गर्भित अर्थ असा की परक्या बाईची चाड ठेवायची पद्धत नाही. खटकतं ते. शिवाय आई-बहीण यामध्ये "बायको" नाही. ती आपली "पायातली वहाण पायातच बरी." किंवा "आपलं जनावर आपल्या ताब्यात हवं." (हे लक्ष्मण मानेच्या बंद दरवाज्यातलं वाक्य).

रांड म्हणजे नवरा मेलेली आणि मग संदर्भाने "छिनाल" स्त्री. माणसं सगळीच मरतात, पण एकाच्या मरणाची भयानक शिक्षा दुसऱ्याला देणारे विधवांचे उल्लेख. तोंड दिसलं की अपशकुन होतो म्हणे. आणि सवाष्ण म्हणजे फार शुभ. तिचं कर्तृत्व काय तर नवरा जिवंत आहे. वांझ बाईची आणखीच परवड. "मूल नसलेला पुरुष" याला भाषेत वेगळा शब्दसुद्धा नाही. पण वांझेची किती हेटाळणी वाङ्मयात सापडते !

आणि माणसाच्या जिव्हाळ्याचा जो विषय शृंगार तो मालकी भावनेशी जोडलेला. नवरा श्रेष्ठ हवा आणि नवरी कुमारिका. "सीलबंद" असली तर पतिव्रता नाहीतर मग काय वाटेल त्या शब्दात वर्णन. मराठी नाटकांमधील आजचे द्व्यर्थी "विनोद", –त्याला "माणसं" हसतात याची शरम वाटावी. स्त्री पुरुषांचे शरीरमीलन ही नैसर्गिक क्रिया किती ओंगळपणे बोलता येते ! या स्पर्धेत मराठीचा नंबर वर लागावा. त्यातून दिसतं ते स्त्रीचं दुय्यम स्थान. पुत्रांना जन्म घालणारी पत्नी (मुलींची आई नव्हे) सोडली तर इतर स्त्रिया यथातथाच.

शिवाय शरीराने तर ती मालकीची हवीच आणि कामजीवनात पॅसिव्ह. तिच्या शरीराचं वर्णन खायच्या वस्तूसारखं केलेलं. "छातीवरची फळं" वगैरे. त्यानं तिच्यावर झडप घातली, चोळामोळा केला, कुस्करली वगैरे. या सगळ्यातून शिकारी–सावज हे नातं दिसतं, नाहीतर खादाड–अन्न हे नातं दिसतं इतर शब्दांतून. तिला पाहून लाळ टपकायला लागली वगैरे. असली बुभुक्षित वर्णनं पुरुषदेहाची होत नाहीत.

त्याहून अपमानास्पद बाजू म्हणजे बाई=शरीर ही कल्पना. "बायकांची अक्कल" विनोदविषय. किंवा बायकांची "जाडी." दोहोंतूनही शरीर माहात्म्यच दिसतं, वेगवेगळ्या पैलूंतून.

"नाकापेक्षा मोती जड नको" ही वधू निवडताना अपेक्षा. "पायाची दासी" सिंधू आमची फार आवडती. "तोंड मिटून सोसणारी" ती म्हणे खरी स्त्री. डोकं वापरून अन्यायाचा प्रतिकार करील तर तिच्यासाठी शब्द नाहीत. उलट ती सरस असली तर अनेक कुचेष्टेचे शब्द आहेत. उदा. बोलभांड, जहांबाज, कजाग वगैरे.

या शब्दांना वाईट वास आहे जसा काही.

"हळवी, रडवी, दुबळी, अबोल," स्त्री आमची लाडकी. कर्तबगार स्त्रीला म्हणायचं "पुरुषी" अरे वा रे वा! मक्ता पुरुषांनाच? बाई शृंगारात रस घेणारी असली तर शब्द सगळे कुचेष्टेचे किंवा तुच्छतेचे. छचोर, छिनाल, सैल, चालू, घसरलेली, वाकडं पाऊल पडलेली, पोट वाढवणारी वगैरे. पण या पायरीपर्यंत तिची साथ देणाऱ्या पुरुषाचे असे शवविच्छेदन नाही.

प्रत्येक प्रकारच्या अपमानाची थोडीथोडीच उदाहरणं मी दिली आहेत. आणखी शब्दकोशात सापडावीत. शरीर, मन, बुद्धी या तिन्ही क्षेत्रांत स्त्रीला भाषिक समानता नाही. कारण सामाजिक विषमतेचाच ठसा भाषेवर उमटलेला.

"एक गेली (मेली) तर छप्पन्न मिळतील" हा आमच्या नवऱ्यांचा बाणा. उलट वाक्य सापडतं का पहा बरं? नुसतं "हा गेला तर दुसरा मिळेल" असं वाक्य सुद्धा इथल्या माणसांच्या कानांना कसंसंच वाटतं. आणि ते बाईच्या तोंडी वाळ्यात सुद्धा क्वचितच आढळतं. (व्यंकटेश माडगूळकरांनी मात्र एका फर्मास विनोदी कथेत–"त्या गावाला काही घोंडे मिळणार नाहीत का?" असा सूचक उल्लेख केला आहे.)

"बायकांची अक्कल चुलीपुरती", "बाईलबुद्धया" माणूस, 'बायकी' वृत्तीचा माणूस (म्हणजे कुचाळक्या, चहाडखोरीत रस घेणारा या अर्थाने) वगैरे. "घरकोंबडा" पुरुष टाकाऊ, पण बाई मात्र "उंबऱ्याच्या आतच रहाणारी" चांगली.

राजकारण, गृहकारण, सर्वत्र बायकांचा उल्लेख अनर्थाला उत्तेजन देणाऱ्या असा होतो. "बायकोच्या तालावर नाचणारा माणूस" हे तुच्छतादर्शक. नवऱ्याच्या आज्ञेतली बायको हे स्तुतिसुमन.

आर्थिक क्षेत्रात तर बाई हीच मालमत्ता. बायकापोरे, गुरेढोरे, जमीनजुमला हे एकाच श्वासात (माफ करा, इंग्रजी वाक्प्रयोग) केलेले संपत्तीचे वर्णन. संकटात मात्र "आत्मानं सततं रक्षेत्, दारैरपि धनैरपि," बाईचं वर्णन उपयुक्त वस्तू म्हणून तर कितीतरी वेळा. "माल" कसा आहे म्हणे किंवा गरिबाघरची मुलगी पण "वस्तु-लाभ" उत्तम म्हणून सून केली. किंवा एखादीची अब्रू "लुटली", कन्यादान पण पुत्रदान नाही. दानावरती वरदक्षिणा द्यायची. "कुणगा" हा स्पेशल शब्द बायकोने नवऱ्याच्या नकळत ठेवलेल्या पैशांना, म्हणजे गृहस्वामिनीला उघड आर्थिक अधिकार नाहीतच.

योनिशुचितेचा केवढा दंभ! बायको 'शिळी' किंवा 'उष्टावलेली' नको आणि पुरुष? अनुभवामुळे 'रसिक' बनलेला. तिचं व्यक्तिमत्त्व एवढं नगण्य की लग्नात नावही बदलायचं. म्हणजे राम असला की 'सीता', रावण असला की 'मंदोदरी'

असलं मॅचिंग. लहानपणापासून ती जी कोणी 'क्ष' होती त्या क्षच्या अस्मितेवरच वरवंटा.

बरं, आता जरा अध्यात्मक्षेत्रात पाहूया. तिथे तर चिखलफेकच, स्त्रीमोह हे नरकाचे साधन. "बरे झाले देवा बाईल कर्कशा" ही आमची संतवाणी. स्त्रीदेहाची, शृंगाराची, सहजीवनाची पवित्रता न समजलेली अती ओंगळ वर्णने "धर्म" या नावाने लिहिल्या जाणाऱ्या पुस्तकांतून सापडतात. बायकोबद्दल संशय तर इतका की बोलायची सोय नाही. रोमन लोक प्रत्यक्षच कुलूप लावून जात परदेशात. इथे सतत पहारा आणि मानसिक छळ. आग आणि लोणी म्हणे पुन्हा आग स्वयंभू, लोणी पराधीन.

मात्र "मातृशक्ती"चे कौतुक हा याला सन्माननीय अपवाद. "माता" या स्वरूपात का होईना स्त्रीचा बराच गौरव, तिच्या शक्तीची जाणीव दिसते. पाश्चात्य परंपरेत तेही नाही. नुसतीच सेक्स ऑब्जेक्ट. "अंगवस्त्र बाळगणं" हा शब्दप्रयोग फार सभ्य म्हणावा असं बाकीचं आहे इंग्रजीत. आणि जी गोष्ट नकारात्मक शब्द-प्रयोगातून जाणवते तीच पॉझिटिव्ह विधानांच्या अभावातून. म्हणजे "पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा." पुरुषापुढे पराक्रमाचं क्षेत्र अमर्याद पण बाईबद्दल जास्तीत जास्त महत्त्वाकांक्षा म्हणजे "तिने सासर-माहेर दोन्ही कुळं उद्धारावी." तिचं क्षेत्र घर-लग्न-मुलंबाळं यातच कसं फिरत रहावं हे शब्दांच्या 'न'–असण्यातूनही जाणवतं. "बायकांच्या जातीला नसत्या चौकशा कशाला" हा कुतूहल मारण्याचा प्रभावी फॉर्म्युला. बाईची सगळी किंमत ठरायची ती परावर्तित प्रकाशातून –तिचा बाप, नवरा, भाऊ, मुलगा यांच्या कर्तृत्वामुळे. याला अपवाद 'कलावंतीण' स्त्रियांचा. त्यांच्या प्रतिभेला वाव. परंतु त्यांना मिळणारा सन्मान दुधारी तलवारी-सारखाच. कलावंतीण आणि 'गरती' या बॉटरटाईट डिव्हिजन्स.

अगदी अखेरचा आणि मर्मावर घाव घालणारा मुद्दा म्हणजे "शिव्या." सगळ्यात पॉवरबाज शिव्या कोणत्या तर आईबहिणीवरून दिलेल्या. पुरुषाचा सर्वांत मोठा अपमान कोणता तर "त्याच्या" कक्षेतल्या बायकांचा शारीरिक उपमर्द.

क्रोध जेव्हा अनावर होतो आणि तो दुर्बलाचा क्रोध असतो, त्यामागे आपली स्थिती बदणार नाही हे वैफल्य असतं, तेव्हा माणूस शिव्या देतो. एकप्रकारचं समाधान मिळतं त्यातून अन्यायाला काहीतरी तोंड दिल्याचं. शिव्या हा सेफ्टी व्हॉल्व्ह. आणि तो मुख्यत्वे आईबहिणीवरून. यातून स्त्रीबद्दल कोणती वृत्ती सूचित होते? स्त्रियां-बद्दलचा हा भाषिक हिंसाचार जर कधी मराठी भाषेतून पूर्ण नाहीसा झाला तर मराठी मनांच्या सुसंस्कृततेचं ते एक लक्षण होईल असं मला वाटतं.

एखाद्याबद्दलचं शत्रुत्व व्यक्त करायला जमावाने जाऊन "त्याची" बायकामुलं मारणं, त्यांच्यावर अत्याचार करणं, जिवंत जाळणं असं आपण सवर्ण–दलित किंवा

अशाच गटांबद्दल वाचतो, हे प्रत्यक्ष करणं आणि तसं भाषेतून बोलून दाखवणं यात काही नातं आहे.

एडमंड गॉसच्या एका पुस्तकात आहे की, "दोन निरुद्योगी म्हाताऱ्या बायका विणकाम करता करता जेव्हा कलुषित मनाने दुसऱ्या राष्ट्राच्या नागरिकांबद्दल बोलतात, तेव्हा महायुद्ध एका पावलाने जवळ येतं." त्याचा संदर्भ त्या पुस्तकात इंग्लंड-जर्मनीबद्दल होता.

या वाक्यात फार खोल अर्थ भरला आहे. "सहज" बोलताबोलता जेव्हा आपण 'स्त्री'ला 'कमी', 'तुच्छ', 'धोकादायक', 'मोहाकडे नेणारी' वगैरे समजतो आणि तसे शब्दप्रयोग करतो, तेव्हा प्रत्येक तशा घटनेतून स्त्रीचं माणूसपण, स्त्रीचं समानपण तिळातिळानं ऱ्हास पावतं. प्रत्येक नवजात कन्येला त्या विचारांचा वारसा मिळतो. तशातच तिचं बालपण घडतं.

लक्ष ठेवाल ना आता स्वतःवर बोलताना? तुमच्या शब्दांतून नकळत काय डोकावतं—स्त्रीमाणसांबद्दल?

('साधना' १५ ऑगस्ट १९८४)

लक्ष्मण कृष्ण चिपळूणकरांच्या शब्दांत...

विष्णुशास्त्री चिपळूणकर

रघुपती भट्ट

नुकतेच एक पुस्तक वाचायला मिळाले. 'विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे चरित्र' असे शीर्षक असलेले हे पुस्तक पुणे येथे 'सत्यप्रकाश' छापखान्यात छापले आहे. उपसंहारावरून पुस्तक एक जून १८९४ साली प्रसिद्ध झाले असावे असा अंदाज करता येतो. लेखकाने आपल नाव घातलेले नाही. फक्त

* * * * बी. ए.

हेडमास्तर हायस्कूल

यांनी लिहिले.

असा उल्लेख आहे. प्रस्तावनेत लेखकाने सांगितले आहे, 'विष्णुशास्त्री यांची प्रसिद्ध झालेली चरित्रे अपूर्ण व कित्येक ठिकाणी चुकलेली पाहून आम्हास बरे वाटत नव्हते; परंतु यापूर्वी आपण मराठीत कधी काही लिहिले नसल्यामुळे व एवढे काम आपल्या हातून झेपणार नाही असे वाटत असल्यामुळे कित्येक दिवस आम्ही तसेच स्वस्थ राहिलो.'

त्यानंतर लेखकाचे एक शिष्य, शास्त्रीबोवांचे–विष्णुशास्त्रीचे चरित्राबद्दल स्मारक फंड समितीची जाहिरात वाचून, त्यांच्याकडे आले. यापूर्वी ज्यांनी जाहिरातीला उत्तर

दिले होते आणि चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली होती त्यांना ते लिहिता येणार नाही असे लेखकाने कळवले होते, पण या शिष्याचे मन मोडवेना म्हणून लेखक स्वतः लिहायला बसले. आठवले तसे लिहीत जाताना सदरचे पुस्तक तयार झाले. तेव्हा शिष्याऐवजी स्वतःच्या नावे ते प्रसिद्ध करण्याचा निर्णय लेखकाने घेतला. सदर चरित्रास जे २०० रुपयाचे बक्षीस होते त्यातील थोडी रक्कम शिष्यास देऊन राहिलेले पुस्तकात घालून पुस्तक स्वस्त करण्याचा निर्णय लेखकाने घेतला.

त्यामुळे कापडी बायडिंगचे हे पुस्तक १॥ रु. किंमतीचे आहे.

लेखकावर 'बासवेल'चा मोठा प्रभाव आहे हे त्याने चरित्र सुरू करताना सांगितले आहे. चरित्र नायकाच्या सर्व लहान मोठ्या गुणावगुणांचे उत्कृष्ट व खरे वर्णन हा बासवेलच्या जॉनसनच्या चरित्रातील गुण आपल्या या पुस्तकात यावा यासाठी त्याने प्रामाणिक धडपड केली आहे. लेखकाची भाषा विष्णुशास्त्री यांच्याप्रमाणेच आहे. पूर्वीच्या भाषेतील सर्व गुण आणि दोष त्यामध्ये आहेत. 'म्हणून' हा शब्द 'ह्मणून', 'म्हण' हा शब्द 'ह्मण' असा लिहिला आहे. 'त्यांची खूप चहा होत असे', 'बोलेत ना' अशा प्रकारचे शब्दप्रयोग त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात.

या पुस्तकाचे एकूण नऊ भाग आहेत. विष्णुशास्त्रींचे जीवन, जे केवळ ३२ वर्षांचे होते त्याची विभागणी लेखकाने अगदी कौशल्यपूर्वक केलेली आहे. लेखक विष्णुशास्त्रींचे स्वरूप जसेच्या तसे म्हणजे लेखकाच्या भाषेत 'फोटोग्राफचे तसबिरीप्रमाणे खरी' वाचकांसमोर आणण्याचा लेखकाचा यत्न आहे.

पहिल्या भागात 'बालपण' या सदराखाली लेखकाने विष्णुशास्त्रींचे वडील कृष्णशास्त्री यांची माहिती दिली आहे. या कृष्णशास्त्र्यांनी संस्कृतचा गाढा अभ्यास केला होता, पण त्यांच्या गुरूंनी बदलत्या जमान्यातील इंग्रजीचा महिमा ओळखला आणि स्वतः उतारवयात त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली आणि कृष्णशास्त्रींनाही त्यांनी तीच दीक्षा दिली. कृष्णशास्त्रींनी २५ वे वर्षी सुरुवात करून इंग्रजीत प्रावीण्य संपादन केले आणि १८५२ साली 'चान्सलेनर एक्झिबिशनर'ची जागा मिळवली. त्यानंतर ते 'पूना कॉलेज' मध्ये असिस्टंट प्रोफेसर झाले. त्या काळात त्यांची विद्यार्थ्यांमध्ये चांगली चहा असे.

लेखकाच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रत्यय लेखक कृष्णशास्त्रींच्या हातून बाहेर चालीची काही आगळिक घडल्याचे सांगून आणून देतो. शास्त्रींच्या चांगल्याबरोबर वाईटही द्यावयाचे तो टाळत नाही.

विष्णुशास्त्रीच्या गुणांचे मूळ लक्षात यावे म्हणून लेखकाने कृष्णशास्त्रींवर विस्ताराने लिहिले आहे. कृष्णशास्त्र्यांनी बरेच ग्रंथ लिहिले. अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी-अनेक विद्यामूलतत्त्व संग्रह, अर्थशास्त्र परिभाषा, साक्रेटिस

यांचे चरित्र, रासेलस याचे भाषांतर इ. त्यांचे प्रमुख ग्रंथ. पण कृष्णशास्त्रींनी बहुतेक भाषांतरे लिहिलेली आहेत. याशिवाय घरात असणांऱ्या इतर नातेबाईकांबद्दल थोडे फार सांगून लेखकाने विष्णुशास्त्रींच्या बालपणावर लिहिले आहे.

विष्णुशास्त्री ज्या काळात 'पूना हायस्कूल' मध्ये शिकत होते त्या काळात म्हणजे १८६५ च्या सुमारासुद्धा 'कॉपी' करण्याची पद्धत विद्यार्थ्यात होती. परीक्षेचे पहिल्या दिवशी असिस्टंट हेडमास्तर कोणाकडे डिक्शनरी वगैरे लपवून ठेवलेली आहे का हे पाहात असत.

विष्णुशास्त्रींच्या वेळी एकाच वर्षात दोन इयत्ता करता येत असत. त्यावेळचे विषय आणि शिक्षणपद्धतीत लेखकाने बरीच पाने घालवली आहेत आणि पुन्हा नव्या शिक्षणपद्धतीवर शेवटी 'हा पुष्कळ गैरफायद्याचा व काही अंशी अपायकारकही आहे' असे 'आमचे मत' ही दिलेले आहे. या सदरामध्ये 'विष्णुशास्त्री' च्या लग्नापर्यंतची हकीकत दिलेली आहे. त्यातच त्यांचे हायस्कूल शिक्षण, त्यांचे घरातील भाऊ वगैरे यांची माहिती आणि लेखकाची मते वगैरे आहेत.

दुसऱ्या भागात डेक्कन कॉलेजातील विद्याभ्यास दिलेला आहे. त्यावेळी डेक्कनचे प्रिन्सिपॉल 'प्रो. वर्डस्वर्थ', विल्यम वर्डस्वर्थचे नातू यांच्याबद्दल लेखकाने अगदी बहारदार दिलेले आहे. हे वर्डस्वर्थसाहेब मुलांचे अवांतर ज्ञान वाढावे यासाठी फारच प्रयत्नशील असत. या साहेबांना नेटिव्ह मुलांबद्दल प्रेम असे पण त्यांचा स्वभाव तापट असे. त्यांच्या व्याख्यानाचा लाभ बी. ए. पास झालेल्या मंडळींना अधिक चांगला झाला असता असे विष्णुशास्त्रींचे मत होते. दुसरे डॉ. किलहार्न हे गृहस्थ. टीका आणि भाषांतर सामग्री आणल्याशिवाय न शिकवणारे संस्कृत प्राध्यापक. केरोपंत नाना छत्रे नावाचे गणिताचे प्राध्यापक, पेंढारकर नावाचे शास्त्री यांच्या आख्यायिका लेखकाने खुलवून सांगितल्या आहेत.

विष्णुशास्त्री हे या काळातच मराठी कवितेकडे वळले. आपल्या डेक्कन कॉलेजातील वर उल्लेख केलेल्या गुरूशिवाय त्याचे वडील कृष्णशास्त्री यांच्या सान्निध्यातही त्यांना बरेच शिक्षण मिळे. विष्णुशास्त्रींना मराठी कवितेचा नाद लागला आणि वडिलांच्या ट्रेनिंग कॉलेजमधील लायब्ररीतील 'सर्वसंग्रह' मासिकाचे अंक त्यांनी वाचले. याशिवाय विष्णुशास्त्र्यांनी पन्हाळकरबोवा यांची कीर्तने ऐकली. त्यांच्या कीर्तनात मराठीतील उत्तमोत्तम पद्यरत्ने विखुरलेली असत. त्यावर्षी गणिताकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि पुढच्या वर्षी अवांतर वाचनात वेळ घालवल्यामुळे विष्णुशास्त्री नापास झाले. प्रो. वर्डस्वर्थने कृष्णशास्त्र्यांना त्यांचा गणित, लॉजिक याचा अभ्यास करून घेण्याबद्दल पत्र लिहिले.

या काळात विष्णुशास्त्री जेवण्यासाठी क्लबात जात असत. या क्लबातील मंडळींचे बारकाईने वर्णन लेखकाने केले आहे. याशिवाय कॉलेजमधील काही ठळक

विद्यार्थी ज्यांचा विष्णुशास्त्रींशी स्नेह होता अशांबद्दलही तो लिहितो. त्यांचे गुणदोष वगैरे सर्व आणि पुन्हा तळटीपेमध्ये त्या गृहस्थाबद्दल वाईट लिहिणे हा आपला उद्देश नसून त्यांची त्या काळातील चित्रे आणि स्वभाव जसाच्या तसा यावा, हा उद्देश असल्याचे स्पष्ट करतो. त्यामध्ये त्या काळात गाजलेले विज्ञानाचे प्राध्यापक जिनसीवाले यांच्या धार्मिक वृत्तीबद्दलही तो लिहितो. प्रो. जिनसीवाले हे विष्णुशास्त्रींच्या वेळी कॉलेजमध्ये ज्युनियर विद्यार्थी होते.

विशेष म्हणजे विष्णुशास्त्री यांच्या वेळेच्या कॉलेजचे जे वर्णन लेखकाने दिले आहे त्यावरून १८६५ सालापासून 'रॅगिंग' अस्तित्वात आहे असे दिसते. लेखक लिहितो —

'काही विद्यार्थी विशेष हूड आणि दांडगे, कित्येक अर्वाच्य व चावट, कित्येकांस स्वतः अभ्यास नकोसा असून ते दुसऱ्यासही करू न देणारे असत. जे विद्यार्थी बुद्धिमान असून त्यास वरील द्वाड विद्यार्थ्यांशी वेताने राहता येईल त्यांचा निभाव लागे; परंतु कधी कधी वरील वृकमंडळात एखादी बिचारी भोळी गाय सापडली म्हणजे तिची दशा पुसूच नये.' (पृष्ठ ७४ भाग २ रा)

अर्थात या त्या काळच्या पागोटेधारी मंडळीचे रॅगिंग हे आजच्या मानाने अत्यंत मवाळ होते. विष्णुशास्त्रींनी दिलेल्या एका उदाहरणाने ते पटते; पण त्या काळाच्या मानाने ती न पुसता येणारी दशा होती.

विष्णुशास्त्री अभ्यास करीत; पण अवांतर वाचनाची गोडी जास्त, त्यामुळे ते बी. ए. च्या परीक्षेत नापास झाले. त्यामुळे त्यांना घरी अभ्यास करणे भाग पडले. त्या वेळी बाबा गोखले यांनी आपल्या शाळेत शिक्षक म्हणून नेमून घेतले. त्याची हकीकत तिसऱ्या भागात 'अध्यापन' या शीर्षकाखाली आली आहे.

या शाळेत 'पहिले बुकापासून माट्रीक्युलेशनपर्यंत' शिकवले जात असे. स्वतः बाबा गोखले हे शाळेकडे म्हणावे तसे लक्ष देत नसत. त्यामुळे इतर असिस्टंटही तसेच वागत. शिक्षक म्हणून विष्णुशास्त्री कसे होते? लेखकाच्या शब्दात.

'विष्णुशास्त्री हे स्वतः सुशिक्षित. त्यांस शिकवण्याची हौस मोठी, त्यांचे शिकवणे पद्धतवार, असे चांगले शिक्षकाचे कित्येक मोठे मोठे गुण त्यांच्या अंगी होते; परंतु वर्गातील ठाकठीक व व्यवस्था, छडीचा किंवा कठोर शब्दांचा तरतरीत अंमल वगैरे शिक्षणकलेची अप्रधान अंगे ही विष्णुशास्त्री यांचे शिक्षणात बरीच कमी असत. त्यातून बाबांचे शाळेतील वर सांगितल्याप्रमाणे व्यवस्था असल्यामुळे विष्णुशास्त्री यांचे शिक्षणापासून त्यांचे विद्वत्तेचे मानाने विद्यार्थ्यांस जितका फायदा व्हावा तितका होत नसेल असे वाटते. विष्णुशास्त्री यांचा दुसरा दुर्गुण म्हटला म्हणजे वेळेवर वर्गावर न येणे. ते काही वाचीत बसले असले म्हणजे तासाची घंटा वाजली असता चटकन उठून वर्गावर जातील असे बहुधा व्हायचे नाही. पंधरा-वीस मिनिटे निघून

जायचीच.' (पृष्ठ ८४ भाग ३ रा)

पण त्यावर्षी अभ्यास करून ते बी. ए. पास झाले. त्यावर्षी सुरू झालेल्या तीन नव्या उपक्रमांना ते हजेरी लावू लागले. डेक्कन कॉलेजचे गॅदरिंग, संस्कृत नाटक, प्रयोग वगैरे. वेणीसंहार नाटकात विष्णुशास्त्र्यांनी धर्मराजाची भूमिका केली होती आणि ती पाहण्यास कृष्णशास्त्री हजर होते.

कृष्णशास्त्र्यांकडे शाळापत्रकाचे काम होते ते त्यांनी चिरंजीवांकडे सोपवले होते. 'देशभाषा' आणि तिचा विकास हे ध्येय विष्णुशास्त्रांनी स्वीकारले होते. त्यासाठी त्यांनी 'शाळापत्रक' हे माध्यम बनवले. प्रथम त्यांनी 'संस्कृत कवि' नामक टीकाग्रंथ सुरू केला. कालिदास, भवभूति, बाण इ. कवींची माहिती आणि त्यांच्या काव्याचे परीक्षण त्यांनी प्रत्येक महिन्यात थोडे थोडे असे छापले. इंग्लिश टीकाकारांची मते, देऊन त्यांना खोडून काढून संस्कृत कवींची महत्ता पटवण्याचा उद्योग शास्त्रीबुवांनी या पुस्तकात केला.

त्यानंतर 'पूना हायस्कूल'चे हेडमास्तर आणि त्या वेळचे एक विद्वान 'महादेव मोरेश्वर कुंटे' यांच्यावर आपली लेखणी उचलली. पूर्वी कुंटेनी राजा शिवाजीवर दोन सर्ग लिहिले होते व त्यानंतर ते सोडून 'मन' या विषयाकडे ते वळले होते. या कवितेवर विष्णुशास्त्र्यांनी 'a poet turned philosopher' या शीर्षकाखाली 'ज्ञानप्रकाशा'त लिहिले.

आणि त्याच्या पुढच्याच वर्षी विष्णुशास्त्र्यांना पूना हायस्कूलमध्ये असिस्टंट मास्तर म्हणून नोकरी मिळाली. ही नोकरी त्या वेळचा डायरेक्टर चाटफिल्ड यांनी कृष्णशास्त्री यांचेवरील लोभाने दिली होती. कृष्णशास्त्रींचा मुलगा पदवीधर असून घरी बसून आहे असे समजल्याने चाटफिल्ड साहेब याने स्वतः होऊन नोकरी देववली. यामध्ये कृष्णशास्त्र्यांचे विदेशी मंडळीतील वजन दिसून येते.

त्यानंतर लेखकाने पूना हायस्कूलच्या स्थितीची माहिती दिली आहे. त्यावरून त्या शिस्तबद्धतेच्या काळीदेखील पुण्यातील विद्यार्थी बाके मोडणे, अंगरख्यास म्हाताऱ्या चिटकवणे, खुर्च्यांचे वेत कापणे वगैरे उद्योग करीत असत. १८७० साली मॅट्रिक्लेशन वर्गातील सत्तर मुले हेडमास्तरांशी वेवनाव झाल्याने शाळा सोडून निघून गेली होती असे मजेदार वर्णन या पुस्तकात आहे. या शाळेत विष्णुशास्त्रींना त्यांचे आवडीचे विषय शिकवायची संधी मिळाली नाही, तरी एकंदरीत सहकारी मंडळीत त्यांचा वेळ मजेत जाई. त्या शाळेतील द्वारकानाथ राघोबा यांची बदली झाल्यामुळे विष्णुशास्त्रींना चाटफिल्डच्या कृपेने बढती मिळाली.

यानंतरच्या म्हणजे चौथ्या भागात निबंधमालेचा आरंभ या सदराखाली निबंधमालेची सुरुवात कशी झाली ते लेखकाने दिले आहे.

१८७४ मध्ये विष्णुशास्त्रींनी निबंधमाला सुरू केली. याबद्दल त्यांनी १८७३ मध्ये

ज्ञानप्रकाशात जाहिरात दिली होती. पहिल्या अंकावर तेवढे त्यांनी...

विष्णु कृष्ण चिपळूणकर बी. ए.

असे नाव घातले होते. पुन्हा कधी घातले नाही.

विष्णुशास्त्री मालेसंदर्भात कोणाचा सल्ला घेत नसत. किंवा प्रती विकत घ्या म्हणून कोणापुढे हात पसरणेही त्यांना मान्य नसे. आपणहून ते कोणाला मालेचे अंक पाठवत नसत. याशिवाय या मालेतील सर्वच्या सर्व मजकूर लिहिणे, प्रुफे तपासणे वगैरे सर्व काम विष्णुशास्त्री स्वतः करीत. दुसरे कोणी मजकूर घेऊन येत पण शास्त्रीबुवा ते स्वीकारीत नसत. यामुळे एवढे व्हायचे की निबंधमाला कधीही वक्तशीर निघाली नाही. ती बहुतेक दोन-तीन महिन्यांनी मागासलेली असायची.

पहिल्या दोन-चार अंकांतच निबंधमाला प्रसिद्ध झाली. त्यांच्यातील निबंधांच्या स्वरूपावर मुंबईहून निघणाऱ्या 'दंभसंहारक' नावाच्या एका मासिकाने टीका केली तेव्हा शास्त्रीबुवांनी त्याला पाचव्या अंकात सणसणीत उत्तर दिले.

मालेच्या त्यानंतरच्या अंकात 'इतिहास' विषय घेतला आणि आठव्या अंकात त्याचा समारोप करताना शास्त्रीबुवांनी इंग्रज इतिहासकार आणि त्यांच्या मागून धावणारे भारतीय विद्वान यांचा परामर्ष घेतला. विशेष म्हणजे सरकारी शाळेत असणाऱ्या विष्णुशास्त्रींनी 'त्यांनी खंडेच्या खंडे उध्वस्त केली' वगैरे मजकूर इंग्रजांविषयी लिहावा हे आहे. या अंकाने पुण्यातील मिशनरी मंडळी खवळली. त्यांनी तो अंक मेजर कँडी यांना दाखवला. कँडीनी कृष्णशास्त्रींना त्याबद्दल विचारले आणि कृष्णशास्त्रींनी विष्णुशास्त्रींना पुन्हा असे लिहू नये अशी समज दिली.

त्यानंतर विष्णुशास्त्रींनी भाषादूषण, लेखनशुद्धी, वाचन आणि भाषांतर हे विषय घेतले आणि त्यातून होतकरू लेखकास बरेच मार्गदर्शन केले आहे.

विष्णुशास्त्री हे पराकाष्ठेचे देशाभिमानी होते. भारताचा प्राचीन इतिहास, राजघराणी आणि राजनीतिधुरंधर याबद्दल त्यांना अतिशय प्रेम होते. लेखकाने एक उदाहरण दिले आहे. कोजागिरीच्या दिवशी दूध वगैरे आणून मित्रमंडळींसमवेत मजेत घालवण्याचा शास्त्रीबोवांचा विचार होता तेवढ्यात बातमी आली की गोसाव्याच्या वेशातील नानासाहेब पेशवे ग्वाल्हेरच्या शिंद्यांना सापडले आणि त्यांनी नानासाहेबांना गिरफ्तार करून इंग्रजांच्या हवाली केले. ही बातमी ऐकताच विष्णुशास्त्री इतके नाराज झाले की, त्यांनी ते सगळे कार्यक्रम रद्द करून टाकले.

त्यानंतर लेखकाने विष्णुशास्त्र्यांच्या घरची परिस्थिती, कृष्णशास्त्र्यांचे आजारपण, आणि विष्णुशास्त्री आणि पूना हायस्कूलचे हेडमास्तर मि. कुंटे यांच्यात जो बेबनाव झाला त्याची हकीकत दिली आहे. मि. कुंटे हे कृष्णशास्त्रींबद्दल अनादराने बोलत आणि पुन्हा विष्णुशास्त्री कॅटलॉग वगैरे ठेवण्यात कमी पडत असत. पुन्हा जादा तास घेणे वगैरे उपद्व्याप शास्त्रीबोवा कधी करत नसत. पुन्हा उशिरा जात. त्यामुळे

कुंटे यांचे फार चुकत होते असेही नाही, पण लेखकाला वाटते की शास्त्रीबोवांची विद्वत्ता आणि इतर गुण यांचा फायदा करून घेता आला असता. शास्त्रीबोवा अप्रधान बाबीत कमी पडले तरी प्रधान बाबी, विद्वत्ता, शिक्षणपद्धती आणि शिकवण्याची हौस या बाबीत थोर होते याबद्दल कोणालाही शंका नव्हती.

यानंतर शास्त्रीबोवांनी निबंधमालेत लोकभ्रम हे विषय घेतले आणि त्यात पिशाच, शकून आणि ग्रहफळे यावर झोड उठवली. शास्त्रीबोवा अत्यंत सनातनी होते. त्यांना फक्त जुनेच पसंत असा ज्या मंडळींचा समज आहे त्यांनी मालेचे हे अंक वाचावेत म्हणजे शास्त्रीबोवा अंधःश्रद्धांवर केवढा कडाडून हल्ला चढवत याची कल्पना येईल असे लेखक म्हणतो. आणि आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ लेखकाने त्या निबंधातील एक प्रदीर्घ उतारा ज्यामध्ये शास्त्रीबोवांनी शकुनावर झोड उठवलीय, तो दिलाय.

वक्तृत्व या विषयावर लिहिताना विष्णुशास्त्रींनी दयानंद सरस्वती आणि पुण्यातील सुधारक मंडळींनी त्यांच्या वतीने काढलेली दयानंदांची हत्तीवरून मिरवणूक वगैरे गोष्टींचा उपहास केला आहे. त्यावरून लेखक शास्त्रीबोवांच्या धर्मविषयक कल्पनांकडे वळतो. लेखकाच्या मते विष्णुशास्त्री सुधारणेच्या विरुद्ध होते असे नाही पण सुधारणा, त्याचा बभ्रा, वितंडवाद यांच्या विरुद्ध होते.

यानंतरच्या भागाला लेखकाने 'विचारस्वातंत्र्य' असे शीर्षक दिले आहे ते अगदी उचितच आहे. प्रथम लेखकाने कृष्णशास्त्रींच्या घरात जो वैचारिक बेबनाव चालला होता त्याची माहिती दिली आहे आणि पुन्हा तो विष्णुशास्त्रींच्या विचारस्वातंत्र्याकडे वळतो. विष्णुशास्त्री शाळापत्रक चालवत होते ते १८७५ सालापासून शाळाखात्याकडून बंद करण्यात आले. याला कारण होते, श्री. विष्णुशास्त्री. प्रथम विष्णुशास्त्रींनी शाळापत्रकात संस्कृत कवी नावाची एक मालिका छापली होती. त्यानंतर शाळापत्रकाचे वाचक म्हणजे शिक्षकांचे आग्रहावरून त्यांनी मराठी कविता हा विषय हाती घेतला. त्याच्या प्रस्तावनेतच त्यांनी लिहिले की शाळाखात्याचे मुख्य अधिकाऱ्यानी 'सर्वसंग्रह' नावाच्या काव्य मासिकाचा आशय काढून घेतल्यामुळे मराठी कवितेच्या पुनरुज्जीवनाच्या आशा मंदावल्या.

लेखकाने दोन्ही बाजूंचा विचार केला आहे. त्या प्रस्तावनेने सरकारी अधिकारी संतापले आणि चाटफिल्ड साहेबांनी ते बंद करण्याचा निर्णय घेतला. विष्णुशास्त्रींकडे त्यात बराच दोष होता हे लेखक स्पष्ट करतो. एक तर शाळापत्रक सरकारी होते हे शास्त्रीबोवांच्या ध्यानातच नव्हते. त्यातूनच सरळ सरळ सरकारवर आरोप कसे चालतील? दुसरे म्हणजे शाळापत्रक सरकारी आदेश शाळांना कळावेत म्हणून काढवे हा होता. शास्त्रीबोवांच्या उपद्व्यापामुळे या शाळापत्रकाचे अंक महिना-दोन महिना उशिरा निघत. त्यामुळे एकंदरीत पाहता चाटफिल्डने विष्णूशास्त्र्यांबाबतीत थोडे औदार्यच दाखवले म्हणायला हरकत नाही.

त्यानंतर विष्णुशास्त्रींचा बराच वेळ निबंधमालेसाठी खर्च होऊ लागला. 'वेदार्थ. यत्नरत्न' नावाखाली वेदांचे भाषांतर क्रमशः येत असे? त्यावर टीका ते लिहू लागले. सदरहू भाषांतरकर्ते अश्रद्धपणे भाषांतर करतात, भारदस्त भाषा वापरीत नाहीत आणि सायनाचार्य, मॅक्समुल्लर इत्यादींचे वेदावरील अविश्रांत परिश्रम लक्षात घेत नाहीत याबद्दल विष्णुशास्त्रींनी त्यांच्यावर प्रखर टीका केली.

आणि त्यानंतर इंग्रजी भाषा हा विषय घेऊन तिची उत्पत्ती, वृद्धी, हल्लीची दशा, इंग्रजीतील अमोल ग्रंथसंग्रह इत्यादींचे विष्णुशास्त्रींनी वर्णन केले. त्यामध्ये काही ठिकाणी इंग्रज ग्रंथ, ग्रंथकार यांच्या दोषांचेही वर्णन होते. ते मेजर जेकब नावाच्या माणसाने भाषांतरित करून गव्हर्नरला सादर केले. 'एलिफ्यास' या नावाने. त्याने हा राजद्रोह आहे, हा पुण्यातील एका ब्राह्मणाने केलेला आहे, याची योग्य दखल घ्यावी असे सुचवले. विष्णुशास्त्रींनी ज्ञानप्रकाशात त्यास उत्तर दिले. या प्रकरणाचा अत्यंत गाजावाजा होऊन चाल्टफिल्डसह सर्व अधिकारी विष्णुशास्त्र्यांवर नाराज झाले.

त्यानंतर विष्णुशास्त्रींनी साने, मोडक, शाळीग्राम यांचेबरोबर काव्येतिहाससंग्रह नावाचे मासिक काढायचे ठरवले. जुने महाराष्ट्र कवींचे व संस्कृत कवींचे अप्रसिद्ध ग्रंथ, बखरी, पोवाडे वगैरे यामध्ये छापायचे ठरले.

त्यानंतर 'चित्रशाळा' या उद्योगाची सुरुवातही अशीच करायचे ठरले.

श्री. बाळकृष्ण वासुदेव जोशी नावाचे चित्रकार शाळीग्रामांमुळे शास्त्रीबोवांना परिचित झाले. त्यांना चित्रे छापण्याच्या पद्धतीची माहिती होती; पण पैशाचे पाठबळ नव्हते. शास्त्रीबोवांनी ही मदत करण्याचे कबूल केले.

१८७७ च्या अंकात शास्त्रीबोवांनी विस्ताराने डॉ. जानसन यांचे चरित्र लिहिले. आपल्या मंडळींनी डॉ. जानसनप्रमाणे आपली जी देशभाषा तिला प्रगल्भ दशा आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. यासाठी शास्त्रीबोवांनी हा उपद्व्याप केला होता आणि त्याप्रकारचा अत्यंत कळकळीचा उपदेश त्यांनी या निबंधात केला आहे. लेखकाने त्यातील उतारा दिला आहे.

'तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनी व विशेषतः आमच्या नवीन विद्वानांनी सतत उद्योग करण्याविषयी उपदेश घ्यावा. हे नवीन मंडळींना विशेषकरून सांगण्याचे प्रयोजन असे आहे की, जानसनने आपल्या देशबंधूंची जी सेवा केली, ती करण्याचे सामर्थ्य व तिचा सारा बोजा त्यांच्याच डोक्यावर आणि सामान्यतः पाहता ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याकडे आहे व ती वहिवाटण्यास वरील गुणांची तर अत्यंत आवश्यकता आहे, यास्तव त्यांनीच त्याच्या संपादनार्थ विशेषतः झटले पाहिजे.'

या सुमारासच शाळाखात्याने विष्णुशास्त्रींची रत्नागिरीला बदली करून टाकली.

लेखकाच्या मते चाटफील्ड यांचा स्वभाव गरीब त्यामुळे त्यांनी विष्णुशास्त्रींची फक्त बदली करून टाकली. वास्तविक पाहता विष्णुशास्त्रींचे अपराध एवढे महान होते की, दुसरा एखादा डायरेक्टर असता तर विष्णुशास्त्रींच्या बदलीवर थांबता ना.

पण विष्णुशास्त्रींनी कुरकुर केली नाही. त्यांना त्या वर्षी पुण्यात दोन नवे उद्योग सुरू करायाचे होते. त्यावेळीच झालेली ही बदली स्वीकारून ते रत्नागिरीला निघून गेले.

'रत्नागिरीस बदली' या भागात लेखकाने विष्णुशास्त्रींच्या रत्नागिरीतील वास्तव्याची हकीकत दिली आहे. यातच या साली १८७८ मध्ये कृष्णशास्त्रींचे २० मे ला देहावसान झाले. त्यावरून कृष्णशास्त्रींची योग्यता, त्यांचा इंग्रजामधील मान वगैरे गोष्टी लेखकाने तपशिलवार दिल्या आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर इस्टेटीच्या वाटण्यावरून विष्णुशास्त्रींच्या घरी कलह चालू झाला.

त्या वर्षीच्या निबंधमालेत शास्त्रीबोवांनी मोरोपंतांची कविता हा विषय घेतला. या विषयावर १३।१४ वर्षे त्यांचे अध्ययन चालले होते. पंतांच्या कवितेवर चुकीची मते मांडणाऱ्या रा. माधवराव रानडे, डॉ. विल्सन आणि श्री. कृष्णशास्त्री यांची मते शास्त्रीबोवांनी खोडून काढली आणि मोरोपंतांच्या कवितेचे उत्तम गुण सांगून या निबंधांचा समरोप केला आहे. लेखकाच्या मते सोलापूरकर जोशीबोवांनंतर पंतांच्या कवितेचे निरूपण करणारा आणि पंतांच्या कवितेचे निर्दोषीपण सिद्ध करणारा शास्त्रीबोवांइतका कोणी झाला नाही. पण याबरोबरच लेखक स्पष्ट करतो की, शास्त्रीबोवांच्या निबंधात अंमळ अव्यवस्था असल्यामुळे वाचकाचे ठिकाणी एकदम प्रकाश पडत नाही. तर त्याला एक दोनदा अंक वाचून विवेचनसंगती लावावी लागते.

या वेळेस विष्णुशास्त्र्यांनी नोकरी सोडण्याचे ठरवले. प्रथम त्याचा बभ्रा होऊ नये म्हणून त्यांनी सहा महिन्याची रजा घेतली आणि ते पुण्यात आले आणि त्यांनी चित्रशाळेच्या कामात रस घेतला. याशिवाय बुधवारात 'किताबखाना' म्हणून शाळीग्राम यांच्याबरोबरीने एक पुस्तकाचे दुकान काढले. रजा संपायच्या सुमारास त्यांनी राजीनामा पाठवला. त्यांनी राजीनामा देऊ नये म्हणून त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न झाला; पण शास्त्रीबोवांचा निर्धार झाला असल्याने त्यांनी माघार घेतली नाही.

राजीनामा दिल्यानंतर गावात बातमी पसरली की शास्त्रीबोवा एक इंग्रजी शाळा काढण्याचा बेत करीत आहेत. सरकारी शाळेपेक्षा कमी खर्चाने वेगळ्या तऱ्हेचे शिक्षण द्यावे अशी त्यांची योजना होती. या योजनेबद्दल ऐकून रा. टिळक, रा. आगरकर, करंदीकर, भागवत ही डेक्कनमधून नुकतीच बाहेर पडलेली मंडळी या उद्योगात भाग घेण्यास प्रवृत्त झाली. लेखकाने लोकमान्य टिळकांचा उल्लेख रा. टिळक असा केलाय. पुन्हा पुढे तो मि. टिळक असा उल्लेख करतो. लेखक म्हणतो.

'याप्रमाणे नवीन शाळा काढण्याचा विष्णुशास्त्रींनी निश्चय केला. परंतु मि.

आगरकर व भागवत व करंदीकर हे तूर्त काही कारणास्तव या बेतात येईनात. मि. टिळक हे मात्र येण्यास कबूल झाले; परंतु त्यांचे म्हणणे पडले की, नवीन शाळा न काढता कालेज काढावे. ते म्हणाले, 'मी महिना पंधरा दिवस तूर्त येतो; परंतु मी एल. एल. बी. चा डिप्लोमा घेऊन आल्यावर मग काय तो कायमचा निश्चय करीन.' (पृष्ठ २२७, भाग ६ वा.)

परंतु विष्णुशास्त्रींनी ही नवीन मंडळी हळूहळू येतील अशी उमेद धरून शाळेबद्दल जाहिरात दिली.

१ जानेवारी १८८० रोजी मोरोबादादा फडनवीस यांच्या वाड्यात १५० मुलांची नावे पटावर नोंदवून घेऊन विष्णुशास्त्री यांनी पाच मिनिटे इंग्रजीत भाषण करून न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. यावेळी शाळेत ३ शिक्षक होते. विष्णुशास्त्री, रा. टिळक व रा. माधवराव नामजोशी. लेखक टिळकांबद्दल लिहितो,

'रा. टिळक यांचा प्रथम निश्चय जरी पक्का नव्हता व शाळेऐवजी कालेज स्थापन करावे असा जरी त्यांचा मतभेद होता तरी ते शाळेला जे एकदा चिकटले ते तीस दृढ धरून राहिले. विष्णुशास्त्री यांचे अंगी धैर्य, विद्वत्ता व देशहिताकरता स्वतःस पैशाची व अंगमेहनतीची झीज लावून घेणे वगैरे जे गुण होते त्यामध्ये त्यांचे खालोखाल यांचीच पायरी लागेल यात संशय नाही. रा. टिळक यांचे कित्येक मत-वैचित्र्याबद्दल व त्यांचे काही अंशी तापट व अग्रही प्रकृतीवरून त्यास कित्येक लोक नावे ठेवतात. तरी ज्या गृहस्थानी एल. एल. बी. चा डिप्लोमा मिळाल्याबरोबर इतर होतकरू विद्वान मंडळींप्रमाणे हायकोर्टाची वाट न धरिता किंवा मुनसफची जागा पटकावण्याची हाव न बांधता विष्णुशास्त्र्यांप्रमाणे देशसेवेकडे आपले आयुष्य खर्चण्याचा निश्चय केला, त्यांची योग्यता कमी मानणे आणि ज्या रावसाहेबांचा आणि रावबहादुरांचा सरकारी नोकरीत स्वतःची व स्वतःचे कुटुंबाची चैन चालण्या-करता जन्माचा जन्म जायाचा त्यांचा मोठा बडिजाव करणे, यापेक्षा आपले लोकां-मध्ये खरे थोरपणाची यथार्थ परीक्षा करण्याची अद्याप समजूत आली नाही याबद्दल दुसरे कोणते प्रमाण पाहिजे बरे?' (पृष्ठ २३३।३४ भाग ७ वा.)

मे पर्यंत शाळेतील मुलांची संख्या पाचशेवर येऊन ठेपली, सुटी सुरू होण्यापूर्वी शास्त्रीबोवांनी जे भाषण केले त्यामध्ये शास्त्रीबोवांची निर्भय वृत्ती दिसून येते. लेखकाने ते सगळे भाषण दिले आहे. आपल्या शिक्षकांना सर्व स्वातंत्र्य आहे. आपला शिक्षक कसा आहे हे सांगताना शास्त्रीबोवा म्हणाले,

'He is here something better than a living automation ruled by the time-table on one hand and the clock on the other; something better than a wretched slave condemned for his allowance of bread to watch the looks of that Superior Intelligence whose

word is law and whose Olympian thunders – he may never venture fo temnt !' (पृष्ठ २३७ भाग ७ वा.)

हे पुस्तक १८९४ साली लिहिलेय. त्यामुळे लेखकानेच तोच बाणा पुढे चालवलाय हे स्पष्ट होते. न्यू इंग्लिश स्कूलची भरभराट सहन न होऊन त्यावेळचे पूना हायस्कूलचे प्रभारी हेडमास्तर यांनी त्याविषयी काय वाटेल ते लिहिले. त्याची पुण्यात बरीच चर्चा झाली.

वा. शि. आपटे हे शाळेला येऊन मिळाल्यावर शाळेत विशेष टापटीप व व्यवस्था आली असे लेखक नमूद करतो.

'चित्रशाळा' आणि 'किताबखाना' हे दोन्ही उत्तम प्रकारे चालले होते, फक्त शाळीग्राम हे गृहस्थ आळशीपणाने व अव्यवस्थितपणे काम करत त्यामुळे त्यांच्याशी भागी मोडून टाकावी असे शास्त्रीबोवांना वाटू लागले होते. याविषयी लिहून लेखक पुन्हा निबंधमालेकडे वळतो.

त्या वर्षी शास्त्रीबोवांनी आपली लेखणी 'लोकहितवादी' गोपाळराव हरि देशमुख यांच्यावर उचलली. लोकहितवादींची विद्वत्ता मान्य करून लेखक म्हणतो इंग्लिश लोकांचे शहाणपण, त्यांचा पराक्रम, त्यांची विद्या यापुढे आपले सर्व काही तुच्छ मानणाऱ्यांमध्ये ते होते, लोकहितवादी आणि विष्णुशास्त्री यांच्यात ३० वर्षांचे अंतर. या काळात विष्णुशास्त्री आदि विद्वानांना संस्कृत विद्यांचा इंग्रजी तऱ्हेने अभ्यास करण्याची संधी मिळाली. मॅक्समुल्लर, विल्सनसारखे विद्वान आपल्या विद्यांविषयी आदराने लिहितात हे पाहून त्यांची आपल्या प्राचीन विद्यांविषयी भावना तीव्र झाली होती. लोकहितवादींच्या वेळची इंग्रजांविषयी कौतुक आणि आदराची भावना नाहीशी होऊन त्याजागी तीव्र देशाभिमान आला होता हे लक्षात घ्यावे. केवळ सनातनी आणि सुधारणावादी असा रंग त्याला देऊ नये म्हणून लेखकाने या विषयावर लिहिण्यापूर्वी सविस्तर निरूपण दिले आहे आणि मग तो त्या १२ निबंधांचा विषय सांगतो.

नाना फडणवीसांवर लोकहितवादींनी जे आरोप केले त्यांना शास्त्रीबोवांनी यात उत्तर दिलेले आहे. नानांनी केवळ अकलेच्या जोरावर इंग्रजाना पंचवीस वर्षे झुलवत ठेवले याचा पुरावा शास्त्रीबोवांनी ग्रांटडफ आणि एशियाटीक आन्यूएल रेजिष्टरमधील उताऱ्यानी दिला. लोकहितवादींनी 'सांप्रतचे पंडितांचे ज्ञान'मध्ये जुनी शास्त्रे आणि काव्ये याबद्दल जे मत व्यक्त केले त्यालाही शास्त्रीबोवांनी उत्तर दिले. ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनाने युरोपात सुधारणा आली तेव्हा आपली जी जुनी संस्कृत, जिचे शास्त्रीबोवांच्या काळात ख्यातनाम युरोपियन विद्वानांकडून रसग्रहण होत होते त्याचेही आवश्यक अध्ययन हवे हे शास्त्रीबोवांनी मांडले. लोकहितवाद्यांनी 'आर्यविद्या उपयोगी पडत नाही.' हे विधान केले, त्याला शास्त्रीबोवांचा आक्षेप होता. केवळ मेकॉले, मिल्ल आदी भारद्वेष्ट्या लोकांचे ऐकून मते बनवणे योग्य नाही असे त्यांना

सुचवायचे होते. लोकहितवादी भारतीय विद्यांना नावे ठेवतात हे त्यांना रुचले नाही. 'उपयोग' ही कसोटी लावल्यास तर एक नांगरणे व रोटी बनवणे सोडून जगातील हजारो विद्या, कला, व्याकरणे मातीमोल ठरवाव्या लागतील असा शास्त्रीबोवांनी युक्तिवाद केला. भिक्षुक हे वेदग्रंथाचा अर्थ समजून न घेता ते केवळ तोंडपाठ करतात तेव्हा ते महामूर्ख होत या गोष्टीचे खंडन करताना शास्त्रीबोवांनी युक्तिवाद केला की एखाद्या सरकारी तिजोरीमध्ये पैसा किती आहे, त्याची व्यवस्था काय आहे याची चौकशी न करता प्राण पणाला लावून खांद्यावर बंदूक अडकवलेला एखादा जवान पहारेकरी जसा मूर्ख म्हणता येणार नाही तसाच वेद, पुराणादि संपत्ती हजारो वर्षे रक्षण करणारा ब्राह्मणही मूर्ख म्हणता येणार नाही. शास्त्रीबोवांचा आपल्या जुन्या परंपरा, जुन्या विद्या आणि संस्कृती यांचा अभिमानच यामध्ये दिसून येतो.

लेखक म्हणतो विष्णुशास्त्रींच्या या प्रतिपादनास उत्तर देण्यास लोकहितवादी जिवंत असते तर अधिक यथार्थ ज्ञान झाले असते यात शंका नाही.

त्या साली आगरकर, ज्यांचा निश्चय होत नव्हता, ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले. आगरकरांचे व शास्त्रीबोवांचे राजकीय विचार एकच होते. आता या सगळ्या मंडळींनी आपल्या मताचा प्रसार करण्यासाठी एक प्रेस काढण्याचे ठरवले. शास्त्रीबोवांनी एका छापखान्याचे साहित्य विकत घेतले होते. त्या साहित्यानेच 'आर्यभूषण' छापखाना सुरू झाला. आणि पुढच्या वर्षापासून मराठीत 'केसरी' व इंग्रजीत 'मराठा' ही वृत्तपत्रे काढण्याचे ठरले. त्याच्या नोटिशीवर पहिली सही विष्णुशास्त्रींची नंतर रा. टिळक, आपटे, आगरकर, डी. गर्दे, इ. आठ-दहा गृहस्थांच्या सह्या होत्या.

'त्या वर्षी मि. तेलंग हे एके दिवशी मि. टिळकांचे बरोबर शाळा पाहण्याकरता आले. ते मि. तेलंग म्हणजे न्या. तेलंग होत. 'बोलता' बोलता आम्ही हळूहळू या शाळेला जोडून एक कॉलेजही काढणार आहोत असे मि. टिळक यांनी सुचवले.' त्यावर तेलंग म्हणाले की दोन लाख जमले ते येतील. तूर्त काही हजार कमी आहेत. त्यावर विष्णुशास्त्री टिंगल करीत असत. उत्तर वय विद्यादानात घालवण्याचे आश्वासन देणारे तेलंग नंतर सरकारी नोकरीचा भपका–आणि बडेजाव या करिता पराङ्मुख होऊन न्यायमूर्ती बनले. याचा लेखकाने खेद केला आहे.

विष्णुशास्त्री हे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये घोकंपट्टी, परीक्षेची तयारी इ. गोष्टींपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये स्वाभिमान, स्वजात्याभिमान, स्वदेशाभिमान, स्वावलंबन इत्यादी गुण यावेत यासाठी प्रयत्न करीत. त्यामुळे अल्प मतीच्या, सरकारी नोकरीचा हव्यास धरणाऱ्या विद्यार्थ्यांना विष्णुशास्त्रींचे शिक्षण नकोसे वाटू लागले.

'केसरी'च्या प्रकाशनाचे काम रा. आगरकर यांच्याकडे आणि 'मराठा'चे रा. टिळक यांच्याकडे होते. केसरीतील पहिले अर्टिकल शास्त्रीबोवांचे असे लेखकाने स्पष्ट

लिहिले आहे की शास्त्रीबोवा वर्तमानपत्राचे धर्तीवर कधी लिहीत नसत. त्याना वर्तमानपत्रे वाचण्याचा कंटाळा असे. त्यामुळे राजकीय किंवा इतर प्रचलीत प्रश्नांवर लिहिण्याचे त्यांच्या मनात कधी घाटत नसे. समाजव्यवस्था, जातीभेद किंवा तत्सम विषयावरच ते लिहीत. 'प्रार्थनासमाज' या विषयावर त्यांनी एकदा केसरीमध्ये लिहिले. 'केसरी'चे संपादक रा. आगरकर यांनी जेव्हा ते वाचले तेव्हा शास्त्रीबोवांची धर्मावरील मते त्यास पसंत न पडून त्यांनी त्यात वरीच बदलाबदल करून छापला. त्यामुळे लेखकासारखे शास्त्रीबुवांचे चाहते नाराज झाले. खुद्द बोवाही नाराज झाले; पण 'संपादका'चे अधिकार त्यांनी पूर्णपणे मानल्यामुळे ते स्वस्थ राहिले.

त्यानंतर लेखकाने शास्त्रीबोवांचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, नित्यक्रम, मनोवृत्ती याबद्दल तपशीलाने लिहिले आहे.

शास्त्रीबोवा मध्यम उंचीचे, मध्यम अंगलटीचे होते. त्यांचा चेहराही मनात भरण्यासारखा किंवा बुद्धिदर्शक होता असे नाही. ज्यांची शास्त्रीबोवांशी प्रथम गाठ पडली व ज्यांना त्यांच्याशी बोलण्याचे काम नसे अशांचे शास्त्रीबोवांबद्दल चांगले मत होत नसे. शास्त्रीबोवा स्वतःहून बोलत नसत. व्यावहारिक आणि राजकीय गोष्टी चालल्या तर शास्त्रीबोवा हं हं यापेक्षा जास्त बोलत नसत. संस्कृत किंवा इंग्रजी ग्रंथावर ते बहारदार बोलत; पण ते सुद्धा ज्यांचा विशेष परिचय आहे अशांशीच. कामाशिवाय शास्त्रीबोवा गप्पा मारत बसलेत असे दृश्य विरळाच. लेखकास स्वतःला मात्र विष्णुशास्त्रींच्या बहुश्रुतेचा लाभ झाला असे तो सांगतो. अनेक चांदण्यारात्री ते त्यास संस्कृत काव्यातील खुबीदार जागा, सुभाषित पद्ये, मोरोपंतांच्या आर्या वगैरे सांगत असत. त्यातील काही लेखकाने उदाहरण म्हणून दिलेली आहेत.

धार्मिक बाबींत शास्त्रीबोवांचा आग्रह नसे पण त्या काळी साधारण मान्य असलेले धर्माचरण मात्र सांप्रदाय म्हणून ते करीत असत.

त्यांचे कपडे साधे असत. चहा कॉफीचा त्यांना कंटाळा असे. वारा एक वाजेपर्यंत ते वाचत बसत. बहुतेक दिवस निबंधमाला लिहिण्यात ते घालवत. गावात नवीन काही असो, नाटक, सरकस, जादूचा खेळ, शास्त्रीबोवा हजर राहातच. तमाशा, गोंधळ, लावणी वगैरेंना ते अगदी आग्रहाने जात. (शाळीग्राम यांनी ऐतिहासिक पोवाडे, रामजोशी, अनंतफंदी इत्यादी लावण्यांचे संग्रह शास्त्रीबोवांच्या उत्तेजनानेच केले.)

लेखक म्हणतो त्यांचे ठिकाणी स्वतःविषयी बराच अहंपणा असे व तो त्यांच्या लेखात बराच दिसून येतो. एकदा लेखकाला ते म्हणाले.

'I am the Shivaji of the Marathi language, who had not his equal either to precede or succeed him!' (पृष्ठ ३८२ भाग ७ वा.)

त्यावेळच्या अनेक विद्वान आणि पुढारी मंडळींना ते First bones of time असे उपहासाने संबोधत. त्या सगळ्यांचे बोलणे फार आणि करणे थोडे–व्याख्यानांची

मात्र झोड उठवतील असे शास्त्रीबोवांना वाटे.

पैशाच्या बाबतीत ते अत्यंत ढिले होते. दुसऱ्यास उसने दिलेल्या पैशाचा हिशेब न ठेवल्यामुळे त्यांचे बरेच पैसे बुडले.

विष्णुशास्त्री स्वतःहून कोणाला उपद्रव देत नसले तरी त्यांचा स्वभाव खुनशी आणि आग्रही असल्यामुळे एकदा मनुष्य त्यांच्या मनातून उतरला की पुन्हा त्याच्याशी ते कधीही बोलत नसत. त्यांचे प्रेम आणि कळकळ नेमस्त असे.

विष्णुशास्त्रींच्या स्वभाव वैशिष्ट्यांना सांगून लेखक त्या सालातील निबंधमालेकडे वळतो. 'आमचे देशाची स्थिती' यावर शास्त्रीबोवांनी ८१ सालात ७ निबंध लिहिले यामध्ये इंग्रज कसे आले, त्यांनी सत्ता कशी संपादिली, राज्यकर्ते इंग्रज आणि प्रजा यामध्ये एकमेकांबद्दल काय भावना आहेत, याविषयीचे निरूपण करून इंग्रजांनी या देशात कोणत्या सुधारणा आणल्या याविषयी देखील शास्त्रीबोवांनी लिहिले. त्यानंतर आम्हाला आमचे राज्य करता येणार नाही या मुद्द्याचे खंडन करून शास्त्रीबोवा इंग्रजांच्या अन्यायाकडे वळतात. 'येशू'ची महत्ता वर्णून ते म्हणतात—

'तुम्ही आपल्या देशातून उठा आणि परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यांनी कधी तुम्हास काडीचा उपद्रव दिला नाही त्यांचे मुलूख काबीज करा, ज्यांनी सालसपणे तुम्हाला आश्रय दिला त्यांच्यावरच उठून अरेरावी करा, रणवाद्ये वाजवा, जयस्तंभ उभारा, खोट्या सह्या करा, दुसऱ्यांच्या बायका उपटा, दिवसा ढवळ्या दरवडे घाला, वाटेल त्यास उचलून फाशी द्या, यापैकी एकही प्रकार 'शुभ वर्तमानात' नाही.'

आणि हे प्रकार करणाऱ्या इंग्रजांबद्दल—

'आमची तर पक्की खात्री आहे की, हेस्टिंग्स, डालहौसी, लिंटन, टेंपल, फ्रीयर अशासारख्यास खिस्ताच्या शिष्यात सामील करणे म्हणजे वेषधारी लांडग्यांस मेंढ्यात गणणे...

शास्त्रीबुवांच्या लेखणीला पक्की धार आलेली होती.

पुढे ते लिहितात.

'इंग्रज लोक गेल्या शतकभर आमच्याशी ज्या तऱ्हेने वागले त्याच तऱ्हेने इतरानी त्यांच्याशी वागावे असे ते इच्छितात काय? आम्ही उठून उद्या इंग्लंडवर गेलो, सारी दौलत आणून हिंदुस्थानात भरली तर चालेल काय? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील सारी प्रजा पिळून काढली असता ते आमच्या पश्चात्त्य आर्यबंधूस कितीसे मानवेल बरे? फूलर साहेबानी एका शिपायास मारले आणि त्याच्या बायकोस ३० रु. त्याच्या प्राणाची भरपाई म्हणून दिले. त्याप्रमाणे एखाद्या खिस्त पुत्रास आकाशातील बापाकडे रवाना करून मडमसाहेबाची समजूत वरील दक्षिणा देऊन केली तर मोठी मौज होईल नाही बरे? बिचारा क्रुसावर चढणारा येशू जर आपल्या शिष्यास असे सांगतो की, मी तुम्हास आकाशातील राज्याचे वाटेकरी करीन तर आजपर्यंत या

सच्छिष्यानी साऱ्या पृथ्वीवर जो धिंगाणा घातला व घालत आहेत, व नवी नवी रण-सामग्री करून एकमेकांच्या उरावर बसण्यास ते जे नेहमी टपलेले असतात, हा सर्व प्रकार ईश्वरपुत्राच्या कानावर जेव्हा पूर्वोक्त दिवशी जाईल तेव्हा त्यास काय वाटेल बरे?'

शास्त्रीबोवांच्या लेखणीला असा बहर आलेला असताना शास्त्रीबोवांना काळाने ओढून नेले. या निबंधात आपल्या देशाचीही तब्येत बिघडली आहे ती सुधारण्या-साठी कोणते उपाय योजले पाहिजेत यावर शास्त्रीबोवांनी निरूपण केले आहे. त्यामध्ये शास्त्रीबोवांचे आत्यंतिक देशप्रेम दिसून येते. 'आमचे दैव फिरल्यामुळे हल्लीच्या अवस्थेत आम्ही येऊन पडलो आहोत, असं शास्त्रीबोवा लिहितात तेव्हा आपल्या देशातील प्रखर पराक्रमी तलवारबहाद्दराची आणि राजकारणधुरंधरांची मालिका शास्त्रीबोवांच्या नजरेपुढे तरळली असावी आणि क्यापटन क्लैव, वारन् हेस्टिंग्ज सारख्यास आपण हार गेलो याचा नितांत खेद वाटत असावा, असे वाटते.

आठवा भाग 'अंत' नावाचा आहे. या भागात शास्त्रीबोवांच्या शेवटच्या दोन-अडीच महिन्यांची हकिकत आली आहे. शास्त्रीबोवांच्या निबंधमालेस आता आठ एक वर्षे होऊन गेली होती. तेव्हा ती संपवून ग्रंथमाला नावाचा उद्योग सुरू करण्याच्या बेतात होते. विष्णूशास्त्रींना मंडळींचा फोटो घ्यायची एके दिवशी इच्छा झाली. सगळ्यांचे फोटो झाल्यावर शास्त्रीबोवांचा एक उभ्याने फोटो घ्यायचा विचार ठरला पण फोटोग्राफरने शास्त्रीबोवांना जास्त वेळ उन्हात उभे केल्याने शास्त्रीबोवा घेरी येऊन पडले. दुखापत झाली. घरगुती उपचाराने ती बरी झाली; पण बारीक ताप चालू राहिला. बरून तब्येत ठीक होती. निबंधमालेचे लिखाण चालू होते; पण अशक्त-पणा आणि बारीक ताप यामुळे शास्त्रीबोवा शाळेत मात्र महिना दीड महिना गेले नाहीत. 'काव्येतिहाससंग्रह' नावाचा जो उपक्रम चालू केला होता, त्यातूनही शास्त्री-बोवांनी अंग काढून घेतले. त्यात शास्त्रीबोवा आणि व्यवस्थापक यांच्यातील गैर-समजाने एकमेकावर वृथारोप झाले आणि शास्त्रीबोवांना निष्कारण मनस्ताप झाला. त्याच सुमारास कोल्हापूर संस्थानचे माजी कारभारी माधवराव बर्वे यांनी केसरी-मराठावर अब्रू नुकसानीचा खटला दाखल केला. शास्त्रीबोवांचा त्यात प्रत्यक्ष संबंध नव्हता तरी बोवांची तब्येत बरोबर नसल्यामुळे त्यांनी त्यात मनस्ताप करून घेतला.

शास्त्रीबोवा टंगळमंगळ करून शाळा चुकवतात असे कोणाला वाटू नये म्हणून जरा बरे वाटताच ते शाळेत गेले; पण जरा काम करताच त्यांना इतका थकवा आला की त्यांना परतावे लागले. त्यांनी डॉक्टरना तब्येत दाखवली नाही कारण त्यांचे वाईट मत होते. काहींच्या तऱ्हेवाईकपणाने त्यांनी यच्चयावत डॉक्टर मंडळींबद्दल वाईट मत बनवून घेतले होते. आग्रहामुळे त्यांनी वैद्याचे औषध घेतले पण फरक पडला नाही. तेवढ्यात त्यांनी एक कलिंगड मागवून खाल्ले आणि तब्येत भयंकर बिघडली.

ताप चढू लागला. इतरांनी त्यांना भात भरवण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात आईचा आवाज ऐकून ते धडपडत पाटावर जाऊन बसले. पुन्हा त्यांना वात सुरू झाला. त्यांचे काका सीतारामपंत हे डॉ. विश्राम यांना घेऊन आले. ज्यांना कृष्णशास्त्री 'Vishram, you are my God' असे म्हणत असत. पण विष्णूशास्त्रींचा डॉक्टरावर विश्वास नसल्यामुळे व त्यांना वात झाल्यामुळे ते ओरडले,

'I won't take your medicine. I shall'nt (मूळ प्रतीतील) be poisoned! Take care you will have to answer. This is Kolhapur Maharaja's case.' (पृष्ठ ३०८ भाग ८ वा.)

त्यामुळे डॉ. विश्राम यांनी औषध दिले नाही. सितारामपंतांनी आग्रह केला; पण विश्रामनी त्यांना वैद्यच बोलावण्याचा सल्ला दिला. त्यानुसार वैद्यबुवा काढा पाजून गेले. जवळची मंडळी विष्णुशास्त्रींच्या अत्यवस्थेतेची कल्पना न आल्यामुळे शेजारच्या खोलीत थकून भागून झोपली तेव्हाच म्हणजे पहाटे ५॥ वाजता, गुरुवार ता. १७ मार्च १८८२ ला शास्त्रीबोवांचा प्राण निघून गेला.

शास्त्रीबोवांच्या निधनाची वार्ता पसरली. लोकांचे थवे जमू लागले. अफवा पसरली की, कोल्हापूर प्रकरणाच्या धास्तीने शास्त्रीबोवांनी आत्महत्या केली. त्यामुळे पोलिसांनी प्रेत नेण्यास आडकाठी आणली; पण वजनदार माणसांनी डॉ. विश्राम यांचे सर्टिफिकेट दाखवून त्यातून मार्ग काढला. फक्त रामभाऊ साने यांनी शास्त्रीबोवांचे गुण गाणारे भाषण केले. इतरांना करायचे होते; पण प्रो. केरोपंत म्हणाले की, पुन्हा पोलिसांची कटकट नको. शास्त्रीबोवांचे बंधू लक्ष्मणराव हजर नसल्यामुळे त्यांचे चुलतबंधू विनायकराव यांनी अंत्यसंस्कार केले.

शास्त्रीबोवांच्या निधनानंतर सर्व महाराष्ट्रभर शोक झाला. मराठी भाषेचा कट्टर पुरस्कर्ता गेला. या शब्दात वर्तमानपत्रांनी आठवडाभर शास्त्रीबोवांवर लिहिले. याशिवाय लंडनमधील 'ग्राफीक' या पत्रात शास्त्रीबोवांचा फोटो आणि जीवनवृत्तांत आला. 'ग्राफीक' मध्ये १६ मे १८८२ साली असे म्हटले आहे.

'Vishnu Krishna Chiplunkar,

This worthy Indian citizen, who died on the 17th March last, at the early age of thirty-two, displayed an enterprise and energy in the persuit of benevolent aims which is nowhere to common, and is especially valuable in India where the people are rather want to lean upon the Government for any improvement.' (पृष्ठ २१३ भाग ८ वा)

यानंतर शास्त्रीबोवांचे संक्षिप्त जीवनचित्र देऊन शेवटी म्हटले आहे,

'He did not live to reap the fruits of his labours, but he never-

theless deserves a hearty recognition as one of those pioneers of progress, who if they become numarous enough, will some day make India, a self governing community.' (२१४ भाग ८ वा)

९ व्या म्हणजे शेवटच्या भागात लेखकाने शास्त्रीबोवांच्या 'भाषासेवा आणि देश-सेवा' याचा परामर्श घेतला आहे. शास्त्रीबोवांची भाषा घाटावरील महाराष्ट्र भाषा आहे. त्यालाच 'पुण्याची मराठी' असे नाव आहे. शास्त्रीबोवांनी इंग्रज ग्रंथकारांची आवेशयुक्त चटकदार वर्णन करण्याची; हास्य, विनोद, पुण्यभाव, तिरस्कार इ. गुणांनी वाचकाला भारून टाकणारी शैली संपादन केली होती. असे भाषेचे लेखकाने शास्त्री-बोवांच्या वर्णनात्मक, त्वेषयुक्त, टर उडवणारे, बुद्धिवाद करणारे वगैरे गोष्टींचे नमुने दिले आहेत. शास्त्रीबोवांनी सादर केलेले काही विनोदही दिलेले आहेत.

मराठी भाषा अपक्व दशेत असून तीत गद्यग्रंथ म्हणण्यासारखा नाही या मुद्द्या-वरून १८७० सालापासून युनिव्हर्सिटीच्या वरच्या परीक्षातून काढून टाकण्यात आली. नव्या पदवीधरांना मराठीचा विटाळ सोसत नसे. व्याख्यानात किंवा पत्रात लिहिण्यास इंग्रजीशिवाय ते चालवत नसत. प्रत्येकाने असा मराठीचा द्वेष चालवला असताना शास्त्रीबोवांनी आवाज उठवला आणि धारदार लेखणीच्या साहाय्याने 'मराठी माऊली' वरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आणि निबंधाच्या साहाय्याने मराठी भाषेत सुशिक्षितांत रस निर्माण केला. (याची पावती अहिताग्नी राजवाडे यांनी श्रीविद्याने प्रकाशित केलेल्या आपल्या आत्मवृत्तात दिली आहे. आपली मराठी शास्त्रीबोवांच्या निबंधांनी चांगली झाल्याचे त्यांनी लिहिले आहे. निबंधमालेचे सर्व अंक त्यांच्या घरी होते. ते शास्त्रीबोवांचे इतके निस्सीम भक्त होते की, शास्त्रीबोवांची मते हीच त्यांना ग्राह्य वाटत आणि त्यांच्या वेळच्या पिढीची ती अवस्था होती.)

तर विष्णुशास्त्री स्वतःला मराठी भाषेचा शिवाजी म्हणवून घेत याचे कारण हेच होय. एक जमाना या निबंधमालेने वेडा केला आणि या युगाचे वर्णन लेखकाने अति-शय ओघवत्या भाषेत आपल्या वाचकांसाठी केलेले आहे.

उपसंहारात लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर लिहितात की या चरित्राची सामग्री आणि योग्यता त्यांच्याकडे असल्याने हे ऋण राहिले होते आणि त्यावरून स्पष्ट होते की, हे त्यांनीच लिहिलेले आहे. अर्थात त्यांच्याशिवाय विष्णुशास्त्रींचे एवढे जवळून दर्शन कोणालाच शक्य नव्हते. पुस्तकाचा उपसंहार १ जून, १८९४ साली लिहिला आहे. त्यावरून पुस्तकाचा प्रकाशन दिनांकही तोच असावा असे मानायला हरकत नाही.

असे हे शास्त्रीबोवांचे चरित्र प्रत्येक मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्याने वाचले पाहिजे इतके सुंदर बनले आहे. लेखकाने प्रत्येक भागाला सुरुवात करताना एखादे इंग्रजी कवन किंवा संस्कृत सुभाषित दिले आहे. लक्ष्मण कृष्ण यांचा उल्लेख तृतीय पुरुषात असला तरी त्यांनीच हे पुस्तक लिहिले असावे असे स्पष्ट करणारी अनेक विधाने

त्यात आहेत. उदा.

'यामुळेच विष्णुशास्त्री यांचे लक्ष्मणरावाशी विशेष जमे...विष्णुशास्त्री यांनी संस्कृत ग्रंथातील मर्मस्थाने त्यास सांगावी त्याचप्रमाणे इंग्रजी ग्रंथातील त्यांनी श्रमाने मिळवलेली माहिती आपले भाविक कनिष्ठ बंधूस देत असावी...परंतु लक्ष्मणरावांची वृत्ती पूर्ण भाविक असल्याने त्यास विष्णुशास्त्री यांनी आपल्या एखाद्या स्नेह्याप्रमाणे हरएक प्रकारच्या गमती, सोवत्यांच्या व प्रोफेसर लोकांच्या नकला, त्याचप्रमाणे धर्म, राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था वगैरे विषयावरील त्याचे विचारही मोकळे मनाने सांगावी; व लक्ष्मणराव हे सर्व नीट लक्ष लावून ऐकत म्हणून विष्णुशास्त्री यांस अधिकाधिक सांगण्याची हौस वाटे.'

लेखकाने स्वतःविषयी जे सांगितले आहे त्याला लक्ष्मणरावांचे वर्णन चपखल बसते. शिवाय उपसंहाराचाही त्याला पाठिंबा आहेच.

असे हे शास्त्रीबोवांचे म्हणजे मराठी भाषेच्या शिवाजीचे चरित्र.

(साप्ताहिक 'माणूस', फेब्रुवारी १९८५)

पैठणी : सर्वाधिक किंमती वस्त्र

मुकुंद निमखेडकर

धुळींनी माखलेले रस्ते, त्यांच्याभोवती कोसळून पडण्याची वाट पाहात उभे असलेली जुनाट कौलू वजा घरे, अधेमधे स्वतःचा दिमाख दर्शवू पाहणारे गलिच्छ रेस्टॉरेन्टस व त्यातून कोकलणारे संगीत असेच फार तर वरकरणी आजच्या पैठण या शहराचे वर्णन करता येईल.

तथापि प्रतिष्ठान या नावाने अखिल भारत वर्षात प्रसिद्धीस आलेल्या या शहरात पैठणी साड्या व रेशमी वस्त्रे विणण्याचा जो एक उद्योग हजारो वर्षापूर्वी उदयास येऊन विकास पावला त्यामुळे पैठणचे नाव लोकमानसात आजही जिवंत आहे.

पैठणीच्या आठवणीने मनात जागे होतात ते तिथे विणल्या जाणाऱ्या भरजरी रेशमी साड्यांविषयी प्रविष्ट असलेले वाक्प्रचार जसे, 'नेस तू नव पैठणी, येगे मन मोहिनी, साध्य सुंदर चांदणीसम हास सदनांगणी' किंवा 'भारी पहाट झाली, चला घालू या रांगोळ्या, भारी नेसून पैठणी' इत्यादी.

अशा या जरतारी रेशमी साड्या केवळ हस्तकौशल्याने विणण्याचे केंद्र असलेल्या पैठणला जाण्याची संधी मिळाली व प्रत्यक्षपणे या उद्योगाची पाहणी करावयाचे मी ठरविले. विणकामाचा उद्योग एकेकाळी पैठण येथे उदयास येऊन पूर्णपणे विकसित झाला. टॉलेमी या भूगोल तज्ज्ञानुसार इसवी सन दुसऱ्या शतकात पैठणच्या रेशीम कापडाला ग्रीस व रोमसारख्या शहरातून भारी प्रमाणावर मागणी होती. याशिवाय

सर्वच धार्मिक व संत वाङ्मयातून पैठणच्या भरजरी रेशमी साड्या व कापडाविषयी केलेला उल्लेख महत्त्वपूर्ण आहे.

परंतु आज हा हस्तव्यवसाय मोडकळीस येऊन संपूर्णतः नष्ट होत आहे, या व्यवसायाचे इतिहासदृष्ट्या असलेले महत्त्व, कापडातील दर्जेदारपणा व लोकप्रियता इत्यादी गोष्टी ध्यानात घेऊन, महाराष्ट्र सरकारने या हस्तव्यवसायाला नवीन जीवन देण्याचे औचित्य दाखवले आहे. व त्यानुसार राज्य लघु विकास महामंडळातर्फे पैठणी साड्या विणण्याचे एक केंद्र पैठण येथे चालविण्यात येते. या केंद्रात सुमारे १५ विणकर काम करीत असून त्यांना त्यांच्या कामानुसार वेतन व भत्ते देण्यात येतात. व प्रामुख्याने पैठणी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पाचवारी साडयाच येथे विणल्या जातात.

पैठणी या पाचवारी साडीचे दोन प्रकार, पहिला प्रकार म्हणजे परंपरागत पद्धतीने विणली जाणारी पैठणी व दुसरा प्रकार म्हणजे आधुनिक पद्धतीने विणली जाणारी. दोन्ही पद्धतीनी विणली जाणारी पैठणी साडी विविध रंगांमध्ये व नक्षीकामामध्ये मिळते. पैठणी साडीवरील नक्षी, रंग व कापडाचा मुलायमपणा इ. गुणांमुळे ही साडी अत्यंत दर्जेदार दिसते. प्राचीन काळी रंगावरून पैठणीला मोठी कलात्मक नावे प्राप्त झाली होती जसे १. काळ्या रंगाची काळी चंद्रकला २. तांबडा, गुलाबी व हिरवा रंग मिळून होणारी वर्साला ३. काळा, पांढरा, पिवळ्या रंगाची पोफळी ४. निळ्या रंगाची निळीगुंजी ५. हिरवा आणि निळा रंग मिळून होणारी मोरपंखी, इत्यादी.

पैठणी या भरजरी रेशमी साडीचे महत्त्व भारतीय स्त्रीच्या जीवनात आजही अनन्यसाधारण आहे. सौभाग्य अलंकार म्हणूनच ही साडी नेसली जाते. तथापी कडाडलेल्या महागाईमुळे पैठणी साडीची किंमत आज साधारण स्त्रीला अजिबात परवडणारी नाही. परंपरागत पद्धतीने विणली जाणारी पैठणी आज सुमारे ३५०० रुपयास मिळते तर आधुनिक पद्धतीने विणल्या जाणाऱ्या एक पैठणीची किंमत तर १५००० रुपये आहे. परंपरागत पद्धतीने विणल्या जाणाऱ्या पैठणीस १७५ ग्रॅम जर व ५०० ग्रॅम रेशमी सुताची गरज असते व ९०० रुपये कारागिरास मजुरी करता द्यावे लागतात. त्याचप्रमाणे आधुनिक पद्धतीने विणल्या जाणाऱ्या पैठणीस सुमारे ६०० ग्रॅम रेशीम व ४०० ग्रॅम जर लागते व सहा महिन्यांचा कालावधी लागतो.

पैठणी या साडीची तुलना बनारसी शालूशी करण्यात येते. परंतु जाणकारांच्या मते पैठणी हे बनारसी शालूपेक्षा बरेच उत्कृष्ट व दर्जेदार वस्त्र होय. पैठण ही पूर्णपणे हाताने विणली जात असल्यामुळे तीत कलाकुसरीस बराच वाव असून ती बरीच टिकावू असते पिढ्यान्‌पिढ्या वापरल्यावर पण त्यातील जर, वस्त्राची मूळ किंमत मिळवून देते. पैठणीवरील नक्षीकाम व विणकाम हे दोन्ही बाजूनी सारखेच दिसते.

अशा या बहुरंगी, बहुगुणी रेशमी कापडाचे विणकाम करणाऱ्या विणकऱ्याच्या समस्या फार गंभीर स्वरूपाच्या आहेत. केवळ शंभर वर्षांपूर्वी अर्ध्यापेक्षा अधिक

पैठणकर लोक या जरतारीचे वस्त्र विणण्याच्या कामात मग्न होते. आज ही संख्या केवळ १५ ते २० आहे. यावरून अखिल भारतात प्रसिद्धिस गेलेल्या या व्यवसायाचा किती झपाट्याने मागील शतकात ऱ्हास झाला याची कल्पना करता येते.

या व्यवसायाची आजची प्रमुख समस्या आहे भांडवलाची. भांडवलाअभावी पिढ्यांपासून पैठणी व भरजरी वस्त्र विणण्यातच समाधान मानणाऱ्या असंख्य विणकरांनी या व्यवसायास तिलांजली दिली आहे. अशा परिस्थितीत सरकार व सामाजिक संस्थांनी भारताचे भूषण ठरलेल्या या जरतारी वस्त्र निर्मितीच्या हस्त व्यवसायास सढळपणे सर्वतोपरी मदत करावयास हवी. लघु उद्योग महानिर्माण मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या केंद्राशिवाय कुठेही या व्यवसायाची हालचाल पैठण शहरात पहावयास मिळाली नाही. वाटले वाढत्या महागाईमुळे हे वस्त्र घेणे लोकांना परवडत नसेल. मात्र जाणकारांशी याबाबतीत चर्चा केली असता असे कळले की लघुउद्योग महामंडळाकडे वऱ्याच दिवसांपासून या वस्त्राकरता मागण्याचे अर्ज पडून आहेत व केवळ कुशल कारागिरांच्या अभावी मंडळ या मागण्या पूर्ण करण्यास असमर्थ आहे.

आज पैठणी साडी विणणे हा पैठणचा घरेलू व्यवसाय राहिला नसल्यामुळे कुशल कारागीर मिळणे असंभव झाले आहे. मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या केंद्रात जे विणकर कार्यरत आहेत त्यातील तर काही सत्तरीच्या घरातले आहेत व बाकीचे सेवा निवृत्तीची वाट बघताहेत. नवीन मुलामुलींना, ज्यांच्याकडे हा व्यवसाय पूर्वजात होता, जे नव्याने या व्यवसायात शिरू इच्छितात, त्यांना या व्यवसायाचे शिक्षण देणे निकडीचे आहे. अशाप्रकारे देण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या सोयीप्रमाणे हजारो बेघर लोकांना या हस्तव्यवसायात येण्याची संधी मिळेल.

शेवटी एक गोष्टीचा येथे प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. तो म्हणजे काही वर्षांपूर्वी जेव्हा पैठणी विणणे हा पैठणकरांचा प्रमुख व्यवसाय होता त्याकाळी उत्तम व पूर्णतया नैसर्गिक प्रक्रियेहून तयार झालेले रेशीम पैठणलाच तयार होत असे. हीच स्थिती चांदी, सोने याजपासून करण्यात येणाऱ्या जरीच्या बाबतीत पण होती. परंतु आज हे दोन्ही मूळ पैठणी तयार करण्यास पूरक ठरलेले उद्योग येथून पूर्णतः नामशेष झाले आहेत. पैठणी साडी व इतर भरजरीचे रेशीम वस्त्र विणण्याच्या या जगप्रसिद्ध हस्तव्यवसायाचे पुनरुज्जीवन करावयाचे असेल तर रेशमी व जर तयार करण्याचा उद्योग पहिल्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी पैठण येथेच सरकारने विकसीत केला पाहिजे. उत्तम प्रकारचे रेशीम स्वस्त दरात व विपुल प्रमाणात पहिल्यासारखेच पैठण येथे तयार होऊ शकल्यास पैठणीच्या किमती निश्चितपणे कमी होतील व या देशातील सामान्य स्त्रीपण पैठणीसारखे महावस्त्र परिधान करू शकेल.

(नागपूर पत्रिका, २३ जानेवारी १९८५)

साहित्यात फुललेला पण....
वास्तवात सुकलेला माणदेश

विजय सिन्हा

संघर्ष वाहिनीच्या वतीने मी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात काम करतो. 'माणदेश, माणदेशी माणसं' मराठी साहित्यात प्रसिद्ध पावली आहेत. माडगूळकर बंधूंच्यापासून शंकरराव खरातांच्यापर्यंतचे मोठेमोठे साहित्यिक या भूमीचा वारसा सांगतात. साहित्यिक प्रसवा ही भूमी सुजलाम, सुफलामच्या बाबतीत अगदी वांझ आहे, असे म्हणणे अनेक जणांना अतिशयोक्तीचे वाटेल. परंतु ते कटुसत्य आहे. माडगूळकर, खरात केव्हाच पुणेनिवासी झालेत. मी म्हसवडच्या सिद्धनाथाच्या गुरव वाड्यात स्थायिक आहे.

'सिद्धनाथ' पावत नाही हे कळायला लागल्यापासून येथल्या दैन्य-दरिद्र्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतोय. महाराष्ट्रातील कायम दुष्काळी पट्ट्यात आमचा तालुका आहे. उघड्या उराडाने माण नदी तालुक्यातून वाहते. एकूण ९३ गावे, १ लाख २४ हजार लोकसंख्या, पावसाचे मान अत्यल्प. १५ ऑगस्टला सारा महाराष्ट्र पावसाच्या थैमानात सापडला होता. आमच्याकडे भरलेले आभाळ वाकुल्या दाखवत होते. त्यामुळे लोकांचा हात साहजिकच कपाळाला. ३० हजार मजूर रोजगार हमी योजनेत काम करतात. सहा रुपयांपर्यंत रोज सुटतो. सीझनला वारणा, कोल्हापूर,

कराड, सांगली भागातील साखर कारखान्यांकडे पोट भरायला. लोकसंख्या मोठी आहे. काही जणांनी कायमचे स्थलांतर केलेले आहे. मुंबई कल्याणकडे रंगकाम करणारे मजूर 'खास' येथलेच आहेत. मेंढपाळ धनगरांची लोकसंख्या २८ टक्के आहे. ही मंडळी चिपळूण, कल्याणकडे जातात. वळई, पानवण, परिती, जांभुळणी गटवाडीसारख्या गावांत ५–१० टक्केही लोक उरत नाहीत. तरुण वर्ग वसई भागात माती कामाला जातो. निम्मी लोकसंख्या शिलकेत ठेवणारी बहुसंख्य गावे आहेत. धनगर, लोणार, मराठे या इथल्या प्रमुख जाती. तसे मराठे अल्पसंख्य परंतु खासदारकीपासून पंचायत समिती सभापतीपर्यंत त्यांचीच वर्दी. बलुतेदारी जवळपास नसावी. महार मात्र प्रत्येक गावात आहेत. एक तरी घर आहेच. गावे जवळपास एकेका जातीचीच. लोणार म्हणजे फक्त लोणार. मांग-महाराचे घर तेवढे अपवाद. धनगर म्हणजे निखळ धनगर. मराठ्यांची अशीच १२–१३ गावे आहेत. दहिवडी, म्हसवडसारख्या ५–६ मोठ्या गावांतून संमिश्र वस्ती आढळते. १९५७ पासून आमचा तालुका राखीव आहे. घाटाखालच्या फलटण तालुक्यातील १५–२० गावे राजकीय खुबीने जोडलेली आहेत. येथे उभा राहाणारा उमेदवार मुंबईहून किंवा बाहेरूनच येतो. निवडून गेला की तिकडेच राहतो. माणदेशी माणसाचे हे ठरलेले वळण आहे. आमच्या भागातून निवडून गेलेले खासदार यशवंतराव चव्हाण निवडणुकीनंतर इकडे कधी येऊन गेल्याचे मला आठवत नाही. आमचे आमदार कधीमधी येतात ते फक्त समारंभाचे पाहुणे म्हणूनच. अशा शोभायमान मंडळींची शोभायात्रा अधूनमधून धूळ उडवीत जाते. तशी धुळीला येथे वानवा नाही. तसं इथं काहीच झालं नाही का ? असा प्रश्न मंडळी विचारतील. माण नदीच्या कडेकडेने कोळपजाईपासून म्हसवडदेवापूरपर्यंतच्या १२–१३ गावांतून कपाशी पिकवतात. इतर ठिकाणी ३३७ पाझर तलाव आहेत. ५० टक्के फायदा झालाय असे सरकारी म्हणणे आहे. टाटा कंपनीने नऊ गावे दत्तक घेतली आहेत. देशी-परदेशीचे मोठमोठे पाहुणे येतात. म्हसवड–दहिवडीला मेळावे भरतात. पाहुणे गहिवरतात. 'हाऊ नाइस–हाऊ वंडरफूल–फॅन्टॅस्टिक' करीत जातात. आंधळी धरणाची एक योजना आहे. परंतु सबंध तालुक्यात सुपीक असलेला तुकडाच पाण्याखाली बुडणार आहे. फायदा किती जमिनीला होईल सांगता येत नाही. तसं काम अजून आंधळं आहे. सरकारला तरी कुठे घाई आहे ?

सांगायचं राहून गेलं. म्हसवडच्या सिद्धनाथाशिवाय शिखर शिंगणापूर शंभू महादेव आहे. गोंदवलेकर महाराजांचे गोंदवले आहे. जत्रा यात्रा मोठमोठ्या भरतात. पुण्या मुंबईची मंडळी येथवर येऊन आम्हाला खाऊ पिऊ घालतात. खाल्ल्या अन्नाला बेईमान होऊन कसे भागेल ?

आमच्यापुढे एक प्रश्न आ वासून उभा आहे. रोजगार हमी योजना सुरू ठेवायला

कामेच उरली नाहीत. पाझर तलाव, रस्ते, बंडिंग सर्व झाले. आता करायचे काय ? ... चालू आहेत त्या कामाची रडारड कायम आहे. .मस्टर, मापे, खोट्या हजेऱ्या, खोटे पगार, कमी पगार वगैरे वगैरे. आम्ही थोडं लावून धरलंय. खाबूंना ओकायला लावतो ! परंतु तसे मायपोट मोठं आहे. पोटांत काहीही साठवता येते. आमच्याकडच्या नोकरदारांचे मात्र चांगले फावते. या नोकरशाहीच्या डोक्यात एकच किडा वळवळत असतो.....' कसं काढता येईल ?' आणि आमच्या डोक्यात 'काम कसं काढता येईल ? ... कसं काढता येईल,' हे आमचे गाणे. देशी साहेबांचं टकुरं लई जड राहतं... आम्ही विचार ठरवला जनतेपर्यंत जाण्याचा. रोजगार यात्रा ठरवली १ जाने. ८४ ते ३० जाने. ८४. ३० दिवस. ९० गावे. तालुक्यातील फक्त तीन गावे सोडली. नरवणे, राणंद आणि कुकुडवाड. काहीसा वाकडा वळसा होत होता म्हणून वगळली एवढेच. रोजगार यात्रा म्हटलं तरी यात्राच, जामानिमा जमवला. दोन टेम्पो, त्यात सामानसुमान. वर लाऊड स्पीकर बसवलेला. यात्रेचे कापडी फलक बांधलेले. आम्ही २५।२६ जण सारे पुरुष. हिंगणी गावापासून सुरुवात केली. हे गाव सोलापूर-सांगली जिल्ह्याच्या टोकाला असलेले. म्हसवड-पंढरपूर रस्ता येथून जातो. गावात शिरताना स्वागत, मग सभा, समेत सुरुवातीला गाणे, दोन भाषणे, शेवटी प्रश्नोत्तरे, दुपारची सभा, रोजगार हमीच्या कामावर. सायंकाळी मुक्कामाच्या गावात. यात्रेचा बोलबाला झालेला असल्याने कर्मकांड जवळपास ठरून गेल्यासारखे. आमचे महत्त्वाचे प्रश्न दोन. गावात रोजगार हमीची कोणती कामे काढता येतील ? आणि काढता आली तर काय करायचे ?

इतरही चर्चा व्हायची.

९० गावे हिंडलो, ८९ सभा झाल्या, लोकांनी गाऱ्हाणी सांगितली.

पाण्याचा प्रश्न तीव्र आहे. पिण्याचा आणि शेतीचा. १५ गावांतून भयावह परिस्थिती आहे... निसर्गतःच टंचाई आहे असे म्हणावे लागेल. बोअर कितीही खोल केले तरी कोरडा पाषाण २-२, ३-३ किलोमीटरवरून पाणी आणावे लागते. (वळई, वारूगड, कुळकजाई, वोते, खोकडे, हिंगणी, गटेवाडी, लोणारवाडी, म्हसवडची फुले वस्ती).

५५ गावांतून विहिरीचे पाणी आहे. विहिरी आटतात. मग मिळेल तेथून. अगदी दाही दिशा. हापसे बसवले आहेत. परंतु दुरुस्तीला माणसे नाहीत. ११ बोअरिंग बिघडली आहेत. फक्त ७ गावांतून नळ पाणी योजना आहे. (दहिवडी, म्हसवड, मलवडी, गोंदवलेखुर्द, गोंदवले बुद्रुक, वरकुटे-मलवडी, शिंगणापूर) २ हजार वस्तीचे वारूगड डोंगरावर वसले आहे. गावाला २-३ वाड्या आहेत. एकेका घागरीसाठी दीड मैल खाली उतरायचे, दीड मैल चढायचे. पाण्यात अक्षरशः किडे पडलेले. भीतीने शाळामास्तर टिकत नाही. पाण्याची एवढी टंचाई असूनही सनातनी

तग धरून आहे. बहुतेक गावांतून विहिरी अलग आहेत. हापशावर मात्र लोक एकत्र पाणी भरतात ! वडझरला बहुसंख्य मराठा वस्ती आहे. मंडळी पहाटे उठून हापशावर पाणी भरतात. दिवसाउजेडी शिवाशिवीचा मामला नको. तालुक्यात एका गावाला फक्त टँकर जातो. पिण्याच्या पाण्याची ही दैना. शेतीला पाणी कसे मिळत असेल याची कल्पना यावी.

७१ गावांत बीज आहे, पण शेतीला बीज नाही. डिपॉझिट भरले आहे. दोन-दोन, चार-चार वर्षे लोटलीत. हजार हेलपाटे झाले. पण बीज मंडळाजवळ तारा नाहीत. खांब नाहीत. काय करावे ? १९ गावे अंधारात, कारण रॉकेल टंचाई. २० गावांतून तलाठ्याचा पत्ताच नसतो. दोन दोन वर्षे पट्टे फिरकत नाहीत.

शिक्षणाचे म्हणाल तर प्रत्येक गावात शाळा आहे. परंतु मुलींना शिकवण्याचा उद्योग करायची तयारी नाही. गुरुजी मंडळीही अशीच. म्हसाईवाडीला शाळा आहे पण मास्तर नाही. सबंध तालुक्यात एक महाविद्यालय आहे. दहिवडीला कला आणि वाणिज्य महाविद्यालय ! ज्युनियर कॉलेजे आहेत. म्हसवड, देवापूर आणि शिंगणापूरला हजेरी, शिक्षण, प्रगती, प्रचंड आनंद आहे ! रोजगाराचे बोला- शिक्षणाचे मागून बघू ! एवढाच विचार.

आरोग्यासाठी अख्ख्या तालुक्यात १९ खाटांचे एक प्रसूतिगृह आहे. पाच प्रथमोपचार केंद्रे आहेत. खासगी दवाखाने आहेत. पाटीवरच्या पदव्या पाहून घ्याव्यात. तसे इकडे कोण येणार ? सरकारी नोकर, एस. टी. वाले, शाळांचे मास्तर, पंचायतीचे नोकर आणि बँकवाले असा नोकरदार वर्ग. पगारी लोक. यांच्या खालोखाल मनिऑर्डरवाले. १३ गावांतून बँकांच्या शाखा आहेत. किती उलाढाल होते कळणे मुष्कील आहे. पाच गावांतून फोनची सोय आहे. त्यामुळे 'मटका'ही बऱ्यापैकी चालतो. काही पगारदार मंडळी सरकारी वेळात कोणता आकडा लावावा याचे बिनधास्त चिंतन करीत असतात. आकडा लागला तर पाटर्या होतात.

तसे आम्ही बरेच काही पाहिले. अनुभवले. आमच्याच डोक्यात प्रश्नांच्या उवा झाल्यात. ही माणसे जगतात तरी कशी ?

- २१ गावांतून यापूर्वी एकही सभा झालेली नव्हती. अगदी निवडणुकीचीसुद्धा !
- आमच्या ८९ सभा झाल्या. एकही स्त्री बोलली नाही, हजेरी मात्र प्रचंड.
- मराठा मंडळी चळवळीत सहसा येत नाहीत.
- म्हसवडचा घोंगडी व पातळे विणण्याचा धंदा बसत चालला आहे.
- २०-२२ गावांतून बिनदुधाचा चहा घेतला. 'भोजलिंगाने सांगितले दूध विकायचं नाही.'
- रोजगार हमीच्या कामावर मुंबईच्या गिरणी कामगारांची संख्या लक्षणीय आहे.
- लोणार व धनगर समाजात बहुपत्नीत्वाची चाल आहे. एका लोणाराला अकरा

बायका झाल्या. त्यांतील नऊ हयात आहेत.

● यात्रेत बाजरीची भाकर; खरडा आणि वांगे शिवाय क्वचितच काही मिळाले. शेवटी शेवटी पित्त उसळायला लागले. रेशनवरचा गहू, तांदूळ कुठे. पण असेल याचा विचार व्हावा.

● लोकांनी झाड झाडुचा तोडून टाकला आहे. आता जळणासाठी वेडी बाभळ, तरवड व कॉंग्रेस गवताचा वापर होतो.

● ३० दिवसांत आमदार २–३ वेळा येऊन गेले. त्यांनी आता आय सोडून एस. कडे कूच केलेले आहे.

● यात्रेला प्रतिसाद भरपूर मिळाला, परंतु प्रश्नांची उत्तरे पुढीलप्रमाणे:–

१. सरकारने काहीही करावे, पण आम्हाला कायम काम द्यावे.

२. वाटल्यास शेतकऱ्यांना फुकट मजूर द्या. सरकारने ती मजुरी द्यावी.

३. मेंढपाळीचा व्यवसाय वाढवा, कोंबड्या, दुभती जनावरे-विचार करा.

४. सुबाभळीची लागवड करा.

५. म्हसवड, राणंद, महाबळेश्वरवाडी, गंगोती, जांभुळणीच्या लघुपाटबंधारे योजना कार्यान्वित करा.

६. ऊसाच्या पाचाडाचे कागद कारखाने काढा.

७. शहरातील भांडवलदारांवर टॅक्स बसवा. शहरांवर लेव्ही बसवा आणि आम्हाला जगवा.

(**'रविवार सकाळ', पुणे, २६ फेब्रुवारी १९८४**)

शवय

मनोहर कदम

"आबानू, पेज हाडलंय..." बायग्याच्या आवाजासरशी खोंगी घालून बसलेला आबा सुतार भानावर आला. डोळे चोळीत त्याने हात पुढे केले. "काय गो ह्या?"

"पेज दिलान आयेन..."

पेजेचा वाडगा हातात घरून तो तसाच थांबला. गेले वर्षभर असेच चालले होते. सुतारकीची कामे बंद झाल्यापासून पोटा-पाण्याचे हाल चालले होते. चाकरमानी पुतण्या एक दिडकी घाडीत नव्हता. म्हातारपण वाढत होते. दोन वेळच्या घाष्टीची चिंता. असंच कुणीतरी वाडगाभर पेज नाहीतर लाहीची भाकरी देई. तेवढी वेळ भागून जाई. आबाने वाडगा तोंडाला लावला. "बायग्या...नुस्ताच व्हाळवनी हाडलंऽ...भाताचा शत नाय भुतू..."

तो कसासाच हसला. पुन्हा वाडगा तोंडाला लावला. पेज पिऊन झाली, तशी शितकुणं वेचू लागला. हाताच्या तळव्यानेच तोंड पुसले.

"बायग्या, व्हाजले किती गो?"

"म्हायत नाय. सांजावला खरा!"

"डाकवालो येवन गेलो?"

"मगाच गेलो. सुतार आवाठात कोनाचाच पत्र नाय."

"पैशे तरी?"

" छाः ! कायच नाय. " बायग्या पुटपुटली.

आठवड्यापूर्वी अशाच एका सांजेला त्याने चाकरमानी पुतण्याला पत्र लिहिले होते. आपण आता ठकलो...हातपाय चालत नाहीत, तेव्हा मुलकात ये आणि काय ती निर्गत लाव, असे त्याने लिहिले होते. पण अद्याप पांडुरंगाचे पत्रही आले नव्हते. गेली दोन वर्षे त्याने पत्रही पाठवले नव्हते. आबा सुतार मात्र येणाऱ्याजाणाऱ्या चाकरमान्याकडे पांडूची चौकशी करायचा. चाकरमानी मुंबईला निघाली की पुण्याला घोड्या, साठांची भेट द्यायचा. चाकरमान्याकडूनच चिट्ठी लिहून घ्यायचा. चाकरमानी घरातून बाहेर पडला की आबाच्या डोळ्यांत अश्रू दाटून यायचे. तो म्हणायचा —" बाबी, दिवस हे अशे इले हत. उद्याचो भरवसो नाय. पुतण्याक सांग, म्हनोचा, अगदीच दारढाकी करू नको. "

आबा सुताराच्या ढगाळलेल्या चेहऱ्यावरून अश्रू झरायचे. चाकरमानी पाझरून रुपाया-दोन रुपायाची नोट आबाच्या मुठीत कोंबायचा.

" बगीच कशाक ह्या..." चाकरमानी धीराचे शब्द बोलायचा. आबा आपणच अश्रू आवरायचा. " बाबी, आंगातला याक आसला तर ठेव रे...हेची शाप बजी झाली." चाकरमान्याने दिलेले जुने खमीस घेऊन आबा सुतार घराची वाट धरी.

गेल्या कित्येक वर्षांत हे असेच चालले होते. शेवटी वैतागून आबाने पांडूला पत्र लिहिले होते. ' हे पत्र अखेरचे समजून दृष्टिभेटीला ये ' असे पत्रात लिहिले होते. पांडू येईल नि आपणास मुंबईस नेईल, असे आबाला वाटत होते. पण अद्याप साधे पत्रही आले नव्हते...

हातातला वाडगा त्याने जिभेवर उपडा केला. एकदोन थेंब जिभेवर पडले. करपलेल्या ओठांवर जीभ फिरवीत त्याने वाडगा बायग्याकडे दिला. ती चिमुकली पोर वाडगा घेऊन हुंदडत गेली. आबा सुतार पाहत राहिला. त्याला जुने दिवस आठवले. असाच वाडगा घेऊन पांडू भात्यासाठी तेल मागायचा. दरवर्षी मिरगसंधी आली की सुताराची शाळा नवी व्हायची. झाडलोट झाली की भाता बनवला जायचा. भात्यासाठी लक्षा चांभार चांमडं आणून टाकायचा. सुताराच्या पोराने वाडगा घेऊन 'भात्याक त्याऽल' करीत गावात हिंडायचे. भात्यासाठी घरोघर फिरून तेल जमवायचे. भाता तयार झाला की भट वाढले जायचे. शाळेतच जेवण बनवले जाई. जावसाल होई. आवाठातल्या लोकांना घास घास परसादी मिळे.

सरत्या वैशाखात सुताराची शाळा धगधगू लागे. भात्याचा करकराट आणि जंगलावर पडणारे घणाचे घाव आवाठाला जागे करीत. आबा सुतार आणि पांडू घामानं न्हाऊन निघायचे. कोळशाची बोचकी घेऊन गावकरी सुताराच्या शाळेत येत. फाळ, जगाल, कोयत्या, कुदळींना आकार दिला जायचा. इशाड, रुमण्या तासून नांगर भरले जायचे, गावकरी ठिय्या देऊन काम करून घेत. दहा तोंडांनी दह

सूचना मिळायच्या– "आबा, नांगर वायच खरशीत घी. भरडाचे उखळीक होयो."

"फाळेटू कऱ्याचा घीरे, नाय तर मोडात काटकन." गावकऱ्यांच्या शब्दासारे काम व्हायचे. ज्येष्ठ-आषाढात तर रात्रभर भाता धगधगत असायचा. आबा-पांडू रातरात राबायचे. वेळच्या वेळी कामे पुरी करून द्यायचे. गावकरी त्यांची आठवण ठेवीत. सराईला खळ्यात सुताराची पेंडकी आधी काढली जायची. कधी कधी तर गावकरी सुतारांच्या दारात भात घेऊन यायचे. आबाला कसेसेच व्हायचे.

सराई संपली की चिरकामाला सुरुवात व्हायची. दारातल्या चिचेबुडी लाकूड-सामान येऊन पडायचे. फळ्या, रिपा, बार चिरली जायची. तीनचार महिने हे काम चालायचं... कधी कधी घराची कंत्राटं मिळायची. मजुरीने माणसं आणून कामं पुरी केली जायची. लग्नसराई आली, की गावच्या सुताराला केवढा मान मिळे! मांडवाला लागणारा सावरीचा खांब त्यानेच तासायचा. त्यासाठी मानाची धोतरजोडी आणि दक्षिणा मिळायची. सुतार कधी लग्नाच्या मांडवात जेवायचे नाहीत. त्यांना वेगळा शिधा मिळायचा. सोवळ्याने जेवण व्हायचे. मान राखला जायचा...

आबा सुतार खाऊनपिऊन सुखी होता. घरात माणसंदेखील इन मिन तीन. स्वतः आबा, बायको पार्वतीबाय आणि पुतण्या पांडुरंग. पांडुरंग शाळा शिकायचा आणि सायंकाळी सुतार काम करायचा. पार्वतीबाय घरातच राबायची. घर कसे लखलखीत ठेवायची.

... पण हा लखलखीतपणा फार काळ टिकला नाही. एके दिवशी परसातला पातेरा जमवितांना पार्वतीबायला पायाबुडी झाले. अंगठ्याला फुरसे डसले. सारे आवाठ गोळा झाले. झिलग्यांनी डोळी बांधली. पार्वतीबायला देवगडच्या हॉस्पिटलात नेण्यात आले. खूप डॉक्टरी इलाज झाले. विष अंगात भिनले होते. उतार पडत नव्हता. आबा सुतार रवळनाथाला साकडे घालीत होता, पण शेवटी व्हायचे तेच झाले. पार्वतीबायने कायमचे डोळे मिटले. आबा सुतार सराभरा झाला...

... बायकोच्या आठवणीने आबा सुतार अस्वस्थ झाला. एकलेपणा असह्य होऊन तो उठला. ताता पारकराच्या दुकानाच्या दिशेने चालू लागला. ताताच्या दुकानात गेले की कुणीतरी गूळशेंगदाणे पुढे करायचा. 'भंगले दात खंयत चावाक...' असे म्हणत आबा हात पुढे करायचा. अगदीच काही मिळाले नाहीतर पळीभर खोबरेल तेल डोईवर घातल्याशिवाय तो निघायचा नाही.

"काय आबानू, तबेत कशी हं?" आबाने समोर पाहिले. ठमा म्हारीण नि तिचा चाकरमानी मुलगा समोर उभे होते. "चाकरमानी कदी इलो?"

"इलो, कलचे बोटीनं..." ठमा म्हारीण ओसरीला उभी राहून माल झेलीत होती. आबा येणाऱ्याजाणाऱ्यांशी गजाली करीत होता. ठमा म्हारीण मागे फिरली.

" पराकमीं नोकरेक खंय ? "

" खंय म्हणजे ? बापूस थंय झिल...मुन्शिपाल्टीत... "

" तुमच्या लोकांचा बरा बाबा... सरकार तुमचा. कायदो तुमचेपाठी. तुमका सगळ्यो सौलती... "

" आबानू, आता तुमच्या लोकांक पन सवलती मिळतल्यो. सुतार, सोनार, कुंभार-सगळ्यांका सवलती... "

" आमका कित्या ? आमी काय हरिजेन हाव ? आमी जानूया घालनारे... आमका कित्या होयो सौलती ? " आबाचा आवाज चढला, तशी ठमा म्हारीन नि तिच्या चाकरमान्याने वाट धरली.

ठमा म्हारीण नि पार्वतीबाय एकाच गावच्या. एकाच वर्षी दोघींची लग्नं झाली. कुणीही माघारपणाहून आली की दुसरीला खुशाली कळायची. पार्वतीबाय गेली नि सुताराच्या घरची सारी रयाच बदलली. ती गेली त्या वर्षी आबा सुताराने अंथरूण धरले. वरसालीची कामे पडून राहिली. मिरगसंधी आली तरी भाता बनला नाही. गावकऱ्यांची कामे खोळंबली. मृगाचा पाऊस सुरू झाला तसे बाबी खोत तणतणत आले. " आबग्या, लय दुक करीत बसलंहऽ मायझया पावसपानी सुरू झाला तरी भातो तयार नाय ! काय, आमका मारूचा येवजलंहऽ ? जमात नसला त तसा सांग. लय बळावलास तुमी सुतार. "

" खोतानू, वगीच करवादा नुको...झेपन्यासारा आसतात केला नसता ? दिवस हे अशे इले, तेका आमी तरी काय करनार ? "

" कपाळ फोडून घेवा. लय आयकोन घितला तुमचा, म्हनू टकलेर चडलास... बोलोची सोय न्हवली नाय... आता सरळ केल्याखेरी पल्लो नाय !... " म्हणत बाबी खोतांनी शाळेतले सामान उचलले.

बरोबरच्या गावकऱ्यांनीही नांगर, कोळसे उचलले. ' लय बळावलो सुतार– ! म्हणत सारे निघून गेले. आबा सुतार बघत राहिला. असे कधीच झाले नव्हते. खोरणातल्या ठिकाणदाराकडे हात जोडून तो पुटपुटला " तुजी सत्ता. "

... कालवीतल्या दाऊदमियाने सुतारकीची कामं सुरू केली होती. रोख पैसे घेऊन तो कामं करायचा. काम तावडतोब करून मिळायचे. बाबी खोतांनी त्याच्याकडून नांगर बसवून घेतले. सगळे गावकरी आता दाऊदमियाकडे जाऊ लागले.

... दिवस असेच चालले होते. सुतारकीची बरीचशी कामे दाऊदमियाकडेच जात होती. आबा सुताराला पूर्वीचा मान आता राहिला नव्हता. बलुतेदारांना वाईट दिवस आले होते.

अनेकांनी पोटासाठी मुंबई गाठली होती. सुतार, न्हावी वगळता बाकीची बलुती गाव सोडून गेली होती. गावामध्ये होणारा हा बदल आबाला जाणवला होता. उद्याचे

चित्र त्याला दिसत होते. तो अस्वस्थ होता.

...एके दिवशी त्याने पांडूला सांगितले– " ह्या बऽ बाबी, हे वरसलीचे कामार जगोचे दिवस आता सोपले. चाल्ला तवंसर चाल्ला. तवा तू आता जानतो झालंस, आता खंवतरी मुंबैक चाकरेधंद्याचा वग. हंय व्हवोन काय पल्लो नाय. वग, मावळणीक पत्र धाडून इचार, " पांडुरंगालाही सारे कळत होते. मुंबईच्या चाकरमान्यांचा रुबाब त्याने पाहिलेला होता. मावळणीला पत्रावर पत्रं तो धाडीत होता.

— आणि एके दिवशी पांडुरंगाने मुलूख सोडला. आबा सुतार एकाकी झाला. पांडुरंगाला मुंबईला धाडताना त्याला खूप वाईट वाटले. एकुलता एक पुतण्या. आईबापाच्या पाठी वाढवलेला... तोही दूर निघाला. आबा सुताराच्या डोळ्यांतून अश्रू थोपत नव्हते. तो एवढेच पुटपुटला, " जा बापड्या, गायचो पाडो, खंयव वाढो. "

पांडुरंग मुंबईला गेला नि आबा सुतार धंद्यात मन गुंतवू लागला. मिरगसंधी आटोपली तशी त्याने गणपती बनवायला घेतले. दर वर्षी वाडकऱ्यांसाठी लागणारे गणपती आबा बनवायचा. पांडुरंगाची खूप मदत व्हायची. या वर्षी स्वतःच्या एकट्याच्या हिमतीवर आबाने मूर्तिकाम सुरू केले. तेवढेच रोकड पैसे मिळायचे. नाहीतर सारी वरसालीची कामं. आबा रात रात राबू लागला.

...बाबी खोतांचा राग शांत झाला नव्हता. नातवाच्या पाळण्याचं निमित्त काढून त्यांनी आबाशी भांडण सुरू केले. आबाही मागे हटला नाही. खूप दिले गावाने– आता कुणाचे ऐकून घ्यायचे नाही. पांडू मुंबईला आहे. उपाशी मरणार नाही आपण... बाबी खोताच्या आवाजाने आवाठ गोळा झाले. आबानेही आवाज चढवला.

... बाबी खोताने गावाला सांगितले, " आवग्या सुतारानं पायरी सोडलान. ह्यो रयतेचो अपमान हां... औंदा गनपती बनवलान हत. ते दुकू म्हागडे. ह्यो गावकेचों सळवाद हा. तेचेकडचे गनपती कोनी घेयाचे नाय. तेपरिस चांदोलच्या गुरवाकडचे घेवा ! " बाबी खोताचे सांगणे लोकांला पटले. चांदोशीच्या गुरवाचे गणपती साच्यातले,रेखीव, उठावदार होते—तर आबा सुताराचे हाती बनविलेले—ओबडधोबड.

आबाने रंगकाम आटोपून गणपती तयार केले. चतुर्थी आली, पण कुणी गणपतीसाठी आलेच नाही. साच्यांनी चांदोशीच्या गुरवाकडून गणपती आणले. शाळेत पडून राहिलेल्या मूर्ती पाहून आबाला वेडे व्हायची पाळी आली. त्याने बाबी खोताचे पाय धरले, पण काही उपयोग झाला नाही. मूर्ती शाळेत पडून राहिल्या. एक पैसा वसूल झाला नाही. माती आणि रंगकामाचे पैसे गळ्याशी आले. आबा सुताराने अंथरूण धरले.

...पांडुरंग गिरणीत नोकरीला राहिला होता. बदली कामगार म्हणून काम

करायचा. मदनपुऱ्यात मावळणीकडे राहायचा. पगार झाला की चुलत्याला मनीऑर्डर धाडायचा. आबा सुताराला तेवढाच आधार झाला होता. म्हयनेम्हाल हक्काचे पैसे हातात पडत होते.

पण आबा सुताराचे दुर्दैव संपले नव्हते. दाऊदमियाचा धंदा वाढत चालला होता. त्याने लायटीवर चालणारी सॉ मशीन घेतली होती. भराभर रिपा, बारं कापायचा... आणि कामदेखील सुरेख– सुतासारखे. आबा सुताराच्या चिंचेबुडी सहासहा महिने झाडं पडलेली असायची– पण चिरकामं संपायची नाहीत. दाऊदमिया दोन दिवसांत सगळे काम आटपून द्यायचा. सगळेच लोक आता दाऊदमियाच्या मशिनीवर जाऊ लागले. घराची, वाड्याची कामंही दाऊदमिया करायचा.

आबा सुताराच्या शाळेत फारशी कामं यायची नाहीत. आबाला वाडीत फिरावं लागे. घिरटींना हिडका घालण्याचे काम मिळे. कोयतीचे थरू भरण्याचे, व्हायणे, उखळ्या तयार करण्याची कामे मिळायची. वरसल चालू ठेवण्यासाठी आबा ही कामे करीत होता.

पण वरसलसुद्धा पूर्वीसारखी मिळायची नाही. खळ्यावर दोनचार फेऱ्या मारल्याशिवाय भात मिळायचे नाही. बऱ्याचदा मळणीचे भात मिळायचे. नुसताच सरला, गोटे नसायचेच. म्हशीला घालण्यासाठी उपयोग व्हायचा.

...गावामध्ये सुधारणा होत चालल्या होत्या. ताता पारकराने हॉटेल काढले. बाबी खोतानीने पिठाची गिरण टाकली. जात्यांचे आवाज बंद झाले. शेरभर नाचणेदेखील गिरणीवर जाऊ लागले. पाठोपाठ भाताची गिरण आली. भराभर भात भरडून मिळायचे. अख्खा स्वच्छ तांदूळ. विरण्याची भीती नव्हती. भाताच्या गिरणीने घिरटीची घरघर बंद केली. हिडका घालण्याचे काम संपले. आबा सुताराची हत्यारे शाळेतच पडून राहू लागली.

पुढच्या वर्षी पांडुरंगाचे लग्न ठरले. आबा सुताराने पुतण्याचे लग्न कर्ज काढून थाटात केले. अख्ख्या गावाला जेवण घातले. पांडुरंग आपल्या माघारणीला घेऊन मुंबईला गेला.

...आबाचे वय तर वाढत चालले होते. काम पूर्वीसारखे मिळत नव्हते, आणि मिळाले तर जमतही नव्हते. कधी कुणाचे लग्न असले की खांबा तासल्यावर धोतरजोडीचा मान मिळे. बाकी सारे पांडुरंगाच्या मनीऑर्डरीवरच चालायचे. स्वतःच सारे करायचे. घर खायला उठायचे.

...पांडुरंग लग्न करून गेला, त्यानंतर दोनचार महिने त्याने पैसे पाठविले. पुढे पैसे बंद झाले. माघारीण शिक आहे, पैसे धाडायला मिळणार नाहीत, अशी पत्रे तो पाठवायचा. पुढे पत्रेही बंद झाली. आबाची उपासमार होऊ लागली. शेजाऱ्यापाजाऱ्यांना बघवत नव्हते. आबा खळ्यात आला की कुणी पेजपाणी दिल्याशिवाय

राहायचा नाही. दुसऱ्यांचे चाकरमानी पाहिले की आबाला खूप वाईट वाटायचे. तो चिडायचा, डाफरायचा.

...एके दिवशी कुणीतरी बातमी सांगितली. म्हाताऱ्या-निराधार माणसांसाठी सरकारने पेन्शन सुरू केली आहे. निराधार माणसांना हयात असेपर्यंत महिना साठ रुपये मिळतात. भिवा धनगराला अशी पेन्शन सुरू झाली होती.

...बातमी ऐकून आबा सरपंचांच्या घरी गेला.

"–तात्यानू, ह्या काय आयकताव ता खरा हां?"

"काय ता?"

"हेरी. नाय–नादार मानसांका सरकार पेंडसन देता, असा आयकाताव."

"हां...जेचा कोन जिता नाय, कोनाचो आदार नाय अशा मानसांक सरकार म्हयना साठ रुपाये देता."

"मगे, आमका सांगो न्हये तुमी? माका कोनाचो आदार हा? ही सगळी धानाधिस्पट तुमी बगताहास."

"रे, हाल्ली कळला ह्या. नि तुजो पुतनयो हा तो."

"माला मोडो तेचा...आज दोन वर्सां झाली–एक दीडकी नाय की दोन ओळीचा कागद नाय–होयो कशाक फटकेक घालूक?"

"ता खरा रे...मन तुजे बाबतीत बायच कठीन दिसता."

"तात्यानू, असा करू नको. म्हरबानी करा. नाय तर काजरो खावन मरोचा येतला. कमाव करून पेंडसनीचा बगा..." आबा काकुळतीला आला होता. तात्या सरपंचांना ना म्हणता येत नव्हते. "बगतंय मी. कायतरी खोटानाटा करूचा लागतला...उद्या अर्ज हाडीन देवगडसून. राती ये–"

"कसाव करून बगा, वरचे सायबाक सांगा, तुमी मनार घितलास त सगळा होयत."

सरपंचाच्या घरातून आबा बाहेर पडला. वांझ्या आंब्याला मोहर यावा तसा तो आनंदून गेला होता. जो भेटेल त्याला सांगत होता–"आता मी कोनाच्या दारार जायचंय नाय. पेंडसन सुरू होतली."

सकाळी त्याने पावणाईला कौल लावला, गाऱ्हाणे घातले. दुपारी भिवा धनगराला जाऊन भेटला. भिवाने त्याला सारी हकीगत सांगिगली. पेन्शनीसाठी खूपच खटपटी कराव्या लागल्या होत्या. घरची शेरडी विकून वरच्या सायबाचे हात ओले करावे लागले तेव्हा कुठे महिना साठ रुपये मिळू लागले.

रात्री तात्या सरपंचाने अर्ज भरून घेतला. त्यांनी आबाला स्पष्ट बजावले, "आबा तुजी परस्थिती माका ठावूक हा...माजेपरीन मी पर्यत्न करीन. पन ह्यो सरकारी गोष्टी. खऱ्याचा खोटा करूचा लागता. वरची मानसा पैशे खाणारी. पाच पन्नास

खरचल्याशिवाय काम होनार नाय."

"मी ह्यो भिकेक लागलंय नि तुमी पन्नासाच्या गोष्टी करतास. मायझयांका म्हनोचा आदी काम करा. मग देव पेसे, पेंडसंन गावल्यार..."

"रे, खुळो कसो तू? आपली अक्काल तेंच्येफुडे चालत नाय. मी आपला पष्ट ता सांगलंय. तू काय ता बग दोन दिवसांत. पन्नासाची नोट नसात त अर्ज दुकू घेवचे नाय."

आबा वैतागून निघाला. पण सरपंचांचे तरी काय चूक होते? भिवा धनगराने बकरी विकून पैसे दाबले होते. काहीतरी करायलाच हवे होते. आबा रात्रभर तळमळत होता.

सकाळ झाली. आबा निश्चयाने उठला. त्याची पावले दाऊदमियाच्या घराच्या दिशेने पडत होती.

आबा सुताराला दारात पाहून दाऊदमिया बाहेर आला. आबा खळ्याच्या पेळीवर बसला होता. दाऊदमियाच्या घरी तो प्रथमच आला होता. दाऊदमिया कोड्यात पडल्यासारखा पाहत होता. आबाने बारदानाची पिशवी पुढ्यात रिकामी केली.

"दाऊदमिया, ही हत्यारा–सगळी भायर गावची. आज्यापंज्यापासून वापरली. आजून जशीच्या तशी हत–ही सगळी तू घेयाची."

"कायकू?"

"–आनि माका पन्नास रुपाये दी. काम जोखमीचा हा...सरकार म्हाताऱ्यांक पेंडसन देता. तेच्येसाठी भरूक पन्नास रुपाये होये..."

आबा सुताराचे शब्द ऐकून दाऊद सुन्न झाला. दाऊदने त्याला अनेकदा कामासाठी बोलाविले होते. आबाच्या कलेचे कसब दाऊदला माहीत होते, पण तरीही आबा कधी दाऊदकडे आला नव्हता, उपासमार झाली तरीही आणि आज आला— तो हत्यारं विकण्यासाठी! आपली हत्यारं देखील चांगल्या कारागिराकडे विकावी, म्हणून तो दाऊदकडे आला होता. आबाच्या भरभराटीचे आणि उपासमारीचे, दोन्ही दिवस दाऊदने पाहिले होते. आबाची हत्यारं त्याला चहूबाजूंनी टोचू लागली.

"ह्या ब आबा, तुका तुका मी पन्नास रुपाये देतंय. पन तेच्ये बदली माका तुजी हत्यारा नुको..."

"छाः छाः असा नुको, तुमी हत्यारा वापरा. माजेकडे पडोनच आसतंय–काम नाय धंदो. हत्यार वापरात नसात तर तेचो उपेग काय?" आबाच्या आग्रहापुढे दाऊदचे काही चालले नाही. तो एवढेच म्हणाला–"हत्यारा हंय ठेवलास तरी ती तुमचीच आसत. कदी बी घेऊन जावा. काय आफत इली त मी हाय."

तात्या सरपंचाकडे अर्ज आणि पन्नास रुपये देऊन महिना लोटला होता. आज मिळेल उद्या मिळेल असे म्हणत दिवस चालले होते. वाडीतली माणसं चेष्टा करायची,

"काय गवर्मेंट, पेंडसन खंयचे बँकेत ठेवलाहास ?" आबा वैतागायचा आणि मग सरपंचाकडे धाव घ्यायचा. तात्या सरपंच त्याला समजावून सांगायचा, "रे, निस्तो अर्ज दिलो हाऽ. आजून तेच्यार इनकोरी होयत, नि मगे गावती पैशे..."

"पन ते कदी ? भरडार नाकडा गेल्यार ?"

तात्यांना गप्प बसावे लागे.

आबाची उपासमार होऊ लागली तशी त्याने पुतण्याला अखेरचे पत्र लिहून दृष्टिभेटीला ये म्हणून लिहिले. तो येणार नाही, हे स्पष्ट दिसत होते. नशिबाचे भोग आता आपणच भोगायला हवेत. आबा सुतार काठीच्या आधाराने उठला. तोंडात साठलेले डरकाल पाचकन थुंकला नि बायग्याच्या घराच्या दिशेने चालू लागला.

ऐन श्रावणात लख्ख ऊन पडले होते. आबा खळ्याच्या पेळीवर भोपळीला बसला होता. सकाळच्या कोवळ्या उन्हात अंग शेकत बसायची त्याची जुनी सवय. आजचा दिवस कसा जाईल, याचीच त्याला चिंता होती.

कसलासा गलबला ऐकू येऊ लागला. आबा सुताराने कान टवकारले– "बायग्या कैसलो गो आवाज !"

"पर्भातफेरी–शाळेतल्या पोरांची–आज पंद्रा अगस्ट ना ?"

"पंद्रा आगस !" आबा खडबडून उठला. खालच्या पांदीतून प्रभातफेरी निघाली होती. पोरासोरांचा कलकलाट चालला होता. खांद्यावर खांबकाठीसारखा तिरंगा झेंडा घेऊन पोरं ओरडत होती–"भारत माता की जैऽ !" आबा डोळे भरून पाहत होता.

"बायग्या, किती वर्सा झाली गो. हेका ?"

"सत्तेचाळीस साल ना ?"

"व्हय व्हय" आबा सत्तेचाळीस सालात पोचला. अशीच पावसाची रात. भात्या-तला विस्तव विझवून आबा घरात शिरणार, तेवढ्यात खळ्यात गोगटे मास्तर उभे.

"ह्या वो काय मास्तर. येवडे रातचे तुमी ?"

"आबा, तेवढेच महत्त्वाचे काम आहे."

"येदे राती कसला काम ?"

"झेंड्यासाठी खांबकाठी तयार करायची. सकाळच्या आत हवी."

"म्हंजे हो ?"

"अरे, आपला देश स्वतंत्र झाला. उद्या तिरंगा झेंडा फडकवायचा. त्यासाठी खांबा तयार करायचा."

"आता येवडी रात झाली. झेंडो उद्याच लावक होयो ? परवा लावलो त नाय

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
3706

चालाचो ?"

"अरे, खुळा कसा तू ? उद्या पंधरा ऑगस्ट– स्वातंत्र्यदिन. उद्याच झेंडा फडकवायला हवा."

तेवढ्यात नाना फोवदार, बाबी खोत गोगटे मास्तरांना शोधत आले. सारे कसे खुषीत होते. पेट्रोमॅक्सचा उजेड साऱ्या आवाठात पडला होता. सुतार आवाठातले झिलगे जमले होते. आबा सुतार घामाघूम होऊन रंधा मारीत होता. गोगटे मास्तर चिऱ्यावर बसून सूचना देत होते– "आबा, खांबकाठीवर चांगले नक्षीकाम व्हायला हवे. ही काठी उद्या सारा गाव पाहील. वर्षोनुवर्षे झेंडा फडकत राहील, लोक तुझं नाव घेतील, असं काम कर."

आबा सुतार मान मोडून नक्षी कोरीत होता. मध्येच तो थांबला– "पन काय हो मास्तर, ह्यो झेंडो कित्या लावायचो ?"

"आपण स्वतंत्र झालो म्हणून."

"म्हंजे ?"

"अरे, इतकी वर्षे आपल्यावर इंग्रज राज्य करीत होते. त्यांनी आपल्याला लुटले. आता इंग्रज देश सोडून गेले. आता आपलं सरकार येणार. सर्वांना सुखाचे दिवस येणार. म्हणून हा झेंडा उभारायचा. आनंदाचा दिवस साजरा करायचा."

"व्हय, व्हय– बरा झाला."

त्या पंधरा ऑगस्टला सारा गाव आनंदून गेला. ढोलताशे वाजवीत मिरवणूक निघाली. अर्जा म्हाराने शिरा ताणून मोगराशिंग फुंकले. झिलग्यांनी बनाट्या फिरवल्या. शाळेच्या मैदानावर झेंडा फडकला. आख्ख्या गावाला गोड गोड सुतरफेणी मिळाली. स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद घराघरात पोचला. सुतरफेणीच्या आठवणीने आबाने आवंढा गिळला.

"बायग्या, अजूनसुदा मिठाय वाटतंत काय गो साळेत ?"

"भंगो ता...हाली निस्तीच फेपरमिटा वाटतंय."

आबा उठला. शाळेच्या दिशेने चालू लागला. गडगा ओलांडून समोर पाहिले– आणि तो उडालाच. पांदीतून चाकरमानी पांडुरंग नि त्याची माघारीण वर येत होती. पांडुरंग पुढ्यात आला.

"बाबी, तू कळवूचा न्हय–"

"तुमचा पत्र इला. गिरणीचो संप चाललोहा. म्हटला जावया."

पांडुरंगाने खळ्याच्या पेळेवर बोझा उतरविला. आबाने त्याला माच्यावर बसवले. "बरा केलं बाबा, माजा आता काय खरा नाय. आपला मानूस जवळ नसात त काय उपेग ? तू शाप ठकलंऽ नि सुनबाय कित्या सोडान झाली ?" पांडुरंग नुसताच हसला. आबा सुतार आनंदून गेला होता.

झाली. आबाने सगळी खरी परिस्थिती सांगितली. आठवडाभरात उत्तर मिळणार होते.

पांडुरंग विचित्रपणे वागत होता. घर चालविण्यासाठी त्याने परसातली झाडे, सुताराची शाळा विकून टाकली. आबाला हे कळले, त्याचा तडफडाट झाला. "पराकर्म्या, ही झाडापेडा इकलंऽ तो कुळोक्षा होवचो इलो हा?"

चुलत-पुतण्याचे कडाक्याचे भांडण झाले. पांडूने आबाला घराबाहेर काढले. "थेरड्या, पुना पाय टाकशी त तंगडी तोडीन."

आबाठकरांनी खूप समजावले पण पांडूने ऐकले नाही. आबा सुतार बोंबटत बाहेर पडला.

शिमग्यातले दिवस होते. पूर्वी शिमग्यात आबा सुतार घरोघर सोंग घेऊन जायचा. दारात नाचायचा, शबय मागायचा. बारा बलुती शबय मागायची. घनगर गजा घालायचे. गाबतांचं घुमट आणि घाडग्यांचे गोमू नाचायचे. कुणाच्या दारात गेले तरी गूळखोबऱ्याची शबय मिळायची. पांडू मुंबईला जाण्यापूर्वी आबा घरोघर सोंग घेऊन जायचा, पण पांडूच्या मनीऑर्डरी यायला लागल्यापासून त्याने शबय मागायची बंद केली.

...आबा तणतणत तात्यांच्या घरी गेला. तात्या माच्यावर बसले होते. आबाची स्थिती त्यांना कळली होती. आबा खळ्यात येऊन नुस्ताच उभा राहिला. काय बोलायचे ते सुचत नव्हते. हळूहळू आवाजात तो बोलू लागला– "तात्यानू पेंडसनीचा काय झाला?"

तात्या खाली मान घालून गप्प होते.

"तात्यानू, काय ता पष्ट बोला. रवळनाथाची शप्पथ तुमका."

तात्या चिरक्या आवाजात सांगू लागले– "आबा, माजेपरीन मी पर्यत्न केलो. आज देवगडसून लेटर इला. तुजो पुतनयो आसताना तू नादार कसो? तेवा नियमापरमान तुका पेंडसन बसनार नाय."

विंचू चावल्यागत कळवळून आबा उठला. तात्यांच्या खळ्यात म्हातारा भिवा घनगर शबय मागायला आला होता. कमरेत वाकून तो नाचत होता, ओरडत होता– 'व्हय रे गजा...शब्बय– शब्बय!!'

आबाला वाटले— आपणही असेच नाचत आहोत — पांडूसमोर, तात्यासमोर– शबय मागत.

...तात्यांनी हाक मारून आबाला बोलावले. घनगराला गूळखोबरे दिले– आबाच्याही हातावर ठेवले. मुठी घट्ट आवळून आबा वईबाहेर पडला. हातातले गूळखोबरे त्याने गायरीत भिरकावले. त्याची पावले आता जोमाने पडत होती— दाऊदच्या कारखान्याकडे!

('स्त्री' डिसेंबर १९८४)

शिवाजी : लोककल्याणकारी राजा आणि समाज

जयंत गडकरी

भारतीय इतिहासात होऊन गेलेल्या थोर व्यक्तिमत्त्वांत शिवाजीचे नाव महत्त्वाचे आहे. ज्याअर्थी आपण 'देश' ह्या अर्थाने 'भारत' ही संज्ञा वापरतो, त्याअर्थी देशनिर्मिती त्या काळी झाली नव्हती. तरीही शिवाजीच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा हा भारतीय इतिहासावर उमटला आहे. इतिहासाच्या एका कालखंडात भारतीय प्रदेशावर स्थापन झालेल्या मराठी साम्राज्याचा पाया शिवाजीने घातला.

शिवचरित्र हे अत्यंत रोमांचकारक गुण व प्रसंग यांनी सिद्ध आहे. अतुलनीय शौर्य, धैर्य, हुशारी, राजकीय डावपेच व आकांक्षा ह्यांनी ते भरलेले आहे. शिवाजी स्वराज्य संस्थापक आहे, शककर्ता आहे, आपल्यापेक्षा कितीतरी बलाढ्य अशा सत्तांशी त्याने झुंज दिली आहे. अशी झुंज देताना केवळ शौर्य व धैर्य नव्हे, तर अचूक डावपेच, गनिमी काव्याचे युद्धतंत्र व राजकीय दूरदृष्टी ह्यांचा संगम करून त्याने विजय मिळवले व स्वराज्य स्थापन केले.

शिवाजी हा हिंदुधर्मीय होता. महाराष्ट्रात जन्माला आला, तेव्हा हिंदुधर्मी व महाराष्ट्रीय अशा दोन्ही अंगानी आपली ओळख बाळगणाऱ्या व सांगणाऱ्या जनसमूहांमध्ये शिवाजीबद्दल खास आदर वाटणे, अभिमान असणे साहजिकच आहे. शिवाजीच्या थोरवीच्या प्रकाशात आपल्या संघसमूहाच्या थोरवीची छटा बघणे त्यांना नक्कीच आनंददायक वाटते. हे मानव-स्वभावाचे साहजिक लक्षण आहे.

ह्या लोकोत्तर व्यक्तीबद्दल अनेक लेख, कथा, कादंबऱ्या, पोवाडे, कविता रचल्या गेल्या आहेत. जगातील सर्वच लोकोत्तर पुरुषांच्या, खास करून सर्वसामान्य जनांच्या अभिमानाचा विषय झालेल्या लोकोत्तर पुरुषांवर असे लिखाण जगभर झालेले आहे. तसे लिखाण करणाऱ्यांचे वर्तमानकालाचे जे सामाजिक व सांस्कृतिक मानदंड असतात त्या मानदंडांनी अशा व्यक्तीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न अशा लेखकांकडून होणे, हे सुद्धा साहजिकच आहे. ते शिवाजीच्या बाबतीत घडलेले आहेच. शिवचरित्र व कार्यकर्तृत्व ह्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा मात्र वेगळा प्रयत्न आहे. कारण तसा प्रयत्न असे अभिमान, व्यक्तिगत किंवा समूह ह्यांचे भावनिक मानदंड ह्यापलीकडे जाऊन करावा लागेल.

शिवचरित्रावर केवढेही लिखाण झाले असले तरी शिवचरित्रातील प्रत्यक्ष प्रसंग, घटना किंवा कार्यकर्तृत्वाची उद्दिष्टे ह्यांचा अभ्यास उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक पुरव्यावरून सर्वसाधारणपणे करावा लागतो. सुदैवाने इतिहाससंशोधकानी असे पुरावे त्यांच्या विश्वसनीयतेच्या छाननीसह उपलब्ध केले आहेत. शिवचरित्राबद्दलच्या पुराव्यामध्ये सर्वात विश्वसनीय पुरावा हा 'सभासद बखरी'चा आहे. कृष्णाजी अनंत सभासद हा लेखक शिवकालीन आहे. राजारामाच्या सांगण्यावरून त्याने शिवाजीने दिलेले आदेश, व्यवस्था व प्रसंग नमूद केले आहेत. त्याचप्रमाणे एक्क्याण्णव कलमी बखर, जेधे शकावली, मोगलांच्या आश्रयाखालील काफीखान इत्यादीचे पार्शियन साहित्य, इंग्रज-पोर्तुगीज-फ्रेंच कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी केलेला पत्रव्यवहार इत्यादी ऐतिहासिक साहित्य उपलब्ध आहे. सभासद बखर ही नंतरच्या काळातील साहित्याप्रमाणे पद्धतशीरपणे लिहिलेली नसली तरी सर्वात जास्त विश्वसनीय आहे. सभासद बखरमधील माहिती सर्वात जास्त खात्रीची असल्याचा निर्वाळा इतिहासकार जदुनाथ सरकार यांनीही दिला आहे. ह्या लेखात त्याचाच सर्वात जास्त उपयोग केलेला आहे. आता हा लेख समजून घेण्याकरिता ज्या आकलनपद्धतीचा उपयोग केला आहे त्याचा विचार करू.

इतिहासाचे आकलन करण्याच्या स्थूलमानाने दोन पद्धती आहेत. एका पद्धतीप्रमाणे इतिहास हा 'यदृच्छया' घडलेला आहे. इतिहास म्हणजे विविध घटनांची साखळी आहे. त्यामागे मूलभूत कारणमीमांसा नाही. ह्या दृष्टिकोनाप्रमाणेच जो इतिहास लिहिला जातो तो मुख्यतः राजेराजघराणी; त्यानी केलेल्या लढाया, आक्रमणे, जय व पराजय ह्यांभोवती गुंफला जातो. अशा प्रकारच्या इतिहासात धर्मसंस्थापक, त्यानी संस्थापन केलेले धर्म, धर्माचा प्रसार, त्यांचे अलौकिकत्व ह्यानाही स्थान दिले जाते. त्यांच्या कामगिरीचा गौरव अशा तऱ्हेने लिहिला जातो की, त्या व्यक्ती देवदूत होत्या. त्यांच्या कार्यामागे दैवी प्रेरणा होती असे भासवले जाते. इतिहासाला वळण देणारे थोर पुरुष किंवा धर्मसंस्थापक किंवा समाजसुधारक

ह्यांचे अशा तऱ्हेने विश्लेषण करणाऱ्या पद्धतीला आपण विभूतीवादी दृष्टिकोन म्हणू. बुद्ध, कृष्ण, ख्रिस्त किंवा शिवाजी अशा लोकोत्तर व्यक्तींबाबत आजपर्यंतचा इतिहास मुख्यतः अशा पद्धतीने लिहिला गेला आहे. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू ह्यांचे ज्या पद्धतीने विभूतीकरण चाललेले आहे, त्यावरून त्यांच्याबद्दलही उद्या असेच होईल, त्यांच्या पुतळ्याभोवती मंदिरे स्थापली जातील. त्यांची पूजा-अर्चा होईल असे मानायला जागा आहे. आजच तशा खुणा दिसत आहेत. मुद्दा असा की, अशा पद्धतीत ह्या अलौकिक नव्हे पण निश्चितपणे लोकोत्तर असणाऱ्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा ऐतिहासिक-सामाजिक संदर्भ पार विरून गेलेला असतो.

ह्याउलट इतिहासाकडे पाहण्याचा जो समाजशास्त्रीय किंवा ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टिकोन आहे, त्याप्रमाणे, इतिहासात घडून गेलेल्या विविध समाजरचनांचे अस्तित्व व त्यात झालेले बदल ह्या संदर्भात इतिहासाचे विश्लेषण केले जाते. मानवी समाजाच्या आदिम अवस्थेपासून किंवा टोळीसंघ समाजव्यवस्थेपासून ते आधुनिक भांडवलदारी समाजव्यवस्थेपर्यंत ज्या सामाजिक व्यवस्था निर्माण झाल्या; त्यांचे जे संक्रमण झाले; विविध प्रदेशांत त्यांची जी विविध स्वरूपे दिसून आली; त्यांची चर्चा हा या दृष्टिकोनातून केलेल्या इतिहासविवेचनाचा गाभा असतो. अर्थात हा सर्वसाधारण दृष्टिकोन ठेवून जेव्हा जेव्हा एखाद्या विशिष्ट कालखंडाचा किंवा विशिष्ट देशाचा किंवा विभाग ह्यांचा विचार केला जातो तेव्हा त्या त्या विभागाचा व कालखंडाचा अधिक बारकाईने विचार केला जातो. त्या कालखंडात त्या व्यक्तींनी कोणती कामगिरी केली ? मानवी समाजाच्या प्रगतीला त्या व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाने कोणता हातभार लावला ? त्यांनी तसा कोणता प्रयत्न केला ? त्यांच्या कर्तृत्वाला स्थलकालाच्या, तत्कालीन मूल्यव्यवस्थेच्या कोणत्या मर्यादा पडल्या ? ह्यांचे ह्या दृष्टिकोनातून विवेचन करण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ शिवाजी, ख्रिस्त, महम्मद किंवा बुद्ध हे देवाचे पुत्र होते किंवा दैवी आदेशाने त्यांनी कार्य केले असे हा दृष्टिकोन मानत नाही तर त्या विशिष्ट कालखंडात त्या प्रदेशात ज्या सामाजिक व सांस्कृतिक गरजा निर्माण झाल्या त्यांना दाद देण्याचे कार्य ह्या लोकोत्तर व्यक्तींनी कसे केले; त्यांच्या मानवतावादी आकांक्षांवर स्थलकालाच्या कोणत्या मर्यादा होत्या; हे जाणण्याचा हा दृष्टिकोन यत्न करतो. ह्या बाबतीत प्रसिद्ध इतिहासज्ञ आल्डस हक्स्ले यांनी काढलेले उद्‌गार मोठे मार्मिक आहेत. ते म्हणतात : " अशा सामाजिक गरजा ओळखणाऱ्या व्यक्तींना समाजोद्धाराचे नेमके मार्ग जर सापडले नाहीत, नव्या शक्तींना उत्थान देण्याचे सामर्थ्य व साधने त्यांच्याकडे नसतील तर ते वेडे ठरतात. कधी कधी त्यांचे विचार काही किंवा बऱ्याच काळानंतर सामर्थ्यशाली ठरतात; तेव्हा त्यांना प्रेषित मानले जाते. पण जर असे सामर्थ्य, साधने व शक्ती त्या उभारू शकल्या तर त्यांना इतिहासातील ' महानायक ' मानले जाते. "

तेव्हा कोणत्याही थोर व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे विश्लेषण करताना ऐतिहासिक व सामाजिक संदर्भ विसरला जाता कामा नये. अर्थात अशा व्यक्तिमत्त्वांना आधिभौतिक, दैवी स्थान देण्याने आपण त्यांचा खराखुरा गौरव करतो असे विभूतिवादी दृष्टिकोन असणाऱ्यांना वाटते. ह्या महान व्यक्तींचे तशा तऱ्हेने विश्लेषण न करणारे, हे पाखंडी आहेत असा प्रचार ते करतात. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की वरिष्ठ वर्गीय व संकुचितवादी शक्ती व स्वार्थी नेते ह्या विभूतिवादी दृष्टिकोनाचा उपयोग सर्वसामान्य माणसांची निष्ठा मिळविण्याकरिता करीत असतात. लोकोत्तर व्यक्ती त्या समाजातील श्रद्धास्थाने झालेली असतात. त्या भावनांचा उपयोग आपल्या व्यक्तिगत, धार्मिक, जातीय वा वर्गीय स्वार्थाकरिता जातीयवादी लोकोत्तर व्यक्तींचा उदोउदो करून जातीयवादी सामान्य जनांना आपलेसे करतात व आपले काम साधतात. सर्व धर्मसंस्थापकांच्या किंवा राज्यसंस्थापकांच्या चरित्रांचा व कार्याचा उपयोग अशा रीतीने केला गेला आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनाप्रमाणे लोकोत्तर व्यक्तींचे व कार्याचे स्थलकाल संदर्भात विवेचन करणे म्हणजे त्यांचे अवमूल्यन करणे; हा प्रचार खरा नाही. कोणतेही व्यक्तिमत्त्व वा कार्यकर्तृत्व हे स्थलकालातीत नसते, हे म्हणणे सामाजिक उत्थापनाला मदतकारक असते. विभूतिवादी दृष्टिकोन सामान्य माणसात असहायतेची भावना निर्माण करतो; त्यांच्यात कर्तृत्वाची ऊर्मी निर्माण करण्यात रस मानत नाही; मुक्तीकरता 'अवतारा'ची वाट बघावयास सांगतो. समाजपरिवर्तनाचा सिद्धान्तच मुळी विभूतिवादी दृष्टिकोनाला अमान्य असतो. फार तर दुःखापासून मुक्त करण्याकरिता-नशिबाने कोणी 'महात्मा' जन्माला येईल एवढीच आशा बाळगण्यास सांगतो. याउलट समाजशास्त्रीय दृष्टिकोन बुद्धिमंतांनी व सामान्य माणसांनी नव्या काळाच्या गरजा ओळखण्यात पर्याय शोधावेत, आपला नेता पारखून घ्यावा असा आग्रह धरतो.

समाजातील परिस्थितीचा फायदा पुरोगामी व प्रतिगामी अशा दोन्ही शक्ती करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. समाजात निर्माण झालेले दारिद्र्याचे, गरिबीचे, विषमतेचे प्रश्न सोडवण्याकरिता अधिक वरच्या थरावरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समता प्रस्थापित करण्याचा आग्रह पुरोगामी धरतात. उलट अशा प्रश्नांचे मूळ हे समाजव्यवस्थेत नसून काही व्यक्तींच्या चांगले वाईटपणात किंवा इतर काही विभागांच्या, पंथांच्या धर्मात, श्रद्धात, परंपरांत व स्वार्थात आहे, असा पुकार प्रतिगामी करीत असतात. आपापल्या समाजाच्या गतेतिहासाचे खोटे उदात्तीकरण करून इतर समाजविभागाविषयी द्वेष किंवा तुच्छता असणारा दृष्टिकोन निर्माण करून सर्व समाजातील सामान्य माणसात दुफळी पाडण्यात प्रतिगामी यशस्वी होतात. थोर व्यक्तींचे कार्य हे केवळ धार्मिक, जातीय वा वंशद्वेषी होते, असे भासवण्याचा प्रयत्न

प्रतिगामी सतत करीत असतात.

शिवकालीन परिस्थिती अशा दृष्टिकोनातून पाहता शिवाजीचा उदय होण्याच्या काळात कोणत्या तऱ्हेची समाजव्यवस्था भारत व महाराष्ट्रात अस्तित्वात होती हा पहिला प्रश्न उपस्थित होतो.

अगदी फार खोलात न जाताही इतके वादातीत आहे की, बहामनी राज्याचे तुकडे पडल्यानंतर भारताच्या दक्षिणेकडील प्रदेशात आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही, बरिदशाही, इमादुशाही, अशा पाच पातशाह्या निर्माण झाल्या. त्याचबरोबर उत्तर भारतातील मोगल पातशाही निजामशाहीला संपवून दक्षिणेकडे हातपाय पसरवू लागली होती. दक्षिणेतील अनेक प्रदेश मोगलांच्या प्रत्यक्ष अमलाखाली आले होते. त्याचप्रमाणे ह्या पातशाह्यांच्या व मोगलांच्या आश्रयाखाली मनसबदार सरदेशमुख, देशमुख, देसाई अशी लहानथोर सरदार घराणी उदयास आली होती. आज्ञापत्र ह्या जुन्या ऐतिहासिक नोंदीत महाराष्ट्रात अशी शहाण्णव परंपरागत सरदार घराणी होती असे नमूद केले आहे. त्यांनाच पुढे शहाण्णवकुळी मराठे म्हटले जाऊ लागले. महाराष्ट्रात तर निजामशाही व आदिलशाही ह्या पातशाह्यात प्रदेशव्यासीकरिता सतत संघर्ष चालला होता. शहाजी राजांनीसुद्धा कधी निजामशाही तर कधी आदिलशाही ह्यांचा आश्रय घेऊन, तर कधी स्वतःच्या ताकदीवर त्यांना आश्रय देऊन स्वतःचे स्वामित्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालवला होता. तो यशस्वी झाला नाही व १६३६ मध्ये त्यांना कर्नाटकात आदिलशाहीचे मनसबदार म्हणून जावे लागले. ह्याचा अर्थ असा की शिवाजीच्या उदयाच्या काळात दक्षिणेत खास करून पश्चिम महाराष्ट्रात सरंजामदारी व्यवस्था होती व त्या व्यवस्थेत अंतर्गत संघर्ष तीव्र झाले होते. विविध पातशाह्या त्यांचे सरदार–दरकदार, पुन्हा त्यांचे शिलेदारबारगीर इत्यादींमधील सतत चढाओढ व संघर्षामुळे महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था कोसळून पडली होती. सामान्य माणसाच्या जीवनातील शांती; शाश्वती ह्यांचे वाटोळे झाले होते. त्याची अनेक उदाहरणे इतिहासाच्या पानोपानी आहेत. शहाजी राजांना पुणे परगण्याचा मोकासा मिळायच्या अगोदर व नंतरही विविध स्वाऱ्यांत पुण्याची लुटालूट व जाळपोळ झाली होती ह्याबद्दल इतिहासकारांत दुमत नाही. पण हा मुद्दा जरा येथेच सोडून देऊ. म्हटले तर, विषयांतर करू. कारण येथे सरंजामदारी व्यवस्था म्हणजे काय हा विषय समजून घ्यायला हवा.

इंग्रजी भाषेतील 'फ्यूडॅलिझम' या शब्दाला पर्यायी मराठी शब्द म्हणून आपण सरंजामदारी हा शब्द वापरतो. पण जगातील सर्व देशांतील फ्यूडॅलिझमचे स्वरूप सर्वस्वी सारखेच असते असे नाही. इंग्लंडधील 'सर्फ', फ्रान्समधील 'पिझंट', जर्मनीमधील 'मटेयर' हे कसणारे कष्टकरी आपल्या मालकांशी विशिष्ट पद्धतीने बांधले गेले होते. भारतातील जातिव्यवस्था, गावगाडा व वतनदारी ह्यांचे स्वरूप

कितीतरी वैशिष्ट्यपूर्ण होते. ह्या व्यवस्थेत कष्टकरी शेतकरी आणि कसबी-निमकसबी कारागीर गावगाड्याच्या व्यवस्थेला आणि संबंध गाव पाटील, कुलकर्णी, मोकाशी ह्या साखळीन्वये व पुढे वतनदार, जहागीरदार, सरदार आणि तेथील प्रदेशातील मध्यवर्ती राजांची शासनसत्ता ह्यांना बांधला गेला होता. ह्या सर्व सरंजामी पद्धती-मधील समान लक्षण हे होते की, प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या (उत्पादन करणाऱ्या) शेतकऱ्यांचे वरकड उत्पन्न विविध प्रकारांनी का होईना, प्रत्यक्ष कष्ट न करणाऱ्या सरंजामदारांकडे व त्यांच्याकडून ते मध्यवर्ती सत्तेकडे विशिष्ट पद्धतीने जात असे.

इतिहासाच्या ह्या कालखंडात भारतभर ठिकठिकाणी अनेक मध्यवर्ती सत्ता आल्या व नाहीशा झाल्या, त्यांनी लांब पल्ल्यांवरील प्रदेशांत स्वाऱ्याही केल्या. पण जिंकलेल्या प्रदेशांत आजच्या काळाप्रमाणे स्वतःचे नोकर ठेवून कर–वसुली करणे किंवा कारभार चालवणे अशा मध्यवर्ती सत्तेला शक्य नव्हते. कारण जलद-गतीने चालू शकेल अशी वाहतूक व्यवस्था नव्हती. दीर्घ पल्ल्यावर असलेल्या प्रदेशांतील जनतेवर सत्ता गाजवण्याकरता मध्यवर्ती खडे सैन्य ठेवणे हेही शक्य नव्हते. त्याऐवजी कर-खंड-वसुली व सैन्य उभारणे ह्याकरता ते आपले मध्यस्थ नेमून त्यांना करवसुली करण्याचा अधिकार देत आणि त्याचा ठरावीक हिस्सा आपल्याला मिळावा अशी तजवीज करीत. अनेक वेळा लहान राजे मोठ्या सत्तांशी तसा समझोता करीत; त्याचबरोबर मध्यवर्ती सत्तेला जेव्हा जेव्हा सैन्याची गरज लागेल तेव्हा तेव्हा अशा सरदार मनसबदारांवर सैन्य उभे करून मध्यवर्ती राजाच्या मदतीला जावे लागे. जगभर आणि युरोपमधील सरंजामदारीची ही लक्षणे होती. (युरोपमधील कॅथलीक चर्चचा जामीनदारी व मनसबदारी करता केला गेलेला उपयोग हे त्यांचे पुन्हा खास वैशिष्ट्य.) भारत किंवा महाराष्ट्रातही अशा व्यवस्थेची हजारो उदाहरणे पाहता येतील. उदाहरणार्थः– (१) शहाजींचे सासरे लखुजी जाधव, खुद्द शहाजीराजे हे निजामशाही व आदिलशाही ह्यांचे महाराष्ट्र व कर्नाटक येथील काही भागाचे 'मनसबदार' होते. (२) मिर्झा राजा जयसिंग ह्याने पुरंदर तहामध्ये शिवाजीला मोगलांची 'मनसबदारी' देण्याचे मान्य केले. (३) महाराष्ट्रा-तील जावळीचे मोरे, फलटणचे निंबाळकर, सावंतवाडीचे खेम सावंत, शृंगारपूरचे सूर्यराव शृंगारपुरे इत्यादी सरदार हे आदिलशाहीचे मनसबदार होते. (४) अफझल-खानाच्या स्वारीत त्याचे जे सरदार स्वारीने सैन्य घेऊन अफझलखानाच्या म्हणजेच मध्यवर्ती सत्तेच्या मदतीस आले होते, त्यात फाझलखानाबरोबर लंबाजी भोसले, जुजुर घाटगे, खंडोजी खोपडे हे मनसबदार होते. (पाहा– सभासद लेख १७–१९ श. ९१ कलमी बखर, ३४). (५) मिर्झा राजा जयसिंग ह्या उत्तरेकडील बड्या सरदाराने मोगली मध्यवर्ती सत्तेच्या वतीने शिवाजीवर आक्रमण केले. तेव्हा त्याच्या मदतीला दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंग सिसोदिया, सुजनसिंग

बुंदेला, मुल्ला याहिया नवयात (हा विजापूर सोडून १४००० सैन्यासह मोंगलांना मिळाला होता.) हरीभान गौर, उदयभान गौर, शेरसिंग राठोड, चतुर्भुज चौहान, मित्रसेन, इंद्रभान बुंदेला, बाजी चंद्रराव, अंबाची गोविंदराव इत्यादी लहान मोठे सरदार मनसबदार आपापली सैन्ये घेऊन आले होते. त्यात तुर्क, मोगल, अफगाण, रजपूत, जाट, मराठे सर्व होते. त्यांचे धर्म, जाती, भाषा विविध असल्या तरी ते मोगलांचे सरदार मनसबदार होते. हा समान दुवा होता. समाजशास्त्रीय वस्तुवादी दृष्टिकोनातून इतिहास बघणाऱ्या टीकाकारांना तो लक्षात घ्यावा लागतो.

तर शिवाजीच्या काळातील समाजव्यवस्था ही सरंजामदारी व्यवस्था होती. भारत व महाराष्ट्र ह्यांच्या इतिहासात पंच हजारी–दश हजारी सरदार अशा शब्दांचा अर्थ मध्यवर्ती सत्तेकडून तेवढे सैन्य ठेवण्याची परवानगी असणारा, तशी व्यवस्था करणारा आणि त्याकरिता तेवढे उत्पन्न मिळण्याची शक्यता असणाऱ्या प्रदेशांवर हुकमत असणारा ' सरदार ' हे लक्षात घेतले पाहिजे.

भारतातील व महाराष्ट्रातील त्या काळच्या सरंजामदारीचे दुसरे वैशिष्ट्य हे की, जरी पाटील, कुलकर्णी ह्या गावगाड्यातील लहान अंमलदारांची आणि इतर कसबी कामगारांची वतने कुटुंबाच्या तहह्यात आणि पारंपरिक मालकीची असली, तरी सरदार–दरकदारांची वतने ही मध्यवर्ती राजाच्या मर्जीवर अवलंबून असत व हा कायमचा संघर्षाचा मुद्दा असे. सरदार–दरकदारांना मोकासे जहागिरी आपल्या कुटुंबात तहह्यात व परंपरागत चालावी असे वाटे, तर आपली सार्वभौम सत्ता अबाधित राहण्याकरिता मध्यवर्ती राजांचा त्याला विरोध असे. सरंजामदारीतील दुसरा आंतरिक संघर्ष हा असे की, सरंजामदार स्वतःचे उत्पन्न वाढवण्याकरिता जास्तीत जास्त प्रदेश पादाक्रांत करणे, एकमेकांवर कुरघोडी, कट–कारस्थाने, खुनाखुनी इत्यादींमध्ये गुंतलेले असत. आक्रमणामुळे किंवा राजघराण्यातील हेव्यादाव्यामुळे मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यास त्याचा फायदा घेऊन महत्त्वाकांक्षी सरदार स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत. महाराष्ट्राच्या इतिहासात मोरो तानदेव होनप (देशपांडे) ह्यांचे असे उदाहरण शिवाजीच्या उदयाच्या अगोदर घडले आहे. असे सरदार वसुलीचा भरणा ' दिवाणात ' न करण्याचा प्रयत्न करीत. भरणा दिवाणात न करणे हे सभासद बखरीतील शिवाजीचे शब्द आहेत. त्याचबरोबर सरदार आपल्या हक्काखालील बारगीर लष्कराची तरतूद करण्याकरिता एकमेकांच्या मुलखात लुटालूट करीत. अगदी असेच प्रकार समांतर काळातील युरोपमधील सरंजामशाहीत चालत असल्याचे इतिहासकार जदुनाथ सरकारांनी नमूद केले आहे.

सरंजामशाहीच्या अंतर्गत संघर्षाचा दुसरा अत्यंत महत्त्वाचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य जनतेची लूट. एकमेकांच्या प्रदेशात लूट करणे हा तर भाग होताच. पण स्वाऱ्यांतील लष्कराला लुटून धान्य पुरवठा करणे; रस्ते मालवाहतूक ह्याकरिता शेत-

कऱ्यांवर वेठबिगार लादणे; शेतकऱ्यांच्या श्रमशक्तीचे अतोनात नुकसान करणे; इत्यादी प्रकारांना सर्वत्र व महाराष्ट्रातही ऊत आला होता. श्रमजीवी शेतकऱ्यांची अत्यंत मोठ्या प्रमाणावर लूट झाली तर उत्पादन धनसंपत्तीचा मुख्य स्रोतच बंद होईल अशी साधार भीती त्यावेळच्याही काही प्रशासकांना होती. शेरशहा, अकबर ही उत्तर हिंदुस्थानातील व मलिकंबर हे दक्षिणेतील नाव ह्याकरिता प्रसिद्ध आहेत की, त्यांनी शेतकऱ्याकडून केवढा सारा व धारा वसूल करावा, दिवाणात केवढा भरणा करावा ह्याचे नियम आखून दिले होते. (अर्थात अनेक वेळा त्यांचा प्रत्यक्ष अंमल होत नसे ते वेगळे.) ह्या बाबतीत सर्वांत जास्त स्पृहणीय कामगिरी दादाजी कोंडदेव व शिवाजी यांची आहे. शिवाजीच्या अंगी असणाऱ्या इतर अनेक सद्गुणांची तारीफ वारंवार झाली आहे, पण ऐतिहासिक दृष्ट्या सर्वांत महत्त्वाच्या अशा ह्या सद्गुणांची मात्र व्हावी इतकी नोंद झाली नाही किंवा त्यांचे व्हावे तेवढे भान निर्माण केले गेलेले नाही. कारण विभूतिवादी दृष्टिकोनाला त्याचे महत्त्व वाटले नाही.

शिवाजीने रामायण, महाभारत ह्यांचे पठण केले होते. जिजामातेच्या धर्मश्रद्ध अशा संस्कारांमुळे त्याच्या कर्तृत्वाला पाया मिळाला असे आपल्याला लहानपणापासून सांगण्यात येते. तो वादाचा मुद्दा करण्याचा इथे प्रयत्न नाही. पण त्यापेक्षाही शिवाजीच्या बालपणी त्याच्या सभोवतालच्या प्रदेशात जी परिस्थिती होती, सामान्य शेतकऱ्यांची जी हलाखी व दैना झाली होती व दादाजी कोंडदेवांनी ती सुधारण्याकरिता माणुसकी, औदार्य व कारभार-चातुर्य दाखवणारी जी पावले टाकली. त्यामुळे सर्वसामान्य जनतेना जो दिलासा मिळाला त्याचा परिणाम बालवयातील शिवाजीवर केवढ्या मोठ्या प्रमाणात झाला ह्याचे मात्र मूल्यमापन होत नाही. पुणे प्रांत हा निजामशाही व आदिलशाही ह्यांच्यातील तंट्याचा प्रदेश होता. त्यावर वारंवार आक्रमणे झाली होती. पुणे व इतर गावे वारंवार भस्मसात केली गेली होती, वस्त्या उजाड होऊन जंगले माजली होती. त्यातून कोल्हे, लांडगे व इतर रानटी श्वापदे माजली होती. ह्या सर्वांचा पुरावा सभासद ९१ कलमी बखर ह्यात आहे. शिवाजीच्या हस्ते सोन्याचा नांगर घातला गेला व तो नंतर ब्राह्मणांना समारंभपूर्वक दान दिला, त्यामुळे भरभराट झाली असे एक अद्भूत आपणाला सांगण्यात येते ते डोळे मिटून खरेही मानले जाते. पण परागंदा झालेल्या शेतकऱ्यांना परत आणवून दादाजीने त्यांना बी-बियाणे व वतने देऊन जमिनी कसावयास दिल्या. त्यांच्याकडून येणाऱ्या महसुलाचा दर बिघ्या पहिल्या वर्षी एक आण्याचा १/१२ भाग; दुसऱ्या वर्षी एक आण्याचा १/४ भाग; तिसऱ्या वर्षी १/२ भाग; चौथ्या वर्षी ३/४ भाग, पाचव्या वर्षी ४ आणे भाग; सहाव्या वर्षी ८ आणे, सातव्या वर्षी एक एक रुपया आणि आठव्या वर्षापासून मलिकंबर पद्धतीप्रमाणे अशा सवलतीने ठरवून दिला. (पाहा ९१ कलमी बखर, भाग २१) जनतेला दिलासा देणाऱ्या ह्या उपायांमुळे भरभराट झाली की

केवळ सोन्याचा नांगर घालून व दान दक्षिणा देऊन झाली, ह्याचा निवाडा वाचकांनी आपल्या तर्कबुद्धीने करावयाचा आहे.

शिवाजीच्या कार्यकर्तृत्वाचे मूल्यमापन ह्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरच करावयास हवे. शिवाजीने स्वराज्य स्थापन केल्यानंतर सर्वसामान्य प्रजेवद्दलचा त्याचा दृष्टिकोन कोणता होता हे सभासद बखरीतील 'रयत' ह्या शीर्षकाखाली सभासदांनी जी नोंद केली आहे त्यावरून दिसून यावी.

'तशीच मुलखांची जमीनमोजणी करून धुरंग झाडचावर करून आकार केला. पाच हात व मुठींची काठी. हात चवदा तसुंचा असावा. हात व मुठी मिळून बैशी, तसुंची लांबी काठीची, बिस काठ्या औरस-चौरस त्याचा बिघा. एक बिघे एकशेबीस, त्याचा एक चावर अशी जमीन मोजून आकारून गावची गावास मोजून चौकशी केली. बिघे यास पिकांचा आकार करून पाच तक्षिमा रयतेस द्यावा, दोन दिवाणात घ्यावा. येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे, नवी रयत येईल. त्यास गुरेढोरे द्यावी. बिजास दाणापैका द्यावा. तो ऐवज दोहोचोहो वर्षांनी आर्युदाव पाहून डगवून द्यावा. ये जातीचे रयतेचे पालग्रहण करावे. गावचा गाव रयतेचा रयतकारकुनाने कमाविस पाहून रयतेपासून पिकांवर द्यावा. मुलखात जमीनदार, देशमुख, देसाई ह्यांचे जप्तीखाली कैदेत रयत नाही. यांनी साहेबी करून रयत नांगविन म्हटलीयाने त्याचे हाती नाही–इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कवज केला. त्या मुलकांचे पाटील, कुलकर्णी व देशमुखांच्या हाती कुलरयत यांनी कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गावी मिरासदारांनी घ्यावे ते गावी दोनशे तिनशे दिवाणात खंड मक्ता द्यावा, त्यामुळे मिरासदार पैकेकरी होऊन गावास हुडे वाडे कोट बांधून प्यादे बंदुकी ठेवून बळावले. दिवाणास भेटणे नाही. दिवाणाने गुंजाईस अधिक सांगितल्यास भांडावयास उभे राहातात. ये जातीने पूंड होऊन देश बळावीले. त्यास राजियाने देश काबीज करून हुडे वाटे कोट पाडिले नामांकित कोट जाहले तेथे आपले ठाणे ठेवले आणि मिरासदारांच्या हाती नाहिसे ठेवले. असे करून मिरासदार इनाम इजारतीने मनास माने सारखे घेत होते ते सर्व अमानत करून जमीनदारांस गल्ला व नख्त गाव पाहून देशमुख व देशकुलकर्णी यांसी हक्क बांधून दिला. वाडा बुरुजाचा बांधू नये घर बांधून रहावे ऐसा मुलखांचा बंद केला.' (सभासद बखर, पान २५, २९, ३०)

जमिनीची मोजमापणी करून, उत्पन्न बघून सारा घ्यावा. नव्या शेतकऱ्यांना बिजे पाणी द्यावे व त्याची परिस्थिती बघून कर वसुली करावी, जमीनदार, सरंजामदार, वतनदार ह्यांची रयत 'कैह' नाही असा विचार करणारा शिवाजी हा लोककल्याणकर्ता राजा होता. शिवाजीवर कुणी चरित्रे, कादंबऱ्या, कथा, कविता लिहिण्या-अगोदर पिढ्यान् पिढ्या महाराष्ट्रातील सामान्य जनांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला. त्याचे कारण त्याने जनतेला स्वास्थ्य, सुरक्षा व न्यायशासन देण्याचा

यशस्वी प्रयत्न केला. दुसऱ्या एका ठिकाणी सभासदाने केलेली नोंद आहे. (ही नोंद लष्करी हालचालीसंबंधी शिवाजीने केलेल्या नियमांच्या संदर्भात आहे.)

' लष्करात बायको बटकीण कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. परमुलखात पोर बाई न धरावी. मर्दाना सापडला तरी धरावा. ब्राह्मणांस उपद्रव न द्यावा. खंडणी केलिया जागा ओळखियसि ब्राह्मण न घ्यावा कोणी बदु अंमल न करावा काम कष्ट महागत. केलिया लोकास सरंजाम (किंमत) करून द्यावा. '

मुलुखगिरी परमुलखात करीत असतानाही बटकिणी घेऊ नयेत असा शिवाजीचा आदेश आहे. मुलीबाळींना पळवून त्यांना बटकिणी म्हणून विकण्याचा सर्रास प्रकार सरंजामदारी चढायात होत असे, ह्यांचेही पुरावे आहेत. कष्ट केल्याचे मोल द्यावे असा आदेश शिवाजी देतो हे त्या काळातील परिस्थितीच्या संदर्भात केवढ्या मोठेपणाचे लक्षण आहे हे शब्दांत सांगता येणे कठीण आहे. शिवाजीच्या लोकप्रियतेचे रहस्य त्यात आहे. बाकीचे मराठे सरदार मुसलमानाचे मिंधे राहून केवळ मनसबदारी सांभाळून राहिले आणि शिवाजीने हिंदवी स्वराज्याची–म्हणजे हिंदूचे राज्य–स्थापना केली एवढाच मर्यादित निर्वाळा देण्याने काही सिद्धसाधकांचे फावते. पण एका ऐतिहासिक सत्याचा विपर्यास होतो. मध्यवर्ती सत्ता जरी हिंदू राजाची असली तरी जनतेला स्वास्थ्य, सुरक्षा व दिलासा देण्याकरिता शिवाजीने तेच केले असते. ह्या मुद्द्यावर अधिक विस्तृत विवेचन नंतर करू या. त्याअगोदर त्या काळच्या समाज-परिस्थितीबाबत दुसऱ्या महत्त्वाच्या भागावर प्रकाश टाकू.

शिवाजी हिंदू होता, महाराष्ट्रीय होता. तेव्हा शिवाजीवद्दल हिंदुधर्मीयांना व मराठी माणसांना खास अभिमान वाटणे साहजिकच आहे. एखादा थोर पुरुष आपल्या धर्मात किंवा भाषागटात निर्माण झाल्यास त्या धर्मीयांचा व भाषा गटांचा तो अभिमानाचा विषय होणे नैसर्गिक आहे. पण धर्म किंवा धर्माची सामाजिक प्रतिष्ठा व स्थान ह्या बाबतच्या आजच्या कल्पना त्या काळावर लादून त्या पद्धतीने विवेचन करणे योग्य नव्हे. भारतीय प्रदेशावरील अल्पसंख्येने आलेल्या मुसलमानांचे आक्रमण यशस्वी का झाले ह्याचे नीट व परखड आकलन झालेच पाहिजे. सरंजामदारीच्या काळात गावगाडा व जाती-उपजातींचे विभाजन चौकड व उतरंड पक्की झाली होती. सबंध समाज त्यामुळे एखाद्या घट्ट झालेल्या चिखलात रुतला होता. अस्पृश्यता, वेठबिगार, बंद अंमल ह्यामुळे समाजातील बहुसंख्य लोकांना असहाय व अगतिक केले होते. कसब व उत्पादन तंत्र ह्यांचे ज्ञान व ते वापरून उत्पादन करणाऱ्या श्रमिकांची समाजातील जागा सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या इतक्या हीनपणाला नेऊन पोचवलेली होती की समाजजीवनात, उत्पादनात त्यांना कोणताही आवेश, उत्साह, ऊर्मी वाटण्याचा प्रश्नच उरला नव्हता. धर्मक्षेत्रामध्ये नानाविध आचार, उपचार, कर्मकांडे, व्रतेवैकल्ये, तांत्रिक विधी, पाप–महापाप यांच्या लांब-

लचक याद्या ह्यांचे एवढे प्रस्थ माजले की, त्याच्या दडपणाखाली समाजाचा सांस्कृतिक ऱ्हास झाला होता. प्रा. दामोदर कोसंबी ह्यांनी आपल्या 'कल्चर ॲन्ड सिव्हिलायझेशन ऑफ इंडिया' ह्या पुस्तकात असे वर्णन केले आहे. 'मध्ययुगातील दोन ब्राह्मण मंत्र्यांनी राज्यकारभारविषयक जे ग्रंथ लिहिले आहेत, ग्रंथ आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्राचे परस्परविरोधी स्वरूप पाहाण्यासारखे आहे. एक आहे भट्ट लक्ष्मीधर ह्याने लिहिलेला कल्पतरू आणि दुसरा आहे हेमाद्रिपंतांचा चतुर्वर्ग चिंतामणी. हे दोन्ही ग्रंथ लहान-मोठ्या प्रसंगी आणि खास प्रसंगी करावयाच्या विधी-उपचारांनी भरलेले आहेत. त्यामध्ये धर्ममर्यादा व मर्यादाभंगाबद्दल इतकी प्रायश्चित्ते आहेत की, सांगता सोय नाही. तीर्थयात्रा, श्राद्ध, शुभ-अशुभ कल्पना, पापक्षालन विधी यांचा इतका धुमाकूळ आहे की, ते प्रसिद्ध केले तर त्याचे बारा मोठे खंड काढावे लागतील. ह्या पुस्तकावरून दिसून येते की, न्यायदान देण्यात अग्निपरीक्षेसारख्या भोळसट व रानटी मार्गांचा अवलंब केला जाई.

अशा समाजात अल्पसंख्य तुर्की, अरबी, हबशी, मोंगली आक्रमणे यशस्वी झाली ह्यात कुठले आश्चर्य आहे? अशा ह्या समाजात माणुसकी व आध्यात्मिक का होईना पण समानता ह्या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या वारकरी व इतर संत-परंपराना आत्यंतिक क्रौर्याला तोंड द्यावे लागले, ह्यावरून कर्मठपणाने केवढा कळस गाठला होता हे दिसून येते.

आजच्या विज्ञानयुगात मानवी व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात वास्तवतावादी वा बुद्धिवादी दृष्टिकोनाने परिशीलन करण्याची शक्यता व आवश्यकता निर्माण झाली आहे. अशा वेळी ज्ञानेश्वर व तुकाराम ह्यांच्या नावाचा व साहित्याचा उपयोग अध्यात्मवाद व अंधश्रद्धा ह्यांचा पुरस्कार करण्याकरिता केला जातो. पण त्या कालसंदर्भात पुरोगामी व मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारणाऱ्यांचा अतोनात छळ झाला आहे. ज्ञानेश्वराला अल्पवयात समाधी घ्यावी लागली आणि तुकारामाचे अभंग इंद्रायणीत बुडवण्याचा आदेश धर्मपीठाच्या आसनावर बसणाऱ्या कर्मठ नेत्यांकडून दिला गेला हे विसरता कामा नये. समाजाने एक सर्वदूर वाटचाल केल्यावर मागच्या काळातील पुरोगामी व्यक्तींनी त्या काळी पुरस्कारलेल्या प्रगत परंतु नंतर कालाबाह्य झालेल्या मूल्याचे विकृतीकरण करून त्याचा वापर नंतरचे प्रतिगामी करीत असतात. (जनसंघाचा किंवा रा. स्व. संघाचा वारसा चालवणारे महात्मा गांधींच्या नावाचा उद्घोष करतात ह्याचा अर्थ हाच आहे. ते असो.) शिवाजीच्या कार्याला संतांच्या कामगिरीची पार्श्वभूमी आहे ह्यात मला तरी शंका नाही. मुद्दा हा की, अशा समाजात शिवाजीने चैतन्य निर्माण केले, हा त्याचा मोठेपणा आहे. शिवाजीच्या काळात हे चैतन्य निर्माण का झाले? त्याचा विचार ह्या ठिकाणी करू या.

शिवाजीच्या कार्यकर्तृत्वाचा विचार करताना एका महत्वाच्या घटकाचा विचार

केला जात नाही. शिवाजी रामदासांना भेटला. त्यांच्याकडून त्याने आदेश-स्फूर्ती किंवा मार्गदर्शन कसे घेतले ? तुकारामाकडून राजसंन्यास, धर्माची दीक्षा कशी घेतली ? ह्याबद्दल बऱ्याच चवीने, पाल्हाळानेसुद्धा लिहिले गेले आहे. शिवाजीच्या कार्यकर्तृत्वाचा उन्मेष व पाया केवळ देवधर्म व गुरूपदेश ह्यातच होता, असा ब्राह्मणी आग्रह त्यामध्ये आहे. पण शिवाजीच्या कार्याचे मर्म त्याला महाराष्ट्रातील बारगीर शेतकऱ्यांचे सहकार्य मिळाले ह्यात आहे. हा भाग अत्यंत वास्तव व महत्त्वाचा आहे.

हे बारगीर कोण होते ? जॉन ब्रिग्ज ह्या ब्रिटिश इतिहासज्ञाने फरिश्ता ह्या जुन्या व तत्कालीन पर्शियन ग्रंथाच्या आधारे लिहिलेल्या 'हिस्टरी ऑफ द राईज ऑफ मराठा पॉवर' ह्या ग्रंथात अशी नोंद केलेली आहे की, बुऱ्हाण इब्राहिम आदिलशहाने प्रथम मराठीत कारभारविषयक दफ्तरे ठेवण्यास सुरुवात केली. त्याच्याकडे तीस हजार मराठी बारगीर होते. बारगीर हा शब्द ऐतिहासिक दृष्ट्या प्रथम ह्या जुन्या ग्रंथात वापरलेला आहे. मराठी वाचकांना तो चांगलाच परिचित आहे. पण बारगीर म्हणजे करवसुली करणारा सरदार किंवा पाटील-कुलकर्णी ह्यांच्यासारखा सरकारी वतनदार नव्हता. तर कधीही सेवेस तयार असणारा शस्त्रधारी सैनिक होता. (त्याच्याकडे घोडा असल्यास तो शिलेदार असे) पण तो नुसता पूर्णवेळ सैनिक नव्हता, तर उदरनिर्वाहाकरिता शेती करणारा शेतकरीही होता. जमिनीच्या लहानशा तुकड्याच्या मोबदल्यात शस्त्र बाळगणारा, ते चालविण्याची सवय ठेवणारा व आपल्या स्वामीच्या हाकेस धावून जाणारा हा बारगीर होता. पुढे केवळ निजामशाही-आदिलशाहीच नव्हे तर दक्षिणेतील अनेक मराठे व इतर सरदार–दरकदार आपल्या पदरी बारगीर बाळगू लागले व आपसातील लढाया व लूटालूट ह्याकरिता ह्या बारगिरांचा उपयोगही करू लागले. (उदा :– शहाजीचे सासरे सिंधखेडचे लखूजी जाधव हे निजामशहाचे एक मनसबदार होते. पुढे १६२१ साली ते पाच हजार बारगिरांसह मोंगलास जाऊन मिळाले असल्याची नोंद शिवचरित्र साहित्य ह्या ग्रंथात आहे व शहाजीचे वडील मालोजी व काका विठोजी हे त्यांच्याकडे बारगीर होते अशीही नोंद ठिकठिकाणी केली आहे.) पाच पातशाह्या आणि सरदार-दरकदार ह्यांतील संघर्षाच्या काळात ह्या बारगीर-शिलेदारांचे जीवनही अत्यंत अशाश्वतीचे झाले असणार. आपल्याच लोकांची लूटालूट करून जिवंत राहण्यापेक्षा शिवाजीच्या स्वराज्य उद्योगात सहभागी होऊन मानाने जगणे त्यांना नक्कीच प्रिय वाटले असणार; समाजाच्या त्या घडीमध्ये हया बारगिरांना शुद्रच मानण्यात येत होते. जुन्या हिंदुधर्म-शास्त्राप्रमाणे शूद्रांना शस्त्रधारी होण्याचा हक्क नव्हता. पण ह्या कालखंडात दक्षिणेतील हजारो शूद्र बारगीर-शेतकरी शस्त्रधारी झाले, ही घटना महत्त्वाची आहे. अफजलखान भेटीवेळी सय्यद बंडाला मारणारा जिवा महाल्या हा जातीने न्हावी होता.

शिवाजीला केवळ नांगरधारी शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळाला असता तर तो

आपली फौज उभारू शकला नसता. अर्थात दक्षिणेतील एका कोपऱ्यात प्रथम शिवाजीने ह्या बारगिरांना नेतृत्व दिले, यात शिवाजीचे लोकोत्तरत्व आहे. बाकीच्या अनेक सरदारांनी त्यांच्या निष्ठेचा उपयोग केवळ वरिष्ठ मध्यवर्ती सत्तेच्या सेवेकरिता व लुटालूट करण्याकरिता केला. महाराष्ट्रातील जवळजवळ सगळे मोठे सरदार-वतनदार (एक कान्होजी जेधे सोडून) शिवाजीच्या विरोधात उभे राहिले होते आणि सुरुवातीला सामान्य मावळ्यांचे सैन्य घेऊनच त्याने स्वराज्याचा तोरणा बांधला.

ह्या ठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो की, असे का घडले? इतके मराठे सरदार हे मुसलमानी पातशाह्यांशी एकनिष्ठ का राहिले? त्याचप्रमाणे अनेक तोलामोलाची सत्तेची परंपरा असलेली रजपूत घराणी मोगलांशी एकनिष्ठ का राहिली? हे सर्व सरदार पिचक्या पाठकणीचे, स्वाभिमानशून्य, धर्माभिमानशून्य वगैरे वगैरे होते, अशी शहाजोग मीमांसा करून असे ऐतिहासिक प्रश्न निकालात काढता येतील का? त्या बाबतचे सत्य काय आहे? खरे, अगदी न आवडणारे सत्य हे आहे की गेल्या पन्नास-शंभर वर्षांत आपण ज्याला राष्ट्राभिमान, धर्माभिमान म्हणतो त्या अर्थी त्या संकल्पना तेव्हा अस्तित्वातच नव्हत्या. मी हिंदू म्हणून जन्माला आलो तेव्हा त्या धर्माचे पालन करणे म्हणजेच त्या धर्मातील वर्णजातीने मला दिलेले स्थान मी सांभाळणे, त्याचे उल्लंघन न करणे एवढ्या अर्थीच त्या काळी धर्माचे भान होते. मुसलमान धर्मीयांचे भानसुद्धा अशाच रूढाचारापुरते मर्यादित होते. तुकाराम महाराजांनी कवितेमध्ये भक्ती केल्याबद्दल राग नव्हता. वेदाचा अर्थ कुणबटाने सांगितला म्हणून त्याला अभंग बुडविण्याची शिक्षा झाली होती. 'वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाची साधला, विठोबासी शरण यावे, निजनिष्ठे नाम गावे', 'ब्राह्मण नव्हे ऐसी ज्याची बुद्धी, पहा श्रुतीमध्ये विचारूनी' वगैरे वगैरे. ब्रिटिश परकीय असतानाही भारतातील मोठमोठ्या विद्वानांनी त्यांच्या नोकरीत काम कसे केले हा प्रश्न उद्या जेवढा बावळटपणाचा ठरावा तेवढाच एवढे रजपूत सरदार किंवा मराठे सरदार मोगलांच्या मनसबदारीने का राहिले हा प्रश्न आज बावळटपणाचा आहे. तरी त्याला चुकीची उत्तरे दिली जातात म्हणून तो निर्माण करावा लागत आहे. परकीय आक्रमणाला काहींनी आपापली स्वतंत्र राज्ये वाचविण्याकरिता विरोध केला; धर्माभिमानापोटी नव्हे किंवा ज्यांनी दुय्यम सरदार-दरकदारीचे किंवा मनसबदारीचे काम तडजोड म्हणून पुकारले त्यांनी, आपली सत्ता वाचविण्याकरिता. त्याच्यात केवळ धर्माभिमान नव्हता म्हणून नाही. धर्माभिमानाचे मूल्य सरंजामदारीत फारसे किंवा जवळजवळ अस्तित्वातच नव्हते. सरंजामदारीचे मूल्यनिधान स्वामिनिष्ठा हेच होते. सरंजामदारी टिकविण्याकरिता असे मूल्यनिधान निर्माण होणे आवश्यक होते. त्याला पावित्र्याची झळाळी चढवण्यात आली होती. अतिरेकी स्वामिभक्तीच्या अनेक गौरवशाली कथा इतिहासामधून रचलेल्या आहेत. ब्रिटिशांच्या काळात राजनिष्ठेचा

असा गौरव काही काळ झालेला आहे. सरंजामदारी साम्राज्यशाही, भांडवलदारी व्यवस्था आपापली मूल्ये व निष्ठा निर्माण करतात.

ह्या संदर्भात आपल्याला एक वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे ती की, शिवाजी आणि अदिलशाही किंवा मोगल ह्यांच्यातील संघर्ष हा हिंदू व मुसलमान राजे ह्यातील धर्म-संघर्ष नव्हता. तसे स्वरूप त्याला काही इतिहासकार व कथा-कादंबरीकार यांनी नंतर दिले आहे, काहींची तशी समजूत प्रामाणिकपणाने आहे, तर काहींचा तो आग्रह आधुनिक जातीयवादाला ऐतिहासिक पाया देण्याकरिता आहे. असे विकृतीकरण फक्त हिंदूजातीय बांधवांकडून झालेले आहे, असे नाही तर मुस्लीम जातीयवाद्यांकडूनही झालेले आहे. ह्या जातीयवादाचा पाया ब्रिटिश इतिहासकारांनी आपल्या साम्राज्यवादी राजकारणाकरिता घातला. हिंदू व मुस्लिम ह्या दोन्ही जातीयवाद्यांनी आपल्या राजकारणाकरिता त्याचा उपयोग करणे चालू ठेवले आहे. औरंगजेब किंवा इतर मुसलमानधर्मीय राज्यकर्ते, सरदार व इतर सर्वसामान्य मुसलमान ह्यांचा धर्म म्हणजे प्रार्थनापद्धती एक होती, ह्यापलीकडे त्यांच्यात काहीच 'समान' नव्हते. इतर सर्वसामान्य हिंदुधर्मीयांप्रमाणे त्यांनाही नागवले जात होते, वेठबिगारी करावयास लागत होती पण आजही अगदी अडाणी मुसलमान स्वतःला मोठ्या राज्यकर्त्यांचा वंशज असल्याचे मानतो. कारण तसे संस्कार केले गेले आहेत. त्याचबरोबर धर्माभिमान जागृत केल्याशिवाय साम्राज्यविरोधी लढ्याला धार येणार नाही, असे वाटणाऱ्या अनेक देशभक्तांनीही ह्या संस्कार करण्याला हातभार लावला आहे.

हिंदू वा मुसलमान राज्यकर्ते जरी त्या त्या धर्माचे होते, तरी त्यांच्या राज्याचा पाया किंवा राज्यधर्म (स्टेट रिलीजन) हिंदू वा मुसलमान नव्हता, असे दाखवणारे अनेक सज्जड पुरावे आहेत. महम्मद गजनीने (सोरटी सोमनाथ देवालयाची लुटालूट केली, ती मुख्यतः संपत्तीकरिता केली; तरी त्याच्या पदरी टिळक (तिलक) हा बडा मुख्य सरदार हिंदू होता.) आदिलशाही, कुतुबशाही किंवा अकबर व खुद्द औरंगजेब ह्यांच्या पदरी अनेक रजपूत, जाट, बुंदेले व मराठे सरदार होते. खुद्द शिवाजीच्या पदरी अनेक मुसलमान सैनिकी अधिकारी होते. सभासद बखरीमध्ये शिवाजीच्या कोकणच्या स्वारीमध्ये 'इम्रानखान' ह्या मुसलमान अधिकाऱ्याने केलेला पराक्रम नोंदवला आहे तो असा :

'फोंडकोट इदलशाही होता. तेथे मोहोबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. तो वेढा घालून सुरुंग लावून हुडे बुरूज उडविले फोंड घेतले. तेव्हा राजियाकडील (शिवाजीकडील) सरदार इम्रानखान मोठा धारकरी लष्करचा हजारी बरोबरी होता. त्याने कष्ट मेहनत बहुत घेतली. त्याने फोंड घेऊन कडवाड शिवेश्वर, मिरज, अंकोले, कदरे, सुपे उडवे हे कोट कोकणचे कुल घेऊन गोकर्ण, महाबळेश्वर,

बरघाट, सुपे येथवर सरद लावली व गोवियांचे फिरंगी यास दबावून त्यांजजवळून तोफा जडजवाहीर घेऊन आपलेसे करून, उदमांस कौल लावून आमदारकी करावयासी निरोप दिला.'

अफझलखानाचा वध केल्यानंतर शिवाजीने त्याची कबर बांधली. ह्यावरून शिवाजी श्रद्धाळू होता, धर्मांध नव्हता, हेच दिसून येते. अफझलखानाचा वध त्याने मध्यवर्ती सत्तेकडून आलेला आक्रमक सरदार म्हणून केला, त्याच्या धर्माविषयी शिवाजीला घृणा नव्हती. तसेच एक उदाहरण घ्यावयाचे झाल्यास अकबराने आपली पत्नी जोधाबाई हिला शंकराची पूजा करण्याकरिता फत्तेपूर शिक्री येथील किल्ल्यात देऊळ बांधून दिले ते अजूनही तेथे आहे. ह्याउलट मिर्झा राजा जयसिंग ह्याने विजय मिळावा ह्याकरता महाराष्ट्रातील ब्राह्मणाकरवी कोट चंडी यज्ञ केल्याचा उल्लेख शिवचरित्र साहित्यात आहे. (पान २०) तो असा : 'मिर्झा राजा जयसिंगाची चिंता, शिवाजी मोठा दगेखोर मोठा हुन्नरवंत आणि मर्दाना, शिपाई अंगाचा खासा. अफझलखान अंगे मारिला. आपणास यश कसे येईल म्हणून चिंता केली. तेव्हा मोठे मोठे ब्राह्मण पुरोहित यांनी उपाय सांगितला. दैवी प्रयोगी अनुष्ठाने करावी म्हणजे यश येईल. मग मिरझा बोलिला–जे कोट जंडी करावी आणि अकरा कोटी लिंगे करावी कामनार्थ बगळामुखी कालरात्री प्रित्यर्थ जप करावा. चारशे ब्राह्मण अनुष्ठानास घातले. प्रत्यही अनुष्ठाने चालिले. अनुष्ठानास दोन कोट रुपये अलाहिदा काढून ठेवले. आणि तीन मास अनुष्ठान काढून सिद्ध केले. अनुष्ठानाची पूर्णाहूती करून ब्राह्मणास दानदक्षिणा देऊन संतर्पण केले. मग दरमजल चालिले.'

शिवाजीचे राज्य जर ब्राह्मण व हिंदुधर्म रक्षण करण्याकरिता होते तर हा एवढा कोटिचंड यज्ञ ब्राह्मणानी कसा बरे केला ?

शिवाजीची आपल्या धर्मावर निष्ठा असणे, साहजिकच होते. त्याच्या राज्यात हिंदुधर्मातील श्रद्धांना आधार मिळणेही साहजिक असणार. त्या काळची वैज्ञानिक व सांस्कृतिक पातळी लक्षात घेता धर्मश्रद्धा हेच सगळ्यांत प्रभावी सांस्कृतिक प्रगतीकरण होते. पण त्याच्या स्वराज्याची प्रेरणा धर्मप्रसाराची किंवा मुसलमान धर्माला आवर घालण्याकरिता होती असे म्हणावयास काही भाकड गोष्टी सोडल्या तर इतिहासात किंवा समाजव्यवस्थेत काहीच आधार नाही.

शिवाजीला गोब्राह्मण प्रतिपालक हिंदुपदपातशाह असे बिरुद सर्रास लावले जाते. सभासद बखरीसह इतर कोठल्याही कागदपत्रात तसे बिरुद लावल्याचे आढळत नाही. तरीही तो गोब्राह्मण प्रतिपालक हिंदुपदपातशाह होताच असा आग्रह अनेकजण करीत असतात. कारण शिवाजीकरिता त्यांच्या दृष्टीने असणारे उदात्त ध्येय पुरवण्याची कामगिरी त्यांना करावयाची असते. हिंदुधर्मव्यवस्थेत ब्राह्मणवर्गाला खास व उच्च स्थान होते यात शंका नाही. वर्णजातश्रेष्ठतेच्या चढणी-उतरणीवर ते

केवळ वरच्या पायरीवर होते, इतकेच नव्हते तर वेगळ्या व पवित्र स्थानावर ते होते. जगण्याच्या आणि मृत्यूनंतरच्या काळातही करावयाचे संस्कार ब्राह्मणांच्या हातात होते. त्यामुळे त्यांच्याकडे एक सामर्थ्य होते. समाज त्यांच्याकडे एका भीतियुक्त आदराने पाहत होता. तरीसुद्धा 'ब्राह्मणास उपद्रव न द्यावा' एवढा उल्लेख सोडल्यास सभासद बखर किंवा जुन्या कागदपत्रात ब्राह्मणांविषयी काहीही उल्लेख नाही. राज्याभिषेक केल्यानंतर 'क्षत्रिय कुलवंतस शहासुनोः शिवाजीस्य मुद्रा भद्राय राजते' अशी बिरुदावली शिवाजीने घेतली, तेव्हा जर गाई आणि ब्राह्मण ह्यांचे संरक्षण कार्य करण्याची व हिंदुधर्मपालन हेच मुख्य ध्येय साधण्याची शिवाजीची इच्छा होती तर तशी बिरुदावली घेण्यास त्यास कोणती हरकत होती? खरी हरकत तर त्याने स्वतःला 'क्षत्रिय' म्हणून घेण्याला होती.

तेव्हा ही 'बिरुदावली' देणे हा नंतरच्या काळातील धर्ममार्तंडाचा डावपेच आहे. शिवाजीने सामान्य शेतकऱ्याला संरक्षण देण्याचे जे आदेश दिले, ते दडवून ठेवून त्याला आपला संरक्षक असल्याचे चित्र रंगवून आपला वर्णीय अहंकार पुन्हा पुन्हा समाजावर लादण्याचा केलेला तो प्रयत्न आहे. असे भासवण्यात येते की, भारतीय मुसलमानी राजे व सरदार हे जणू काही सुरे पाजळत गाई आणि ब्राह्मण ह्यांच्यामागे लागले होते. गाई व ब्राह्मण एकमेकांना घेऊन पळत होते. हे चित्र खरे नाही, हे मिर्झा राजा जयसिंगाच्या कोटी चंड यज्ञावरूनही सिद्ध व्हावे. मुसलमानी राज्यातही व्रतकैवल्ये, अनुष्ठाने, उद्यापने अव्याहतपणे चालली होती. शोषणव्यवस्थेत ब्राह्मणांची धार्मिक अंगाने भागिदारी निवांतपणे चालत होती. ही 'गोब्राह्मण प्रतिपालन' कल्पना किती उथळ करण्यात यावी! 'बुडाला औरंग्या तापी, म्लेंच्छ संहार जाहला, उदंड झाले पाणी स्नान संध्या करावया' अशा उथळ ओळी रामदासांच्या नावे रचल्या गेल्या आहेत. रामदास हा प्रवृत्तीधर्माचा उपासक होता. केवळ स्नानसंध्या हा हिंदुधर्माचा प्राण आहे असे मानणारा नव्हता. त्याने अशा ओळी लिहिणे त्याच्या एकंदर लिखाणाशी सुसंगत नाही. त्याशिवाय शिवाजीच्या कार्याला सामाजिक पार्श्वभूमी निर्माण करणारा, शिवाजीपेक्षाही वयाने मोठा असणारा रामदास औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत जगला असण्याची शक्यताही कमी आहे, गो. नी. दांडेकर ह्यांनी 'दास डोंगरी रहातो' या पुस्तकांत ह्या ओळींना रामदासाची भविष्यवाणी म्हटले आहे. ते सर्व असो. पण मुसलमानी राजवटीत गाई व ब्राह्मण ह्यांच्यावर आपत्ती आली होती काय? तसा पुरावा आहे काय? प्रत्यक्ष पुरावा काय आहे?

मुसलमानी अंमलाच्या सुरुवातीला देवळांची लुटालूट झाली असल्याचे पुरावे आहेत. अर्थात अशी लुटालूट ही मुख्यतः संपत्तीकरिता होत असे. मुसलमानी आक्रमणाअगोदरही काश्मीर हर्ष राजाने (काळ १०८९ ते ११०१) उमारा नावाच्या बंडखोरांची लढण्याकरिता, पैसा गोळा करण्याकरिता देवालयांची लुटालूट केल्याचे

नमूद झाले आहे. आक्रमकांची राज्ये स्थिर झाल्यानंतर त्यांनी देवालये किंवा ब्राह्मण ह्यांचा छळ केल्याच्या आरोपाला कपोलकल्पित कथांशिवाय दुसरा पुरावा नाही. शिवाजी लहानपणी विजापूरला गेला असता, गाय कापणाऱ्या कसायाचा त्याने वध केल्याची अशी कथा आम्हा सर्वांना आमच्या लहानपणापासून ऐकवण्यात आली आहे. प्रत्यक्षात पुरावा मात्र वेगळाच आहे. निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही इत्यादी पातशाह्यांचे फार मोठे अधिकारी ब्राह्महण होते. बहामनी राज्याचा सूत्रधार कन्वर सैद हा ब्राह्मण होता. गोवळकोंड्याचा कुतुबशाहीचा कारभार मदन्ना पंडित आणि अकण्णा पंडित ह्या ब्राह्मण बंधुच्या हातात होता. (पाहा : शिवाजी ॲन्ड हिज टाईम्स–जादुनाथ सरकार) अगदी अफझलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर हासुद्धा ब्राह्मण होता. ह्याच अफझलखानावर विठोबाचे मंदिर भ्रष्ट करण्याचा आरोप नंतरच्या इतिहासात 'मूर्ती कांढीली' ह्याऐवजी 'मूर्ती काडीली' असे शब्द बदलून करण्यात आला (पाहा, सेतुमाधवराव पगडी.)

अशा परिस्थितीत केवळ हिंदुधर्म म्हणजे गो ब्राह्मण प्रतिपालनार्थ शिवाजीने स्वराज्याचा उद्योग केला, लढाया मारल्या, जिवावरचे प्रसंग ओढवून घेतले; राजकारणचातुर्य व डावपेचांची पराकाष्ठा केली आणि वर प्रत्यक्षात राज्याभिषेक करताना तशी बिरुदावली मात्र घ्यायला विसरला हे तर्काला पटणारे आहे का? मुसलमान गोमांस भक्षण करावयाचे तेव्हा गोहत्या होत असणार. तशी ती आजही होते. पण धर्मविद्वेष किंवा धर्माभिमान म्हणून ती जशी आज होत नाही तशी ती त्या काळीही होत नव्हती. बरे एवढे करून शिवाजीने अनेक आदेश काढल्याचा पुरावा आहे, पण गोहत्या-बंदीचा आदेश काढल्याचा पुरावा नाही.

धार्मिक बाबतीत शिवाजीचे धोरण औदार्याचे व सहिष्णुपणाचे होते. आजच्या धर्मलंड किंवा जातीयवादी शक्तींच्या अमानुष विद्वेषी वृत्तीचा गंधही त्याच्याकडे नव्हता. त्याने देवळांना जशी नवी इनामे दिली तसे त्याच्या राज्यांतील मशिदींना मिळणारी जुनी इनामे चालू ठेवली आणि नवीही दिली आहेत. त्याचे उल्लेख सभासद बखर व इतर साहित्यात आहेत. त्याचप्रमाणे मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदूंच्या देवळांची गुप्त किंवा पालव किंवा देवगिरी राजांपासून चालत आलेली इनामे रद्द केल्याचे कोठेच दिसत नाही. तसे केले असते तर ह्या देवळांचा कारभार बंद पडला असता. देवांचेच नव्हे तर पुरोहित वर्गाचे 'राजभोग' बंद झाले असते.

शिवाजीचे राज्यारोहण ही मराठ्यांच्या इतिहासातील एक अत्यंत रोमांचकारक व उज्ज्वल घटना आहे. शिवाजीने राज्यारोहण करून सत्ता संपादित केली असे झाले नसून स्वतः उभारलेल्या सत्तेला वैधानिक पाया दिला, हे त्या राज्यारोहणाचे वैशिष्ट्य आहे.

एवढे शौर्य गाजवून राज्य स्थापन केल्यानंतर शिवाजीला राज्याभिषेक करवून

घेऊन असा वैधानिक पाया का द्यावा लागला? हा समाजशास्त्रीय प्रश्न आहे.

शिवाजीच्या राज्यारोहण समारंभाला दुसरी एक व्यथित करणारी बाजू आहे. ह्या राज्यारोहणाला विशिष्ट धर्मव्यवस्थेमुळे झालेला विरोध, अडचणी व त्या दूर करण्याकरिता शिवाजीला करावे लागणारे विविध सोपस्कार. त्या काळी ही धर्मव्यवस्था, समाजाचे मानसिक, सांस्कृतिक व सामाजिक नियंत्रण करीत होती. त्या परंपरेनुसार हिंदुधर्म मानणाऱ्यांचा राजा केवळ 'क्षत्रिय'च असू शकत होता. हिंदूधर्मीय नसणारा यवन, शक, कुशाण, हूण, मुस्लिम चालत होते. (नंतरच्या काळात अशा अनेकांचा समावेश क्षत्रियात झाला आहे.) पण शूद्रवर्णीय राजा होऊच शकत नव्हता. बहुसंख्य समाज हा शेतकरी व कसबी कारागिरांचा म्हणजेच शूद्रांचा होता; पण परंपरेने शूद्र शस्त्रधारी होऊ शकत नव्हते, कारण ते शस्त्रधारी झाल्यास वर्णव्यवस्थेला धोका पोचेल अशी भीती होती. स्मृतिग्रंथातून तशी अनेक वचने आहेत. शूद्र हे प्रजापतीच्या पायापासून जन्माला आले व उच्च त्रैवर्णिकांची सेवा करणे हा त्यांचा धर्म आहे, ह्या संस्कारांचा फास केवळ मध्ययुगांच्या शेवटपर्यंत चालू होता असे नव्हे, तर आजही सुटलेला नाही. म्हणूनच आजही परंपरागत उपनयनविधी आम्ही चालू ठेवला आहे. राजा हा देवाचा अंश असतो आणि शूद्रांत देवाचा अंश असणे शक्य नाही; म्हणून शिवाजी कितीही शूर असला तरी तो राजा होऊ शकत नाही असा आग्रह येथील पुरोहित वर्गाने धरला.

हा प्रश्न केवळ ब्राह्मण वर्गाचा किंवा व्यक्तिगत ह्या वा त्या पुरोहिताचा नव्हता हे अगदी ठासून सांगितले पाहिजे. शिवाजीच्या स्वराज्य-उद्योगात अनेक ब्राह्मण साथीदार होते. दादाजी कोंडदेव हे तर त्याचे गुरूच होते. मोरोपंतांसारखे अनेक ब्राह्मण पेशवेपदासारख्या महान पदावर होते. ते राजकारण-चातुर्य दाखवत व लढायाही करत असत. शिवाजीच्या आग्ऱ्याहून सुटका करून घेण्याच्या रोमांचकारक प्रयत्नांत त्र्यंबकपंत डबीर आणि रघुनाथपंत कोरडे ह्या महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी व कृष्णाजी काशी व विसाजी ह्या उत्तरेकडील ब्राह्मणांनी हिरोजी फर्जंद व मदारी ह्यांच्या इतकीच मोलाची कामगिरी केली आहे. हा प्रश्न ब्राह्मणांचा नव्हता, पण धर्मव्यवस्थेचा होता व परंपरेने ती पवित्र मानली जात होती. ब्राह्मण, वैश्य, शूद्रांसह सर्वांनी श्रद्धेने स्वीकारली होती. संतपरंपरेने ह्या धर्मव्यवस्थेत मानवतावादी आशय ओतण्याचा प्रयत्न केला, त्यावद्दलही त्यांचा छळ करण्यात आला.

शिवाजीला ह्या अडचणींना फार सुरुवातीपासून तोंड द्यावे लागले आहे, असे इतिहासात नमूद केलेल्या एका प्रसंगावरून दिसून येते. रांझे पाटील नावाच्या ब्राह्मणाने जेव्हा गावातील शेतकऱ्याच्या मुलीवर बलात्कार केला तेव्हा शिवाजीने त्याचे हात-पाय तोडण्याची शिक्षा दिली. तेव्हा रांझे पाटीलांनी मोरोपंताकडे गोतमुखाने न्याय द्यावा अशी मागणी केली. त्याचा अर्थ असा की, ब्राह्मणाला शिक्षा

देण्याचा अधिकार ब्राह्मणाशिवाय कोणाला नाही, असे रांझे पाटलांचे म्हणणे होते व ते धर्मसंमत होते; मोरोपंतांनी त्याला नकार दिला नाही. हिंदुधर्मीय स्मृती कायदा तसाच आहे. ब्राह्मण किंवा वरिष्ठ वर्णीय ह्यांना शिक्षा देण्याचा अधिकार एक राजाला किंवा गोतगणांच्या सभेला होता.

हा प्रश्न सोडवून आपले शासन प्रस्थापित करण्याकरिता, राज्याचे कायदेशीर परिवर्तन शासनात करण्याकरिता शिवाजीला राज्याभिषेक करवून घेणे भाग पडले. आदिलशाही, निजामशाही व मोगल ह्यांनी दिलेल्या सनदा किंवा अधिकार समाजमान्य होत्या व त्या सनदा बाळगणारे सुभेदार, वतनदार आपले स्थान कायदेशीर मानत होते. शिवाजी त्यांच्या दृष्टिकोनातून यशस्वी बंडखोरच राहिला होता. त्यांना नैतिक अधिष्ठान असल्याचा व ते शिवाजीला नसल्याचा त्यांचा प्रामाणिक दावा होता; म्हणून ते सरंजामदारीतील स्वामिनिष्ठेच्या मूल्यनिधानाची जपणूक करीत होते. अशा स्वामिनिष्ठेपायीच त्यांनी शिवाजीच्या स्वराज्य प्रयत्नांना कसून विरोध केला होता. शिवाजीला राज्यारोहण करणे प्राप्त होते कारण त्याच्या राज्याला वैधानिक पाया व नैतिक अधिष्ठान मिळणे आवश्यक होते.

शिवाजी खरोखरीच क्षत्रिय कुळातील होता काय? हा प्रश्न माझ्या दृष्टीने अगदीच क्षुल्लक आहे. कोणीही खरे ब्राह्मण, खरे क्षत्रिय किंवा खरे शूद्र होते काय? ह्याचे खरे उत्तर मूळ सामाजिक श्रमविभागणीत होते, ज्याचे पर्यवसान कुलपरंपरागत व्यवसाय विभाजनात आले. महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी वर्गाला शूद्रच मानण्यात येत होते. ह्या शूद्रांमधून शस्त्रधारी 'बारगीर' वर्ग निर्माण झाला. वर्णजात व्यवस्थेला दैवी, धार्मिक व नैतिक अधिष्ठान दिल्यामुळे ती अपरिवर्तनीय व कुलपरंपरागत झाली. शिवाजी क्षत्रिय होता. मी क्षत्रिय आहे तेव्हा मीसुद्धा थोर आहे किंवा तो 'भोसला' होता; आणि मी 'भोसला' आहे, म्हणून मी कोणी तरी थोर आहे असे मानणारी अर्धवट वेडगळ माणसे सोडली तर शिवाजी कुलपरंपरेने क्षत्रिय होता किंवा काय ह्या प्रश्नाला अर्थ नाही. पण महत्त्वाचा सामाजिक संशोधनाचा प्रश्न हा आहे की, अतुलनीय शौर्य, असामान्य धैर्य, विलक्षण कर्तृत्व असणाऱ्या शिवाजीला गागाभट्टाला बोलावून स्वतः क्षत्रिय असल्याचे सिद्ध करण्याची यातायात का करावी लागली? मी क्षत्रिय असेन वा शूद्र असेन, हे राज्य मी माझ्या कर्तृत्वाने स्थापन केले आहे तेव्हा मला राजा माना, असे शिवाजी का सांगू शकला नाही? वयाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी शिवाजीला मुंज करावी लागली. मंत्रविधीसह पुन्हा विवाह करावे लागले. दानदक्षिणा म्हणून लाखो रुपयांची उधळपट्टी करावी लागली. एवढे सर्व करूनही 'बेलभंडारा', अंबेचे कुंकू व निर्माल्य हाती घेऊन पुन्हा पुन्हा शपथ घेऊन त्याचे समाधान करावे लागले, तेव्हा याज्ञिक पूर्ण झाले. (पाहा : सभासद बखर लेख ८३, ८४, ९०) वेदमंत्रांचा घोष शिवाजीच्या कानावर पडू नये,

असा ब्राह्मणांनी आग्रह धरला तेव्हा 'ब्राह्मण हे आदरणीय आहेत. त्यांना राज्यकारभारात नोकराचे स्थान देणे योग्य नाही. देवाची पूजा करण्याचे काम त्यांच्यावर सोपवावे व इतर कामगिरीतून मुक्त करावे –' असे उद्‌गार शिवाजीने काढले. तेव्हा मोरोपंतांनी ब्राह्मणांच्या वतीने रदबदली केली. (९१ कलमी बखर, ८३)

शिवाजीवर ही जी आपत्ती आली (राज्यारोहणाची नव्हे तर आपण 'क्षत्रिय' असल्याचे जाहीर करण्याची) त्यामुळे महाराष्ट्रावर नंतरच्या इतिहासात एक सतत आपत्ती येत राहिली आहे. ती आपत्ती म्हणजे 'शिवाजी क्षात्रतेजाचा आविष्कार असल्याची खोटी प्रतिमा निर्माण करून' आपल्यात तसा आविष्कार पाहणारे अनेक प्रतिशिवाजी निर्माण झाले. शिवराज्याचा सामान्य जनांच्या हिताचा पाया पुढे पेशवाईने चालवलेल्या मराठेशाहीत उखडून निघालाच, पण त्यानंतरही शूद्रातिशूद्रांचा तिरस्कार करणारे शिवप्रतिमेचा वापर करू लागले. हरिजन वस्तीवर हल्ला करणारे गुंड व जातीयवादी आजही 'शिवाजी महाराज की जय' असा उद्‌घोष निर्लज्जपणे करतात. कारण त्यांच्यामागे चुकीचा इतिहास व इतिहासाची चुकीची दृष्टी असणारे नेते व विचारवंत असतात.

शिवाजीला राज्याभिषेक करवून घेणे व त्याकरिता क्षत्रिय असणे क्रमप्राप्त होते. ती सामाजिक चौकट शूर शिवाजीसुद्धा मोडू शकला नाही, त्याअर्थी ते व्यक्तिमत्व थोर नव्हते असे नाही. तसा आग्रह जे धरतात त्यांचे सामाजिक परिस्थितीवद्दलचे ज्ञान तोकडे आहे किंवा कुठल्याही ऐतिहासिक व्यक्तिमत्वाचे किंवा त्या काळच्या परिस्थितीचे विश्लेषण करताना ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धान्त वापरण्याचे पुरेपूर भान ते बाळगत नाहीत असेच म्हणावे लागेल.

शिवाजी व सरंजामदारी व्यवस्थेबाबतच्या धोरणावर बराच वाद झालेला आहे. काही वर्षांपूर्वी डॉ. पंढरीनाथ रानडे ह्यांनी शिवाजी कालानंतर झालेल्या सरंजामदारी व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख व पुरावे देऊन शिवाजी ह्या संदर्भात क्रांतिकारक नव्हता, असे सिद्ध करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी दिलेले पुरावे तर पेशवाईच्या काळातील होते. तेव्हा ह्या बाबतही पुन्हा एकवार विचार करणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्रातील वतनदारी हा शब्द जमीनविषयक विविध संबंधांबाबत सरसकटपणे वापरला जातो. महाराष्ट्रात पाटील, कुलकर्णी, महार, ब्राह्मण, पुरोहित ह्यांची वंशपरंपरागत वतने फार काळापासून म्हणजे मध्ययुगीन काळाच्या सुरुवातीपासून चालू होती. गावगाड्याच्या व बलुतेदारीच्या पद्धतीचा तो एक भागच होता. पाटील व कुलकर्णी ह्यांची वतने ही गावाचा कारभार चालवण्याकरिता, ज्याला आपण इंग्रजीमध्ये 'ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲपरटस म्हणतो'–त्याकरिता दिलेली होती. त्याची स्वतःची जमीन असे किंवा वसुलीचा काही भाग त्यांना मिळे किंवा दोन्ही पद्धतीनुसार ते हक्क गाजवीत. ही वतनदारी म्हणजे सरंजामशाही पद्धती किंवा यंत्रणेचा भाग असली

तरी मुख्य गाभा नव्हती. पाटील, कुलकर्णी ह्या मध्यस्थावरच्या स्तरात देशमुख, सरदेशमुख, अशा नावाचे असेही मध्यस्थ होते. साधारणपणे ही वतने जरी वंशपरंपरागत चालत तरी त्यात बदल करण्याचा यत्न होत असे. त्यावरही पंचहजारी, दशहजारी, सरदार, मोकाशी, जहागिरदार (वगैरे) असे त्याच्याही वरच्या स्तरांवरील वतनदार होते. त्यांचे अधिकार मोठे होते व त्यांच्या पदरी सैन्य असे. मुख्यतः हाच सरंजामदारीचा गाभा होता. शिवाजीने (जे शत्रू झाले नाहीत असे सोडून) बाकीची पाटील, कुलकर्णी किंवा लहानसहान देशमुख ह्यांची वतने खालसा केली नाहीत; नवी दिली आहेत, हे एकंदर पुराव्यावरून दिसून येते. पण नवीन मोकासे व जहागिरी देण्यास शिवाजीचा सक्त विरोध होता हे खालील उताऱ्यावरून दिसते.

'सरनोबतास व मुजुमदारास व कारकुनास व हुजुरांतील लोकांस तनखे वराता देत होते. सेत करत होते. त्याचा आकार रयतेप्रमाणे हक्कांत धरीत होते. वरकड वाटणी व बलकावरी वराता येणेप्रमाणे सालझडा वरचेवर करीत होते. लष्करास व हशमांस व गडास एकंदर मोकाशे महालगांव दरोवस्त देणे बरोबर नाही. जे देणे ते वरातेने द्यावे अगर पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखात सत्ता साहेबी कारकूनाखेरीज मुलकी अधिकारी कोणाची नाही. लष्करास व हशमांस व गडास देणे ते कारकूनांनी द्यावे. मोकाशी जाहलियाने रयत अफरा (अव्यवस्थित) होईल. कमाविशीची कैद (मुलकी अधिकाऱ्यांची सत्ता) चालणार नाही. रयत बळावली तर जागा जागा बंडे होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीनदार एक जाहलिया बेकैद होतील म्हणून मोकासे कोणास देणेच नाही' (सभासद पान २८)

ह्या उताऱ्यावरून असे स्पष्ट दिसते की, मोकासे किंवा जहागिरी देण्यापेक्षा शिवाजीराजे 'तनखे' म्हणजे पगारी अधिकारी नेमणे पसंत करीत होते. शिवाजीराजांनी जी मध्यवर्ती सत्ता स्थापन केली त्याचे मुलकी अधिकारी (कारकून) ह्यांच्याखेरीज इतरांची सत्ता अन्नधान्य करवसुलीबाबत चालू नये अशी स्पष्ट भूमिका शिवाजीने घेतली होती. जहागिरदारी, सरंजामदारी अधिकारांमुळे बेबंदशाही माजते, जनतेची लूट होते हे शिवाजीला कळून चुकले होते. शिवाजीराजांनी अशा रीतीने सरंजामदारीच्या गाभ्यास हात घालण्याचा प्रयत्न केला होता.

डॉ. सतीशचंद्र ह्या इतिहासज्ञाने शिवाजीच्या या प्रयत्नांचा उल्लेख करून त्यात शिवाजी राजे यशस्वी झाले नाहीत असा निर्वाळा दिला आहे. पण तेही सर्वस्वी बरोबर नाही. पश्चिम महाराष्ट्रात बंगाल, बिहारसारखी मोठी जमीनदारी व तशा तऱ्हेचे सरंजामी अवशेष शिल्लक राहिले नाहीत. ह्याचे श्रेय शिवाजीराजांना आहे. पेशवाईच्या काळात पुन्हा सरंजामदारी संबंधांना ऊत आला. नंतरचे अनेक सरदार पेशवाईच्या काळात उदयास पावले, ते मराठ्यांचे राज्य जेव्हा मध्यवर्ती सत्तेपासून दूर असणाऱ्या प्रदेशात पसरले तेव्हा आणि मुख्यतः तशा प्रदेशात उदयास पावले.

गुजरात, माळवा, मध्यप्रदेश, नागपूर, ग्वाल्हेर येथे नवी सरदार-सरंजामदार घराणी तेव्हा उदयास पावली. अर्थात त्या काळची दळणवळण वाहतूक व्यवस्था एवढी मागासलेली होती की, मध्यवर्ती सत्तेला स्वतः पगारी अधिकारी नेमून करवसुली करणे शक्य नव्हते. एका बाजूला राज्यविस्तार होणे व दळणवळण वाहतुकीच्या प्रगतीचा अभाव ह्यातून सरंजामदारी संबंधांचा म्हणजेच करवसुली करणाऱ्या मध्यस्थांचा उदय होतो, हे जगभर सिद्ध झालेले सत्य आहे. उत्पादनाच्या साधनाच्या विकासांवर समाजघडण अवलंबून असते, हे कुठल्याही सच्च्या भौतिकवाद्याने विसरता कामा नये. अन्यथा स्वप्नाळूपणे इतिहास व वर्तमान आकलन करून घेण्याची वृत्ती बळावल्याशिवाय राहत नाही.

महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांना उत्तर भारतापेक्षा वेगळी अशी रयतवारी पद्धतीची निम-सरंजामदारी पद्धती स्थापन करावी लागली. करवसुली करणाऱ्या लहानसहान वरिष्ठ वर्णीय अधिकाऱ्यांना व सावकारांना करवसुली न झाल्यास किंवा कर्जापोटी जमिनीवरचे मालकी हक्क बहाल केले गेले त्यातून आज दिसणारी महाराष्ट्रातील जमीनदारी निर्माण झाली आहे. अर्थात तो भाग आहे संशोधनाचा.


ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी ह्या देशातील सरंजामदारीचे स्वरूप बदलून टाकले. साम्राज्यवाद्यांशी साथ करील अशा तऱ्हेची जमीनदारी त्यांनी परमनंट सेटलमेंट ॲक्ट, रयतवारी ॲक्ट इत्यादी कायद्यांन्वये तयार केली. त्यामुळे त्या अगोदरच्या काळातील सरंजामदारी जमीनमालकी व सामाजिक संबंधाचा वास्तवपणे अभ्यास करण्यात गैरसमज व अडचणी निर्माण झाल्या. शिवाजीचा सरंजामदारी पद्धतीला असणारा विरोध व त्याचबरोबर मागासलेल्या भौतिक साधनांमुळे त्याच्या उद्दिष्टांवर पडणाऱ्या मर्यादा ह्याचा योग्य अभ्यास होऊ शकला नाही.

शिवचरित्राचा, त्या श्रेष्ठ व्यक्तिमत्वाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून योग्य अभ्यास होणे आवश्यक एवढ्याकरिता आहे की, स्वतंत्र भारतात नवी समतावादी समाजरचना निर्माण करताना आपल्या पुरोगामी ऐतिहासिक परंपरा आणि शिवाजीसारख्या लोकोत्तर पुरुषाची खरीखुरी ओळख नव्या पिढीला झाली पाहिजे. त्यातून त्यांना स्फूर्ती मिळाली पाहिजे. धर्म–जात–वर्ण–निरपेक्ष असा नवा समाज निर्माण करण्यात जाती–धर्म–वर्णवादी जे अडथळे निर्माण करीत आहेत, अशा दुरभिमानी शक्तींना शिवाजीच्या नावाचा उपयोग करता येता कामा नये.

ह्या शक्तींनी आजवर शिवाजीचे व्यक्तिमत्त्व व कार्य ह्याबाबत अत्यंत चुकीचे समज पसरवले आहेत, पोसले आहेत; आपल्या क्षुद्र हेतूकरिता त्या भव्य व्यक्तिमत्त्वाचा वापर केला आहे. हा प्रकार बंद व्हावा असा आग्रह सर्वांनी धरला पाहिजे.

(श्रमिक प्रबोधिनी प्रकाशित पुस्तिका)


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दाखल क्रमांक ३१०७
दिनांक


REFBK-0024664

राजीव साने	आमचे माहितीयुग
डॉ. राजीव जोशी	बुद्धिप्रामाण्यवादाची यथार्थता
माधव साठे	सामाजिक...ती विकृती; व्यक्तिगत...ती श्रद्धा
विनायक लिमये	इच्छामरणाचा हक्क हवाच !
ना. नि. देशपांडे	दोन इक्षुमहर्षी
आशा मुंडले	भाषेतून दिसणारी स्त्री
रघुपती भट्ट	विष्णुशास्त्री चिपळूणकर
मुकुंद निमखेडकर	पैठणी : सर्वाधिक किंमती वस्त्र
विजय सिन्हा	वास्तवात सुकलेला माणदेश
मनोहर कदम	शवय
जयंत गडकरी	शिवाजी : लोककल्याणकारी राजा